# माझा देश माझे लोक

## २



म. ग्रं. सं. ठाणे
विषय
REFBK-0009738

# माझा देश, माझे लोक

## भाग २ रा

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 22343 वि:
क्रमांक नों. दि.

लेखक

श्रीपाद जोशी

REFBK-0009738

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८७३८

प्रकाशक

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

जून १९५७

मुद्रक व प्रकाशक

**गो. वा. कुलकर्णी,**

प्रकाशन – महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

मुद्रण स्थळ – सेवा मुद्रणालय, १६७ बी वॉर्ड, कोल्हापूर.

प्रथमावृत्ति

**मूल्य ३ रु.**

# आभार !

'माझा देश, माझे लोक'चा पहिला भाग ऑक्टोबर १९५५ मध्यें प्रसिद्ध झाला. त्या वेळीं त्याच्या प्रस्तावनेंत मीं लिहिलें होतें कीं, " मराठी वाचकांकडून या संग्रहाचें कसें काय स्वागत होतें यावर याचे पुढील भाग निघणें न निघणें अवलंबून आहे. मीं स्वतः मात्र पुष्कळच आशावादी आहें; आणि या पुढचे भाग लौकरच निघतील अशी मला आशा वाटते." परंतु माझी आशा इतक्या लौकर सफल होईल आणि दीड वर्षांच्या आंतच दुसरा भाग बाहेर पडेल असें मात्र मला त्या वेळीं मुळींच वाटलें नव्हतें. त्यामुळें हा दुसरा भाग प्रकाशित होत असतां वाचक आणि प्रकाशक यांच्याबद्दल माझ्या मनांत विशेष कृतज्ञता निर्माण झाली आहे आणि त्यांच्या या प्रेमाबद्दल मी अत्यंत आभारी आहें. आतां यापुढील भाग तयार करण्यासाठीं मला नेटानें व त्वरेनें भारत-भ्रमण करावें लागेल. तें न केल्यामुळें पुढील भाग लौकर निघाले नाहींत तर त्याचा दोष वाचक किंवा प्रकाशक यांच्यावर न राहातां स्वतः मजवरच राहील याची जाणीव मला आहे.

या दुसऱ्या भागांत दक्षिण व उत्तर यांच्या जोडीला पश्चिम भारताचाहि फार मोठा हिस्सा आहे. गुजरात व महाराष्ट्र हे सध्यां जरी एका राज्यांत असले तरी सांस्कृतिक दृष्ट्या आपण दोघे एकमेकांचे शेजारीच आहोंत. त्या दृष्टीनेंच मी गुजरात–सौराष्ट्रांतील स्थानांचें व लोकांचें वर्णन केलेलें आहे.

पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत मीं लिहिलें होतें कीं, " कोणत्याहि धर्मांच्या, पंथाच्या अथवा प्रांताच्या लोकांबद्दल अनास्था अथवा अनादर दाखविण्याचा माझा हेतु कधींहि नव्हता व नाहीं...ते लोक माझेच आहेत ही भावना मी कधींच दृष्टीआड होऊं दिलेली नाहीं." त्याचाच

पुनरुच्चार मी या प्रस्तावनेंतहि करीत आहें. कारण आपल्या देशांतील कित्येक लोक आपला धर्म, आपली जात, आपला प्रांत यांच्या विषयीं इतके हळवे असलेले आढळतात कीं निरागस व निरोगी विनोदहि त्यांना समजूं शकत नाहीं; आणि एखाद्या गमतीदार उपमेवरूनहि ते लेखका-विषयीं गैरसमज करून घेतात. जुन्या सनातनी लोकांनीं अशी वृत्ति दाखविली तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं; परंतु चांगले सुशिक्षित तरुणहि जेव्हां भडकून जातात तेव्हां मात्र खरोखरींच मनाला दुःख होतें.

लालित्य आणि माहिती यांचा समन्वय करण्याची धडपड माझ्या प्रवासवर्णनांत मी नेहमीं करीत असतों. केवळ ललितलेखनाची हौस भागविण्यासाठीं मीं हे लेख लिहिलेले नाहींत या गोष्टीकडेहि मी वाचकांचें लक्ष नम्रपणें वेधूं इच्छितों. आणि त्याच दृष्टीनें त्यांनीं या लेखांचें मूल्य-मापन करावें अशी माझी विनंति आहे.

सदर संग्रहांतील लेख 'स्वराज्य', 'लोकसत्ता', 'पुरुषार्थ', 'हंस' व 'वसंत' या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. आपल्याजवळील ब्लॉक्स वापरण्यास दिल्याबद्दल 'वसंत', 'हंस' व 'पुरुषार्थ' यांच्या संपादकांचा मी अत्यंत आभारी आहें.

४२ नारायण, पुणें २
१० मे १९५७

– श्रीपाद जोशी

# अनुक्रम


| क. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १) | श्रवण बेळगोळ ... ... | १ |
| २) | श्रीरंगपट्टण ... ... | १६ |
| ३) | मैसूर ... ... ... | २७ |
| ४) | दक्षिणकाशी कांचीपुरम् ... ... | ३७ |
| ५) | पक्षितीर्थम् ... ... | ४६ |
| ६) | महाबलिपुरम् ... ... | ५६ |
| ७) | मद्रास ... ... ... | ६५ |
| ८) | प्रेक्षणीय वाराणसी ... ... | ७४ |
| ९) | महागुजरातच्या वाटेवर ... ... | ८४ |
| १०) | बडोद्यांतील दोन दिवस ... ... | ९१ |
| ११) | अहमदाबाद ... ... | ९७ |
| १२) | सांस्कृतिक शहर—भावनगर ... | १०४ |
| १३) | जय सोमनाथ ... ... | १०८ |
| १४) | गांधीजींच्या जन्मभूमींत ... ... | ११७ |
| १५) | कंडला बंदर ... ... | १२२ |
| १६) | आपला प्रेमळ शेजारी सौराष्ट्र ... | १४४ |
| १७) | सौराष्ट्राची राजधानी राजकोट ... | १५१ |
| १८) | गिरनार ... ... | १५४ |
| १९) | जुनागड ... ... | १६१ |
| २०) | शत्रुंजय—जैनांची मंदिरनगरी ... | १६६ |
| २१) | मोरवी ... ... | १७२ |

# .... शुद्धिपत्र ....

| पान | ओळ (वरून) | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १८ | तर | तर कधीं |
| १६ | ४ व ५ | रंगेलपणा | रगेलपणा |
| २० | ३ | दिलें | न दिलें |
| ७६ | १२ | नालेप्रमाणें | नालाप्रमाणें |
| ,, | १९ | केल्यावर | केला |
| ७८ | ८ | मध्यांवर | माथ्यावर |
| ८५ | २३ | ‘वेदसंदेश’ | ‘वेदसंदेश’ व ‘वसुंधरा’ |
| ९५ | १६ | व्हेक | व्हेल |
| १०६ | २० | वीराजी | वीराणी |
| ,, | २८ | यशवंतराव | यशवंतराय |
| ११२ | ७ | दोन | दोन फूट |
| १२७ | ७ | जीवनराम | जीवतराम |
| १५७ | २४-२५ | ‘गिरनारच्या–आहेत’ | हीं वाक्यें गाळावींत. |


—*—

स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................

# माझा देश



# माझे लोक



समुद्रकिनाऱ्यावरील मंदिर (शोअर टेंपल)
(महाबलिपुरम्) पृष्ठ ५७



नकुलसहदेवाचा रथ (महाबलिपुरम्) पृष्ठ ६४

# श्रवण बेळगोळ : १

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

## फारा दिवसांची इच्छा

१९४८ सालीं मंगळूर (दाक्षिण-कानडा) जवळील वेणूर आणि कारकळ येथील टेकड्यांवरील अनुक्रमें ३५ व ४२ फूट उंचीच्या बाहुबली गोमटेश्वराच्या दगडी मूर्ती मीं पाहिल्या होत्या. त्याच वेळीं, श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराची ५८ फूट उंचीची अखंड प्रस्तर–मूर्ति आपण केव्हां तरी पाहिली पाहिजे अशी इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झालेली होती. कांचीपुरम्‌च्या सर्वोदय सम्मेलनाच्या निमित्तानें आठ वर्षांनीं का होईना, ती इच्छा नुकतीच पूर्ण झाली आणि देशांतील सर्वांत उंच प्रस्तर–मूर्ति पहायचें समाधान मनाला लाभलें. तसा गोमटेश्वराच्या दर्शनाचा मला कांहीं धार्मिक ध्यास लागलेला नव्हता; पण दोन मूर्ती पाहिल्यानंतर तिसरी मूर्तिहि अवश्य पाहिली पाहिजे, अशी जी भावना मनांत निर्माण झालेली होती तिला महत्त्व हें होतेंच.

## माहितीच्या अभावामुळें झालेली धांवपळ

रात्रीं दहाच्या बंगलोर–मेलनें निघून आम्ही दुसऱ्या दिवशीं रात्रीं (किंवा तिसऱ्या दिवशीं पहांटे) दीड वाजतां ‘ अर्सीकेरे ’ जंक्शनवर उतरलों. येथून सरकारी बस–सर्व्हिसप्रमाणेंच खासगी गाड्याहि सुटतात. आम्ही सुमारें ५० लोक होतों. त्यामुळें एक स्वतंत्र बस आम्हांला मिळूं शकली असती. म्हणून आम्ही तशा त्या मध्यरात्रीं बसवाल्याच्या शोधांत बाहेर पडलों. एका हमालाच्या मदतीनें बस–एजंटाचें घर शोधून काढलें. एजंटाला उठविलें. त्यानें मुळींच त्रागा न करतां आमचें म्हणणें ऐकून घेतलें आणि तो आम्हांला घेऊन ड्रायव्हरच्या घरीं गेला. घरीं म्हणजे घराजवळ! आम्ही गल्लीच्या तोंडाशीं थांबलों आणि तो त्याच्या घरांत

जाऊन बोलूं लागला. अर्थात् त्यांचें बोलणें कानडींत चाललेलें असल्यामुळें आम्ही तेथें गेलों असतों तरी आम्हांला त्यांतील फारसें कांहीं कळलें नसतेंच !

सुमारें अर्धा तास विचारविनिमय केल्यानंतर एजंट आमच्याजवळ येऊन सांगूं लागला, 'सकाळीं सात खेरीज गाडी चालवायला सरकारी परवानगी नाहीं. तुम्ही सकाळींच या.'

आम्हांला वेळ वांचवायचा होता, म्हणून आम्ही थोडी लांचलुचपत द्यायलाहि तयार झालों. दर माणशीं आठ आणे जास्त द्यायची आम्हीं तयारी दर्शविली. प्रत्येकीं एक रुपया जास्त मिळाल्यास तावडतोब निघायला तो तयार झाला. त्यावरून कायद्याची अडचण मुख्य नसावी असें आम्हीं ताडलें. पण तीन–चार तासांसाठीं एक रुपया जास्त द्यायला आमचे कांहीं सहकारी तयार झाले नाहींत.

या सगळ्या गडबडींत अर्सीकेरेहून हसनला जाणारी गाडी भरून गेली होती. त्यामुळें सकाळपर्यंत थांबणें आम्हांला भाग पडलें. सकाळीं माणशीं २ रुपये भाडें देऊन आम्हीं सबंध बस भाड्यानें घेतली. (येथून खरें भाडें दीड रुपाया आहे असें म्हणतात.) ३० उतारूंच्या जागेंत आम्ही ५० लोक बसलों. तरी ड्रायव्हरची हांव कांहीं सुटत नव्हती. मधूनच एखादी 'सीट' मिळाली तर ती गाडींत कोंबायचा तो प्रयत्न करीत होता आणि आम्ही तो हाणून पाडायचा–कधीं यशस्वी, तर अयशस्वी–प्रयत्न करीत होतों.

## सुंदर डांबरी रस्ता

म्हैसूर संस्थानांतले रस्ते मला नेहमींच आवडतात. संस्थानी राजवटींत हे रस्ते फारच उत्कृष्ट होते. स्वराज्यांतील इतर अनेक गोष्टींप्रमाणें त्या रस्त्यांना सध्यां अवकळा आलेली आहे. पण तरीहि ते आमच्याकडील रस्त्यांपेक्षां किती तरी चांगल्या स्थितींत आहेत. डांबरी रस्त्यांवरून गाडी घरंगळत जाऊं लागली म्हणजे मोठी गंमत वाटते.


दक्षिणेंत आल्याबरोबर एक शब्द आम्हीं शिकून घेतला, आणि दक्षिणेच्या सबंध प्रवासांत त्यानें आमची साथ केली. तो शब्द म्हणजे 'रैट !' 'राइट' (right) या इंग्रजी शब्दाचें तें लोकसुलभ रूप

आहे. मोटार सुरू करण्याचा इषारा किंवा संमति देण्यासाठीं गाडीचा क्लीनर किंवा कंडक्टर 'रैट' म्हणतो. तो हा शब्द इतक्या ढंगदारपणें उच्चारतो कीं, आपल्याला त्या शब्दाबद्दल मोठा आपलेपणा वाटूं लागतो. गाडीला उशीर होऊं लागला कीं आम्ही सर्वजण एक सुरांत 'रैट' नामाचा गजर करीत असूं!

## दुरून दर्शन झालें नाहीं !

अर्सीकेरे ते श्रवण बेळगोळ या ४२ मैलांच्या प्रदेशांत विशेष प्रेक्षणीय अशी वनश्री किंवा डोंगरपर्वत नाहींत. तरी पण सकाळची वेळ असल्यामुळें अधूनमधून दिसणारीं हिरवीं भातशेतें आणि नारळीच्या बागा यांनीं मन चांगलेंच प्रसन्न होत होतें. वाटेंत तिपटूरला गाडी अर्धा तास थांबली. या ठिकाणीं उत्कृष्ट आंबे मिळाले. दक्षिणेकडे त्यांतल्या त्यांत चांगले आंबे म्हैसूर प्रदेशांतच मिळतात. (अर्थात् रत्नागिरी किंवा गोवा येथील आंब्यांची सर त्यांना मुळींच नसते!) मद्रासकडे तोतापुरी आणि नीलम सारखे पोटभरू आंबेच मिळतात. तिपटूरचे आंबे लक्षांत रहाण्याचें कारण म्हणजे येथें आंबे सोलून मिळतात; आणि त्या सोलण्यामध्यें एक विशेष कौशल्य असतें. आंब्याला एकदां सुरी लावली कीं सबंध साल काढून झाल्याखेरीज ती वर उचलीत नाहींत. त्यामुळें सालीचा तुकडा न पडतां एखाद्या सुंदर माळेप्रमाणें ती अखंड निघते. आंबेवाल्यांचें तें कौशल्य पहाण्यासाठींच केवळ, आमच्यापैकीं अनेकांनीं आंबे विकत घेतले. दोन आंब्यांत पोट भरून जाई. आणि किंमत काय, तर तीन पैशांपासून सहा पैशांपर्यंत! आंब्याचें नांव 'रसपुरी'! तें सार्थ होतें यांत शंका नाहीं.

बाहुबली गोमटेश्वराची ५८ फूट उंचीची मूर्ति ४७० फूट उंचीच्या (समुद्रसपाटीपासून ३३४७ फूट) टेकडीवर असल्यामुळें ती खूप दूर अंतरावरून दिसत असावी अशी माझी कल्पना होती; आणि कांहीं लेखकांनीं ती कित्येक मैलांवरून दिसते असें लिहूनहि ठेवलेलें आहे. म्हणून मी मोठ्या उत्सुकतेनें बाहेर डोकावून पहात होतों. पण अगदीं जवळ जाईपर्यंत—३—४ मैल अंतरावर जाईपर्यंत — ती मूर्ति दिसत नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव आला. याचें कारण त्या मूर्तीच्या सभोंवतीं असलेला



मूर्तीच्या डाव्या हाताशेजारीं लेखक उभा आहे.

दगडी तट हेंच असावें अशी माझी समजूत आहे. प्रथम एखादा दगडी खांब टेकडीवर उभारलेला असावा असा भास होतो आणि मग जवळ गेल्यानंतर मानवी आकृति स्पष्ट दिसूं लागते.

श्रवण बेळगोळ हें 'इंद्रगिरि' आणि 'चंद्रगिरि' या दोन टेकड्यांच्या बेळक्यांत वसलेलें छोटेसें टुमदार गांव आहे. तांब्या–पितळेच्या भांड्यांविषयीं हें गांव प्रसिद्ध आहे. यामुळें दिवसभर तांबटांच्या हातोड्यांचा 'ठक् ठक्' असा आवाज कानावर पडत असतो. इंद्रगिरीच्या पायथ्याशीं असलेल्या दिगंबर जैनांच्या एका धर्मशाळेंत आम्हीं मुक्काम केला आणि स्नानासाठीं पाण्याच्या शोधार्थ बाहेर पडलों.

## स्वच्छ पाण्याची टंचाई

आपल्या देशांत सर्वांत अधिक दुष्काळ जर कोणत्या गोष्टीचा असेल, तर तो म्हणजे स्वच्छतेचा. दक्षिणेकडे थोडीफार का होईना, स्वच्छता पहायला मिळते; पण जसजसें उत्तरेकडे जावें तसतसा तिचा अभाव वाढत जातो आणि काशीला अगदीं कडेलोट होतो, हें मला स्वानुभवानें माहीत झालेलें होतें. म्हणून येथें स्नानाला स्वच्छ व भरपूर पाणी मिळेल अशी अपेक्षा होती. पण ती चुकीची असल्याचें लौकरच प्रत्ययास आलें. धर्मशाळेच्या आवारांतील विहिरीचें पाणी बादलीनें काढलें तर त्यांतून मेलेल्या दोन घुशी वर आल्या! त्यामुळें तें पाणी तोंडांत घालण्याची इच्छाच होईना. म्हणून जवळच्या तलावावर गेलों, तों तेथील पाण्यावर शेवाळ माजलेलें! वस्तुतः आपल्या ज्या पूर्वजांनीं हे तलाव बांधले असतील, त्यांच्या मनांत लोकांना शुद्ध व स्वच्छ पाणी मिळावें अशीच इच्छा असली पाहिजे; पण आपण स्वच्छतेच्या बाबतींत इतके बेफिकीर बनलों आहोंत, कीं आपल्याला स्वच्छ करणाऱ्या पाण्यालाच आपण अस्वच्छ करून टाकलें आहे. या बाबतींत जैन तरी कसे अपवाद असणार? पावापुरीच्या सुंदर तलावाची तेथील लोकांनीं कशी नासाडी करून टाकली आहे हें मीं प्रत्यक्षच पाहिलेलें होतें. त्यामुळें त्यांच्याकडून विशेष स्वच्छतेची अपेक्षा मीं बाळगली नव्हती. तरी पण श्रवण बेळगोळच्या पाण्याची स्थिति पाहून मला मोठा विषाद वाटला.

## ‘ बेळगोळ ’ म्हणजे ‘ श्वेत कुंड ’

‘ श्रवण ’ अथवा ‘ श्रमण ’ म्हणजे जैन ( किंवा बौद्ध ) संन्यासी. बाहुबली गोमटेश्वर हे असेच श्रवण किंवा सिद्ध पुरुष होऊन गेले आहेत. त्यामुळें त्यांची मूर्ति ज्या ठिकाणीं आहे त्याला ‘ श्रवण बेळगोळ ’ हें नांव पडलें. ‘ बेळ ’ म्हणजे ‘ पांढरें ’ आणि ‘ कोळ् ’ म्हणजे कुंड. ‘ बेळ् ’ व ‘ कोळ् ’ यांच्या समासामुळें ‘ कोळ् ’चें ‘ गोळ ’ झालें. या गांवाच्या मध्यभागीं ‘ कल्याणी ’ नांवाचें जें तळें आहे, तेंच हें ‘ श्वेत कुंड. ’ पण आतां त्याचें पाणीहि अगदीं हिरवेंगार आहे. आम्ही गेलों त्या वेळीं कांहीं बायका त्या पाण्यांत कपडे धूत होत्या; पण त्या पाण्यामुळें कपडे स्वच्छ होण्याऐवजीं जास्तच घाण होत आहेत असें आम्हांला वाटलें.

एके काळीं हें स्थान खूप भरभराटीला आलेलें असावें असें शिला-लेखांवरून वाटतें. इसवी सनापूर्वीं तिसऱ्या शतकांत सम्राट् चंद्रगुप्त मौर्य आपलें साम्राज्य सोडून येथें येऊन राहिला होता, असें सिद्ध करणारा शिलालेखीय पुरावा येथें आढळलेला आहे. आपले गुरु अंतिम श्रुतिकेवली भद्रबाहु यांच्याबरोबर तो येथें आला आणि कांहीं वर्षें तपश्चर्या केल्यानंतर सल्लेखना क्रियेच्या द्वारें ( आमरण उपोषण करून ) त्यानें येथें देहत्याग केला असें म्हणतात.

## इंद्रगिरीची मजेदार टेकडी

ज्या टेकडीवर गोमटेश्वराची मूर्ति आहे, तिचें नांव ‘ इंद्रगिरि. ’ स्थानिक लोक हिला ‘ दोड्डु बेट्ट ’ ( ‘ मोठा डोंगर ’ ) असेंहि म्हणतात. ही टेकडी अंडाकार असून एखादी भली मोठी दगडी वाटी पालथी घातलेली असावी असा दुरून भास होतो. सबंध टेकडी म्हणजे जणूं एकच दगड आहे. या दगडांत पायऱ्या खोदलेल्या आहेत, त्यामुळें वर चढणें फार सोपें जातें. सुमारें पांचशें पायऱ्या आहेत. त्या वर चढून जाईपर्यंत सामान्य माणसाला चांगलाच थकवा येतो. पण वरून सभोंवतालचें जें सुंदर दृश्य दिसतें आणि गार वारें अंगाला गुदगुदल्या करतें, त्यामुळें सारा थकवा क्षणांत नाहींसा होतो आणि आपण ताजेतवाने होऊन हिंडण्यास तयार होतों. खालीं असतांना जें कल्याणी तळें गलिच्छ वाटत असतें, तेंच

आतां मोठें मनोहर दिसूं लागतें. त्याच्या चारी बाजूंना उत्कृष्ट दगडी पायऱ्या केलेल्या असल्यामुळें वरून तें खरोखरीच एखाद्या कुंडासारखें दिसतें. त्याचें गोपुर तर छानच खुलून दिसतें. इंद्रगिरि ही एक प्रचंड शिळाच असल्यामुळें अगदीं माथ्यावर जाईपर्यंत वाटेंत झाड किंवा झुडूपहि दिसत नाहीं. पण संन्याशाच्या तुळतुळीत मस्तकाप्रमाणें दिसणाऱ्या त्या टेकडीचा मोहकपणा मात्र त्यामुळें मुळींच कमी होत नाहीं.

## ' गुळ्ळकायज्जि 'ची कलापूर्ण मूर्ति

वर गेल्यानंतर ब्रह्मदेव मंदिर, चोवीस तीर्थंकरांची बस्ती, चेन्नण्ण बस्ती, ओदेगल बस्ती, त्यागद ब्रह्मदेव स्तंभ, अखंड बागिलु ( अखंड द्वार ), सिद्धर बस्ती, वगैरे अनेक गोष्टी पहाण्यासारख्या आहेत. पण त्यांचें महत्त्व मुख्यतः धार्मिक दृष्टीनें आहे. कलात्मक दृष्ट्या त्यांत विशेष कांहीं आढळत नाहीं.

सिद्धर बस्तीच्या पश्चिमेला गोमटेश्वराच्या समोरच ' ब्रह्मदेव स्तंभ ' नांवाचें एक छोटेसें देऊळ आहे. त्याच्या वरच्या भागांत ब्रह्माची मूर्ति असून खालीं ' गुळ्ळकायज्जि ' नांवाच्या स्त्रीची पांच फूट उंचीची एक कलापूर्ण मूर्ति आहे. हिच्या हातांत ' गुळ्ळकायि ' नांवाचें ( वांग्याच्या जातीचें ) एक जंगली फळ आहे. तें छोट्याशा नारळासारखें किंवा नारळाच्या करवंटीसारखें दिसतें. या स्त्रीच्या चेहऱ्यावरील प्रसन्न भक्तिभाव, कंबर किंचित् वांकडी करून उभें रहाण्याची तिची ढब, तिच्या डोळ्यांतील उत्सुकता हीं सर्वच मोठीं पहाण्यासारखीं आहेत.

हिच्यासंबंधीं प्रचलित असलेली आख्यायिका मोठी उद्बोधक आहे :

चामुंडरायानें गोमटेश्वराची मूर्ति तयार करविल्यानंतर मूर्तीच्या अभिषेकाची तयारी मोठ्या थाटामाटांत केली होती. परंतु प्रत्यक्ष अभिषेकाच्या वेळीं मूर्तीच्या मस्तकावरून घातलेलें शेंकडो घागरी दूध कसेंबसें मूर्तीच्या मांड्यापर्यंतच पोंचत होतें. दुधानें सर्व मूर्ति माखून निघाल्याखेरीज अभिषेक पूर्ण कसा होणार ?

अखेर एक गरीब म्हातारी तेथें आली. तिनें गोमटेश्वराच्या अभिषेकासाठीं ' गुळ्ळकायी 'मधून थोडेसें दूध आणलें होतें. ( कुणी म्हणतात

कीं, तिनें स्वतःच्या स्तनांतील दूध काढून जवळच पडलेल्या करवंटीमधून तें मूर्तीवर घातलें!) तें दूध मूर्तीवर घालतांच सारी मूर्ति दुधानें न्हाऊन निघाली. एवढेंच नव्हे, तर त्या दुधाचा ओघळ टेंकडीवरून खालीं वाहूं लागला!

आपण इतकी प्रचंड मूर्ति बनविली, या कल्पनेनें चामुंडरायाला भयंकर गर्व चढलेला होता. त्याचा तो गर्व उतरवण्यासाठीं पद्मावतीदेवीच म्हातारीचें रूप घेऊन आली होती असें म्हणतात. तें कांहींहि असो, श्रीमंतांची अहंकारी भक्ति आणि गरिबांची सच्ची विनम्र भक्ति यांतील तफावत दाखवून न्यायाचा कांटा गरिबांकडे झुकता ठेवण्याची जी एक परंपरा आपल्याकडे चालत आलेली आहे, तिला अनुरूप अशीच ही दंतकथा आहे. या 'गुळ्ळकायज्जी'ची ही मूर्ति चामुंडरायानेंच येथें स्थापन केली असें म्हणतात. त्यावरून खऱ्या भक्तीची कदर करण्याइतका तो उदार होता एवढें तरी मानावेंच लागेल.

येथून समोरच गोमटेश्वराच्या मूर्तीभोंवतालचा उंच तट आहे. दरवाज्यांतून आंत शिरलें कीं बाहुबली गोमटेश्वराची जगप्रसिद्ध प्रचंड मूर्ति दृष्टीला पडते आणि आश्चर्यानें आपलें मन थक्क होऊन जातें.

**गोमटेश्वर कोण होते?**

या गोमटेश्वरांचा इतिहास मोठा रोमांचक आहे. जैनांचे प्रथम तीर्थंकर, पुरुदेव (अथवा आदिनाथ) यांना यशस्वती आणि सुनंदा या नांवाच्या दोन राण्या होत्या. त्यांना अनुक्रमें भरत व बाहुबली (अथवा भुजबली) नांवाचे दोन मुलगे झाले. यांपैकीं भरत हा अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि शूर होता. बाहुबली शूर असला तरी महत्त्वाकांक्षी नव्हता. तो आपल्या राज्यांत सुखासीन राहूं लागला.

भरतानें दिग्विजय करून सारें जग जिंकलें. परंतु बाहुबलीचें राज्य जिंकल्याखेरीज त्याचा दिग्विजय पूर्ण होणार नव्हता. म्हणून त्यानें 'दाक्षिणांक' नांवाच्या आपल्या मित्राला बाहुबलीकडे पाठवून त्याला वश करून घेण्यास सांगितलें. परंतु बाहुबली त्याच्या तावडींत सांपडला नाहीं. अखेर त्या दोघांत दृष्टियुद्ध, जलयुद्ध व मल्लयुद्ध झालें. त्यांत

बाहुबलीनें भरताचा पराभव केला. पण त्याच वेळीं त्याच्या मनात असा विचार आला कीं, जें राज्य अथवा जी संपत्ति भावाभावांत शत्रुत्व निर्माण करते तिचा माणसाला काय उपयोग? आणि उभ्या उभ्या तपश्चर्या करूं लागला. त्याच्या शरीराच्या आसपास झाडेंझुडपें उगवलीं, वारुळें वाढलीं, त्याच्या शरीरावर वेली चढल्या, तरीहि बाहुबली जागचा हालला नाहीं. अखेर भरताच्या मनांतलें किल्मिष नाहीसें झालें, त्यानें बाहुबलीजवळ येऊन त्याची प्रार्थना केली आणि त्याप्रमाणें बाहुबलीनें आपली तपश्चर्या पुरी केली. राजैश्वर्यांत आणि सुखाविलसांत गढून गेलेला बाहुबली आपल्या तपोधनानें जितेंद्रिय झाला आणि वैराग्यक्षेत्रांतील सर्वांत उच्च 'केवली' ही पदवी त्याला मिळाली! (आत्मा आणि परमात्मा यांच्यांतील निरक्षेप ऐक्याचें ज्ञान ज्याला झालेलें आहे, अशा संन्याशाला जैन धर्मशास्त्रामध्यें 'केवली' असें म्हणतात.)

त्यामुळें बाहुबली म्हणजे तपश्चर्येच्या क्षेत्रांतील एक आदर्श पुरुष, असें समीकरण आपोआपच निर्माण झालें.

## 'श्रीचावुंडरायें करवियलें'

मराठी साहित्याच्या इतिहासांत या गोमटेश्वराच्या मूर्तीला एक वेगळेंच महत्त्व प्राप्त झालेलें आहे. मूर्तीच्या पायांशीं 'श्रीचावुंडरायें करवियलें' व 'गंगसुत्ताले करवियलें' हीं दोन मराठी वाक्यें जुन्या नागरी लिपींत कोरलेलीं आहेत. महाराष्ट्रापासून शेंकडो मैल दूर असलेल्या या प्रदेशांत मराठी गद्याचे आद्य नमुने समजलीं जाणारीं हीं वाक्यें खोदलीं जावींत याचें कारण काय असावें? गंगवंशीय राजा सत्यवाक्य अथवा राचमल्ल अथवा राजमल्ल (इ. स. ९७४ ते ९८४) याचा मंत्री चामुंडराय यानें इ. स. ९८३ किंवा १०२८ सालीं (विभव संवत्सराच्या चैत्र शुद्ध पंचमीस, रविवारीं) ही मूर्ति स्थापन केली. त्याचा महाराष्ट्राशीं कांहीं संबंध होता काय? कीं कर्नाटकांतहि मराठींतील उल्लेख अपरिहार्य ठरावा इतकें त्या भाषेचें तेज त्या काळीं पसरलेलें होतें? कीं शेजारची प्रांत-भाषा म्हणून मराठीला स्थान मिळालें असावें? मूर्तीच्या दुसऱ्या बाजूला कन्नड व तामिळ भाषांतून (लिपींतूनहि) हाच मजकूर लिहिलेला

आहे. तामिळ ही मराठीसारखीच कन्नडची शेजारभाषा. त्यामुळें पूर्वेच्या व उत्तरेच्या शेजारभाषांना चामुंडरायानें कानडीच्या बरोबरीनें स्थान दिलें असावें असें वाटतें.

चामुंडरायानें समोरच्या चंद्रगिरि डोंगरावरून मारलेला बाण इंद्रगिरीवरील ज्या शिळेला लागला, तिच्यांतून ही मूर्ति आरिष्टनेमीमुनीच्या देखरेखीखालीं बनविण्यांत आली असें म्हणतात. शंभर-शंभर फूट उंचीच्या शिळा या भागांत पहायला मिळतात. तशीच एखादी शिळा या डोंगरावर असावी. कारण एवढा मोठा दगड खालून वर नेणें कोणालाहि शक्य नाहीं. या भागांतील शिळा जरी वरून काळ्या दिसत असल्या तरी आंतून त्या पांढऱ्या शुभ्रच असतात. इंद्रगिरि डोंगरहि असाच पांढऱ्या शुभ्र दगडांचा आहे. हा दगड पुष्कळच मऊ असतो. त्यामुळें त्यांत मूर्ति कोरणें सोपें जात असलें पाहिजे. गोमटेश्वराची मूर्ति अगदीं पांढरी शुभ्र व गुळगुळीत आहे.

**भव्यतेचें दडपण**

गोमटेश्वराची ही मूर्ति संपूर्ण नग्न असून (वर्षानुवर्षें तपश्चर्या करीत राहिल्यावर अंगावरील वस्त्र टिकणें कसें शक्य आहे ?) उत्तराभिमुख आहे. तिच्या भुजा विशाल असून दोन्ही हात सरळ खालीं सोडलेले आणि बोटें मोकळीं आहेत. मूर्तीच्या आकाराच्या मानानें गुडघ्यापासून खालचा भाग किंचित् लांडा आणि जाड झालेला आहे. मांड्यापर्यंतचा भाग मागील बाजूच्या हत्तीसारख्या खडकावर टेकलेला आहे. त्यामुळें मूर्तीला एक प्रकारें आधार मिळालेला आहे. वरचा भाग मात्र निराधार आहे. गुडघ्यापर्यंत दोन्ही बाजूंना दोन छोटे दगडी उंचवटे आहेत. ते सापांच्या वारुळासारखे दिसतात. त्यांतील साप मात्र बदकांसारखे दिसतात! पायांमधून दंडापर्यंत मांड्यांना व हातांना वेष्टून माधवी लता वर गेलेली आहे. या वेलीची कलाकुसर खूपच नाजूक आहे. सारी मूर्ति कमळाच्या फुलावर उभी आहे. वस्तुतः इतक्या प्रचंड मूर्तीला आसन म्हणून कमळाच्या नाजूक फुलाची योजना न करतां एखादें कणखर प्रतीक घ्यायला हवें होतें, असा विचार माझ्या मनांत येऊन गेला. पण जुनें

अनुक्रम ........ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ........

परंपरागत प्रतीक सोडण्याची हिम्मत त्या कलाकाराला झाली नसावी.

मूर्तीच्या भव्यतेचें दडपण जितकें झटकन् मनावर पडतें तितकी तिच्यांतील सौंदर्याची छाप मात्र मनावर पडत नाहीं. मुख्य म्हणजे या मूर्तीचा चेहरा अगदींच भावहीन दिसतो. शरीराच्या अवयवांत बांधेसूदपणा नाहीं. कांहीं अवयव तर अगदीं उघड उघड कृत्रिम दिसतात. कमरेला आकार नाहीं. पोटाचा भाग वाजवीपेक्षां बारीक दाखविलेला आहे. (कदाचित् उपासाचें सूचन करायचें असेल!) पाठ अगदीं सपाट आहे. डावा कान उजव्या कानापेक्षां किंचित् मोठा आहे. भुंवया कोरीव असून खालचा ओठ फारच जाड आहे. केसांचा कुरळेपणा अगदीं यांत्रिक करण्यांत आलेला आहे. स्तनाग्रें आणि त्यांच्या भोंवतींचीं वलयें कृत्रिम वाटतात.

तरीहि फर्ग्युसन म्हणतो, "Nothing grandeur or more imposing exists anywhere out of Egypt and even there no known statue surpasses it in height or excells it in perfection of art in exhibits." ('इजिप्तखेरीज जगांत अन्यत्र कोठेंहि या मूर्तीहून अधिक भव्य व प्रभावशाली मूर्ति विद्यमान नाहीं; आणि तेथें देखील या मूर्तीहून अधिक उंच आणि कलापूर्ण मूर्ति अद्यापि आढळलेली नाहीं.')

प्रथमदर्शनीं मूर्तीच्या भव्यतेची जी छाप पहाणाऱ्यावर पडते तिच्यामुळें सामान्य माणसाचें मतहि फर्ग्युसनप्रमाणेंच होतें. पण जरा चिकित्सक दृष्टीनें पाहूं लागलें म्हणजे मूर्तींतील दोष दिसूं लागतात. ही मूर्ति पहात असतां माझ्या डोळ्यांसमोर वेणूर आणि कारकळच्या बाहुबली गोमटेश्वराच्याच मूर्ती पुन:पुन्हां उभ्या रहात होत्या. त्या मूर्तिहि मूळच्या पांढऱ्या दगडाच्याच; पण ऊन्ह, पाऊस आणि आबाळ यांचा मारा खाऊन त्या काळवंडल्या आहेत. तरीहि त्या श्रवण बेळगोळच्या मूर्तीपेक्षां जास्त कलापूर्ण आणि म्हणून अधिक आकर्षक वाटतात. त्यांतहि वेणूरची मूर्ति सर्वांत लहान असूनहि तिचा चेहरा भावपूर्ण आहे आणि तोंडावर स्मितहास्य आहे. त्यामुळें मूर्ति लहान असली तरी सजीव वाटते. कितीहि वेळ त्या मूर्तीकडे पाहिलें तरी मनाची तृप्ति होत नाहीं. एक

प्रकारचें अद्‌भुत आकर्षण त्या मूर्तीच्या चेहऱ्यामध्यें आहे. पण ती आकारानें लहान असल्यामुळेंच बहुधा तिच्याकडे कोणाचें लक्ष गेलेलें नसावें. गरिबाच्या काळ्यासांवळ्या, पण वास्तविक सुंदर मुलाचें कौतुक करण्याऐवजीं श्रीमंताच्या गोऱ्यागोमट्या, पण बेढब मुलाचें कौतुक करण्याकडेच सामान्य लोकांची प्रवृत्ति असते, नाहीं का ? या मूर्तीच्या प्रचंडपणामुळें आपल्या मनावर एवढें दडपण निर्माण होतें कीं, कलेच्या खऱ्या कसोट्या तिला लावायला आपण तयारच होत नाहीं

## चामरवाहकांच्या सुंदर मूर्ती

फार दूर कशाला, या गोमटेश्वराच्या मूर्तीच्या पायाशींच डावीकडे एक आणि उजवीकडे एक अशा दोन छत्र–चामरवाहकांच्या सुमारें सहा फूट उंचीच्या ज्या सुंदर मूर्ती आहेत, त्यांच्याकडे कितीजणांचें लक्ष जात असेल ? त्यांपैकीं उजव्या बाजूची मूर्ति यक्षाची असून डावीकडील यक्षिणीची आहे. या मूर्ती अगदीं रेखीव असून त्यांच्या चेहेऱ्यांवर चांगलाच तरतरीतपणा आहे. जुन्या पद्धतीप्रमाणें मूर्तीवर भरमसाट दागदागिने कोरलेले आहेत. त्यामुळें आधुनिक (मॉडर्न) कलेच्या चहात्याला त्यांत कृत्रिमपणा वाटेल; पण मला मात्र त्या मूर्ती फारच आवडल्या.

## नेहमीं चरणपूजा

गोमटेश्वराची मूर्ति अवाढव्य मोठी असल्यामुळें तिची संपूर्ण पूजा रोजच्या रोज करणें अशक्य आहे. म्हणून रोज मूर्तीच्या फक्त पावलांचीच पूजा करण्यांत येते. अर्थात् हीं पावलेंहि लहान नाहींत. प्रत्येक पावलाची लांबी ८ फूट ३ इंच आहे. नुसत्या अंगठ्यांचीच लांबी २ फूट ९ इंच आहे. या अंगठ्यांवर एकाच वेळीं अनेक नारळ ओळीनें राहूं शकतात. अंगठ्याला फुलें वाहून त्याची आरती करण्यांत येते.

दर पंधरा वर्षांनीं मूर्तीला मस्तकाभिषेक करण्यांत येतो. त्या वेळीं लाखो रुपये खर्च करण्यांत येतात. हजारो जैन लोक या उत्सवाचा सोहळा पहायला देशाच्या सर्व भागांतून येथें गोळा होतात. असा मस्तकाभिषेकोत्सव नुकताच गतवर्षीं पार पडला. जैन जमात सधन असल्यामुळें

या देवस्थानाला पैशाचा तुटवडा कधीं भासत नाहीं. सुदैव एवढेंच कीं, इतर जैन तीर्थकरांच्या मूर्तींप्रमाणें ते लोक या मूर्तीलाहि सोन्यामोत्यांनीं मढवून ठेवीत नाहींत.

## मुलासाठीं नवस करणाऱ्या स्त्रिया

कोणाकडे काय मागावें याचा सारासार विवेक आपल्या देशांत फारच क्वचित् करण्यांत येतो. पुत्रप्राप्तीसाठीं बालब्रह्मचारी हनुमानाला संकटांत घालणाऱ्या स्त्रिया तर मीं अनेक पाहिलेल्या आहेत! पण येथें बाहुबली गोमटेश्वरापुढें पदर पसरून संतानाची भीक मागणाऱ्या स्त्रिया पाहून हंसावें कीं रडावें तेंच कळेना! आपल्याकडे पुत्रप्राप्तीचा मोक्षाशीं संबंध जोडला गेल्यामुळेंच बहुधा असले हास्यास्पद प्रकार घडत असावेत!

## चंद्रगिरीवरील पार्श्वनाथांची मूर्ति

या मूर्तीच्या सभोंवतीं जवळच तट व इमारत असल्यामुळें संपूर्ण मूर्तीचा फोटो घेतां येत नाहीं, म्हणून जेवढ्या भागाचा फोटो घेतां आला तेवढा घेऊन आम्ही गच्चीवर चढलों आणि आसपासचें दृश्य पुनः एकदां डोळाभर पाहून खालीं उतरूं लागलों. डोंगर चढण्यापेक्षां उतरणें हें नेहमींच कष्टाचें असतें. त्यामुळें त्या गुळगुळीत डोंगरावरून सहज घसरत जातां येईल तर काय गंमत होईल असा विचार मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं.

खालीं उतरून आम्हीं कॉफी वगैरे घेतली आणि समोरच असलेल्या चंद्रगिरि टेकडीवर चढलों. ही टेकडी अगदीं लहान म्हणजे १७५ फूट (समुद्रसपाटीपासून ३०५२ फूट) उंच असून तिला 'चिक्क बेट्ट' ('छोटा डोंगर') असें म्हणतात. इंद्रगिरीप्रमाणें ही टेकडी एका अखंड दगडाची नसून मोठमोठ्या शिळा एकमेकांवर रचून ती तयार केल्यासारखी वाटते. येथें झाडेंझुडपेंहि थोडींफार आढळतात. येथून समोरच्या इंद्रगिरीवरील बाहुबली गोमटेश्वराची मूर्ति मोठी छान दिसते. मूर्तीचा छातीपासून वरचा भागच दिसतो; पण रात्रीं मूर्तीच्या चेहेऱ्यावर विद्युत्दीपांचा झोत सोडल्यानंतर तो विशेष प्रेक्षणीय दिसतो. प्रथम तर आम्हांला

वाटलें कीं, चंद्रप्रकाशामुळेंच मूर्तीच्या चेहेऱ्याभोंवतीं शांत तेजोवलय निर्माण झालेलें आहे. पण त्या वेळीं आकाशांत चंद्र नव्हता आणि थोड्या वेळापूर्वीं पाहिलेल्या सर्चलाइटचीहि आठवण झाली.

या चंद्रगिरि टेकडीवर भद्रबाहूची गुंफा, कूगे ब्रह्मदेव-स्तंभ, मानस्तंम, अनेक प्राचीन शिलालेख, कत्तले-बस्ती, चंद्रगुप्त-बस्ती, शासन-बस्ती, शांतिनाथ-बस्ती वगैरे अनेक गोष्टी पहाण्यासारख्या आहेत. शांतिनाथ-बस्तींतील अकरा फूट उंचीची काळ्या पाषाणाची मूर्ति विशेष लक्ष वेधून घेते.

जवळच भरतेश्वराची (गोमटेश्वराचे गुरुबंधु) ९ फूट उंचीची अपूर्ण मूर्ति आहे. या मूर्तीवर आघात केल्यास कर्णमधुर आवाज निघतो, म्हणून लोकांनीं दगड मारून मारून ही मूर्ति अनेक ठिकाणीं खराब करून टाकलेली आहे.

## आणि ती घसरगुंडी !

अशा गुळगुळीत दगडाचा उपयोग घसरगुंडी म्हणून बेळगोळच्या मुलांनीं केला नसता तरच आश्चर्य! चंद्रगिरीवर अशी एक नैसर्गिक घसरगुंडी तयार झालेली आहे. नेहमींच्या घसरगुंडीच्या तिप्पट-चौपट तिची लांबी आहे. ती पहातांच आमच्यांतील 'बालक' जागें झालें आणि वय, प्रतिष्ठा, स्त्रीपुरुषभेद या सर्वांचा विसर पडून आम्हीं मनसोक्तपणें त्या घसरगुंडीवरून घसरून घेतलें. भव्यतेचें, धार्मिकतेचें, प्रतिष्ठेचें जें दडपण इतका वेळ आम्हांला गुदमरवून टाकीत होतें तें जणूं कुठल्या कुठें निघून गेलें, आणि आम्ही आमच्या धर्मशाळेकडे परतलों तेव्हां आमचीं शरीरें दमलेलीं असलीं तरी आमचीं मनें मात्र फुलांसारखीं हलकीं, प्रफुल्ल अन् टवटवित झालेलीं होतीं.

## गांवांतील मंदिरें

या दोन टेकड्यांप्रमाणेंच श्रवण बेळगोळ गांवांतहि अनेक प्रेक्षणीय मंदिरें आहेत. त्यांपैकीं भंडारी-बस्ती, अक्कन-बस्ती, दानशाले-बस्ती, कलामंदिर, नगर जिनालय, मंगाई-बस्ती, जैनमठ वगैरे मंदिरें विशेष

महत्त्वाचीं आहेत. पण हीं सर्व पहाण्याइतका वेळ अथवा उत्साह आमच्यांत उरलेला नव्हता. म्हणून केवळ भंडारी-बस्ती हें सर्वांत मोठें मंदिर पाहूनच आम्हीं समाधान मानलें. या मंदिराचा सभामंडप इतका मोठा आहे कीं, एका वेळीं हजार लोक येथें बसूं शकतात. येथें एकच मूर्ति नसून एका ओळींत काळ्या पाषाणाच्या चोवीस मूर्ति आहेत. त्यामुळें याला 'चतुर्विंशति तीर्थंकर बस्ती' असेंहि म्हणतात. या मंदिरांत प्रचंड लांबीरुंदीच्या दगडी फळ्यांचा छतासाठीं उययोग करण्यांत आलेला आहे. या फळ्या तयार करायला किती मेहनत पडली असेल याची कल्पनाच करवत नाहीं. मंदिराच्या दरवाज्यावरील नृत्यमुद्रेंतील इंद्राची अलंकारयुक्त कोरीव मूर्ति मोठी प्रेक्षणीय आहे.

## शांत, सुखपूर्ण निद्रा

एका दिवसांत इतक्या नवीन, सुंदर आणि अद्‌भुत गोष्टी आम्हीं पाहिल्या होत्या कीं, आमचें मनहि शरीराप्रमाणें थकून गेलें होतें. म्हणून दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम कसाबसा ठरवून आम्हीं धर्मशाळेच्या व्हरांड्यांत धराशायी झालों. नेहमीं झोंप येण्यासाठीं पुस्तक वाचण्याची संवय असलेल्या मलाहि त्या वेळीं निद्रेची आराधना करण्याची गरज भासली नाहीं. दिवसभर जी दगदग झाली होती, ओलीं लांकडें पेटवितांना डोळ्यांना ज्या पाण्याच्या धारा लागल्या होत्या, ( तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं ओलीं लांकडें पुरविण्यांतच पुण्य असतें ! ) स्वच्छ पाण्याच्या अभावामुळें जे हाल झाले होते, त्या सर्वांचा मला एका क्षणांत विसर पडला आणि कधीं तरी सठीसहामासीं लाभणारी शांत, सुखपूर्ण निद्रा हलक्याच पावलांनीं येऊन गेली. त्या रात्रींच्या निद्रेमुळेंच श्रवण बेळगोळचा तो प्रवास माझ्या स्मरणांत अनंत वर्षेंपर्यंत राहील, असें म्हटल्यास मुळींच वावगें होणार नाहीं.

● ● ● ●

# श्रीरंगपट्टण : २

## टिपू सुलतानाबद्दलचें आकर्षण.

मराठ्यांच्या इतिहासांतील संभाजी आणि दक्षिणी मुसलमानांच्या इतिहासांतील टिपू, या दोन पुरुषांबद्दल आपल्यापैकीं अनेकांना जें आकर्षण वाटतें, त्याचें कारण त्यांच्यांतील जबरदस्त रंगेलपणा हेंच होय. संभाजीच्या रंगेलपणांत धार्मिक कडवेपणा होता, तर टिपूमध्यें भारताचें प्रेम आणि इंग्रजाविषयींचा द्वेष हीं पराकोटीला जाऊन पोंचलेलीं दिसतात. त्याच्यांतील या इंग्रजद्वेषामुळेंच टिपू भारतीय देशभक्तांमध्यें एके काळीं अत्यंत लोकप्रिय झालेला होता. अशा ह्या देशभक्ताच्या राजधानींत प्रवेश करतांना माझेंहि मन क्षणभर आदरानें व भक्तीनें पुलकित झाल्याशिवाय राहिलें नाहीं. त्याच्या राजधानींतून फिरून आल्यानंतर टिपूबद्दलचा माझा आदर व आत्मीयता हीं कमी होण्याऐवजीं उलट जास्तच वाढलीं, हें मला कबूल केलें पाहिजे.

## श्रवणबेळगोळहून श्रीरंगपट्टण

श्रीरंगपट्टण हें म्हैसूरपासून ९ मैल दूर असून तेथें आगगाडीनेंहि जातां येतें आणि सिटी बसहि तेथपर्यंत जातें. म्हैसूरला जायचें आणि तेथून श्रीरंगपट्टणला व कृष्णराजसागरला जायचें, असा सर्वसामान्य नियम. पण आम्ही वाटेंत उतरून श्रवणबेळगोळला गेलों होतों. तेथून म्हैसूरला येतांना वाटेंत श्रीरंगपट्टण लागलें. त्याबरोबर म्हैसूरचें तिकीट काढलेलें असूनहि आम्ही कांहींजण तेथेंच उतरलों आणि श्रीरंगपट्टण पाहून घेतलें.

## चुणचुणीत विद्यार्थी-मार्गदर्शक

मोटार-स्टँडवर उतरून इकडेतिकडे पाहूं लागलों. इतक्यांत तरतरीत चेहऱ्याचा एक काळासांवळा मुलगा आमच्याजवळ आला आणि आम्हांला

'मार्गदर्शक हवा काय' म्हणून विचारूं लागला. आपल्या लोकांना अद्यापि मार्गदर्शकाचें महत्त्व पटलेलें नाहीं. एखाद्या ठिकाणीं गेल्यानंतर तेथील महत्त्वाच्या गोष्टी व्यवस्थितपणें पाहण्याच्या कामीं या मार्गदर्शकांचा किती उपयोग होतो, हें अजून आम्हांला कळलेलें दिसत नाहीं. त्यामुळें बावळटाप्रमाणें कांहीं तरी पाहून आपण परत येतों. आपण अमुक ठिकाणीं गेलों होतों, अमुक गोष्ट पाहिली, असें इतरांना सांगतां यावें, एवढीच आपली महत्त्वाकांक्षा असते. त्यामुळें तो विद्यार्थी–मार्गदर्शक (Student-guide) मदतीला आला असतां, 'कशाला हवा मार्गदर्शक? आपण स्वतःच काढूं सगळं शोधून,' असें कांहींजण म्हणूं लागले. पण आमच्याजवळ असलेल्या थोड्याशा वेळांत महत्त्वाच्या गोष्टी पाहून होणें मार्गदर्शकाच्या मदतीखेरीज शक्य नाहीं, हें मी स्वानुभवानें जाणून होतों. म्हणून दोन रुपये देण्याचें कबूल करुन आम्हीं त्या विद्यार्थ्याला बरोबर घेतलें. (आणि तो होता म्हणूनच अडीच–तीन तासांत श्रीरंगपट्टण पाहून होऊं शकलें, ही गोष्ट नंतर इतर मंडळींनींहि कबूल केली.)

या मार्गदर्शकाचें नांव 'शिवराज गौडा' असें होतें. तो एका शेतकऱ्याचा मुलगा होता. शिक्षणाच्या गोडीमुळें वय वाढलेलें असूनहि तो शाळेंत शिकत होता, आणि सुटीच्या वेळीं मार्गदर्शकाचें काम करीत होता. त्याला मोडकेंतोडकें हिंदी व कामचलाऊ इंग्रजी येत होतें. त्यामुळें त्याच्याशीं बोलतांना आम्हांला अडचण भासत नव्हती. मुलगा मोठा हुषार व चुणचुणीत दिसला. त्यानें सांगितलेल्या माहितींत थापेबाजी नव्हती, ही गोष्ट सरकारी पुस्तकांतील माहितीवरुन नंतर आमच्या लक्षांत आली. सुमारें सहा मैलांची चक्कर अनवाणी पावलांनीं–तीहि ऐन उन्हाच्या वेळीं मारून तो दमल्यासारखा दिसत नव्हता. उलट त्याच्याबरोबर रहाण्यासाठीं आम्हांला अधूनमधून चक्क धांवावें लागत होतें.

**श्रीरंगपट्टणचें सुरक्षित बेट**

श्रीरंगपट्टण हें सामान्य शहर नसून, कावेरी नदीच्या दोन फांट्यांनीं बनविलेलें तें एक मजेदार बेट आहे. शहराच्या पश्चिमेला कावेरी नदीचे दोन फांटे होतात आणि पूर्वेस कांहीं अंतरावर ते दोन्ही फांटे पुन्हां

एकत्र मिळतात. त्यामुळें मधल्या भागाला बेटाचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. या ठिकाणीं कावेरी नदी फारशी खोल नाहीं; परंतु तिचें पात्र चांगलेंच रुंद आहे. त्यामुळें वर्षांतील चार सहा महिने, निदान पावसाळ्यांत तरी, या शहराला बाहेरच्या शत्रूपासून धास्ती नसे. अर्थात् आतां दोन्ही फांट्यांवर चांगले पूल बांधण्यांत आलेले असल्यामुळें त्याचें हें वैशिष्ट्य उरलेलें नाहीं. पण ऐतिहासिक काळीं पावसाळ्याच्या प्रारंभीं इंग्रजांची व मराठ्यांची कुरापत काढून पावसाळ्यांत या बेटामध्यें हैदर किंवा टिपू सुरक्षित रहात असतील यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या बेटाची लांबी सुमारें साडेतीन मैल असून रुंदी सुमारें दीड मैल आहे. त्यामुळें त्याच्या संरक्षणाची व्यवस्था करणें पूर्वींच्या काळीं बरेंच सुटसुटीत व सोयीचें होत असलें पाहिजे. अर्थात् इ. स. ११२० पासून, म्हणजे या शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंत तें इतक्या लोकांच्या हातांत गेलें आहे कीं, कावेरीचें संरक्षण ऐन वेळीं निरुपयोगी ठरतें, असेंच म्हटलें पाहिजे.

## ताजमहालाच्या धर्तीवरील टिपूचें थडगें

श्रीरंगपट्टण हें शहर एका भुईकोट किल्ल्याच्या आंत असून त्याच्या भोंवतालचा तट आजहि पुष्कळ अंशीं चांगल्या स्थितींत आहे. तटाच्या भोंवतीं चांगला रुंद खंदक आहे. (लहानमोठे असे तीन तट व तीन खंदक या शहराभोंवतीं आहेत.) त्याच्यापलीकडे बस्-स्टँड आहे. तेथून जवळच टिपूचा 'दरिया-दौलत' नांवाचा उन्हाळी राजवाडा (Summer Palace) असून, तेथून सुमारें दीड मैलावर टिपूचें थडगें किंवा स्मारक (Mausoleum) आहे. त्याला इथें 'गुंबझ' (म्हणजे घुमट) असें म्हणतात. पायीं चालायचें होतें म्हणून जास्त ऊन्ह होण्यापूर्वीं हें स्मारक पाहून यावें असा सल्ला शिवराज गौडानें आम्हांला दिला. तो पटल्यामुळें आम्ही वाटेंत न थांबतां सरळ लालबागेच्या मध्यभागीं असलेल्या गुंबझापर्यंत गेलों. या थडग्याच्या इमारतीवर जो मोठा घुमट आहे, त्यामुळेंच याला 'गुंबझ' हें नांव पडलेलें दिसतें.

या इमारतीमध्यें टिपूचें थडगें असलें तरी ती फार पूर्वीं, त्यानें स्वतःच बांधविलेली होती. आपल्या आईवडिलांसाठीं-हैदर व सैदानी बेगम

यांच्यासाठीं–त्यानें ती तयार करविलेली होती. इमारतीच्या बाह्य स्वरूपामध्यें आग्र्याच्या ताजमहालाची नक्कल करण्याचा टिपूनें प्रयत्न केलेला आहे. समोर लांबट स्वरूपाचा तसाच बगीचा असून रस्त्याच्या दुतर्फा सुरूचीं झाडें लावलेलीं आहेत. पण ताजमहालाच्या पासंगालाहि हा गुंबझ पुरणार नाहीं. कुठें इंद्राचा ऐरावत अन् कुठें शामभटाची तट्टाणी! तरी पण तट्टाणीचेंहि स्वत:चें कांहीं वैशिष्ट्य असतेंच. तें वैशिष्ट्य म्हणजे तळमजल्यावरील काळ्या संगमरवरी दगडांचे कलापूर्ण खांब, हें होय. सबंध इमारत पांढऱ्या दगडांची असून मुख्य इमारतीच्या पडवीचे (Corridor) ते काळे, गुळगुळीत खांब मोठे मनोहर दिसतात. टुमकूरच्या पाळेगारांकडून हे दगड टिपूला भेट म्हणून मिळाले होते असें शिवराजानें सांगितलें. मुख्य गाभारा म्हणजे एक चांगली प्रशस्त खोली असून तिच्या दरवाज्यांवरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. दाराचें कुलूप मोठें मजेशीर असून तशा आकाराचें कुलूप मीं प्रथम तेथेंच पाहिलें.

## माता, पिता व पुत्र

हैदर, त्याची पत्नी सैदानी बेगम व टिपू अशा तिघांचीं थडगीं या हॉलमध्यें आहेत. भिंतीवर वाघाच्या पट्ट्यांची भडक नक्षी (वाघ हें टिपूचें आवडतें प्रतीक होतें!) रंगावलेली असून पायाखालचा गालिचा आपण किती मौल्यवान् आहोंत याची जाणीव चालणाऱ्यांच्या अनवाणी तळपायांना पावलोपावलीं करून देत असतो. तिन्ही समाधींवर उंची कापड व फुलांच्या माळा घातलेल्या असतात. धूप व उदबत्ती यांचा सुगंध तर सदैव दरवळत असतोच. त्यामुळें हिंदूंच्या देवळांप्रमाणें येथें जीव गुदमरून जात नाहीं. केव्हां एकदां या अंधारकोठडींतून बाहेर पडतो असें वाटण्याऐवजीं क्षणभर येथें रेंगाळावें अशीच इच्छा कोणाच्याहि मनांत उत्पन्न होते. मुसलमानांशीं आपले कितीहि मतभेद असले तरी त्यांच्या धार्मिक व ऐतिहासिक स्थानांतील शांतता, स्वच्छता व सुगंधितता यांचें अनुकरण आपण अवश्य केलें पाहिजे, असें मला वाटतें. धार्मिकता किंवा आध्यात्मिकता अंगीं बाणण्यासाठीं गोंधळ, गडबड, कोंदटपणा, अस्वच्छता आणि कुजटपणा, यांचें अस्तित्व अपरिहार्य आहे, असें समजण्यास कांहीं आधार नाहीं!

हिंदूंच्या देवळांतल्या पुजाऱ्याप्रमाणें येथेंहि मुस्लिम भटजी बसलेला असतो. हैदर–टिपूच्या नांवावर तोहि तुमच्याकडे दक्षिणा मागतो. पण त्यांत विनय असतो आणि तुम्हीं कांहींहि दिलें तर तो तुम्हांला मारायला धांवत नाहीं,–एवढाच काय तो फरक. मुसलमान प्रेक्षक त्याच्या थाळींत पैसा–आणा बहुधा टाकतातच.

**इंग्रजांचा सुसंस्कृतपणा**

मध्यभागीं हैदरची समाधि असून तिच्या उजव्या बाजूला सैदानी बेगम व डाव्या बाजूला टिपू यांचीं थडगीं आहेत. बाहेरच्या बाजूला टिपूच्या दाईचेंहि एक थडगें आहे. वस्तुतः टिपू हा इंग्रजांचा कट्टा दुष्मन पण लढाईच्या मैदानावर पडलेलें त्याचें प्रेत शोधून काढून इंग्रजांनीं तें मोठ्या इतमामानें हैदराच्या थडग्याशेजारीं आणून पुरलें. इतका सुसंस्कृतपणा हिंदूंनीं किंवा मुसलमानानीं दाखविला असता कीं काय, ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे! इतकेंच नव्हे, तर या इमारतीला असलेलें टेंबुरणी ( Ebony ) लांकडाचें, हस्तीदंती कलाकुसर असलेले काळेभोर दरवाजे मार्क्विस ऑफ् डलहौसी यानें भेट म्हणून दिलेले आहेत, हें जेव्हां मीं ऐकलें ( आणि वाचलें ) तेव्हां इंग्रजांच्या खिलाडूपणाविषयीं माझ्या मनांत आदर निर्माण झाल्याशिवाय राहिला नाहीं. 'मरणान्तानि वैराणि' अशांसारखीं तत्त्वें आपण घोकत असतों; पण त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र पाश्चात्यांमध्यें आढळते!

**कर्नल बेलीचें स्मारक**

या घुमटाच्या आवारांत शिरतांना डाव्या बाजूला एक स्मारकस्तंभ आपल्याला दिसतो. कर्नल बेली या इंग्रज सेनाधिकाऱ्याचें त्याच्या पुतण्यानें बांधविलेलें हें स्मारक आहे असें म्हणतात. पण त्यांत कांहींच वैशिष्ट्य नसल्यामुळें आम्हीं दुरूनच त्याच्यावर दृष्टिक्षेप टाकला आणि झपझप् पावलें उचलीत परत फिरलों. वाटेंतील 'गंजाम' गांवाकडेहि आम्हीं लक्ष दिलें नाहीं.

**दरिया–दौलत बाग**

कावेरी नदीच्या कांठीं ज्या बागेमध्यें टिपूनें आपल्यासाठीं ग्रीष्म-कालीन राजवाडा (Summer Palace) बांधला होता, त्याचें नांव त्यानें

'दरिया–दौलत' असें ठेवलें होतें. दरिया म्हणजे नदी. समुद्र नव्हे! ( आणि येथें समुद्राचा कांहीं संबंधहि नाहीं.) तिच्यामुळें निर्माण झालेली दौलत, ती दरिया–दौलत. वस्तुतः हा कांहीं राजवाडा म्हणतां येत नाहीं; चांगली ऐसपैस पडवी (व्हरांडा) असलेला हा एक टुमदार बंगला आहे. सध्यां सभोंवतीं थोडीफार बागहि आहे; पण पूर्वीं येथें फार चांगली बाग असावी.

दरिया–दौलत बागेमुळें या राजवाड्यालाहि 'दरिया-दौलत' असेंच नांव पडलेलें आहे. या राजवाड्याच्या तळमजल्यावरील भिंतींवर खूप मोठमोठीं चित्रें काढलेलीं आहेत. हीं चित्रें टिपू सुलतानानें काढवून घेत-लेलीं होतीं. पण तीं पुसट होऊं लागल्यामुळें इंग्रजांनीं व म्हैसूरच्या राजांनीं दोनदां त्यांचें पुनश्चित्रीकरण केलें. त्यामुळें सध्यां तीं चांगल्या स्थितींत आहेत. जुन्या पद्धतीच्या चित्रांमध्यें वस्तूंच्या अंतराकडे ('पर्स्पेक्टिव्ह') विशेष लक्ष दिलें जात नसे. दूरची व जवळची वस्तु सारख्या आकाराची काढण्यांत येई. त्यामुळें त्या चित्रांत वास्तविकतेची प्रचीति येत नाहीं. तरी पण ऐतिहासिक दृष्ट्या त्यांचें महत्त्व पुष्कळच आहे. हीं चित्रें जवळ-जवळ एका खणाइतकीं लांबरुंद आहेत.

पश्चिमेकडील भिंतीवर उजव्या बाजूला अश्वारोही टिपू व हैदर आपल्या वजीरांसह सैन्यामध्यें उभे असलेले दिसतात, तर त्याच भिंतीवर डाव्या बाजूला कांजीवरमजवळील पालिलोर या ठिकाणीं कर्नल बेलीचा टिपूनें जो पराभव केला होता, त्याचें चित्रीकरण करण्यांत आलेलें आहे. कर्नल बेली आणि त्याचें सैन्य मध्यें सांपडलें असून त्यांच्या पुढील बाजूला टिपूचें देशी सैन्य व मागील बाजूला टिपूच्या मदतीला आलेलें फ्रेंच सैन्य दाखविलेलें आहे. ह्या दोन सैन्यांच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें कर्नल बेलीचा धुव्वा उडाला होता. टिपूनें हें चित्र मुद्दाम काढवून घेतलें होतें. पुढें इंग्रजांनींहि तें तसेंच कायम ठेवलें.

याखेरीज तंजावर, कूर्ग, सावनूर, अर्काट, कुडाप्पा, वगैरे संस्थानांचे राजे, चित्तूरची राणी, कृष्णराज वाडियार वगैरे अनेक स्त्री–पुरुषांचीं चित्रें आहेत. आपला वाटाड्या संध्येंतील नामावळीप्रमाणें त्यांचीं नांवें

भरभर उच्चारीत जातो आणि आपण निर्बुद्धाप्रमाणें नुसतें ' हूं हूं ' करीत त्यांच्याकडे कसेंबसें पहात पुढें जातों.

राजवाड्याच्या वरच्या मजल्यावरील दालनांना नक्षीदार व कमानीचे सज्जे आहेत आणि भिंतींवर, खांबावर व छतांवर लता--फुलांची लाल, पांढऱ्या व हिरव्या रंगांतील चित्रकारी आहे. या वाड्यांतील खोल्या इतक्या लहान आहेत, कीं आपल्याला तेथें हिंडतांनाहि संकोचल्यासारखें होतें.

## देशद्रोहाबद्दल शिक्षा

बंगलोर दरवाज्यांतून श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यांत, म्हणजेच शहरामध्यें प्रवेश करतांच उजव्या हाताला एका देशद्रोह्याचें स्मारक दिसतें. मीर सादिक नांवाच्या टिपूच्या एका मंत्र्यानें इंग्रजांना फितूर होऊन त्यांना किल्ल्यांत येण्याची गुप्त वाट दाखविली होती. त्या दगलबाज मुसलमानाला पुढें इंग्रजांनींहि जिवंत ठेवलें नाहींच. त्याचें थडगें या ठिकाणीं बांधलेलें होतें; परंतु येणाऱ्या-जाणाऱ्या मुसलमानांनीं त्याच्यावर दगडांचा वर्षाव करून तें उध्वस्त करून टाकलें. त्यानंतर पुन्हां त्याचें थडगें बांधण्याचा प्रयत्न कोणी केला नाहीं. आतां तेथून जाणारे मुसलमान त्या जागेवर थुंकतात असें वाटाड्यानें सांगितलें. आपल्या देशांत फितुरांचा तुटवडा कधींच पडला नाहीं. आज, विसाव्या शतकाच्या उतारार्धांतहि त्यांची संख्या कमी झाली आहे असें वाटत नाहीं. पण अशा फितुराबद्दल सामान्य जनतेच्या मनांत जी तिटकाऱ्याची भावना पूर्वींपासून वसत आलेली आहे, ती अद्यापि कायम आहे, हीच आशेला जागा !

## जुम्मा मशिदीचे उंच मनोरे

तेथून जरा पुढें गेलें कीं टिपूची आवडती जुम्मा मशीद लागते. ही एका हिंदु मंदिराच्या भग्नावशेषांवर उभारलेली आहे. हिचें वैशिष्ट्य म्हणजे हिचे दोन उंच मनोरे. या मनोऱ्यांवर चढून कावेरी नदीचें व श्रीरंगपट्टण शहराचें दृश्य पहाण्यासारखें आहे.

पण आमच्याजवळ मशीद पहायला वेळ नव्हता. श्रीरंगनाथाचें मंदिर साडेबारा वाजतां बंद होतें. त्यापूर्वीं तेथें जाऊन देवाचें दर्शन घेणें आवश्यक होतें. म्हणून वाटेंतील ' होळे दिड्डी बागिलु ' किंवा ' वॉटरगेट '

पहाण्यांतहि आम्ही फार वेळ घालविला नाही. या वॉटर-गेटपासून शंभर यार्डांच्या अंतरावर एक छोटीशी पाटी लावलेली आपल्याला दिसते. ती नसती तर याच ठिकाणीं टिपू सुलतान लढतांलढतां ( १५ एप्रिल १७९९ रोजीं ) धारातीर्थी पतन पावला आणि पराभव पत्करण्यापेक्षां मरण पत्करण्याचा बाणेदारपणा त्यानें कसा दाखविला, ही गोष्ट आपल्याला कळली नसती.

## श्रीरंगनाथस्वामींचें मंदिर

श्रीरंगपट्टणचें महत्त्व दोन गोष्टींकरितां आहे. एक, टिपू सुलतानाची राजधानी म्हणून, आणि दुसरें श्रीरंगाच्या देवळामुळें. एक ऐतिहासिक तर दुसरें धार्मिक. कावेरी नदीवरच पुढें पूर्वेला तमिळनाडांत तिरुचिरा-पल्ली ( त्रिचनापल्ली ) जवळ श्रीरंगम्‌चें क्षेत्र आहे. (आणि येथून जवळच ४० मैलांवर शिवसमुद्रम्‌च्या बेटांत तिसरें देऊळ आहे.) त्यामुळें श्रीरंगपट्टणच्या या क्षेत्राला ‘ आदिरंग ’ किंवा ‘ पश्चिम रंगनाथ ’ असें म्हणतात. रंगनाथ म्हणजे विष्णु आणि स्वामी म्हणजे महाराज. येथील देवाला ‘ रंगनाथस्वामी ’ असें म्हणतात. शेषशायी विष्णुची सुमारें दहा फूट ( दोन पुरुष ) लांबीची एका कुशीवर आडवी पहुडलेली मूर्ति या मंदिरांत आहे. अनंताला किंवा आदिशेषाला सात डोकीं असून त्यांनीं विष्णूवर छत्र धरलेलें आहे. मूर्तीवर वस्त्रें घातलेलीं होतीं आणि तिच्या पायांत व डोक्यावर सोन्या-चांदीचे दागिने घातलेले दिसत होते. त्यामुळें मूर्तीचें खरें सौंदर्य मनावर ठसत नव्हतें. देवावर वस्त्रालंकाराचें ओझें घालून चोरांची भीति कायम पाठीला लावून घेण्याऐवजीं त्याला संपूर्ण मोकळा ठेवल्यास लोकांच्या मनांत अधिक भक्तिभाव निर्माण होईल, असा विचार माझ्या मनाला चाटून गेला.

श्रीरंगाच्या चरणांजवळ हातांत कमळ घेऊन बसलेल्या स्त्रीची एक लहानशी मूर्ति आहे. ती लक्ष्मी असावी असें प्रथम वाटलें. पण नंतर असें कळलें कीं, ती लक्ष्मी नसून कावेरी आहे. नद्यांच्या एका सम्मेलनामध्यें गंगेनें आपल्या पावित्र्याच्या घमेंडीमध्यें कावेरीचा अपमान केला. ( सग-ळेच पावित्र्यवादी लोक इतरांना तुच्छ लेखीत असतात ! ) तेव्हां कावेरीनें

देवाधिदेव विष्णूला प्रसन्न करून घेण्यासाठीं घोर तपश्चर्या सुरू केली. अखेर भगवान् विष्णू प्रसन्न झाले आणि त्यांनीं कावेरीला वर मागण्यास सांगितलें. आपल्या पात्रांतच निवास करण्याचा वर कावेरीनें मागून घेतला. त्याप्रमाणें ज्या तीन ठिकाणीं कावेरीच्या पात्रांत बेटें बनलीं आहेत, तेथें विष्णूचा निवास आहे असें मानण्यांत येतें. त्याच्या पूजेसाठींच कावेरीनें हृदयाचें प्रतीक असलेलें कमळ हातांत धरलेलें आहे.

आम्ही गेलों त्या वेळीं विष्णु भगवान् भोजन करून खरोखरीच झोंपी जाण्याच्या तयारींत होते. सुमारें साडेबारा वाजतां देऊळ बंद होतें. त्यामुळें आम्हीं केलेल्या धांवपळीचें सार्थक झालें असें आम्हांला वाटलें.

या देवळाच्या गर्भागाराच्या दाराला जे जाडजूड सांखळदंड व प्रचंड कुलुपें लावलेलीं असतात, तीं पाहिलीं म्हणजे मात्र हंसूं आल्याशिवाय रहात नाहीं. दाक्षिणेकडील बहुतेक श्रीमंत मंदिरांना अशीं भक्कम कुलुपें असतात. कारण देवाच्या अंगावरील दागिने चोरीला जातील ही भीति क्षणोक्षणीं पुजाऱ्याच्या मनाला वाटत असते. त्या वस्त्रालंकारांमुळें बिचाऱ्या देवाला मात्र एखाद्या भयंकर कैद्याप्रमाणें हवा नसलेल्या खोलींत तासन् तास बंद रहावें लागतें. दुपारीं व रात्रींच नव्हे, तर पांच मिनिटांसाठींहि गाभाऱ्यांतून बाहेर जायचें असेल तर पुजारी-महाराज दार बंद करून कड्याकुलुपांचा बंदोबस्त करतात. त्यांची ती तत्परता पाहून मला वाटलें, या गृहस्थांना दागिन्यांच्या चोरीपेक्षां देव पळून जाईल म्हणूनच बहुधा भीति वाटत असावी !

श्रीरंगपट्टणचें हें रंगनाथ मंदिर म्हणजे द्राविडी स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. तें भव्य गोपुर, तो प्रशस्त सभामंडप, ती कलाकुसर, सर्व कांहीं दक्षिणेंतील इतर मंदिराप्रमाणेंच आहे. म्हैसूर राज्यांतील सर्वांत मोठ्या देवळांमध्यें याची गणना होते.

इ. स. ८९४ सालीं होयसळ राजांनीं ( तिरुमलयगग राजानें ) या देवळाची स्थापना केली. त्यानंतर त्याच्या वैभवाची कमान चढतच गेली. विजयनगरच्या राजांनीं मंदिर अधिक मोठें केलें, आणि त्यांच्यानंतर आलेल्या म्हैसूरच्या वाडियार राजांनीं त्याला आणखी भव्य स्वरूप आणून

दिलें. हैदर व टिपू या दोघांचीहि या रंगनाथ देवावर एकनिष्ठ भक्ति होती. ( टिपू तर आपल्या वतीनें ब्राह्मणांकडून श्रीरंगाची पूजाअर्चा व जपजाप्य करवीत असे, असें सांगतात.) कदाचित् हें दैवत जागृत समजलें गेल्यामुळेंहि त्याच्याबद्दल हैदर टिपूच्या मनांत भययुक्त आदराची भावना असेल! त्यामुळें त्यांच्या कारकीर्दींतहि या मंदिराला तोशीस लागली नाहीं. हैदरानें तर अनेक हिंदु मंदिरांना वर्षासनें चालू करून दिली होतीं. यामुळें हिंदूंबद्दल त्याच्या मनांत विशेष द्वेष असावा असें वाटत नाहीं. उत्तरेकडील मुसलमान आणि दक्षिणी मुसलमान यांच्यांत हाच मुख्य फरक आहे. दाक्षिणी मुसलमान जास्त सहिष्णु व हिंदूंशीं मित्रत्वाचे संबंध ठेवणारे होते, असें इतिहास सांगतो.

## आणि ती अंधारकोठडी !

रंगनाथाचें दर्शन घेऊन आम्ही जवळच असलेली अंधारकोठडी (Dungeon) पहायला गेलों. ही तळघरासारखी आहे. हल्लीं हिच्या एका बाजूची भिंत काढून टाकण्यांत आलेली आहे. त्यामुळें तेथें अंधार असत नाहीं. अर्थात् त्यामुळें तिची भेसूरताहि कमी झालेली आहे. हिची लांबी ९० फूट असून रुंदी ३७½ फूट आहे. या कोठडीच्या भिंतीत खुंट्यां-प्रमाणें दगडी खांब बसविलेले असून त्यांना एकेक भोंक आहे. या भोंकांत सांखळदंड घालून त्यांनीं कैद्यांचें दंड आंवळून ठेवीत. या अंधारकोठडींत टिपूनें कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांना कैदेंत ठेवलें होतें. रोज सकाळ-संध्या-काळ फक्त एक भाकरी त्यांना देण्यांत येई. अष्टौप्रहर हे कैदी बांधून उभेच ठेवलेले असत. फक्त रात्रींच्या वेळीं त्यांचें पाय जमिनीला टेकत. इतर वेळीं यंत्राच्या साह्यानें त्यांना अधांतरीं लोंबकळत ठेवण्यांत येई. इंग्रजांबद्दल टिपूच्या मनांत जो भयंकर द्वेष होता, त्याचें प्रकटीकरण अशा घटनांतून होत असे. बाहेरच्या लोकांना या अंधारकोठडीचा पत्ता लागूं नये म्हणून छतांतून एका तोफेचें तोंड वर काढून ठेवलेलें असे. त्यामुळें तेथें दारूगोळ्याचा कारखाना असावा असा भास लोकांना होई. ( असें शिवराज गौडानें सांगितलें; पण त्यांत अतिशयोक्ति असावी असें मला वाटलें. )

अशीच आणखी एक अंधारकोठडी येथें आहे. तिला ‘ इमामाची अंधारकोठडी ’ ( Imam's dungeon ) असें म्हणतात. या ठिकाणीं प्रसिद्ध मराठी पुंड धोंड्या वाघ हा कैदेंत होता असें सांगितलें जातें. हा धोंड्या वाघ एवढा मोठा मराठी मुलूख सोडून कर्नाटकांत कशाला मरायला गेला असावा, देव जाणे !

येथून जवळच पूर्वीं एक झुलती कमान होती. पण जुलै १९३६ मध्यें ती मोडून पडली. आतां फक्त वाटाड्या ती जागा आपल्याला दाखवून तिचें रसभरित वर्णन करतो आणि आपण बेफिकीरपणें ‘ अस्सं ? ’ असें म्हणून पुढें चालूं लागतों. विशेषतः पायपीट करून आपण बेहद्द थकून गेलों असलों म्हणजे वाटाड्याच्या चर्पटपंजरीकडे आपलें फारसें लक्ष जात नाहीं. शेवटीं शेवटीं आमचेंहि असेंच झालें. म्हणून इतर कांहीं न पहातां आम्हीं वाटाड्याला पैसे व रजा दिली आणि श्रीरंगपट्टण गांवांतून रेंगाळत रेंगाळत बस-स्टँडवर येऊन पोंचलों. सामान्यतः लोक रेल्वे-स्टेशनापासून श्रीरंगपट्टण पहायला सुरुवात करतात आणि रेल्वे-स्टेशनहि चांगलें प्रेक्षणीय आहे यांत शंका नाहीं. त्याचे खांब काळ्या दगडाचे व नक्षीकाम केलेले आहेत. त्यामुळें प्लॅटफॉर्मवर फिरतांना आपण एखाद्या राजवाड्याच्या व्हरांड्यांतूनच फिरत आहोंत असें वाटतें.

पण गाडी उशीरां होती आणि बसेस तर सारख्या सुटत असतात. म्हणून आम्ही श्रीरंगपट्टणच्या तटावर शेवटचा दृष्टिक्षेप करीत करीत बसमध्यें चढलों आणि म्हैसूरला निघालों. हा सारा भाग उन्हाळ्यामुळें अगदीं शुष्क व रखरखीत वाटत होता. पण श्रीरंगपट्टणच्या तटांच्या आंतील बाजूला काफीर इंग्रजांबरोबर दांतओठ खात प्राणपणानें लढणाऱ्या टिपूची मूर्ति डोळ्यांपुढून हालत नव्हती आणि त्याच्या लोकप्रियतेचा सुगंध जणूं आजहि वातावरणांत भरून राहिलेला आहे, असा भास आम्हांला पदोपदीं होत होता.

● ● ● ●

# मैसूर : ३

## सुंदर व रुबाबदार शहर

वस्तुतः ‘मैसूर’ (म्हैसूर)ला जायचें तर तें दसऱ्यालाच गेलें पाहिजे. त्या वेळीं हें शहर आपल्या साऱ्या वैभवाचें प्रदर्शन मांडून बसलेलें असतें. त्यामुळें म्हैसूरचा खरा रुबाब आणि सौंदर्य त्याच वेळीं पहायला मिळतें. पण सर्वांनाच तशी संधि कोठून मिळणार ? सवड मिळतांच शहर पाहून घेणारे माझ्यासारखे लोकच जास्त असतात. अर्थात् दसऱ्याच्या उत्सवाची धमाल उडालेली असतांना घाईगर्दीनें शहर पहाण्याऐवजीं इतर वेळीं शांतपणें त्याचें नैसर्गिक सौंदर्य पहाण्यांतहि एक वेगळाच आनंद असतो, हें कांहीं खोटें नाहीं.

## ‘गायत्री’मधील भोजन

श्रवणबेळगोळहून म्हैसूरला जातांना वाटेंत श्रीरंगपट्टण पहायला आम्ही उतरलों होतों. म्हैसूरला पोंचेपर्यंत दोन वाजून गेले होते. पोटांत भूक आणि शरीरांत व मनांत थकवा घेऊन आम्ही बसस्टँडवर उतरलों. माणशीं एक आणा देऊन टांगे केले आणि आम्हीं ‘नंजाराजाबहादुर छत्रम्’ ऊर्फ ‘चौथरी’ (धर्मशाळा)मध्यें जाऊन उतरलों. टांगेवाला आम्हांला सांगत होता कीं, “ही धर्मशाळा ‘हनीमून’साठीं येणाऱ्या श्रीमंत प्रवाशांना उतरायला चांगली आहे. खूप पैसे पडतात तिथें. म्हणून तुम्ही तिथें उतरूं नका.” पण आमच्याबरोबरचे इतर लोक आमच्या आधींच तिथें जाऊन उतरले होते. म्हणून आम्ही टांगेवाल्याचा सल्ला न मानतां त्याच धर्मशाळेंत उतरलों. तिथली उत्कृष्ट स्वच्छता आणि गर्दीचा अभाव यांमुळें टांगेवाल्याचा सल्ला न ऐकल्याबद्दल आम्हांला पश्चात्ताप झाला नाहीं.

तिथून जवळच ‘गायत्रीभवन’ आणि ‘इन्द्रभवन’ नांवाचीं दोन

जंगीं हॉटेलें होतीं. त्यांपैकीं आम्हीं 'गायत्रीभवन' पसंत केलें. देशी पद्धतीच्या खाणावळींत इतकी स्वच्छता, इतका रुबाब आणि भपका असूं शकतो, ही नवीच गोष्ट आम्हांला तिथें कळली. पुण्या-मुंबईच्या हॉटेलांबद्दल मला एक प्रकारचा अभिमान किंवा गर्व होता; पण तो उत्तरेकडील भिकार हॉटेलें पाहिल्यानंतर निर्माण झालेला होता. दक्षिणेकडे लोकांना घरांपेक्षां हॉटेलचेंच आकर्षण अधिक असतें. त्यामुळें इथली हॉटेलें राजेशाही असल्यास नवल काय? 'गायत्रीभवना'ची तीनमजली प्रशस्त इमारतहि चांगली आकर्षक आहे. तिथें राहण्याची, जेवणाची आणि फराळाची अशी सर्व प्रकारची सोय आहे. आम्ही जेवायला गेलों त्या दिवशीं तिथें कांहीं महाराष्ट्रीय मंडळीहि उतरलेली दिसत होती.

आम्ही गेलों त्या वेळीं दोन वाजून गेले होते. त्यामुळें चपातीचें जेवण संपलें होतें; इडली, दोशे वगैरे जिन्नस चार वाजल्यानंतर सुरू होणार होते. त्यामुळें आम्हांला 'अन्नम्', 'सांबार' आणि 'रसम्' यांच्यावरच भूक भागवावी लागली. अर्थात् कडकडून भूक लागलेली असल्यामुळें तें भात-सांबारहि गोड लागलें यांत आश्चर्य नाहीं. गुबगुबीत गादी असलेल्या खुर्चीवर बसून केळीच्या पानांत जेवण्याचा तो पहिलाच दिवस होता. त्यामुळें आम्ही अगदीं सावकाश, रेंगाळत जेवलों.

दक्षिणेकडील केळीच्या पानांची पद्धत मात्र मला फारच आवडली. विशेषतः हॉटेलें आणि खाणावळी यांतून ही पद्धत, स्वच्छता आणि मानसिक प्रसन्नता यांच्या दृष्टीनें खास स्वागतार्ह आहे असें मला वाटतें. खाणावळींत जेवतांना आपल्यासमोर ताट आलें कीं, 'या ताटांत पूर्वीं कोण कोण जेवले असतील, ही वाटी कितीजणांनीं तोंडाला लावली असेल, हा चमचा किती लोकांच्या तोंडांत गेला असेल,' अशा तऱ्हेचा चमत्कारिक विचार कधींकधीं आपल्या मनांत येतो; तो या केळीच्या पानामुळें येणार नाहीं. दक्षिणेकडे भाजी, सांबार भातावर किंवा पानांतच घेण्याची प्रथा असल्यामुळें वाटीची जरूर भासत नाहीं, आणि पाणी पितांना भांडें ओठांना न लावतां वरून पाणी पिण्याची पद्धत असल्यामुळें उष्ट्याची भीति येथें नसतेच!

## राजवाड्यांतील मजेशीर आरसा

सामुदायिकपणें प्रवास करणें जसें अनेक वेळां फायद्याचें ठरतें, तसें अनेक वेळां तें अत्यंत गैरसोईचेंहि होतें. सर्व लोकांना एकत्र हिंडण्यासाठीं सरकारी बस् मिळावी म्हणून म्हैसूरमध्यें आम्हीं जो प्रयत्न केला, त्यांतच आमचा सबंध दिवस वायां गेला; आणि मग आम्ही लहान-लहान टोळ्या करून शहर पहाण्यासाठीं बाहेर पडलों.

आम्ही परस्थ पाहुणे आहोंत हें ओळखून टॅक्सीवाले आमच्याभोंवतीं गोळा झाले आणि ' कृष्णराज सागर'वरील वृंदावन बागेंत आज स्पेशल लाइट आहे, तो तुम्ही पहायला चला, लाइट नसल्यास पैसे देऊं नका,' असें सांगूं लागले. वृंदावन बागेंत सामान्यतः दर शनिवारीं, रविवारीं रोषणाई करण्यांत येते; पण पन्नास रुपये दिले तर स्पेशल लाइटचीहि व्यवस्था केली जाते. त्या दिवशीं सकाळीं एक मोठी पार्टी म्हैसूरला आलेली होती. ती कृष्णराज सागरला गेलेली असून तिनें लाइटची व्यवस्था केली आहे, असें टॅक्सीवाल्यांचें म्हणणें होतें. पण त्यांच्या एकूण बोलण्याच्या पद्धतीवरून आम्हांला शंका आली आणि म्हणून आम्हीं जवळच असलेल्या बस्-ऑफिसच्या फोनवरून चौकशी करविली. तेव्हा तिथें स्पेशल लाइट नाहीं असें कळलें. त्याबरोबर हिरमुसले होऊन टॅक्सीवाले पांगले. ही चौकशी करण्याची सद्बुद्धि आम्हांला झाली नसती, तर निष्कारण येतांजातां सोळा मैलांचा फेरा पडला असता, पैसे गेले असते आणि निराशेचा सूड म्हणून टॅक्सीवाल्यांशीं थोडा वेळ का होईना, आम्हांला भांडावेंच लागलें असतें.

खुद्द म्हैसूर शहर हें कांहीं कमी प्रेक्षणीय नाहीं. सुमारें अडीच लाख लोकसंख्या असलेलें हें शहर १४ चौरस मैलांमध्यें पसरलेलें आहे. इथल्या टुमदार, कोऱ्या करकरीत भासणाऱ्या इमारती, रुंद रस्ते, ऐसपैस चौक, टापटिपीनें रहाणारे तरतरीत चेहऱ्यांचे हौशी लोक, सगळेंच कसें मोहक वाटत होतें. पुण्या-मुंबईच्या गर्दीला कंटाळलेल्या आम्हांला इथली कमी गर्दी पाहूनहि जरा हायसें वाटलें. या शहरामध्यें गचाळ किंवा गलिच्छ वस्ती मात्र कुठें दिसली नाहीं. ती खरोखरीच नाहीं कीं बाहेरच्या

लोकांच्या नजरेला सहजासहजीं ती पडणार नाहीं अशी व्यवस्था सरकारनें आणि नगरपालिकेनें घेतलेली आहे, हें कळणें कठिण होतें.

पायपीट करीत करीत आम्ही मुख्य राजवाड्याच्या आवारांत शिरलों आणि दारावरच्या शिपायांच्या दटावणीला विशेष भीक न घालतां चामुंडेश्वरी, विष्णु, वगैरे देवांचीं सरकारी देवळें पाहून आलों. देवळें मोठीं, स्वच्छ आणि राजवाड्याला शोभतील अशीं आहेत. प्रत्यक्ष राजवाड्यांत प्रवेश करण्यासाठीं सरकारी परवानगी लागते. ती आमच्याजवळ नसल्यामुळें आम्हीं बाहेरूनच वाड्याचें निरीक्षण केलें आणि समोरच्या बाजूला असलेल्या दोन दगडी वाघांचें कौतुक करण्यावर समाधान मानलें.

परत येतांना दरवाज्याजवळच सुमारें दोन पुरुष उंचीचा एक आरसा दिसला. त्यांत आपलीं प्रतिबिंबें पहात असतां एक मजेदार गोष्ट आम्हांला आढळून आली. सामान्यतः आरशामध्यें उलट दिशेला असलेल्या वस्तूंचें प्रतिबिंब पडतें. म्हणजे उजव्या बाजूला असलेल्या वस्तूचें प्रतिबिंब आरशांत डाव्या बाजूला दिसतें; पण या आरशांत ज्या बाजूला वस्तु असेल, त्याच बाजूला तिचें प्रतिबिंब पडतें. राजवाडा आणि चामुंडी हिल्स् यांचीं प्रतिबिंबें त्या त्या दिशांना दिसत होतीं. आमच्याबरोबर असणाऱ्या कुणालाहि याचें शास्त्रीय कारण समजावून सांगतां आलें नाहीं.

### नखरेल चामुंडी टेकडी

म्हैसूर शहराला विद्युत्प्रकाशाचें जणूं वेडच आहे. सूर्यास्त झाला रे झाला, कीं सारी नगरी विद्युत्-दीपांनीं जणूं झळाळून उठते. तसें पाहिल्यास इथें वीज कांहीं स्वस्त नाहीं. युनिटला चार कीं साडेचार आणे पडतात. पण आपलें दुकान किंवा घर विजेच्या दिव्यांनीं सुशोभित केलेंच पाहिजे, असें इथल्या प्रत्येक व्यक्तीला वाटत असावें. सरकारी इमारती आणि सार्वजनिक स्थळें तर काय, रोजच दिवाळी साजरी करतात. शहराबाहेरील 'चामुंडी हिल' या टेकडीवरून म्हैसूरची ही रोषणाई अत्यंत आकर्षक वाटते; आणि शहरांतून चामुंडी टेकडीवरील दिव्यांचा लखलखाट मन मोहून घेतो. पहांटेच्या वेळीं या टेकडीकडे पाहिल्यानंतर प्रसिद्ध गुर्जर कवि श्री. सुंदरम् यांना अशी कल्पना सुचली होती कीं,

' जणूं एखादी मस्त रमणीच आपल्या वक्षस्थळावर रत्नहार रुळत ठेवून स्वस्थपणें पहुडली असावी ! '

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दर मैलाला २ रुपये या दरानें आम्हाला एक मोठी सरकारी बस मिळाली. तिच्यांतून आम्ही प्रथम चामुंडी हिल पाहायला गेलों. ही टेकडी समुद्रसपाटीपासून ३४८४ फूट इंच असून वर जाण्यासाठीं १ हजार पायऱ्या चढाव्या लागतात. मोटारीनेंहि वरपर्यंत जातां येतें. कांहीं कांहीं ठिकाणीं चढण्याचा आणि उतरण्याचा असे दोन स्वतंत्र रस्ते असून त्यांच्यामध्यें लहानशी भिंत आहे. त्यामुळें मोटारींची टक्कर होण्याची भीति इथें नसते.

## डौलदार महिषासुर

टेकडीच्या माथ्यावर प्रवेश करीत असतांना वेशींतच महिषासुराचा रंगीबेरंगी आणि भडक पुतळा समोर दिसतो. हा पुतळा सुमारें दोन पुरुष उंचीचा असून त्यांतील पौरुषामुळें तो मोठा डौलदार दिसतो. त्याच्या डोक्यावर दोन शिंगें असून त्याच्या मिशा भरदार व पिळदार आहेत. त्याच्या उजव्या हातांत तलवारीसारखें जाडजूड शस्त्र आहे आणि डाव्या हातांत एक प्रचंड नाग आहे. त्याच्या कपाळावरील गंध, गळ्यांतील जानवें आणि कमरेचा पितांबर, यांवरून तो ब्राह्मण आहे हें चटकन् ओळखूं येतें. रावणहि ब्राह्मण होता. त्यावरून पूर्वींच्या काळीं सगळे राक्षस ब्राह्मणच होते कीं काय, अशी शंका मनांत येऊन गेली. या महिषासुराचे केंस ऐटींत मागें वळविलेले आहेत. त्यामुळें मात्र तो एखाद्या आधुनिक नटासारखा दिसतो.

## ' राजेन्द्रविलास ' राजवाडा

चामुंडी टेकडीवर पहाण्यासारख्या गोष्टी दोन. एक म्हणजे चामुंडेश्वरीचें मंदिर व दुसरा ' राजेन्द्रविलास ' राजवाडा. आम्ही गेलों त्या दिवशीं चंद्रग्रहण असल्यामुळें देवीचें दर्शन होणार नाहीं असें कुणी तरी सांगितलें. पण ती अफवाच ठरली, आणि पूजा आटोपतांच आम्हाला देवीचें दर्शन घडलें. देवीची मूर्ति सामान्यच आहे; पण स्वतः राजेसाहेब या मूर्तीची पूजा करतात आणि सकाळ-संध्याकाळ तिचें दर्शन घेतात.

( कारण हिच्या कृपेनेंच या राजवंशाच्या मूळ पूर्वजाला हें राज्य मिळालें होतें. ) यामुळें हिचें माहात्म्य विशेष आहे.

' राजेन्द्रविलास ' राजवाडा सर्वांत उंच जागीं असून तिथून म्हैसूर शहराचें दृश्य अत्यंत मनोहर दिसतें. म्हैसूरचें रेसकोर्स मैदान आपल्या रेखीवपणामुळें इथून विशेष नजरेंत भरतें. राजवाड्यामध्यें खूप उंची फर्निचर आणि शोभेच्या वस्तू भरलेल्या आहेत.

## आणि तो प्रचंड नंदी !

टेकडीवरून खालीं उतरतांना सुमारें निम्म्या रस्त्यावर एका दगडांत कोरलेला एक प्रचंड नंदी आहे. या नंदीचें वय तीनशें वर्षांहून जास्त आहे. त्याची उंची सुमारें दीड पुरुष असून तो निश्चितपणें बसलेला आहे. त्याच्या चेहऱ्यावर तृप्ति आणि सुखासीनता यांचे भाव स्पष्ट दिसतात. इतका धष्टपुष्ट आणि देखणा नंदी क्वचितच पहायला मिळतो. तिथें जवळच चरणाऱ्या मरतुकड्या गाईकडे पाहून तर त्याचा प्रचंडपणा विशेषच नजरेंत भरला.

शहराकडे परत येतांना उजव्या बाजूच्या एका सुंदर इमारतीकडे बोट दाखवून आमचा वाटाड्या म्हणाला, " हा ' ललिता-महाल.' खास सरकारी पाहुण्यांना उतरण्यासाठीं हा राजवाडा बांधलेला आहे. पंडित नेहरू किंवा राजेंद्रबाबू याच ठिकाणीं उतरतात. इटालियन संगमरवराच्या पायऱ्या आणि स्प्रिंगची जमीन असलेलें ( Spring-floor ) नृत्यगृह ( ' बॉल-रूम ' ) हीं या राजवाड्याचीं वैशिष्ट्यें. "

तो राजवाडा पहाण्याची परवानगी आम्हीं मिळविलेली नव्हती. त्यामुळें त्याचें तें वर्णन आम्हीं निरुत्साही मनानेंच ऐकून घेतलें आणि आसपासची शोभा पहाण्यांत गढून गेलों.

## आधुनिक वराहावतार

आमची मोटार पशुसंग्रहालयाच्या ( ' झू ' ) दारांत उभी राहिली आणि चामुंडी टेकडीवरून पाहिलेला देखावा बाजूला सारून आम्ही दोन आण्यांचें टिकिट काढून आंत गेलों. दारावर अडीच फूट उंचीचा एक म्हातारा मुसलमान होता. त्याचें तें लठ्ठ डोकें आणि गुटगुटीत

मैसूर
अनुक्रम ........... दि: ...........
क्रमांक ........... नों: दि: ........... 33

शरीर पाहून ‘ हीसुद्धां येथील संग्रहालयांतील एक प्रेक्षणीय वस्तु आहे ’ हें आम्हीं मान्य केलें.

या पशुसंग्रहालयांत अनेक मजेदार प्राणी आहेत. भल्या मोठ्या कोंबड्याएवढे अमेरिकन पोपट आहेत. त्यांचे रंग लाल आणि निळे असून त्यांची चोंच गिधडाच्या चोंचीसारखी मोठी आहे. त्यांच्या डोळ्यांभोवतीं असणारीं पांढरीं वर्तुळें नंतर रंगविल्यासारखीं कृत्रिम वाटतात. ( पण तीं नैसर्गिकच आहेत. ) आम्ही गेलों त्या वेळीं एका हत्तीच्या पिलाच्या पायावर उपचार चालू होता. त्याच्या पायाला झालेली जखम सडून मोठें भोंक पडलेलें होतें. त्याला मागें पुढें दोरानें बांधूनहि तें पिलूं स्थिर रहात नव्हतें. म्हणून दोन मोठ्या हत्तींच्या मधें त्याला कोंडून धरलेलें होतें. त्याच्या करुण किंकाळ्यांनीं त्याची आई अगदीं अस्वस्थ होत होती. पण तें जवळच असल्यामुळें ती कांहीं दांडगाई करीत नव्हती.

जवळच एक म्हातारा आफ्रिकन हत्ती होता. त्याचे कान भारतीय हत्तीच्या कानांपेक्षां दुप्पट मोठे आणि ताठ होते. खरोखरीचीं सुपेंच लावलीं आहेत असें वाटत होतें !

एका कोपऱ्यांत दोन जंगी कासवें ( Land tortoise ) प्रेमालाप करीत होतीं; तर दोन गेंडे चिखलांत लोळत होते.

पण सर्वांत मजेदार प्राणी म्हणजे ‘ हिपॉपोटॅमस ’ अथवा पाणघोडा. नील नदीच्या विशाल पात्रांत स्वैर विहार करणाऱ्या या प्राण्याला इथें लहानशा खड्ड्यांत रहावें लागत असलेलें पाहून त्याची आम्हांला कींव आली. याच्याइतका कुरूप प्राणी कदाचित् शोधूनहि सांपडणार नाहीं. याच्या तोंडांतील वीत-दीड वीत लांबीचे सुळे-किंवा फाळ म्हणा हवे तर-पाहिले कीं वराहावतारामध्यें ईश्वरानें ज्या दांतांवर पृथ्वीचा भार तोलून धरला होता, त्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं; त्याचे हे दांत पहायचे असतील तर तिथल्या रखवालदाराला आणा-दोन आणे द्यावे. म्हणजे तो पाणघोड्याला बोलावून त्याच्या नाकावर गवताचा किंवा कसला तरी कचरा धरतो. त्याबरोबर तो पाणघोडा आपला भयानक जबडा

वासतो आणि आपल्या खंजिरासारख्या सुळक्यांचें दर्शन घडवितो. त्या दांतांमधील लालसर पातळ जीभ इतकी मुलामय वाटते कीं, तिच्यावरून हात फिरविण्याचा मोह कुणालाहि व्हावा. तुमचें पहाणें झालें कीं रखवालदार तो गवताचा चोथा त्याच्या तोंडात टाकतो. त्याबरोबर तोंडाची पेटी बंद करून पाणघोडा तुरुतुरु डबक्याकडे निघून जातो.

## जगन्मोहन चित्रशाळा

'झू' मधून आम्ही थेट 'जगन्मोहन' राजवाड्यांत गेलों. सध्यांचा राजवाडा तयार होण्यापूर्वीं म्हैसूरचे राजे याच वाड्यांत रहात असत. सध्यां येथें सरकारची (राजाची) चित्रशाळा आहे. हिंदुस्थानांतीलच नव्हे, तर युरोपांतील आणि चीन–तिबेटमधीलदेखील चित्रकारांचीं चित्रें इथें पहायला मिळतात. एका मराठमोळ्या बाईच्या चित्रानें माझें लक्ष वेधून घेतलें. त्याच्याखालीं लिहिलेलें होतें, 'Glow of Hope' ('आशेचा लालिमा'). तिच्या एका हातांत तेवणारी समई असून दुसरा हात वाऱ्यापासून ज्योतीचें रक्षण करण्यासाठीं समोर धरलेला आहे. तिच्या हाताच्या बोटांच्या फटींतून दिव्यांचा प्रकाश मजेदार दिसतो. समईच्या ज्योतीचा लालसर प्रकाश त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर ठिक-ठिकाणीं पडून तो उजळून निघाला आहे. तें चित्र मीं पूर्वीं केव्हां तरी पाहिलेलें होतें, त्यामुळें मला पुनर्भेटीचा आनंद झाला. चित्रकाराचें नांव होतें, 'एस. एल. हळदणकर.'

याखेरीज श्री. के. वेंकटप्पा यांचें 'महाशिवरात्रि', एम् वीराप्पा यांचें 'नलदमयंती', सौम्य रंगाची किमया करणारीं गोविंदराज यांचीं निसर्गचित्रें, वगैरे कांहीं चित्रें सहज जातांजातां मनावर ठसा उमटवितात. 'बारा भारतीय (हिंदी) महिने' किंवा 'कृष्ण–सुदाम–कथा' यांसारखीं क्रमबद्ध चित्रेंहि इथें आहेत. मात्र सुदाम्याला मुस्लिम पद्धतीची दाढी कां लावली असावी तें कळत नाहीं. नाना फडणीसाचेंहि एक चित्र इथें पहायला मिळालें.

यांखेरीज हस्तीदंती, कांचेचीं, संगमरवरी, चंदनाचें काम असलेलीं लांकडी, पितळेचीं वगैरे नाना प्रकारचीं चित्रें (मूर्ती) पहातांना

पाहणाराच थकून जातो. समुद्रांतील शेवाळांसारख्या चित्रविचित्र वनस्पतींचा संग्रह प्रेक्षणीय आहे.

दुसऱ्या मजल्यावरील चिनी चित्रें आणि रविवर्म्यांचीं पौराणिक चित्रें आपलें लक्ष वेधून घेतात. सैरन्ध्री, मत्स्यगंधा, दमयंती वगैरे चित्रांच्या लहान छापील प्रती आपल्या पहाण्यांत येतात. त्यांचीं मूळ मोठीं चित्रें येथें आहेत. इतक्या वर्षांनंतरहि त्या चित्रांत एक प्रकारचें अद्‌भुत आकर्षण असल्याचा प्रत्यय सहृदय कलावंताला आल्याशिवाय रहात नाहीं.

तिसऱ्या मजल्यावर वाद्यें, खेळ ( सोंगट्यांचे पट ) वगैरे तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु जमवून ठेवलेल्या आहेत. त्या सर्वांचें नीट अध्ययन करावयाचें तर कांहीं दिवसच इथें घालविले पाहिजेत !

अखेरशेवटीं तळमजल्यावरील कांहीं महत्त्वाचीं चित्रें आम्हीं पाहिलीं. त्यांतील हैदर व टिपू यांच्या जीवनांतील कांहीं चित्रें विशेष स्मरणांत राहिलीं आहेत. टिपूच्या दोन मुलांना इंग्रज लोक ओलीस म्हणून घेऊन जात आहेत, त्या वेळीं त्यांची आई त्यांना मिठी मारून जाऊं देत नाहीं,— किंवा निरोप देत आहे,— असें जें मोठें चित्र आहे, तें पहातांना आपल्या हृदयांत आजहि कालवाकालव झाल्याशिवाय रहात नाहीं. रणांगणावर पडलेलें टिपूचें प्रेत इंग्रज सेनाधिकाऱ्यांनीं रात्रींच्या अंधारांत मशाली घेऊन शोधून काढलें, त्याचें चित्र मोठें धीरगंभीर आहे. टिपूच्या मृत शरीरावर पडून त्याचीं बायकामुलें विलाप करीत असल्याचें चित्रहि असेंच हृदयद्रावक आहे.

### ‘ कर्नाटक’ऐवजीं ‘ म्हैसूर ’ कां ?

चित्रशाळा पाहिल्यावर आम्ही अगदीं थकून गेलों. त्यामुळें इतर कांहीं पहाण्याचा उत्साह राहिला नाहीं. वस्तुतः इथलें रेल्वे–स्टेशन, युनिव्हर्सिटी, गव्हर्मेंटहाउस, चंदनाच्या तेलाचा कारखाना, रेशमाचा कारखाना, वगैरे अनेक गोष्टी पहाण्यासारख्या आहेत. पण आम्ही दमून गेल्यामुळें तो नाद सोडला. अर्थात् रेल्वे-स्टेशन येतां जातां पहायला मिळालें होतेंच. नवख्या माणसाला तोहि एखादा राजवाडा आहे असेंच वाटतें. सेंट फिलोमिना चर्चचे मिनार ( मनोरे ) तुम्हांला आगगाडींतूनहि

दिसतात आणि तुमच्या डब्यांत ख्रिस्ती उतारू असतील तर ते चर्चची शिखरें दिसेपर्यंत छातीवर क्रूसची खूणहि करीत रहातील.

मी परत येत असतां म्हैसूरपासून बंगलोरपर्यंत गाडींतील म्हैसुरी लोकांशीं इकडच्या–तिकडच्या गप्पा मारल्या. त्यांत तेथील लोक 'कर्नाटक' या विशाल नांवाऐवजीं 'म्हैसूर' हें संकुचित नांव राखण्या-बद्दल कां आग्रह धरतात, हा मुद्दाहि होता. डॉ. मूर्ति नांवाचे एक प्रख्यात डॉक्टर माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना म्हणाले, "म्हैसूर हें पुरोगामी आणि सुसंस्कृत राज्य म्हणून पूर्वीपासून स्वदेशांत नि परदेशांतहि प्रसिद्ध आहे. त्याचें हें 'गुडविल' नव्या प्रांताला लाभावें असें आम्हांला वाटतें. तसेंच बाहेरच्या कर्नाटकासारखा म्हैसूरला जातीयवाद नाहीं. तेव्हां स्वच्छ वातावरण रहायला हेंच नांव योग्य ठरेल."

म्हैसूरच्या जातीयवादाची मला जी माहिती होती, ती त्यांना मी सुनावली, तेव्हां ते म्हणाले, "सगळ्या लोकसंख्येंत ब्राह्मण एक किंवा दोन टक्केहि नसतील. तेव्हां त्यांना मंत्रिपदें किंवा नोकऱ्या मिळाव्यात हा हट्ट कशाला ?"

अर्थात् त्यांचा युक्तिवाद शास्त्रीय नाहीं हें मला कळत होतें; पण मी जास्त वाद घातला नाहीं. म्हैसूर हें पुष्कळच सुधारलेलें आहे हें मलाहि दिसलें होतें. रस्त्यांतील वाहतुकीचे नियम किती काटेकोरपणें पाळले जातात—पोलिस नसतांनाहि रस्ता ओलांडतांना वाहन थांबवून पुढें जाण्याचा नियम रिक्षावाले आणि टांगेवालेहि किती व्यवस्थितपणें पाळतात, हें मीं पाहिलें होतें आणि त्याबद्दल मीं त्यांना मनांतल्या मनांत शाबास-कीहि दिली होती. पण इतकें सर्व असूनहि म्हैसूरकरांनीं 'कर्नाटक' हें सर्वसमावेशक नांव घेण्यास इतका विरोध कां करावा, हें मात्र मी समजूं शकलों नाहीं !

●●●●

# दक्षिणकाशी कांचीपुरम् : ४

## सप्तपुरींपैकीं एक क्षेत्र

आपल्या देशांत खालील सात क्षेत्रें मोक्षदायक समजलीं जातातः–

अयोध्या, मथुरा, माया, काशी कांचीरवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ।।

यापैकीं अयोध्या, मथुरा, माया (गया), काशी, अवंतिका (उज्जैन) व द्वारावती (द्वारका) या सहा पुरी उत्तर भारतांत असून फक्त कांची तेवढी दक्षिण भारतांत आहे. तसेंच अयोध्या, मथुरा व द्वारका या तीन विष्णूच्या असून काशी, अवंती व माया या तीन शिवाच्या आहेत. उरलेल्या एका पुरीबद्दल शैव व वैष्णव यांच्यांत वाद माजूं नये म्हणून कीं काय तिचा निम्मा भाग शैवांना व निम्मा वैष्णवांना वांटून देण्यांत आलेला आहे. म्हणजे, कांचीचे शिवकांची व विष्णुकांची असे दोन भाग आहेत. कांचीचें कांचीपुरम् (कांचन नगरी–गोल्डन सिटी) व त्यांचेंच इंग्रजी रूपांतर कांजीवरम् झालें. या ठिकाणीं फक्त शैव-वैष्णवांचींच देवस्थानें आहेत असें नव्हे, तर जैन व बौद्ध या अवैदिकांचींहि तीर्थस्थानें येथें आहेत. म्हणजे भारतांतील वैदिक-अवैदिक मतांचा सुरेख संगमच येथें झालेला आहे. आणि याच कारणामुळें आचार्य विनोबा भावे यांनीं अखिल भारतीय सर्वोदय समाजाच्या आठव्या वार्षिक संमेलनासाठीं ही नगरी पसंत केली होती. कांचीपुरमूला तेथील लोक 'दक्षिण काशी' असेंहि म्हणतात. या शहराची प्राचीनता लक्षांत घेतां त्याला 'दक्षिण काशी' नांव शोभतें यांत मात्र शंका नाहीं. या प्रदेशाचें पूर्वीचें नांव 'तुण्डप विषय' असें होतें. इसवी सनापूर्वीं पांचव्या शतकांत भगवान् बुद्ध येथें आले होते असें म्हणतात. अशोकाचें धर्मचक्र येथेंहि

फिरत होतें. त्यानें येथें अनेक स्तूप बांधले होते. अनेक विहार व संघाराम येथें होते. सुमारें दहा हजार भिक्षू या ठिकाणीं रहात असत. या संघारामांचे अवशेष अजूनहि येथें पहावयास मिळतात. त्यानंतर जैन राजे आले. त्यांनीं सुमारें हजार वर्षें राज्य करून जैन धर्माच्या प्रसारास हातभार लावला. त्यानंतर वैदिक किंवा ब्राह्मण धर्म उदयास आला. पल्लव राजांनीं तीनशें वर्षेपर्यंत कांचीला राजधानी बनवून राज्य केलें. पुढें चौलांनीं त्यांचा पराभव केला. तेव्हां कांचीचें राजकीय महत्त्व कमी होऊन त्रिची, मदुरा, म्हैसूर, विजयानगर वगैरे नगरांना राजधानी बनण्याचें भाग्य लाभलें. तरी पण कांचीचें धार्मिक माहात्म्य कायमच राहिलें.

मध्यंतरीं औरंगजेबाची वक्रदृष्टि या प्रदेशाकडे वळली होती. त्या वेळीं येथील मूर्तींचें रक्षण करण्यासाठीं त्यांना तिरडीवर लपवून त्रिचनापल्लीजवळील उदरपलायम् या ठिकाणीं नेलें. पुढें हे देव आपल्याच गांवीं रहावेत असा लोभ उदरपलायम्च्या अधिपतींच्या मनांत निर्माण झाला. तेव्हां लाला तोडरमल्ल या देवभक्तानें त्याचा पराभव करून इ. स १७१० सालीं पुनः या मूर्तींची प्रस्थापना केली. तेव्हांपासून या देवांना स्वास्थ्य लाभलेलें आहे.

### मंदिरांचें नगर

कांचीपुरम् शहराचें क्षेत्रफळ सुमारें साडेचार चौरस मैल असून लोकसंख्या लाखाच्या आसपास ( ८५,०४३ ) आहे. गांवाची आंखणी व्यवस्थित झालेली असून स्वच्छताहि चांगली आहे. मुख्य रस्ता डांबरी व चांगला प्रशस्त आहे. या गांवांत शैवांचीं २७५ मंदिरें असून वैष्णवांचीं १८ मंदिरें आहेत. पुष्कळ लोकांचा चरितार्थ या मंदिरांवरच चालत असतो. मंदिरांच्या प्रचंड संख्येमुळें या शहराला ‘ मंदिरांचें नगर ’ असेंहि म्हणतात. अर्थात् अशीं मंदिरांचीं नगरें आपल्या देशांत इतरत्रहि अनेक आहेत. काशी, जगन्नाथपुरी, भुवनेश्वर, द्वारका, शत्रुंजय वगैरे अनेक नांवें सहज सांगतां येतील. पण कांचीमध्यें विशाल व अवाढव्य मंदिरांची जेवढी संख्या आहे तेवढी मात्र इतरत्र क्वचितच असेल.

**एकांबरनाथाचें मोठें मंदिर**

मंदिरांची इतकी गर्दी असल्यामुळें मुख्य मुख्य प्रेक्षणीय देवळें कोणतीं याची माहिती मिळवणें आवश्यक होतें. आम्ही आमच्या निवासस्थानांतून म्हणजे सर्वोदयपुरम् मधून बसनें निघून सरळ शहराचे मध्यभागीं गेलों. समोरच नगरपालिकेची कचेरी दिसली, तेथें शहरासंबंधीं कांहीं माहिती आंकडेवारींत दिलेली होती. ती पहात असतां एक प्रतिष्ठित गृहस्थ तेथें आले व त्यांनीं आमची इंग्रजींत चौकशी केली. आम्ही त्यांना आमची अडचण सांगितली तेव्हां, त्यांनीं कागदावर नकाशा काढून महत्त्वाच्या ६ मंदिरांचीं नांवें व ठिकाणें सांगितलीं. त्यांचा तो सल्ला आम्हाला बराच उपयोगी पडला.

ज्याला फार वेळ घालवितां येणें शक्य नसेल, त्यानें दोन मंदिरें पाहिलीं तरी त्याला देवळांच्या भव्यतेची कल्पना येऊं शकेल. एक म्हणजे शिवकांचींतील एकांबरनाथाचें आणि दुसरें विष्णुकांचींतील वरदराज पेरुमलचें. यापैकीं एकांबरनाथाचें मंदिर ( शंकराचें ) गांवाच्या पश्चिम टोकास असून वरदराज स्वामीचें ( विष्णूचें ) पूर्वेस आहे. या दोन मंदिरांतील अंतर जवळ जवळ चार मैल आहे.

एकांबरनाथाच्या मंदिरासमोरील गोपुर ९ मजली असून मदुरेच्या मीनाक्षी मंदिराच्या गोपुराशीं तें जणूं स्पर्धा करीत आहे असें वाटतें. दक्षिणेमध्यें पुष्कळ वेळां नुसतीं गोपुरेंच प्रचंड असतात. आंतील देवळें त्या मानानें अगदींच मामुली असतात. एकांबरनाथाचें गोपुर पाहिल्यानंतर अशीच स्थिति असावी असा विचार मनांत येतो. पण गोपुरांतून आंत प्रवेश केल्यानंतर मंदिराची अवाढव्यता दिसून येते. कोल्हापूरच्या अंबाबाईच्या देवळासारखी ४।५ देवळें तरी या देवळांत सहज सामावून जातील. एवढ्या मोठ्या देवळांतील मूर्ति मात्र अगदींच किरकोळ वाटते. शंकर-पार्वतीच्या छोट्या मूर्ती असून शिवाय शिवलिंगहि आहे. येथील मंडपांतील प्रचंड खांबांची कतार ( हजार खांब ) पाहिली कीं छाती दडपून जाते. पण त्यावर नक्षीकाम मुळींच नाहीं. यामुळें कुंकू न लावणाऱ्या व दागिने न घातलेल्या आधुनिक तरुणींप्रमाणें ते खांब अगदीच ओकेओके

वाटतात. कलेच्या दृष्टीनें या देवळांत पहाण्यासारखें कांहीं नाहीं, पण याची भव्यता पाहून डोळे दिपतात व मन थक्क होतें यांत शंका नाहीं. बाकी, शंकर बैरागी देव, जगाचा संहारकर्ता, त्याच्या देवळांत नाजूक नक्षीकामाऐवजीं छाती दडपून टाकणारी भव्यता असणें हेंच जास्त योग्य नाहीं काय?

येथें एका आंब्याच्या झाडाखालीं (एक + आम्र = एकाम्र = एकांबर) पार्वतीनें शंकराची उपासना केली होती, तेव्हां पृथ्वीतत्त्वाच्या रूपानें शंकर येथें प्रकट झाले, (देवळांतील लिंगाला पृथ्वी लिंग म्हणतात.) म्हणून याला एकांबरनाथ किंवा एकांबर म्हणतात. जंबुकेश्वरीं जलाच्या रूपानें, कालाहस्ती येथें वायूच्या रूपानें, तिरुवन्नमलाई येथें अग्नीच्या रूपानें आणि चिदंबरम् येथें आकाशाच्या रूपानें शंकर प्रगट झाले होते असें भाविक समजतात.

येथील शिवलिंग वाळूचें असल्यामुळें त्याला पाण्यानें अभिषेक न करतां सुगंधी तेलाची उटी चढते असें म्हणतात. भक्त लोक आपल्या-बरोबर कापूर नेतात. तो लावून पुजारी आरती करतो. त्या प्रकाशामध्यें मूर्तीचें दर्शन होतें.

## शिवकांचींतील इतर कांहीं मंदिरें

या भागांत जीं २७५ शैव मंदिरें आहेत तीं सर्व पहाणें शक्य नसल्या-मुळें आम्ही मुख्य मुख्य चार पांच मंदिरें पाहून घेतलीं. गांवाच्या मध्य-भागीं असलेलें कच्छपेश्वर मंदिर प्रशस्त आवारामुळें प्रेक्षकांचें लक्ष वेधून घेतें. शंकराच्या या देवळांत त्याचा मुलगा कार्तिकेय ऊर्फ सुब्रह्मण्यम् याच्याहि सुबक मूर्ती आहेत. आम्ही गेलों त्या वेळीं लग्नाची एक वरात तेथें आली होती. नववधूवर सुब्रह्मण्यमूला नमस्कार करीत असल्याचें पाहून आपल्याकडे कार्तिकेयाचें दर्शन घेण्यास स्त्रियांना मज्जाव असल्याचें मला स्मरण झालें. आणि दक्षिणी कार्तिकेयानें आपल्या उत्तरेंतील ब्रह्म-चर्याचें उट्टें काढण्यासाठीं दोन बायकांशीं लग्न केल्याचेंहि आठवलें.

येथून जवळच गांवाबाहेर कैलासम् मंदिर आहे. या देवळाची बांधणी पल्लव पद्धतीची असून इ. स. ७०० च्या सुमारास तें बांधलेलें आहे.

इतर देवळें यानंतरचीं असावीत असें म्हणतात. या देवळासमोरचा नंदी अलंकारांनीं नटलेला असून मोठा रुबाबदार दिसतो. येथून गांवांतील गोपुरें अगदीं उठून दिसतात.

चित्रगुप्ताच्या देवळाचें वैशिष्ट्य असें कीं काशीखेरीज इतर कोठें चित्रगुप्ताचें देऊळ नाहीं. चित्रगुप्ताच्या हातांतील वही व लेखणी प्रेक्षणीय आहे.

वामनावताराचें देऊळ विशेष महत्त्वाचें नाहीं, पण देवळांतील वामनाची मूर्ति मजेदार आहे. ही मूर्ति दहा–बारा फूट उंच असून भिंतीशीं चिकटलेली आहे. वामनाच्या उजव्या पायाखालीं बळिराजा असून डावा पाय नृत्याप्रमाणें खांद्याच्या रेषेंत वर नेलेला आहे. गाभाऱ्यांत अंधार आहे व मूर्ति काळ्या दगडाची आहे. त्यामुळें काठीला बांधलेली मशाल पेटवून पुजारी सबंध मूर्ति दाखवितो तेव्हांच ती दिसते. पल्लव राजांचीं चित्रें या देवळाच्या भिंतीवर दगडांत कोरलेलीं आहेत. त्यामुळें ऐतिहासिक दृष्ट्याहि या मंदिराचें महत्त्व विशेष आहे.



वामन अवतार

वैकुंठेश्वराच्या देवळांतील पांचसहा फूट उंचीची काळ्या दगडाची मूर्ति अत्यंत सुंदर आहे.

कामाक्षी अम्माचें मंदिर खूप मोठें असून तेथील कामाक्षीची म्हणजे



पार्वतीची मूर्ति फारच मनोहर आहे. या देवळाच्या आवारांत श्रीमत् शंकराचार्यांची पांढऱ्या संगमरवरी दगडाची मूर्ति आहे. त्यांनींच या कामाक्षीची स्थापना केली असें म्हणतात. या देवळाच्या गोपुराचें वैशिष्ट्य असें कीं प्रत्येक मजल्यावर मधल्या दरवाजाजवळ पुरुष द्वारपालकाऐवजीं स्त्री द्वारपालिका आहेत.

उत्कृष्ट टप असलेल्या एका छोट्याशा एक्यांतून आम्ही पांच जण दाटीवाटीनें बसून एका मांदिरांतून दुसऱ्या मंदिराकडे जात होतों. येथील एक्काहि प्रेक्षणीय आहे. एखाद्या भल्या मोठ्या पेटीसारखा तो दिसतो. पांच–सहा लोकांचें ओझें वाहून नेणारा तो काटक बैल मात्र खरोखरीच प्रशंसेस पात्र समजला पाहिजे.

## वरदराजाची रथयात्रा

माझे मित्र श्री. रामानंद सागर कांचीपुरमला आले होते. त्या दिवशीं ( ता. २८ मे रोजीं ) सोमवार होता. सोमवारीं शंकराचें दर्शन व पूजा केल्याशिवाय जलग्रहण करायचें नाहीं, असा त्यांचा नियम आहे. म्हणून गांवांत जाऊन एकाम्बरनाथाचें दर्शन घेऊन यावें, असें त्यांनीं ठरविलें. आदल्या दिवशीं मी शिवकांचींतील देवळें पाहून आलों होतों. यामुळें तिकडे

जाण्यास मी फारसा उत्सुक नव्हतों. म्हणून सर्वोदयपुरम्हून कांची गांवापर्यंत पायीं जावें व तेथून श्री. सागर यांनीं शिवालयाकडे जावें आणि मीं देवराजस्वामी ( वरदराजाच्या ) मंदिराकडे जावें असें ठरलें.

त्याप्रमाणें आम्ही गांवांत पोंचलों तों सारा रस्ता माणसांनीं फुलून गेलेला दिसला. दूरवर दृष्टि टाकली तेव्हां एक प्रचंड चार मजली घर हळूहळु पुढें सरकत आहे असें दिसलें. तो वरदराजाचा रथ होता. त्या वेळीं त्याचा ब्रह्मोत्सव चालू होता. त्याचीच ती रथयात्रा. एवढा प्रचंड रथ मी पूर्वीं पाहिला नव्हता; यामुळें मला मोठी गंमत वाटली. रथांत विष्णूची मूर्ति असून, तिच्यासमोर भटजी बसलेले होते. वाजंत्रीहि वरच होते. रथाला चार जाडजूड काथ्यांचे दोर लावलेले असून, शेंकडो लोक त्या दोराच्या साहाय्यानें रथ ओढीत होते. एवढे प्रचंड धूड एकदां चालू झालें म्हणजे थांबविणें अत्यंत अवघड असलें पाहिजे हें उघड होतें. विशेषतः डांबरी रस्त्यावर तें जवळजवळ अशक्यच होतें. दीड दोन पुरुष उंचीच्या रथचक्राकडे पाहिलें कीं उरांत धडकीच भरे. जर हा रथ उतरणीला लागला व आवरतां आला नाहीं तर काय होईल? पण ज्यानें रथ बनविला त्याला त्याचे 'ब्रेक्स' हि बनवितां आलेलेच असणार! असे गाडीभर 'ब्रेक्स' रथाच्या मागोमाग येत होते. जमीन चोपण्यासाठीं जें चोपणें किंवा बडवणें वापरतात तशी गाडीभर चोपणीं तयार ठेवलेलीं होतीं. रथ ओढण्याच्या वेळीं चाकाखालून चोपणीं काढून घेत आणि तो एखादा फूट पुढें गेला कीं, लगेच चाकांखालीं दोन्ही बाजूंनीं चोपणीं ठेवीत. चढणीचा रस्ता असल्यास रथ मागील बाजूस घसरूं नये म्हणून चाकांच्या मागेंहि चोपणीं लावण्यांत येत होतीं. रस्त्याच्या दोन्ही बाजूस उभे असलेले स्त्री-पुरुष भक्तीनें वरदराजाला नमस्कार करीत होते. मधून मधून जुन्या पद्धतीच्या उखळींतून दारूचे बार उडविले जात होते.

### माडीवरील वरदराज पेरुमल

रथयात्रेची गंमत पाहून मी विष्णुकांचींतील मुख्य वरदराजाचें (विष्णु) मंदिर पहाण्यास गेलों. याचें आवार खूप मोठें असून आंत तळें आहे. ( अर्थात् प्रत्येक मोठ्या देवळांत असें तळें किंवा कुंड असतेंच आणि त्याचें


पाणी गलिच्छ, हिरवेंगार असावयाचें हेंहि ठरलेलेंच असतें!) या मंदिराचे तट खूप उंच व भक्कम आहेत. देवाच्या दागदागिन्यांचें संरक्षण करण्यासाठीं एवढ्या मोठ्या तटांची जरूरी नाहीं असें कोण म्हणेल? याचें गोपुर मात्र अगदींच सामान्य व फक्त सात मजलेच उंच आहे. आंत प्रवेश केल्यानंतर शंभर खांबाचा वसंत-मंडप आपल्या दृष्टीस पडतो आणि आपणाला वरदराजाच्या दर्शनाचा विसर पडून आपण त्या मंडपाच्या खांबावरील नक्षीकाम पहाण्यांतच गढून जातों. प्रत्येक खांबावर वेगवेगळीं चित्रें खोदलेलीं आहेत. घोडेस्वार व देवीदेवतांच्या मूर्तींचें जणू प्रदर्शनच या मंडपांत भरलेलें आहे. घोड्याच्या टापांखालीं माणसेंहि आहेत आणि जनावरेंहि सांपडलेलीं आहेत. लतापल्लवांचाहि चांगला उपयोग करण्यांत आलेला आहे. या मंडपांतील शिल्पकला पहाण्यांत तासन् तास घालविले तरी मनाची तृप्ति होणार नाहीं.

म्हणून मी वरदराजाच्या शोधार्थ फिरूं लागलों. खरोखरीच या देवळांतील देव शोधून काढावा लागतो. नेहमींप्रमाणें गोपुराच्या समोर मुख्य गाभाऱ्याचें प्रवेशद्वार नसून मागील बाजूनें टेकडीसारख्या एका माडीवर (किंवा माडीसारख्या एका टेकडीवर) चढून गेलें म्हणजे मुख्य गर्भागार लागतें. ज्यांना हें माहीत नसतें ते लोक देवळांतील इतर दोन तीन देवळें पाहूनच परत जातात आणि गाभाऱ्यांत मिट्ट काळोख असल्यामुळें आपण कोणत्या देवाचें दर्शन घेतलें हें माणसाला सहसा कळतच नाहीं!

## दर्शनासाठीं मनस्वी धक्काबुक्की

वरदराजाचा उत्सव सुरू असल्यामुळें देवळांत अतोनात गर्दी झालेली होती. शिवाय देवळाचें आवार जरी विस्तीर्ण असलें तरी प्रत्यक्ष गाभारा मात्र एखाद्या अंधारकोठडीसारखा कोंदट व अरुंद होता. त्यामुळें आंत जाण्यासाठीं चांगलीच धक्काबुक्की करावी लागत होती. अर्थात् आंत हवेचा अभाव असल्यामुळें तेथें जातांच जीव गुदमरत होता आणि बाहेर पडण्यासाठीं पुनः युद्ध करावें लागत होतें. दक्षिणेकडे देवदर्शनाच्या बाबतींतील इतकी अव्यवस्था मला इतरत्र कोठेंच दिसली नाहीं. प्रत्यक्ष गाभाऱ्याला चोरांच्या भीतीमुळें दारें किंवा खिडक्या ठेवतां येत नसल्या तरी त्याच्या

पुढच्या खोलीला दोन्ही बाजूस दारें ठेवतां येणें शक्य आहे आणि कांहीं देवळांतून तशीं दारें आहेतहि. पण देव उजेडांत यावा, त्याला मोकळी हवा लागावी असें भक्तांनाच वाटत नसेल तर कोण काय करणार ?



श्रीविष्णु वरदराज पेरूमल

येथील विष्णूची काळ्या दगडाची मूर्ति मात्र सुंदर आहे. पुजारी कापूर लावून आरती करीत असतां सर्व मोठी मूर्ति स्पष्ट पहावयास मिळते. मूर्ति एक पुरुषभर उंच असून तिच्या हातांत शंख, चक्र, गदा व पद्म आहेत.

एक दोन मिनिटें मी दर्शन घेऊन बाहेर पडलों तेव्हां माझ्या अंगावरील सर्व कपडे घामानें चिंब भिजून गेले होते. कांहीं लोक ती भयंकर गर्दी पाहून बाहेरच्या बाहेरच परत जात असलेले मला दिसले, तेव्हां त्यांच्या शहाणपणाची मीं मनांतल्या मनांत तारीफ केली.

अशा प्रकारें शिवकांची व विष्णुकांची येथील मुख्य मंदिरांचें दर्शन घेऊन मी दीड मैलांवरील सर्वोदयपूरमला परत गेलों. येथील जैन–बौद्ध अथवा मुसलमान यांचीं पूजास्थानें पहाण्याइतका उत्साह आतां माझ्या ठिकाणीं उरला नव्हता !

●●●●

# पक्षितीर्थम् : ५

## अद्‌भुताचें आकर्षण

माणूस कितीहि सुधारला, विज्ञानानें कितीहि प्रगति केली तरी माणसाच्या अंतःकरणांतील अद्‌भुताविषयींचें आकर्षण कांहीं कमी होत नाहीं. पाक्षितीर्थम् या ठिकाणीं रोज नियमित वेळीं दोन गृध्र पक्षी येतात आणि ते भटजीच्या हातून अन्न ग्रहण करतात हें ऐकल्यावाचल्यापासून आपण केव्हांतरी तेथें अवश्य गेलें पाहिजे असें मला वाटत होतें. म्हणून कांचीपुरम्‌चें सर्वोदय-संमेलन आटोपल्यानंतर ता. ३१ मे १९५६ रोजीं भल्या पहांटे गाडीनें निघून २२ मैल दूर असलेल्या चेंगलपट (चिंगलपेट) या जंक्शनच्या गांवीं गेलों. स्टेशनवरच पक्षितीर्थम् व महाबालिपुरम् या स्थळांना जाणाऱ्या मोटारी उभ्या होत्या. पाक्षितीर्थम् हें कांहीं त्या गांवचें नांव नव्हे. त्यामुळें मोटारीवर 'तिरूक्कलिकुड्रम्' हें नांव (इंग्रजींत) वाचतांच कांहीं अर्थबोध झाला नाहीं; म्हणून मोटारवाल्याला विचारून खात्री करून घ्यावी लागली.

चेंगलपेटहून 'तिरुक्कलिकुंड्रम्' नऊ मैल दूर आहे. मोटारवाल्यानें पांच आणे भाडें घेतलें, तें योग्यच वाटलें. अर्ध्या पाऊण तासांतच आम्ही त्या गांवाला पोंचलों. 'तिरूक्कलिकुंड्रम्' या तामीळ शब्दाचा अर्थ मृत्यु-संजीवन पर्वत असा होतो. पक्षीराज साडेअकरा वाजतां येत असले तरी साडेदहा वाजल्यापासून डोंगरावर हजर राहणें चांगलें, असें आम्हांस सांगण्यांत आलें होतें. तरीहि आमच्याजवळ दोन तास जास्त होते. म्हणून आम्ही शेजारच्या हॉटेलांत जाऊन यथेच्छ नास्ता केला आणि जवळचें सामान हॉटेलवाल्याकडे ठेवून जवळचें मंदिर पहावयाला गेलों.

### भक्तवत्सलेश्वर शिवजी

दक्षिणेंतील इतर मंदिराप्रमाणें भक्तवत्सलेश्वर शिवाच्या मंदिरालाहि चार बाजूस चार गोपुरें आहेत. गोपुरांवर सात सुंदर कलश आहेत. समोरच्या बाजूस वेगवेगळीं चित्रें असून त्यांत क्वचित् एखादें नग्न चित्रहि आढळतें. भुवनेश्वर किंवा कोणार्क येथील देवळांप्रमाणें या भागांतील मंदिरांत शृंगारिक किंवा अश्लील चित्रें विशेष आढळत नाहींत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यावरून द्रवीड लोक हे आर्यांपेक्षां जास्त सुसंस्कृत व संयमी होते असा निष्कर्ष काढतां येईल किंवा काय हें पाहिलें पाहिजे. या मंडपांत खूप कलाकुसर केलेली आहे आणि स्त्री–पुरुष चुंबनाचीं प्रणयचित्रेंही क्वचित् पाहावयास मिळतात.

### ‘ अघोर वीरभद्रा ’ ची प्रभावशाली मूर्ति

पण येथील ‘ अघोर वीरभद्रा’च्या मूर्तीनेंच मला विशेष आकर्षून घेतलें. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा भयंकर जिवंतपणा दिसतो. त्याच्या गळयांत पायांपर्यंत पोंचणारी रुंडमाळ असून त्या माळेंतील मस्तकें अगदीं स्पष्ट दिसतात. या वीरभद्राला आठ हात असून त्यांत साप, डमरू, भाला वगैरे आयुधें आहेत. एकूण मूर्ति मोठी प्रभावशाली ( Impressive ) वाटते.

या देवळाच्या आवारांतच पार्वतीचें स्वतंत्र सामान्य देऊळ असून तिला ‘ बाला त्रिपुरसुंदरी ’ किंवा ‘ तिरुपुर सुंदरी ’ असें नांव आहे.

या देवालयांतील इतर तीन गोपुरें देवळाच्या तटाच्या बाहेर आहेत ही गोष्ट जरा विचित्र वाटली.

### वेदगिरीवर आरोहण

गांवाच्या मध्यभागीं शंखतीर्थ नांवाचें एक कुंड किंवा तळें असून बहुतेक लोक त्यांत स्नान करूनच टेकडीवर जातात. पण त्यांतील गलिच्छ पाणी पाहून आम्हांला स्नान करण्याची इच्छा झाली नाहीं. म्हणून आम्ही तसेच निघालों.

पायथ्याशीं एक फाटक असून तेथें एक सरकारी रखवालदार बसलेला होता. डोंगरावर जाण्यासाठीं अर्धा आणा सरकारी कर आहे. त्याचें

तिकीट घेणाऱ्यालाच वर जाऊं देण्यांत येतें. आम्हीं गेलों त्या वेळीं एक गुर्जर महिला मोडक्या तोडक्या हिंदींत रखवालदाराशीं वाद घालीत होती. यात्रेकरूंकडून दोन पैसे कर घ्यायला सरकारला भीक लागलीय कीं काय असा तिचा सवाल होता; आणि आपल्या मुद्याच्या प्रतिपादनार्थ ती जोरजोरांत बोलत होती. पहारेकरी शांतपणें तिचें म्हणणें ऐकून घेत होता; आणि मधूनच थोडेंसें हंसत होता. मला मात्र त्या बाईच्या चिकाटीचें व तत्परतेचें मोठें कौतुक वाटलें! अर्थात् अखेर तिनेंहि २ पैशांचें तिकीट काढलेंच.

या डोंगराचें नांव 'वेदगिरि' असें असून त्याची उंची सुमारें ५०० फूट आहे. वर चढण्यासाठीं सुंदर पायऱ्या बांधलेल्या असून दर पांचदहा पायऱ्यानंतर काळ्या दगडांत कोरलेली व पायऱ्यांच्या कडेच्या भिंतींत बसविलेली तामीळ भाषेंतील एकेक पाटी आहे. बहुधा ज्या धनिकांनीं या पायऱ्या बांधण्यास पैसे दिले, त्यांचीं नांवें त्यांवर कोरलेलीं असावींत. चढण सरळ असल्यामुळें पायऱ्या असूनहि सामान्य माणसाला वर चढतांना त्रास होतो. आम्ही मात्र फारसे न दमतां वर चढून गेलों. एक भिकारी पोऱ्या कृत्रिमपणें ओक्साबोक्सी रडत आमच्या मागें लागला होता. त्याला चुकविण्यासाठीं तरी आम्हांला वर पोंचणें भागच होतें.

## वेदांची कहाणी

या डोंगराला 'वेदगिरि' हें नांव कसें पडलें त्यासंबंधींची आख्यायिका अशी आहे कीं मूळ एका वेदाचे चार वेद झाले. पुढें भारद्वाज वगैरे ऋषी गायत्री मंत्रांसारखे मंत्र वेगळे काढून वेदांचे आणखी तुकडे पाडूं लागले. तेव्हां वेदांना अशी भीति पडली कीं हा प्रकार असाच चालू राहिला तर आपण नामशेष होऊन जाऊं; म्हणून त्यांनीं कैलास पर्वतावर जाऊन तप करण्यास सुरुवात केली. तेव्हां शंकरांनीं प्रसन्न होऊन त्यांना आशीर्वाद दिला कीं तुम्हीं पृथ्वीवर टेकडीच्या रूपानें राहा. मी त्या टेकडीवर निवास करीन. म्हणजे तुमच्या केंसालाहि कोणी धक्का लावूं

शकणार नाहीं. त्याप्रमाणें या टेकडीवर वेद येऊन राहिले आणि तिच्या शिखरावर शंकर स्वतः आले म्हणून ' वेदगिरि ' असें नांव मिळालें.

## गुदमरवून टाकणारें देऊळ

' येथील देऊळ शिखरावर असल्यामुळें येथें थंडगार वारें सारखें भिरभिरत असतें. येथील खिडकींतून खालचें दृश्य अत्यंत मनोहर दिसतें. हिरवीगार शेतें, देवळाचीं भव्य गोपुरें, शंखतीर्थ, रुद्रकोटि तीर्थ, इंद्रतीर्थ वगैरे तळीं, आसपासचे छोटे छोटे डोंगर, सर्व जणूं स्वप्नांतील सुंदर प्रदेशाप्रमाणें भासतें. देवाच्या गाभाऱ्याला एक दोन खिडक्या ठेवून हें वारें आंत खेळविलें असतें तर किती छान झालें असतें ! पण छेः ! आमच्या धर्माप्रमाणें आमच्या देवालाहि बाहेरचें वारें नको असावें ! आंत गेलों तों एका मिनिटांत अंगाला घामाच्या धारा लागल्या. तेथील दिवे हवेशिवाय कसे टिकत असतील अशी शंका एका मित्रांनीं काढली तर आंतील पुजारी हवेशिवाय कसे जगत असतील अशी शंका दुसऱ्या मित्रांना आली. मी म्हणालों, ' सगळी देवाची कृपा ! बाहेरची हवा न घेतां आपला हिंदुधर्म इतकी वर्षें नाहीं का टिकला ? '

' तो मेलेला नाहीं म्हणूनच त्याला जिवंत म्हणायचें ! बाकी जिवंतपणाचं कोणतं लक्षण आहे त्यांत ? ' एका मित्रानें खंवचटपणें शेरा मारला.

## पक्षिराज कोठून येतात ?

पण आम्हांला पक्षिराजांच्या दर्शनाची ओढ लागलेली होती; म्हणून आम्हीं वादविवादाचा मोह टाळून शिखरावरून खालीं उतरलों. पण अजूनहि तासभर अवकाश होता. हा वेळ कसा घालवायचा ? अखेर आजूबाजूच्या टेकड्यांवरून जाऊन यायचें ठरविलें. त्याप्रमाणें एका टेकडीच्या मागें गेलों तों वर आकाशांत एक पक्षी उडत असलेला आम्हांला दिसला. लगेच मनांत विचार आला, हाच तर तो पक्षिराज नसेल ? थोड्याच वेळांत तो पक्षी अगदीं आमच्या डोकीवर आला. त्याच्या पोटाजवळचा पांढरा शुभ्र रंग मला मोठा मोहक वाटला. त्याच्या पिवळसर चोंचींत एक मोठी वाळलेली काटकी होती. तो ती काटकी घेऊन कोठें जातो तें

आम्ही लक्षपूर्वक पाहूं लागलों. थोड्याच वेळांत तो वरच्या देवळाच्या शिखरावर जाऊन बसला आणि आमच्या लक्षांत आलें कीं शिखरावर एक घरटें बांधलें जात आहे. ' अरे, ही तर मादी दिसते ! ' आमच्या तोंडून उद्गार बाहेर पडला. मग दुसरा पक्षी कुठें आहे ?

इतक्यांत हुबेहूब तसलाच आणखी एक पक्षी आमच्या डोकीवरून देवळाच्या शिखराकडे जात असलेला आम्हांला दिसूं लागला. त्याच्याहि तोंडांत एक काटकी होती. हाहि पक्षी देवळाच्या शिखरावर जाऊन घरट्यांत बसला. याचा अर्थ घरटें बांधण्याच्या कामांत नर व मादी दोघेहि समान मेहनत घेत होते. पावसाळ्याच्या सुरुवातीचे दिवस असल्यामुळें पुढें होणाऱ्या पिलांसाठीं ते नर–मादी घरटें बांधीत असतील तर त्यांत नवल वाटण्यासारखें कांहींच नव्हतें.

आमच्या देखत त्या पक्ष्यांनीं एक– दोन फेऱ्या केल्या. घरटें अजून पूर्ण झालेलें नव्हतें. त्यामुळें घरट्यांत बसल्यावरहि त्या पक्ष्यांचा अर्धा भाग दुरूनच स्पष्ट दिसत होता. त्यावरून पक्षी घरट्यांत आहे कीं नाहीं तें सहज समजत होतें.

एवढा शोध लावल्यानंतर आमच्या बुद्धिवादी मराठी मनाला मोठें समाधान वाटलें. इतर भोळसट लोकांप्रमाणें आपण पक्ष्यांच्या अवतारांवर अंधविश्वास ठेवला नाहीं याचा रास्त अहंकार आमच्या मनांत निर्माण झाला. तेथून परत येतांना एका गुहेसारख्या जागेंत एक गंमत पहावयास मिळाली. एका मोठ्या कोनाड्यांत पांढरे शुभ्र, आधुनिक कपडे ( सदरा व धोतर ) घातलेला एक गृहस्थ ध्यानस्थ बसलेला होता. त्याला भाविक स्त्री–पुरुष नमस्कार करीत होते. लवकरच तेथें एखादें बुवाबाजी केंद्र निर्माण होईल अशी आशा करण्यास हरकत नसावी.

### पक्षी उशीरां आले

हे पक्षी सामान्यतः साडेअकरा वाजतां येतात असें टेकडीच्या खालींच फाटकावर लिहिलेलें होतें. म्हणून आम्ही आमचें संशोधन आवरतें घेऊन अकरा वाजतांच त्या जागेवर जाऊन पोंचलों. तेथें उन्हाच्या वेळीं लोकांना बसतां यावें यासाटीं एक पत्र्याचें छप्पर बांधण्यांत आलेलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.



पक्षितीर्थम्

या छपरापासून ५।६ फुटांच्या अंतरावर एक पुरुषभर उंचीचा खडक आहे. या खडकावर हे पक्षी येतात. तेथेंच एक विहिरीसारखा एक खड्डा आहे. त्याला 'संभावतीर्थ' असें म्हणतात. त्यांत फारच थोडें पाणी उरलेलें होतें आणि तें अत्यंत घाणेरडें दिसत होतें. पक्षिराजासाठीं तें तीर्थ आहे असें म्हणतात, पण इतकें गलिच्छ पाणी गिधाडेंहि पिणार नाहींत असें मला वाटलें.

सव्वा अकरा वाजतां एक भटजी व दोन नोकर त्या खडकावर आले. एव्हांना शंभरदीडशें बघे व भाविक मंडळी तेथें जमली होती. भटजीनें व नोकरांनीं खडकावरच्या व आसपासच्या लोकांना हुसकून छपरीमध्यें पाठविलें. नंतर भटजीनें एका मोठ्या तांब्यांत (किंवा छोट्या कळशींत) पायस (तांदुळाची खीर), दोन वाडगे, एक पितळी, दोन डाव, दोन तांबे इत्यादि सामानासह त्या रंगभूमीवर प्रवेश केला. त्याचा रंग काळा असला तरी चेहऱ्यावर तरतरी व चाणाक्षपणा हीं दिसत होतीं. त्यानें तोंडानें कांहींतरी मंत्र पुटपुटून देवळाकडे तोंड करून त्या खडकावर साष्टांग नमस्कार घातला व खालीं बसून तो पक्ष्यांची वाट पाहूं लागला. आम्हीं शिखरावरील घरट्याकडे पाहिलें तो तेथें एकहि पक्षी नव्हता. याचा अर्थ ते कोठें तरी भक्ष्य शोधण्यास गेले होते.

### पापी लोकांना दर्शन देत नाहींत

भटजीनें तपेलींतील पायस (खीर) पितळींत ओतून ठेवलें आणि आकाशाकडे व देवळाकडे पाहून तो पक्ष्यांची वाट पाहूं लागला. अधून-मधून आपल्या जवळील एक पितळी वाटी खडकावर आपटून आवाज काढीत होता. आपण आपल्या परिचित पशूंना शीळ घालून किंवा त्यांच्या नांवानें हांक मारून बोलावीत असतों, त्याचप्रमाणें तो त्या वाटीच्या खण-णीत आवाजानें पक्षिराजांना बोलावीत होता. पण पक्षी आले नाहींत. म्हणून तो आपल्याजवळील छत्री उघडून स्वस्थ बसला. पक्षी पाहण्या-साठीं पत्र्याच्या शेडच्या बाहेर आलेले लोक उन्हाचा ताप असह्य झाल्या-मुळें परत छपरींत गेले, आणि पक्षी कां येत नसावेत याची चर्चा करूं लागले. कुणी म्हणाले, 'पापी लोकांना हे पक्षी दर्शन देत नाहींत. मागें

एकदां मद्रासचा इंग्रज गव्हर्नर लागोपाठ दोन दिवस येथें आला. पण दोन्ही दिवस हे पक्षी आले नाहींत ! '

' पापी ' हा शब्द इतका भोंगळ व निरर्थक आहे कीं ज्या दिवशीं पक्षी येणार नाहींत त्या दिवशींच्या प्रेक्षकांमध्यें कोणीतरी पापी होता असें बेधडकपणें सहज सांगतां येतें.

## अखेर तेच पक्षी आले

अखेर १२ वाजून ५ मिनिटांनीं दूरच्या टेकडीवरून ते दोन्ही पक्षी आले, तेव्हां जमलेल्या मंडळींच्या जिवांत जीव आला—निदान त्यांच्यावर पापीपणाचा शिक्का तरी आतां बसणार नव्हता ! त्या पक्ष्यांनीं भटजीच्या हातून थोडीशी खीर खाल्ली आणि त्यानें दिलेल्या पाण्याला चोंच लावून ते उडून गेले. आम्हीं सकाळीं जे गिधाड पक्षी पाहिले होते तेच हे होते यांत शंका नव्हती. तोच पांढरा शुभ्र रंग, तीच पिवळी चोंच, तोच आकार ! ते उडून गेल्यावर सर्वजण त्या खडकावर चढले. कांहीं लोकांनीं इकडेतिकडे पडलेलीं खिरीचीं शितें प्रसाद म्हणून उचलून घेतलीं, आणि मी पक्ष्यांच्या मार्गावर डोळे लावून बसलों. थोडा वेळ इकडे तिकडे भराऱ्या मारल्यानंतर ते पक्षी मंदिर—शिखरावरील आपल्या घरट्यावर घिरट्या घालूं लागले. त्यावरून माझी खात्री पटली कीं तेच हे पक्षी ! अर्थात् एव्हांना इतर भाविक मंडळी तेथून निघून गेलेली होती. पक्ष्यांचा माग लावण्याची गरज कुणालाच भासलेली नव्हती. अद्‌भुत रसांतून निघालेलें भक्तीचें लोणीच त्यांना अधिक प्रिय होतें.

## पक्ष्यांचें रहस्य काय असावें ?

या पक्ष्यांची कथा मोठी मजेदार आहे.

ब्रह्माच्या आठ मानसपुत्रांनीं सारूप्य पदवी मिळाविण्यासाठीं शंकराची आराधना सुरू केली. पण शंकरानें प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगतांच त्यांनीं सारूप्य ऐवजीं सायुज्य पदवी मागितली. तेव्हां शंकरानें क्रुद्ध होऊन त्यांना असा शाप दिला कीं, ' तुम्ही गिधाडें होऊन फिरत रहाल ! ' पुढें त्यांनीं पश्चात्ताप व्यक्त केल्यावर शंकर म्हणाला, ' तुम्हांला गिधाडांचें रूप घ्यावेंच लागेल. पण गृध्ररूपांत तुम्ही तपश्चर्या करीत राहिलांत तर

प्रत्येक युगांत तुमच्यापैकीं दोघांना सारूप्य पदवी मिळेल.'

त्याप्रमाणें सत्ययुग, त्रेतायुग व द्वापरयुग या तीन युगांत प्रत्येकीं दोन याप्रमाणें सहा मानसपुत्र मुक्त झाले. आतां फक्त कलियुगांतील पूषा व विधाता नांवाचे दोन मुनी उरले आहेत. ते या वेदागिरीवर तप करीत असतात. तेच हे पक्षी. यांच्या दर्शनानें मोक्ष मिळतो व मनोरथ पूर्ण होतात असें भाविक लोक समजतात. ते गंगानदींत स्नान करतात, वेद-गिरीवर भोजन करतात आणि रात्रीं चित्रकूटावर वस्ती करतात असें भाविक लोक समजतात. पण आम्हीं सकाळपासूनच त्यांना येथें पाहिलें होतें, त्यामुळें या कहाणीवर आमचा विश्वास बसणें शक्य नव्हतें.

तरीपण डच अधिकाऱ्यांच्या वहींत या पक्ष्यांची नोंद सतराव्या शतकांत सांपडते. त्यावरून हे पक्षी शेंकडो वर्षांपासून येथे येत असले पाहिजेत हें मान्य करावें लागतें. अर्थात् येथील पुजाऱ्यांनीं ते पाळलेले असणें कांहीं अशक्य नाहीं. पण एका गिधाडाचें आयुष्य किती वर्षं असूं शकतें ? तें मेल्यानंतर त्याच्या पिलांना शिक्षण देण्याची व्यवस्था पुजाऱ्यांनीं काय केली असेल ? या साऱ्या प्रश्नांचें उत्तर तेथील पुजारीच देऊं शकतील.

## संतान-दायक झाड

या डोंगरावर पिण्याच्या पाण्याची कांहीं सोय नाहीं. सोडावॉटरवाले चार-चार आण्याला एक बाटली विकत असतात. उन्हामुळें आम्हांला खूप जोराची तहान लागलेली होती. पण त्या सोडावॉटरची (व ते विकणाऱ्यांची) सुरत पाहून तें घेण्याची इच्छा झाली नाहीं ! तहानेंत गुंतलेल्या मनाला दुसरीकडे गुंतविण्यासाठीं आसपासच्या गोष्टी न्याहाळूं लागलों, तों पिवळ्या जर्द फुलांनीं भरलेलें एक मजेदार झाड दिसलें. त्याला पान जणूं नव्हतेंच. त्याच्यासंबंधीं चौकशी करितां त्याचें हिंदी नांव अमलताश (मराठी नांव बहावा – भावा) आणि स्थानिक नांव Konnan–कोन्नन–असल्याचें कळलें. साऱ्या प्रवासांत केव्हांहि जिची आठवण झाली नव्हती त्या सौभाग्यवतीची आठवण हीं फुलें पाहून मला झाली. ती येथें असती तर तीं पक्षी पाहाण्याचें सोडून हीं फुलेंच माळीत बसली असती !

दुसरें एक छोटें झाड तेथें होतें. त्याला रंगीबेरंगी चिंध्या बांधलेल्या होत्या. जवळ जाऊन पाहिलें तों त्या चिंध्यांमध्यें लहान लहान दगड व विटकरांचे तुकडे बांधलेले होते. आपल्याला मुलगा व्हावा अशी इच्छा बाळगणारा गृहस्थ येथें येऊन या झाडाच्या गळ्यांत दगडाचें ओझें बांधतो आणि त्याला मुलगा झाला म्हणजे तो येथें येऊन ती चिंधी सोडून जातो. अर्थात् त्याच्या बापानें बांधलेलीच चिंधी त्याला सोडायला मिळत असेल असें नाहीं! मात्र झाडाला आपल्यावरील दगड-गोट्यांचे ओझें हलकें व्हावें असें वाटत असेल तर लोकांना अपत्यें दिल्याखेरीच दुसरा मार्ग नाही हें त्यानें ओळखलें असावें. यामुळें लोकांच्या अपत्यचिंतेनें त्याची वाढ खुंटली आहे.

**ओरुकल मंटप**

या टेकडीच्या पूर्व भागीं, सुमारें ५० पायऱ्या उतरून खालीं गेलें म्हणजे एक गुंफा लागते. तिला 'ओरुकल मंटप' असें नांव आहे. इ. स. ६४० च्या सुमारास महेंद्रवर्मन् राजाच्या कारकीर्दींत ही गुंफा खोदलेली आहे. तिच्या भिंतीवर साडेअठरा फूट उंचीच्या ब्रह्मा व विष्णूच्या दोन मोठ्या मूर्ती आहेत. मध्यभागीं शिवलिंग आहे. कारागिरीच्या दृष्टीनें हें कोरीव काम सामान्यच आहे. पण डच मुसाफिरांनीं सतराव्या शतकांत येथें आपल्या सह्या कोरलेल्या आहेत. त्यामुळें या गुंफेला एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

**भिकार भोजन करून रवाना**

डोंगरावरून खालीं उतरलों तेव्हां दुपारचा एक वाजून गेला होता. सकाळची न्याहारी केव्हांच जिरून गेली होती. पोटांत कावळे ओरडूं लागले होते. पण जेवणाची गलिच्छ जागा आणि भिकार भोजन पाहून लागलेली भूक आंतल्या आंत विरून गेली. दक्षिण प्रवासांत इतकें भिकारडें अन्न-भात, सांबार, भाजी-इतरत्र कोठेंच मिळालें नाहीं. अर्थात् अन्न वाईट असलें तरी पैसे भरपूर द्यावेच लागले. ते देऊन आम्ही मोटार स्टँडवर आलों आणि महाबलिपुरमूच्या बसची वाट पाहूं लागलों.

●●●●

# महाबलिपुरम् : ९

## ‘ मामल्लपुरम् ’चें ‘ महाबालिपुरम् ’

महाबलिपुरम्‌ची कीर्ति फार दिवसांपासून कानावर होती. एकेका दगडांत कोरलेलीं मंदिरें आणि इतर कलाकृती जशा येथें पहायला मिळतात, तशा इतर कोठेंहि आढळत नाहींत असें ऐकलें होतें. म्हणून असें हें एकमेवाद्वितीयं महाबलिपुरम् आहे तरी कसें हें पहाण्याची उत्कंठा मनांत कित्येक वर्षांपासून होती. कांचीपुरम्‌पासून महाबालिपुरम् जवळच असल्यामुळें ही इच्छा सहजासहजीं पूर्ण झाली.

दुपारीं १२ वाजतां पक्षितीर्थम् वरील दोन पक्षी पाहून आम्ही खालीं उतरलों आणि जेवण करून पहिल्या बसनें निघून अर्ध्या तासांत दहा मैलांवरील महाबलिपुरम्‌ला पोंचलों. या ठिकाणीं वामनावतारांतील बलि-राजाचें एखादें देऊळ असेल व त्यावरून त्याला हें नांव पडलें असावें अशी माझी कल्पना होती. परंतु या नांवाचा बळीशीं किंवा नवव्या–दहाव्या शतकांत दक्षिणेकडे होऊन गेलेल्या महाबलि राजवंशाशीं कांहीं संबंध नाहीं असें तेथें गेल्यावर कळलें. हें नांव या ठिकाणाला ‘ मामल्ल ’ या शब्दावरून मिळालेलें आहे. महान् पल्लव सम्राट् नरसिंहवर्मन् (पहिला) याची मामल्ल ही पदवी होती. त्याच्या काळीं ( इ. स. ६३०–६७० ) येथील बहुतेक देवळें व कोरीव काम करण्यांत आल्यामुळें या गांवाला हें नवें नांव मिळालें. तत्पूर्वीं या गांवाला मलंगे व कदलमल्लई हीं नांवें होतीं.

## ‘ सेव्हन पॅगोडाज ’

युरोपियन दर्यावर्दी लोकांनीं या ठिकाणाला ‘ सेव्हन पॅगोडाज ’ म्हणजे ‘ सात मंदिरें ’ असें नांव दिलेलें होतें. एके काळीं समुद्राच्या काठीं सात देवळें होतीं. त्यांचीं पितळी शिखरें समुद्रांतून जाणाऱ्या जहाजांचें

लक्ष वेधून घेत. त्यांनाच उद्देशून पाश्चात्यांनीं हें नांव दिलें असावें. सध्यां मात्र या ठिकाणीं फक्त एकच देऊळ आहे. त्याला ‘ शोअर टेंपल ’ ( किनाऱ्यावरील मंदिर ) असें म्हणतात. येथील इतर बहुतेक देवळें एका दगडांत कोरलेलीं आहेत. दगडांच्या विटांनीं बांधलेलें हेंच महत्त्वाचें देऊळ म्हणून आम्हीं प्रथम हें देऊळ पहाण्यासाठीं एका वाटाड्याला बरोबर घेऊन समुद्रकिनाऱ्यावर गेलों.

आमच्या बरोबरच्या कांहीं लोकांना समुद्रस्नान करून पुण्य मिळवायचें होतें, परंतु प्रत्यक्ष देवळाच्या जागीं समुद्र एकदम खोल व धोक्याचा आहे, ( अशी पाटीच तेथें लावलेली आहे ) म्हणून आम्ही जरा दूर गेलों. तेथें समुद्रांत एक भला मोठा ( सुमारें वीस फूट उंचीचा ) खडक दिसला, किनाऱ्याच्या बाजूनें त्याच्याकडे पाहिलें कीं, एखादा प्रचंड हत्तीच कोरल्याचा भास होतो. त्याचे कान आणि सोंड अगदीं स्पष्ट दिसतात, पण जरा पुढें जाऊन समुद्राच्या बाजूनें पांहूं लागलें कीं तेथें रेड्याचा आकार दिसतो. त्या रेड्याला मारणारी महिषासुरमर्दिनीहि तेथें आहेच. त्यामुळें या खडकाला ‘ महिषासुर रॉक ’ असें म्हणतात.

हा खडक पाहून इतर मंडळी स्नान करूं लागली आणि मी तसाच किनाऱ्या किनाऱ्यानें मंदिराकडे जाऊं लागलों. भरतीची वेळ असल्यामुळें समुद्राच्या प्रचंड लाटा उसळून समुद्रांतील एका मोठ्या खडकावर आपटत होत्या. त्या फुटून त्यांचा शुभ्र फेंस त्या खडकाभोंवतीं गोळा होई तेव्हां तो काळा खडक ( जो वस्तुतः आंतून पांढराच आहे ! ) मोठा मजेदार दिसे.

येथील हें शिवमंदिर समुद्राच्या अगदीं कडेलाच आहे. इतकें कीं भरतीच्या वेळीं याच्या लाटांचे तुषार देवळावर उडत असतात. या खारट पाण्यामुळें देवळावरील नक्षीकाम झिजून गेलेलें आहे. समुद्राच्या पाण्यापासून रक्षण करण्यासाठीं या देवळाभोंवतीं नुकतीच एक बऱ्यापैकीं भिंत बांधलेली आहे. दूर क्षितिजापर्यंत पसरलेल्या समुद्राची शोभा येथून फारच छान दिसते.

देऊळ तसें लहानच आहे. दक्षिणेंतील देवळांच्या मानानें तें अगदींच क्षुद्र वाटतें, पण समुद्रांतील त्याचें स्थान आणि अशा प्रकारचें या

गांवांतलें हें मुख्य देऊळ या दृष्टीनें त्याचें महत्त्व आहे. मुख्य गाभाऱ्यांत छातीइतकें उंच १६ कोनी काळ्या संगमरवराचें भग्न लिंग आहे. दक्षिणें-तल्या अनेक लिंगांप्रमाणें या लिंगालाहि शाळुंका नाहीं. अभंग स्थितींत हें लिंग आकर्षक असलें पाहिजे असें मला वाटलें.

## ' भीष्म ' कीं ' विष्णु '

मुख्य गाभाऱ्याच्या मागील बाजूस एका अंधाऱ्या ओवरींत शेषशायी विष्णूची मूर्ति आहे. दाराशीं एक माणूस कंदील घेऊन बसला होता. त्यानें दिव्याच्या साहाय्यानें आम्हांला ती मूर्ति दाखविली आणि असें सांगितलें कीं, ' हा भीष्म पितामह आहे. बाणांच्या शय्येवर पहुडलेला आहे.' भीष्माला चार हात कसे हा प्रश्न आम्ही त्याला विचारला नाहीं; कारण तो विष्णु आहे हें आम्हांला माहीत होतें.

या देवळाच्या आवारांत मोडक्या तोडक्या नंदींची एक रांग चारी बाजूंनीं लावून ठेवलेली आहे. हे नंदी याच देवळांतील आहेत कीं इतर ठिकाणचे गोळा करून आणले आहेत हें समजलें नाहीं. त्याखेरीज मारीचि राक्षस सुवर्णमृगाचें रूप घेऊन येत आहे व राम त्याला बाण मारीत आहे असें एक सुंदर चित्र या आवारांत पहायला मिळालें.

या देवळांतील देव अभंग नसल्यामुळें त्याची पूजा—अर्चा होत नाहीं. त्यामुळें अहिंदूनाहि या देवळाच्या गाभाऱ्यापर्यंत जातां येतें. वस्तुतः या देवळांतील धार्मिकता नाहींशीच झालेली आहे. तें एक पिकनिकचें ठिकाण बनलें आहे. मद्रासहून फक्त ३० मैल दूर असल्यामुळें सुटीच्या दिवशीं येथें खूप लोक येतात.

## कृष्णमंडप

महाबलिपुरम्‌चें वैशिष्ट्य म्हणजे येथील एका दगडांत कोरलेलीं देवळें ( monolithic rock-cut shrines ) व खडकांत कोरलेले नानाविध प्रसंग. इतके प्रचंड दगड दक्षिणेकडे पुष्कळ ठिकाणीं आढळतात, पण त्यांचा असा कलात्मक उपयोग इतरत्र सांपडत नाहीं.

उदाहरणार्थ, आम्ही पाहिलेली गुंफा घ्या. हिचें नांव कृष्णमंडप. या गुंफेमध्यें श्रीकृष्णाच्या जीवनांतील गोवर्धन पर्वत उचलून धरण्याचा प्रसंग

चित्रित केलेला आहे. इंद्राच्या कोपापासून गोपगोपींचें व गायींचें रक्षण करण्यासाठीं कृष्णानें डाव्या हातानें गोवर्धन पर्वत उचलून धरलेला आहे. त्याचा उजवा हात अभयदान देण्याच्या मुद्रेंत आहे. त्याच्या आसपास गोपी उभ्या असून त्या कृष्णाकडे आश्चर्ययुक्त आदरानें पाहात आहेत. कृष्णाच्या उजव्या बाजूस बलराम असून त्याच्या डाव्या बाजूस एक अत्यंत सुंदर दृश्य आहे. त्यांत एक गोप गायीची धार काढीत आहे. (हा गोप बुद्धासारखा कां दाखविला असावा कोण जाणे!) ही गाय आपल्या वासराला चाटत आहे. तें दृश्य अगदीं जिवंत व नैसर्गिक वाटतें. पलीकडे एक गोपी एका शिंक्यामध्यें दुधाचीं मडकीं हातांत धरून उभी आहे. तिच्या डोकीवरील गवताचा भारा आणि तिच्या शरीराचा झोंक पहातां ही गवळण लगबगीनें कुठें तरी अर्थात् बाजाराला चाललेली आहे हें सहज लक्षांत येतें. जवळच दुसरी एक गोपी आपल्या मुलाला स्तनपान करवीत बसली आहे. पण तें मूल दूध पिण्याऐवजीं समोर उभ्या असलेल्या गवळ्याची बासरी ऐकण्यांत गुंग झालेलें आहे; आणि म्हणून ती गोपी बांसरी न वाजविण्याबद्दल त्या गोपाला विनवीत आहे. मोठें आल्हाद-दायक चित्र आहे. इंद्राच्या कोपाची जणूं कुणालाहि फिकीर नाहीं. गोवर्धनधारी श्रीकृष्णाचें हें कोरीव काम साऱ्या हिंदुस्थानांत अप्रतिम समजलें जातें.

## अर्जुन कीं भगीरथ ?

या गुंफेजवळच पंचपांडवमंडप आहे. पण त्यांत विशेष पाहण्यासारखें कांही नाहीं. तेथून जरा पुढें गेलें कीं, एक अप्रतिम भव्य चित्र आपल्याला पाहावयास मिळतें. वस्तुतः तें एक चित्र नसून अनेक लहानमोठ्या चित्रांचें सुंदर संमेलनच आहे. सुमारें शंभर फूट लांब आणि तीस फूट उंच (रुंद) अशा एका प्रचंड खडकावर हीं चित्रें कोरलेलीं आहेत. हा खडकच इतका प्रचंड दिसतो कीं, त्यामुळें आपली छाती दडपून जाते. या खडकाचे दोन भाग असून त्यांच्या मध्यें किंचित् फट आहे. पण त्या फटींतहि नाग व नागिणी यांचीं चित्रें आहेत. त्यामुळें तो एक व अखंड असल्यासारखा भासतो. डाव्या बाजूच्या खडकांत एका (डाव्या) पायावर

उभा राहून व दोन्ही हात वर आकाशाकडे धरून एक दाढी-जटा असलेला पुरुष तप करीत आहे. त्याच्या छातीच्या फांसळ्या अगदीं मोजून घ्याव्यात इतक्या स्पष्ट दिसतात. त्यावरून तो वर्षानुवर्षें तप करीत असला पाहिजे अशी कल्पना सहज मनांत येते. हा मनुष्य म्हणजे अर्जुन असून तो शंकराकडून दिव्य अस्त्रें मिळविण्यासाठीं तप करीत आहे आणि त्याच्याजवळ उभा असलेला शंकर त्याला तीं अस्त्रें देत आहे असें कांहीं लोक म्हणतात; तर तो भगीरथ असून गंगेला पृथ्वीवर आणण्यासाठीं तप करीत आहे असें इतर लोकांचें म्हणणें आहे. गंमत अशी कीं, या दोहों-पैकीं कोणतीहि कल्पना मान्य केली तरी ती चित्राला लागू पडते. चित्रांतील यक्ष, गंधर्व, किन्नर, सूर्य, चंद्र, अप्सरा वगैरे सर्वांची दिशा अर्जुनाकडे वळलेली आहे. त्यामुळें अर्जुनाचें चित्र लहान असलें तरी त्याच्याकडे प्रेक्षकांचें लक्ष आपोआपच वेधलें जातें. या चित्रांतील लहान मोठे हत्ती, वाघ, सिंह, उंट, मांजर, उंदीर वगैरे पशूहि चांगले जिवंत वाटतात. एक छोटेंसें विष्णु-मंदिरहि त्यांत आहे आणि त्याच्या आसपास कांहीं ऋषि-मुनि तपस्या करीत आहेत. सिंह आणि हरण हीं एकाच ठिकाणीं विश्रांति घेत आहेत. त्यावरून एकूण पवित्र व निर्भय वातावरणाची कल्पना येते.

इतकीं विभिन्न पात्रें असूनहि या चित्राची एकात्मता भंग पावत नाहीं. एखाद्या महाकाव्यांतील वेगवेगळ्या सर्गांप्रमाणें तीं चित्रें भासतात. त्या सर्वांचा मिळून असा एक परिणाम आपल्या मनावर होतो आणि हा परिणाम निर्माण करणाऱ्या त्या अज्ञात कलावंताच्या प्रतिभेपुढें आपली मान आदरानें लवल्याशिवाय राहात नाहीं.

**कृष्णाचा लोण्याचा गोळा**

अर्जुन-तपस्येचें चित्र पाहून जरा पुढें गेलें कीं, समोर एक छोटीशी टेकडी दिसते. हिच्यावर अत्यंत प्रचंड असे दगड आहेत. त्यांपैकीं एक दगड वाटोळा असून त्याला श्रीकृष्णाचा लोण्याचा गोळा अशी संज्ञा मिळालेली आहे. सुमारें १००–१५० फूट परिघाचा हा दगडी गोळा कसलाहि आधार नसतां टिकून राहिलेला आहे. त्याच्याकडे पाहिलें कीं

वाटतें, आतां हा खालीं घसरून येणार! पण आमच्या वाटाड्यानें सांगितलें कीं, ' सात हत्तींनाहि हा दगड हलवितां आला नाहीं. ज्या दिवशीं हा दगड खालीं घसरून पडेल त्या दिवशीं महाबलिपुरम् गांव समुद्रांत बुडून जाईल!' दक्षिणेंतल्या अवाढव्य शिळांची मला नेहमींच गंमत वाटते. अगदीं लहानशा आधारावर त्या वर्षांनुवर्षें कशा टिकून राहिल्या असतील याची कल्पनाहि करवत नाहीं!

लोण्याचा गोळा आहे, त्याअर्थीं ताक घुसळण्याचा डेराहि हवाच. त्याप्रमाणें तो आहेहि. पण लोण्याच्या गोळ्यापेक्षां डेरा फारच लहान आहे.

तीन प्रचंड दगड एके ठिकाणीं आल्यावर आपोआपच ती भीमाची चूल झाली. त्या दगडांच्या खालीं दगडी कोळशाचे तुकडेहि पडलेले दिसले. त्याअर्थीं ती चूल असलीच पाहिजे हें कबूल करावें लागलें. अर्थात् भीम स्वयंपाक करायला तेथें कशाला आला हा प्रश्न न विचारणेंच बरें!

## एका दगडांतील ' गणेश-रथ '

येथून जवळच एका दगडांत कोरलेलें एक अप्रतिम सुंदर देऊळ आहे. त्याला ' गणेश-रथ ' असें म्हणतात. हें तीन मजली असून याच्या शिखरावरील कलाकुसर मोठी मोहक आहे. पूर्वीं या देवळांत शिवलिंग होतें, पण सुमारें ४०-५० वर्षांपूर्वीं गांवच्या लोकांनी येथें गणपतीची स्थापना केली आणि देवळाला ' गणेश-रथ ' हें नांव मिळालें. या गांवांत ' रथ ' हा शब्द देऊळ या अर्थानेंच अनेक ठिकाणीं वापरण्यांत आलेला आहे. कदाचित् या देवळांचा अकार रथाप्रमाणें असल्यामुळेंहि हा शब्द वापरण्यांत आलेला असावा.

या देवळासमोरच वराहमंटपम् ( नं. २ ) आहे. वराह अवतारांतील ईश्वर समुद्रांत बुडालेल्या पृथ्वीला वर उचलून काढीत असल्याचें मजेदार चित्र कोरलेलें आहे.

याच मंडपांत गजलक्ष्मीचें एक चित्र असून त्यांत कमळावर बसलेल्या लक्ष्मीच्या दोन बाजूस एकेक हत्ती असून त्यांपैकीं एका हत्तीनें लक्ष्मीच्या डोकीवर सोंड धरलेली आहे. दुसऱ्या हत्तीनें आपलें मस्तक नमविलेलें

आहे. येथें आणि महाबलिपुरमूच्या इतर मंदिरांत व गुंफामध्यें स्त्रियांच्या मूर्ती नग्न आहेत ही विशेष लक्षांत येण्यासारखी गोष्ट आहे.

येथेंच वामनावताराचेंहि एक लहानसें चित्र आहे. त्यांतील बलीच्या डोकीवर विष्णूचा पाय असून दुसरा पाय आकाशांत आहे. आकाश दाखविण्यासाठीं वरच्या बाजूला सूर्य-चन्द्राच्या आकृती काढलेल्या आहेत.

## ओलक्कनाथाचें मंदिर

समुद्रकांठच्या मंदिरा ( शोअर टेंपल ) प्रमाणेंच आणखी एक शिव मंदिर या टेकडीवर आहे. त्याचें नांव ओलक्कनाथाचें मंदिर. दगडांच्या विटांनीं बांधलेलें हें मंदिर इतकें उंच आहे कीं, एके काळीं ( इ. स. ६९० ते ७१५ ) दीपगृहाचेंहि काम तें करीत असे. या देवळाच्या गच्चीवरून समुद्राचें दृश्य फार सुंदर दिसतें. मात्र वर जाण्यासाठीं जो जिना चढावा लागतो तो अत्यंत अरुंद असल्यामुळें चढतांना—उतरतांना चांगलीच कसरत करावी लागते.

याच्या समोरच आधुनिक दीपस्तंभ असून त्याच्यावर जाण्यास साडेतीन आणे पडतात. ( दोन पैसे कमी कां ? ) पण ओलक्कनाथाच्या गच्चीवरून जें दृश्य दिसतें त्याहून अधिक सुंदर दृश्य त्या नव्या दीपस्तंभावरून थोडेंच दिसणार आहे ? असा विचार करून आम्ही आमचे साडेतीन आणे ( प्रत्येकीं ) वांचविले !

## आणि ते पांच रथ !

महाबलिपुरमूचें एक महत्त्वाचें आकर्षण म्हणजे पांच पांडवांचे रथ. बहुतेक प्रवासी पहिल्या प्रथम हे रथ पाहून घेतात आणि शेवटीं किनाऱ्यावरील देवळाकडे जातात. आम्ही उलटा क्रम अवलंबिला होता. त्यामुळें आम्ही शेवटीं या रथांच्या परिसरांत पोंचलों. गांवापासून अर्धा पाऊण मैल दूर असलेल्या या ठिकाणीं आपण जाऊन पोंचलों कीं जणूं एखाद्या जादूच्या नगरींतच पोंचल्यासारखें वाटतें.

हे रथ म्हणजे एकेका दगडांत कोरलेलीं पांच लहान मोठीं देवळें आहेत. त्याचा पांडवांशीं कांहींहि संबंध नाहीं. पण ज्याचा कुठेंच संबंध

लावतां येत नाहीं, त्याचा पांडवांशीं संबंध लावून आपण चटकन् मोकळे होतों. त्यांत पुनः या देवळांची संख्या पांच असल्यामुळें पांडवांशीं संबंध जोडण्याला आयतीच संधि लोकांना मिळाली.

या पांच मंदिरांपैकीं धर्मराजाचा रथ हाच सर्वांत महत्त्वाचा. हा रथ दक्षिण टोंकाला असून पिरॅमिडप्रमाणें तो वरच्या बाजूस चिंचोळा होत गेलेला आहे. हा चार मजली उंच असून प्रत्येक मजल्यावर वेगवेगळीं चित्रें कोरलेलीं आहेत. खालच्या बाजूस अर्धनारी नटेश्वराची मूर्ति पाहाणाऱ्याचें लक्ष वेधून घेते. या देवळावर केवळ शंकराच्याच मूर्ती नसून विष्णूची व कालियामर्दन करणाऱ्या कृष्णाचीहि मूर्ति कोरलेली आढळते.

भीमाचा रथ मोठा असला तरी त्यांत कलाकुसर मुळींच नाहीं.

धर्मराज रथानंतर महत्त्वाचा रथ म्हणजे अर्जुनाचा. हा दुमजली असून त्याच्या भिंतीवर नंदीवर टेकलेला शिव ( वृषभान्तिक शिव ), ऐरावतावरील इंद्र व गरुडावरील विष्णु यांचीं चित्रें मोठीं मोहक आहेत. नंदीला टेकून उभ्या असलेल्या शिवाच्या चेहऱ्यावर इतका उल्हास व बेफिकीरी आहे कीं खेड्यांतला एखादा गुराखी आपल्या गरीब बैलाच्या अंगाशीं अंग घाशीत समोरून येत आहे असें वाटतें. या देवळांतील भिंतींवर तरुण–तरुणींच्या जोड्या ( मिथुनें ) हि बऱ्याच विखुरलेल्या आहेत.

चौथा रथ द्रौपदीचा ! वस्तुतः चौथा नंबर नकुलाचा व पांचवा सहदेवाचा लागला पाहिजे. पण ते दोघे बिचारे कुणाच्या खिजगणतींतहि नसतात. कर्तृत्वशून्य पुरुषाची स्थिति याहून अन्य काय असणार ? त्यांच्या मानानें द्रौपदी हजारपट तेजस्वी अन् कर्तृत्ववान् ! तेव्हां चौथा नंबर तिला मिळणें स्वाभाविकच नव्हे काय ? हा रथ छोटासा असला तरी सर्वांत सुरेख आहे. आणि म्हणूनच बहुधा त्याला द्रौपदीचें नांव दिलें गेलें असावें. या मंदिरांत चार हातांची एक दुर्गादेवी असून दोन पुरुष तिच्या चरणांवर मस्तक ठेवून तिची पूजा करीत आहेत. या रथाच्या समोरच एक सिंहाची मूर्ति आहे.

नकुलसहदेवाच्या रथांत कांहीं वैशिष्ट्य नाहीं. हा रथ इतरांच्या रांगेत नसून समोरच्या बाजूस आहे. याच्या बाजूला एक मोठा हत्ती आहे. हेंच त्यांचें वैशिष्ट्य !

अशा प्रकारें सतत तीन तासपर्यंत पायाला भिंगरी बांधल्याप्रमाणें आम्ही हिंडत होतों. माणसाला स्वास्थ्य लाभलें म्हणजे तो दगडांतूनहि कसें जिवंत सौंदर्य निर्माण करतो हें पाहावयाचें असेल तर महाबलिपुरम् हें एक उत्कृष्ट ठिकाण आहे. प्रचंड शिळांमध्यें ज्यांनीं दिव्य–भव्य शिल्प हेरलें आणि तें साकार करुन दाखविलें त्या कलावंतांना मनांतल्या मनांत शतशः धन्यवाद देत आम्ही बसस्टँडवर आलों आणि मद्रासला जाणाऱ्या मोटारीची वाट पाहूं लागलों !

● ● ● ●

## मद्रास : ७

### दाक्षिणात्य संस्कृतीचें प्रवेशद्वार

मुंबई, कलकत्ता आणि मद्रास हीं भारतांतील पहिल्या तीन क्रमांकांचीं बंदरें. यांपैकीं मद्रास हें इंग्रजांच्या आधिपत्याखालीं येणारें सर्वांत प्रथम बंदर. नाहीं म्हटलें तरी गेलीं तीनशें वर्षे त्याचा पाश्चात्यांशीं संबंध राहिलेला आहे. पण तरीहि या शहरानें आपलें द्राविडीपण सोडलेलें नाहीं. मुंबईला जशी एक प्रकारची बाजारू कळा आलेली दिसते किंवा कलकत्त्यावर जशी बकालीपणाची छाया पसरलेली आहे तशी स्थिति मद्रासची झालेली नाहीं. मद्रासी माणूस कितीहि शिकला-सवरला तरी घरीं लुंगी लावूनच वावरतो आणि गंधाचे छाप कपाळावर मारून घेऊन देवदर्शनाला जातो; त्याप्रमाणें वर्षानुवर्षे पाश्चात्यांच्या सहवासांत राहूनहि मद्रास शहरानें आपली जुनी परंपरा सोडलेली नाहीं. मौंट रोडची मुख्य बाजारपेठ सोडल्यास मद्रासमधील बहुतेक घरें तमिळनाडमधील कोणत्याहि मध्यम वस्तीच्या गांवांत शोभतील अशींच आहेत. यामुळें मुंबईचा नखरेलपणा व झगझगाट या शहरांत जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. अर्थात् स्वच्छतेच्या बाबतींत मुंबई व कलकत्ता या दोन्ही शहरांपेक्षां मद्रास किती तरी पुढारलेलें आहे ही गोष्ट कुणाच्याहि चटकन् ध्यानांत येते. कदाचित् बड्या चाळींचा अभाव आणि विरळ वस्ती यामुळेंच ही स्वच्छता टिकूं शकली असावी ! मुंबई आणि मद्रास यांच्यातील आणखी एक फरक म्हणजे मुंबईतील धांवपळ, धांदल, गडबड, यांत्रिकपणा येथें नाहीं. जीवन कसें शांत, धीम्या गतीनें चाललेलें असतें. कुणाला घाई अशी दिसतच नाहीं. ९-४७ ची लोकल चुकेल म्हणून पोत्यांत धान्य भरल्याप्रमाणें पोटांत अन्न कोंबण्याची गरज बहुधा येथील लोकांना भासत नसावी. एकूण सारें शहर मोठें सुस्त व स्वतःच्याच मस्तींत असल्यासारखें

वाटतें. ( कांहीं तामिळ लोक अजूनहि या शहराचें जुनें ‘ चेन्नपट्टण ’ नांव वापरतात. त्यावरून त्यांची पुराणप्रियता दिसून येते. )

**भपका कमी**

सुमारें ५–६ वर्षांपूर्वीं दक्षिणभारताच्या दौऱ्यासाठीं या भागांत मी आलों असतां मद्रासला उतरलों होतों, पण त्या वेळीं मद्रास पाहाण्याइतकी सवड मिळाली नव्हती. त्यापूर्वीं १९३९ सालीं एकदां मद्रासला आलों होतों. त्या वेळीं अड्यार, मत्स्यालय वगैरे गोष्टी मोठ्या उत्सुकतेनें पाहून घेतल्या होत्या. त्यामुळें मद्रास हें कांहीं मला अगदींच नवखें नव्हतें. या खेपेस मद्रास शहर पाहाणें हा कांहीं माझा मुख्य उद्देश नव्हता. नवीन राज्यें निर्माण झाल्यानंतर तमिळनाड ( मद्रास ) राज्यांत फिरून येण्याचा माझा विचार आहे. तेव्हां तत्पूर्वीं कांहीं ओळखी करून ठेवाव्यात या हेतूनें मी तेथें गेलों होतों. माझे मित्र श्री. रामानंद सागर यांनीं प्रसिद्ध तामिळ महाकवि श्री. कोत्तमंगलम् सुब्बू व कथालेखक श्री. की. रा. ( रामचंद्रन् ) यांच्याशीं माझा परिचय करून दिला होता. त्यांच्या सहवासांत कांहीं वेळ घालविण्याचीहि माझी इच्छा होती. म्हणूनच मी मद्रासला गेलों होतों. श्री. रामानंद सागर हे कोनेमारा या प्रख्यात युरोपियन हॉटेलांत उतरले होते. तेथें राहावयाचें म्हणजे रोज तीस रुपये द्यावे लागतात. माझ्यासाठीं सागरना इतका खर्च करावा लागावा हें मला बरें वाटलें नाहीं. म्हणून मी आपला सरळ त्यागरायनगर भागांतील आमच्या दक्षिणभारत हिन्दी प्रचार सभेंत गेलों. तेथील कार्यकर्ते पूर्वींपासून परिचित असल्यामुळें ती संस्था म्हणजे घरच्यासारखीच होती मला. पण सुब्बू व की. रा. यांच्याशीं गप्पा मारावयाच्या होत्या. म्हणून मी द. भा. हिं. प्र. सभेंत सामान टाकून मौंट रोड भागांतील सुब्बूच्या बगल्यांत गेलों. जेवण-खाण तेथेंच केलें आणि दिवसभर सागर, सुब्बू व की. रा. यांच्या संगतींत भटकलों. हे तिघेहि साहित्यिक जेमिनी स्टुडियोंत काम करतात व भरपूर पैसा मिळवतात. सुब्बू यांचा स्वतःचा बंगला व मोटारहि आहे. पण त्यांच्या घरांत वावरतांना एखाद्या मध्यम-वर्गीय पांढरपेशाच्या घरांतच आपण आहोंत असें मला वाटत होतें. भात

व सांबार यांचें सार्धें, केळीच्या पानावरील जेवण, तेंहि गुळगुळीत जमिनीवर ( पाटाशिवाय ) बसून ! दक्षिणेकडे या भातामुळें गरीबश्रीमंतां-तील भेदच जणूं नाहींसा करून टाकला गेला आहे. केळीच्या पानाखेरीज दुसरें पात्र ( वाटी वगैरे ) नाहीं. समाजवाद किंवा साम्यवाद आणायला हा दाक्षिण देश खूपच अनुकूल आहे अशी माझी तरी समजूत झाली.

जसें जेवण तसा पोशाख ! एक लुंगी आणि एक सदरा. तिसऱ्या कपड्याची जरूर नाहीं. घरीं तर नुसती लुंगीच ! साधा कारकून असो कीं प्रांताचा मुख्य मंत्री असो, सर्वांचा पोषाख सारखाच !

**अड्यारचें रुक्ष तपोवन**

अर्थात् गप्पा मारायच्या तरी एकाच ठिकाणीं बसून कंटाळा हा येणारच. म्हणून आम्हीं बाहेर पडायचें ठरविलें. पूर्वी मी मद्रासला गेलों होतों तेव्हां मला तेथील मत्स्यालय सर्वांत अधिक आवडलें होतें. पण आतां मुंबईला आशियांतील अव्वल दर्जाचें मत्स्यालय बनलेलें आहे म्हणून आणि मद्रासच्या मत्स्यालयांत कांहीं राम उरलेला नाहीं असें कळल्यावरून तिकडे न जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर माझें आवडतें स्थान म्हणजे थिऑ-सॉफिस्ट लोकांचें आद्यपीठ व मुख्य केंद्र असें अड्यार व त्यांतहि तेथील विशाल वटवृक्ष ! वडाचें झाड मला नेहमींच आवडत आलेलें आहे. वडाचें झाड म्हणजे भारतीय संस्कृतीचें आणि हिंदू धर्माचें प्रतीकच जणूं. त्याला मरण ठाऊकच नाहीं. कारण मूळ बुंधा सडून गेला तरी झाड मरत नाहीं. पारंब्यांतून नवीन झाडें निर्माण होत असतात. कित्येक फांद्यांना आपल्या मूळ खोडाचा पत्ताहि नसतो. एखादा भाग जीर्ण होत असतो. त्याच वेळीं दुसरा जवानींत येत असतो. हिंदू धर्मांतला प्रत्येक पंथ जसा स्वतःला स्वतंत्र समजतो तशी या वटवृक्षाची फांदी स्वतःला स्वतंत्र वृक्ष मानते. अर्थात् जीवनरस सर्वच फांद्यांना एकमेकींकडून मिळत असतो.

असा हा वटवृक्ष पुनः एकदां पहावा म्हणून सुब्बूंच्या गाडींतून आम्ही चौघे अड्यारला गेलों. पहिल्या खेपेस मीं हा वृक्ष पाहिला तेव्हां त्याची जी छाप पडली ती मात्र या खेपेस पडली नाहीं. कदाचित् कलकत्त्याचा त्याहून मोठा वटवृक्ष त्यानंतर पहाण्यांत आल्यामुळें हें झाड मामुली वाटलें

असावें. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें या तपोवनांतील हिरवळ सुकून गेली होती व झाडांवर फुलें नव्हतीं. त्यामुळें सारें वातावरण कसें रुक्ष वाटत होतें.

## सुंदर संगमरवरी प्रतिमा

आडियार या तामिळ शब्दाचा एक अर्थ ' तुम्हांला तेथें पोंचतां येणार नाहीं, You could not reach ' असा असून दुसरा अर्थ अयार म्हणजे ' नदी ' आणि अडै म्हणजे ' शहराच्या बाहेरील भाग ' यापासून शहराबाहेरील नदीकांठचा भाग असा होऊं शकतो. विद्वानांना अथवा विद्वत्तेचा आव आणणाऱ्यांना महत्त्वाची वाटणारी अड्यारमधील गोष्ट म्हणजे तेथील लायब्ररी. गेल्या खेपेस मीं ही लायब्ररी पाहिली होती आणि थकहि झालों होतों. त्यामुळें या खेपेला तिच्या आंतील भागांत फेरफटका करण्याची संधि न मिळाल्याबद्दल मला विशेष दुःख झालें नाहीं. तेथील म्हाताऱ्या युरोपीय बाईनीं ज्या तुसडेपणानें आणि रुक्ष स्वरांत ' सभासदांखेरीज इतरांना आंत प्रवेश नाहीं ' हें वाक्य उचारलें त्यामुळें मात्र मला वाईट वाटलें आणि आध्यात्मिकतेच्या अगदीं गड्डयांत राहूनहि या बाईवर सभ्यपणाचा अथवा शालीनतेचा किंचितहि परिणाम न व्हावा याचा खेद झाला. असा अपमान पुनः न व्हावा म्हणूनच कीं काय सागर-सब्बु-की. रा. नीं तिथल्या तिथें सभासदत्त्वाची वर्गणी भरून टाकली आणि त्या निमित्तानें आम्ही आंतल्या बाजूस थोडा फेरफटका करून आलों.

ग्रंथालयांतून बाहेर पडून बाहेरच्या पडवींतील धर्मसंस्थापकांचीं भव्य चित्रें आणि प्रतीकें पाहूं लागलों. तेथें आठ दहा वर्षांच्या मुलीची एक अत्यंत कलापूर्ण शुभ्र संगमरवरी प्रतिमा आहे. ती पाहात असतां आम्हांला इतर सर्व गोष्टींचा जणूं विसर पडला. ही मुलगी एका लहान मुलाला कडेवर घेऊन उभी आहे. त्या मुलाचा भार तिला सहज पेलेल असा नाहीं ही गोष्ट तिच्या शरीराला मिळालेल्या किंचित् बांकावरून दिसून येते. म्हणूनच बहुधा तिला आधार देण्यासाठीं दगडाचा उपयोग करण्यांत आलेला आहे. तिच्या झग्याला पडलेल्या सुरकुत्या तर अगदीं नैसर्गिक वाटतात. मुलीच्या चेहऱ्यावरचा वात्सल्यभाव मोठा मोहक आहे. तिच्या

खांद्यावरील मुलानें तिच्या गळ्याला मिठी मारलेली असून प्रेमानें जणूं तें तिला अगदीं बिलगलें आहे. या चित्रांतील जिवंतपणानें आमच्यावर जणूं जादूच केली.

## ' तीं आध्यात्मिक चर्चा करताहेत हं ! '

पण त्या चित्रांतच सगळा वेळ घालविणें आम्हांला शक्य नव्हतें. म्हणून आम्ही बाहेर पडलों आणि अडयारच्या आवारांतील भिन्नधर्मीय देवळांना चक्कर मारून आलों. वाटेंत एके ठिकाणीं एक आंग्ल युगुल एका झाडाखालीं गुजगोष्टी करीत होतें. त्यांच्याकडे पाहून सुब्बू मिस्किल-पणें म्हणाले, ' ते दोघे आध्यात्मिक चर्चा करताहेत बरं का, नाहींतर तुम्हांला वाटेल ते प्रेमालाप करताहेत ! ' त्यांवर सागर म्हणाले, ' अहो, पण प्रेम हें सुद्धां आध्यात्मिकच असतें कीं ! '

आणि आम्ही खदखदून हंसत त्यांच्या म्हणण्याला संमति दर्शविली.

तेथें नृत्य-गायन-चित्रकला वगैरे शिक्षण देणारी कलाक्षेत्रम् नांवाची एक कलाशाळा आहे. ती पाहाण्यास आम्ही गेलों. पण उन्हाळ्याच्या सुटी-मुळें ती बंद होती. अडयारच्या संचालिका श्रीमती रुक्मिणीदेवी अरुंडेल यांच्याशीं सुब्बूची ओळख होती म्हणून त्यांना भेटण्याचें आम्ही ठरविलें. पण त्या आजारी असल्याचें कळल्यामुळें तोहि कार्यक्रम रहित झाला आणि अडयारच्या समुद्रकांठची शोभा पाहात पाहात आम्ही गांवांत परत आलों.

## कपालेश्वराचें भव्य मंदिर

युनिव्हर्सिटी, म्यूझियम, झूलॉजिकल गार्डन्स (पशुसंग्रहालय), हायकोर्ट वगैरे प्रेक्षणीय समजलीं जाणारीं ठिकाणें पाहाण्यांत मला विशेष रस नव्हता. कारण कोणत्याहि मोठ्या शहरीं हीं ठिकाणें असतातच. त्यांत वेगळेपणा असा फारच थोडा असतो. म्हणून मैलापूर विभागांतील कपालेश्वर मंदिर पाहावयास जाण्याचें ठरलें तेव्हां मला ती कल्पना विशेष स्वागतार्ह वाटली. ट्रिप्लिकेन भागांतील पार्थसारथीचें देऊळहि असेंच प्रेक्षणीय आहे. पण आमचा पुष्कळसा वेळ कपालेश्वर मंदिरांत मोडल्यामुळें आम्ही पार्थसारथी मंदिरांत गेलों नाहीं.

कपालेश्वर हें शंकराचें देऊळ दक्षिणेंतील सर्वसामान्य मंदिराप्रमाणें चांगलें प्रशस्त आहे. या देवळांतील गर्दी मात्र अगदीं अफाट होती. शुक्रवारचा दिवस असल्यामुळें पार्वतीच्या–कर्पकांबल देवीच्या–देवळांत विशेष गर्दी होती. तरी पण शंकराच्या भक्तांची संख्याहि कांहीं कमी नव्हती. (दोन्ही देवळें एकाच आवारांत आहेत) श्री. सागर हे कालीचे विशेष भक्त आहेत. ते एका टोपलींत नारळ, फुलांची वेणी, केळीं, कमळ, कापूर वगैरे घेऊन दर्शनाला गेले. तेथून बाहेर येण्यास त्यांना अर्धा पाऊण तास लागला. तोंपर्यंत आम्ही देवळाचें व दर्शनार्थी लोकांचें निरीक्षण केलें. देवाला जाणाऱ्यांत मुख्यतः स्त्रियांचाच भरणा असावयाचा अशी माझी समजूत. पण येथें स्त्रियांपेक्षां पुरुषांचीच संख्या जास्त दिसली. या देवळांतील आरती मोठी आकर्षक वाटली. दिव्यांचे वेगवेगळे आकार (पिरॅमिड, झाड वगैरे) आरती करतांना होत होते. ते पाहून गंमत वाटली.

## जगांतील दुसऱ्या नंबरचा समुद्र किनारा

मद्रासचा समुद्रकिनारा हें एक प्रेक्षणीय स्थान आहे. एका रेषेंत जवळ जवळ वीस मैल पर्यंत पसरलेला इतका मोठा समुद्रकिनारा आपल्या देशांत तरी अन्यत्र नाहीं. जगामध्येंहि फक्त कॅलिफोर्नियांतच एवढा सरळ किनारा आहे असें म्हणतात. या किनाऱ्याच्या कांठाकांठानें सुमारें आठ मैलपर्यंत गेलेली डांबरी सडक मुंबईच्या मरीन ड्राइव्हची आठवण करून देते. तिला व त्या भागाला मरीना असेंच म्हणतात. फरक एवढाच कीं मरीन ड्राइव्हवर गुजराती–मारवाडी शेठ लोकांचे बंगले असल्यामुळें समुद्रसौंदर्याला खासगी मक्तेदारीचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. तर मद्रासच्या मरीना मार्गाच्या कडेला युनिव्हर्सिटीच्या व सरकारी इमारती आहेत. म्हणजे एक प्रकारें समुद्रसौंदर्याचें राष्ट्रीयीकरण झालेलें आहे. या रस्त्यानें मोटारींतूनच नव्हे तर पायीं जाण्यांतहि एक प्रकारची मजा वाटते.

आम्ही समुद्रकिनाऱ्यावर पोंचलों तेव्हां अंधार पडला होता आणि आम्ही जाण्यापूर्वीं एक छोटीशी पावसाची सर येऊन गेलेली होती. यामुळें लोकांची वर्दळ अजीबात नव्हती. त्या शांत वातावरणांत समुद्राचा गंभीर निनाद कसा गंभीर शंख-ध्वनीसारखा घुमत होता. हिंदुस्थानांतील

सर्व समुद्रकिनाऱ्यांत मद्रासचा किनारा सर्वांत अधिक स्वच्छ असतो असें ऐकिलें होतें, त्याचीहि प्रचीति आली. बहुधा मुंबईप्रमाणें भेळीचा व्यापक प्रचार व प्रसार येथें विशेष नसल्यामुळें विशेष कचरा होत नसावा.

## जेमिनी स्टुडिओंतील फेरफटका

सागर, सुब्बू व की. रा. हे तिघेहि जेमिनी स्टुडिओंतील कार्यकर्ते असल्यामुळें जेमिनींत जाणें क्रमप्राप्तच होतें. माझा सिनेमाशीं तसा फारसा संबंध आलेला नाहीं आणि जो कांहीं संबंध आला आहे त्यावरून सिनेमा आणि तेथील लोक यांविषयीं माझें फारसें चांगलें मत झालेलें नाहीं. (अर्थात् माझ्या मताची सिनेमावाल्यांना मुळींच फिकीर नाहीं हें मी जाणतोंच!) म्हणून जेमिनी स्टुडिओच्या आवारांत फिरतांना मी फारसा उत्सुक अथवा उत्साही नव्हतों. परंतु तेथील एकूण वातावरण, व्यवस्थितपणा, वरिष्ठ अधिकाऱ्यांतील सौजन्य वगैरे गोष्टी पाहून सिनेमासंबंधीं माझें मत बरेंच निवळलें. की. रा. सांगत होते, ' इथल्या वातावरणाबद्दल, श्री. वासन् (श्रीनिवासन्चें संक्षिप्त रूप) फार खबरदारी घेतात. कोणीहि जरा चावटपणा किंवा अशिष्टपणा केला कीं त्याला येथून रजा देण्यांत येते. बिडी-सिगारेट फुंकणारे लोकहि तुम्हांला येथें दिसतात का पहा!' वासन् यांच्या शिस्तीची सागर यांनीहि खूप तारीफ केली. 'पुण्यामुंबईकडे असा एखादा स्टुडिओ आहे काय?' असें मीं विचारलें असतां श्री. सागर म्हणाले, ' श्री. व्ही. शांताराम यांच्या राजकमल स्टूडिओंत थोडीफार शिस्त आणि सभ्यता दिसते. बाकी इतरत्र सगळा बाजारच आहे.' मला ही माहिती नवीनच होती. या शिस्तीच्या जोरावर बहुधा दक्षिणेकडे राहूनहि वासन् यांनीं हिंदी चित्रपटसृष्टि काबीज केली असावी. श्री. वासन् हे ध्येयवादी असून त्यांनीं या धंद्याबद्दल लोकांत आदर निर्माण केला आहे असें म्हणतात. स्टुडिओच्या आवारांत ४ मोठीं स्टेजेस असून एका वेळीं चार चित्रपटांचें शूटिंग चालूं शकतें. आतां ट्वेंटीएथ सेंचरी फॉक्सच्या मदतीनें इंग्रजी बोलपट काढण्यासाठीं पांचवें स्टेज बांधण्याचा वासन् यांचा विचार आहे. येथील सामानाचें एकेक स्टोअर पाहिलें कीं त्याच्या अवाढव्यपणाची कल्पना येते. पोषाख विभागांत पांच-सहा शिंपी कायम नोकरीवर असून

त्यांना सतत बारा महिने काम पुरतें. ही एकच गोष्ट कामाच्या पसाऱ्याची साक्ष देऊं शकेल. कोट्यवधि रुपयांचें भांडवल येथें गुंतलेलें आहे. जेमिनी म्हणजे मिथुन राशि. श्री. वासन् यांची ती रास असल्यामुळें त्यांनीं आपल्या स्टूडिओला तें नांव दिलें आहे. या धंद्यांत पडलेले श्री. वासन् हे एकटेच ब्राह्मण गृहस्थ आहेत असें म्हणतात. त्यांनीं 'आनंद विकटम्' नांवाचें एक साप्ताहिक तामिळ भाषेंत चालविलें असून त्याचा खप ऐंशीं हजारांहून अधिक आहे. जेमिनीतर्फे तामिळ व हिन्दी चित्रपट निघत असतात. लहान लहान चित्रपट काढीत बसण्याऐवजी खूप पैसा खर्च करून वर्षांतून एखादाच अवाढव्य बोलपट काढण्याची नवी पद्धत श्री. वासन यांनीं प्रथमच सुरू केली आणि तींत ते यशस्वीहि झाले.

## रूपसौंदर्याची चर्चा

मद्रासी ऊर्फ तमिळभाषी लोक तल्लख बुद्धीचे आणि व्यवहारांत हुषार आहेत. जगाच्या पाठीवर ते कुठेंहि जातात आणि वाटेल तेवढ्या कमी प्राप्तींत गुजराण करतात अशी त्यांची ख्याती आहे. मात्र या लोकांमध्यें-विशेषतः त्यांच्या स्त्रियांमध्यें रूप-सौंदर्याची, लावण्याची किंवा आकर्षकतेची फार उणीव आहे, असें मला आढळून आलें. कांचीपुरम् पासून मद्रास-पर्यंतच्या एक आठवड्याच्या मुक्कामांत मला एकहि मद्रदेशीय 'सुंदरी' दिसली नाहीं. त्या मानानें सुब्बूसारखे कांहीं पुरुषच जास्त देखणे व ठस-ठशीत वाटले. माझें हें मत सागरनीं मान्य केलें. इतकेंच नव्हे तर सुब्बू व की. रा. यांनींहि माझें म्हणणें कबूल केलें. याचें कारण मात्र कोणालाच सांगतां आलें नाहीं. मद्रासच्या उत्तरेकडील कन्नडिग व आंध्र लोक काळे असले तरी तरतरीत व आकर्षक आहेत. पश्चिमेकडील केरळकन्या गौर-वर्णीय व सुंदर आहेत. मग तमिळनाडच्याच लोकांवर या बाबतींत निसर्गानें अशी अवकृपा कां केली असावी ? नृवंशतज्ज्ञांनीं विचार करण्यासारखा हा मुद्दा अवश्य आहे. तमिळभाषी लोक आर्य नसून अस्सल द्रविड आहेत. केरळ–कर्नाटक–आंध्रच्या लोकांत आर्यद्रविडांचें मिश्रण झालेलें आहे. याचा तर त्याच्याशीं कांहीं संबंध नसेल ?

**गच्चीवरील गप्पा**

त्या दिवशीं रात्रीं आम्ही सर्वजण सुब्बूंच्या घरींच वस्तीला राहिलों. जेवण अर्थातच बाहेर हॉटेलांत घेतलें. ‘ अर्थातच ’ म्हणण्याचें कारण या भागांत पाहुण्याला घरीं उतरवून घेण्याऐवजीं हॉटेलांत उतरविण्याकडेच लोकांची प्रवृत्ति जास्त असते. हॉटेलचें जेवण व खाणें याबद्दल कोणालाच संकोच वाटत नाहीं. मात्र येथील देशी पद्धतीचीं उत्कृष्ट हॉटेलें उत्तर भारतीयांच्या मालकीचीं असलेलीं पाहून आश्चर्य वाटलें. गुप्ता नांवाच्या एका हॉटेल मालकाला मी म्हणालों देखील कीं, ‘ इतक्या लांब दक्षिणेंत येण्याऐवजीं तुम्हीं आग्रा, बनारस, अलाहाबाद या ठिकाणीं चांगलीं हॉटेलें कां चालवीत नाहीं ? ’ त्यावर तो म्हणाला, ‘ साहेब, हॉटेलें आम्ही खूप चालवूं, पण गिऱ्हाईक मिळायला हवं ना ? आमच्या भागांत लोक मिठाई खातात. हॉटेलची चव त्यांना नाहीं. इथल्या लोकांसारखे हॉटेल-रसिक इतरत्र क्वचितच आढळतील तुम्हांला ! ’

नेहमींच्या कडक उकाड्यापासून संरक्षण करण्यासाठीं येथील लोक अंगाला चंदनाचा लेप लावतात. तसा सुगंधित चंदनाचा लेप लावून आम्ही सुब्बूंच्या गच्चीवर मध्यरात्रीपर्यंत गप्पा मारीत बसलों. सहसा पत्त्यांना न शिवणारा मी, पण पत्तेहि कुटले आम्हीं. सुब्बूंच्या कविता ऐकल्या आणि ढगाआड लपलेल्या चंद्राचें संशोधन करीत करीत हळूहळू निद्राधीन होऊन गेलों.

● ● ● ●

# प्रेक्षणीय वाराणसी : ८

## बनारस नव्हे, वाराणसी

भगवान् बुद्धाच्या २५०० व्या परिनिर्वाण दिनाची स्मृति म्हणून बुद्धकाळीं प्रचारांत असलेलें काशीचें वाराणसी हें नांव पुनः प्रचारांत आणावें असें उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री पंडित संपूर्णानंद यांनीं जाहीर करतांच, भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं त्या गोष्टीला विरोध करून शहरांची जुनी सर्वपरिचित नांवें बदलूं नयेत असें आपलें मत व्यक्त केलें होतें. त्यामुळें काशीच्या नांवांत फरक झालेला नसेल अशी माझी समजूत होती. परंतु काशीला गेल्यानंतर दिल्लीहून आलेल्या एका पत्रावर जेव्हां 'वाराणसी' असा पोस्टाचा शिक्का मीं पाहिला तेव्हां मला जरा आश्चर्य वाटलें. अर्थात् प्रत्यक्ष काशीला मात्र वाराणसी शब्दाचा उपयोग किंवा वापर करणारे मला कुणीच आढळले नाहींत.

## ठळक जागीं लावलेल्या पाट्या

काशीची माझी ही तिसरी वारी! १९४० सालीं पहिल्यांदा काशीला गेलों होतों तेव्हां अत्यंत भक्तिभावानें तेथील विश्वनाथापासून काळभैरवापर्यंत सगळ्या देवांचीं देवळें मीं पालथीं घातलीं होतीं. व शिसारी येत असतांहि गंगेच्या किनाऱ्याजवळील गलिच्छ पाण्यांत स्नान केलें होतें. दुसऱ्यांदा सेवापुरीच्या सर्वोदय संमेलनाच्या निमित्तानें १९५२ सालीं गेलों होतों. त्या वेळींहि विश्वनाथाच्या कोंदट व घाणीनें भरलेल्या देवळांत जाऊन 'दर्शन' करून आलों होतों, पण स्नान मात्र दुपारच्या वेळीं स्वच्छ गंगेमध्यें केलें होतें. जून १९५६ च्या अखेरीस तिसऱ्यांदा गेलों तेव्हां काशी-विश्वेश्वराच्या देवळांत हरिजनांच्या सत्याग्रहाची धामधूम सुरू होती आणि हरिजनांना आंत प्रवेश करतां येऊं नये म्हणून पुजाऱ्यांनीं

देवालाच पिंजऱ्यांत बंद करून टाकलेलें होतें. तेव्हां देवाच्या दर्शनाला जाण्यांत कांहीं अर्थच नव्हता म्हणून या खेपेस काशींतील इतर प्रेक्षणीय स्थळें पहावयाचें ठरविलें. भाविक यात्रेकरू काशीला येतात तेव्हां मुख्यतः येथील देवळेंच पहातात. विश्वनाथाचें दर्शन घेऊन ज्ञानवापीच्या पाण्यानें स्नान करतात. गंगेवर क्षौरकर्म करवून घेऊन स्वतःचा व पितरांचा उद्धार करून घेतात; दुर्गा, संकटमोचन (हनुमान), बिंदुमाधव वगैरे इतर देवतांचें दर्शन घेतात आणि प्रसाद घेऊन परततात. पण मी मात्र या खेपेस प्रेक्षणीय स्थळेंच पहावयाचें ठरविलें होतें.

पण थांबा जरा! स्टेशनवर ठिकठिकाणीं ठळकजागीं लावलेली ती पाटी वाचून घ्या.

'यात्रियोंसे प्रार्थना है कि अपनी ही भलाई के लिए वे किसी अनजान आदमीसे खानेकी चीजें न लें! ऐसा न हो कि उसमें विष मिला हो!' (प्रवाशांना विनंति आहे कीं त्यांनीं आपल्या स्वतःच्या कल्याणासाठींच कोणाहि अपरिचित व्यक्तीकडून खाण्याच्या वस्तु घेऊं नयेत—कदाचित् त्यांत विषहि मिसळलेलें असेल!)

अशा पाट्या इतर क्षेत्राच्या ठिकाणींहि असतील. कारण जवळ भरपूर पैसा बाळगून तीर्थयात्रा करावयास आलेल्या भाविक लोकांना भल्याबुऱ्या मार्गांनीं लुबाडणें हा या क्षेत्रांतील कांहीं लोकांचा खास धंदाच असतो. पण काशीची या बाबतींत विशेष ख्याति असावी असें जागजागीं लावण्यांत आलेल्या पाट्यांवरून बाहेरच्या प्रवाशाला वाटल्यास त्याबद्दल त्याला दोष देतां येणार नाहीं.

## आल्हाददायक नौकाविहार

सारें काशी शहर गंगानदीच्या डाव्या (उत्तर) तीरावर वसलेलें आहे. या शहराच्या एका बाजूस वरुणा व दुसऱ्या बाजूस असी या छोट्या नद्या वहात येऊन गंगेला मिळतात. म्हणून तिला वाराणसी हें नांव मिळालें असें म्हणतात. गंगा नदी या ठिकाणीं उत्तरवाहिनी होते, हिमालयाकडे वळते म्हणून तिला विशेष पावित्र्य प्राप्त झालें आहे, असें समजण्यांत येतें. परंतु प्रत्यक्षांत मात्र उत्तरवाहिनी गंगा फारशी दिसत नाहीं. जरा एके

ठिकाणीं तिनें उत्तरेकडे वळण घेतलें आहे एवढेंच. अर्थात् जेथें ती उत्तर-वाहिनी झालेली आहे तेथें सध्यां घाट वगैरे कांहीं नाहीं. यावरून ती पात्र बदलत राहिली असावी असें वाटतें. गंगा नदी सध्यां आपल्याला दिसते ती पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात आहे. तिचा आकार या ठिकाणीं चंद्रासारखा झालेला आहे. यामुळें तिला चंद्रभागाहि म्हणण्यांत येतें. या नदीच्या दक्षिणेस मगध देश सुरू होतो. तो पापी लोकांचा देश समजला जाई. यामुळें सारी काशी उत्तर किनाऱ्यावरच वसलेली आहे. फक्त काशी-नरेशांचा किल्ला असलेलें रामनगर तेवढें दक्षिण किनाऱ्यावर आहे, यावरून कदाचित् एके काळीं हें रामनगरहि गंगेच्या मध्यभागीं बेटाप्रमाणें असावें किंवा त्याला वळसा घालून गंगा वहात असावी असा कांहीं लोकांचा कयास आहे.

गंगेचा आकार नालेप्रमाणें असल्यामुळें नावेंत बसून जलविहार करूं लागलें कीं सारें काशी शहर आपल्या डोळ्यांसमोरून चित्रपटाप्रमाणें सरकत जातें. आम्ही राजघाटावरून नौकेंत बसून निघालों आणि दशाश्वमेध घाटाला लागलों. एवढ्या मैल, दीड मैल अंतरासाठीं नावाड्या सामान्यतः बारा आणे घेतो, परंतु आम्ही बाहेरचे आहोंत हें ओळखून त्यानें आमच्याकडून सबंध नावेचा दीड रुपया घेतला.

## पुरवैया वाऱ्याचा प्रताप

आम्ही नौकाविहार केल्यावर त्या दिवशीं ‘ पुरवैया ’ म्हणजे पूर्वेकडील वारे चालू होते. आम्हांला पश्चिमेकडे म्हणजे नदीच्या प्रवाहाच्या उलट दिशेला जावयाचें होतें. एरव्हीं खूपच त्रास होतो. पण त्या दिवशीं पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणाऱ्या त्या वाऱ्याचा जोर इतका अधिक होता कीं जणूं प्रवाहाच्या दिशेनें वहात जावी त्याप्रमाणें आमची नौका चालली होती. समुद्राच्या लाटांप्रमाणें नदींत लाटा उठत होत्या. नावाड्यांची तक्रार चाललीच होती कीं ‘ साहेब, आतां परत येतांना मला त्रास होईल.’ अर्थात् परत येतांना आम्ही होडींतून येणार नव्हतों. त्यामुळें त्याला फार त्रास पडणार नाहीं हें आम्ही ओळखून होतों.

हा प्रल्हाद घाट ! एका दगडाला हिरण्यकश्यपूचा आकार दिला आहे.

अनुक्रम ........... वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

या घाटाचे वरील बाजूस गोस्वामी तुलसीदासांचें मंदिर आहे. या घरांत तुलसीदास रहात असत. सध्यां तेथें तुलसीदासांची शुभ्र संगमरवरी मूर्ति आहे. पण तें घर खाजगी मालकीचें असल्यामुळें त्याची चांगलीच दैना झालेली दिसते. बहुधा दिवसभर तें बंदच असतें. एका जाळीदार खिडकींतून तुलसीदासांचें दर्शन घ्यावें लागतें.

हा गाय घाट नि त्यानंतरचा तो लाल घाट ! राजा बलदेवदास बिडला यांनीं स्थापन केलेलें संस्कृत महाविद्यालय या लाल घाटावर आहे. त्यानंतर ब्रह्मा घाट, दुर्गा घाट, पंचगंगा घाट वगैरे नाना घाट लागतात.

## मशिदीच्या जागीं मंदिर असावें

पंचगंगा घाटाजवळ आपण आलां कीं एक उंच मिनार आपल्या डोळ्यांत भरतो. तो औरंगजेबाच्या मशिदीचा मनोरा असला तरी लोक मात्र त्याला ‘ माधवरावका धरहरा ’ असें म्हणतात. धरहरा म्हणजे मनोरा. कुणा माधवराव नांवाच्या मोहल्ल्यांत ही मशीद आहे, म्हणून त्या मनोऱ्याचा संबंध माधवरावाशीं जोडण्यांत आलेला आहे असें मशिदीच्या रखवालदारानें आम्हांला सांगितलें. याच्या जवळच बिंदुमाधवाचें मंदिर आहे. काशीमध्यें मुख्यतः शिवाचें महत्त्व! पण हिंदु धर्मांतील समन्वयात्मक वृत्तीमुळें बिंदुमाधवाचेंहि ( विष्णूचें ) मंदिर येथें चांगलेंच छानदार आहे. हल्लीं जेथें औरंगजेबाची मशीद आहे तेथें पूर्वीं हें देऊळ असावें आणि तें उध्वस्त करून त्यावर औरंगजेबानें मशीद बांधली असावी. कारण सध्यांचें बिंदुमाधवाचें देऊळ कोपऱ्यांत पडल्यासारखें वाटतें.

‘ माधवराव का धरहरा ’ या मनोऱ्यावर जाण्यासाठीं आधी बेचाळीस पायऱ्या चढून गच्चीवर जावें लागतें. नंतर मनोरा लागतो. त्याच्या टोकावर जाण्यासाठीं चौऱ्याऐंशी पायऱ्या चढाव्या लागतात. या पायऱ्या इतक्या उभ्या चढाच्या आहेत कीं एकदांच चढउतार केल्यानें माझ्या मांड्या चार दिवस दुखत होत्या. गच्चीवर जाण्यासाठीं ज्या पायऱ्या आहेत त्या चांगल्या रुंद असून एका वेळीं दोनतीन माणसांना वर जातां येते दोन्ही बाजूंना जाड जाड साखळदंड लावलेले असल्यानें चढतां उतरतांना

सोयीचें जातें म्हणजे घसरून पडण्याची भीति रहात नाहीं. मनोऱ्यांतील पायऱ्या मात्र अगदीं अरुंद असून एका वेळीं एकाच व्यक्तीला चढतां किंवा उतरतां येते. यामुळें वरून उतरतांना किंवा चढतांना विरुद्ध बाजूनें कोणी येत नाहीं ना याची खात्री करून घ्यावी लागते. आंतील बाजूस अंधार आहे. आणि मार्ग चक्राकार, यामुळें माणसाच्या शब्दांवरून किंवा पावलाच्या आवाजावरून कोणी येत आहे का नाहीं तें ओळखावें लागतें.

### वरुन दिसणारें सुंदर दृश्य

मनोऱ्याच्या मध्यांवर गेलें म्हणजे मात्र सर्व शीण कुठल्या कोठें नाहींसा होतो. सारी काशी आपल्या डोळ्यांसमोर नकाशांतल्याप्रमाणें उभी राहते आणि तें दृश्य मोठें सुंदर दिसतें. काशींतील घरें किती दाटीवाटीनें वसलेलीं आहेत याची खरी कल्पना या मनोऱ्यावरून येते. बहुतेक घरांना उघड्या गच्च्या आहेत. भयंकर उकाड्यामुळें त्यांचें अस्तित्व अपरिहार्यच आहे. पण त्या सगळ्या गच्च्या या मनोऱ्यावरून इतक्या स्पष्ट दिसतात कीं गच्चीवरील लोकांना एकांत कसा लाभत असेल याविषयीं मनांत शंका उभी राहते. चंद्रकोरेप्रमाणें वाहणारी गंगाहि येथून मोठी मनोहर दिसते. आणि तो मालवीय पूल ! ( पूर्वीचा डफरिन ब्रिज. ) एवढा प्रचंड पूल, पण मनोऱ्यावरून तो कसा खेळण्यांतल्या पुलासारखा दिसतो. एकूण दृश्य इतकें मनोहर दिसतें कीं तासन्‌तास पहात राहिलें तरी मनाची तृप्ति होत नाहीं.

काशींतील सर्वांत उंच ठिकाण म्हणजे हा मनोराच होय. याच्या जोडीचा दुसरा मनोरा १९४० सालीं मीं पाहिला होता. त्या वेळीं ही जोडी मोठी सुंदर दिसत असे. हा दुसरा मनोरा नोव्हेंबर १९४९ सालीं रात्रीं नऊच्या सुमारास अचानक कोसळला. त्याच्या जीर्णत्वाची कांहींहि चिन्हें त्या वेळीं दिसत नव्हतीं. त्या दिवशीं संध्याकाळीं नेहमीप्रमाणें अनेक लोक तो मनोरा पाहूनहि गेले होते. तो मनोरा दिवसा कोसळला असता तर अनेक लोकांना जिवाला मुकावें लागलें असतें यांत शंका नाहीं, कारण तो अगदीं घाटावर असून तेथें नेहमींच गर्दी असते. अर्थात् रात्रीं पडूनहि घाटावरचीं दोन माणसें त्याच्याखालीं चेंगरून मेलींच.

**मणिकर्णिका घाटावरील प्रेतें**

यानंतर राम घाट, गणेश घाट, भोसला घाट, संकठा घाट ( बडोद्याच्या महाराजांचा ), सिन्धिया घाट ( ग्वाल्हेरकरांचा ) वगैरे अनेक घाट पहात पहात आपण पुढें सरकत जातों, तोंच एका ठिकाणीं अनेक प्रेतें जळत असलेलीं आपल्याला दिसतात. हाच तो प्रसिद्ध मणिकर्णिका घाट. असें म्हणतात कीं भगवान् विष्णूंनीं या ठिकाणीं तपःश्चर्या केली होती. तिनें प्रसन्न झालेल्या शंकराला इतका आनंद झाला कीं त्या भरांत ते नाचूं लागले. तेव्हां त्यांच्या कानांतील मणि तेथील कुंडांत पडला. तेव्हांपासून या कुंडाला मणिकर्णिका म्हणूं लागले. मृतांच्या अस्थि व राख लोक या कुंडांत टाकूं लागल्यामुळें हल्लीं तेथें अगदीं नरक बनलेला आहे. पण तरीहि भाविक लोक या पाणींत स्नान करीत असतात.

काशी ही मुमूर्षु ( मरणाची इच्छा बाळगणाऱ्या ) लोकांची नगरी आहे. कारण येथें मरणाऱ्याला हमखास मुक्ति मिळते, अशी भाबड्या लोकांची समजूत कांहीं डोकेबाज लोकांनीं करून दिली आहे. त्यामुळें जन्मभर अनंत पापें करणारे लोकहि मरण्यासाठीं काशीस येत असतात. मोक्ष मिळविण्याचा किती सोपा मार्ग ! ज्यांना काशींत मरणें शक्य होत नाहीं त्यांची पार्थिव शरीरें दाहक्रियेसाठीं काशींत आणतात. त्यामुळें या घाटावर चिता सदैव पेटलेल्या असतात. स्मशानाची जागा फार लहान असल्यामुळें तेथे प्रेतांचा ' क्यू ' लागलेला असतो. आम्ही नावेंतून चाललों होतों तेव्हां घाटाच्या पायऱ्यावर दोन शवें आपला नंबर केव्हां लागतो म्हणून वाट पहात पडलीं होतीं. मोक्षाच्या लालचीनें माणूस आपल्या निष्प्राण शरीराची विटंबना करून घेण्यासहि कसा तयार होतो, हें पाहिल्या नंतर हसावें कीं रडावें तेंच कळत नाहीं.

या मोक्षप्राप्तीसाठीं काशीच्या आसपासच्या तीसचाळीस मैलांच्या प्रदेशांतील प्रेतें येत असतात. त्यामुळें अहोरात्र ' राम नाम सत्य है ! ' चा आक्रोश आपल्या कानांवर आदळत असतो. रात्रीं अपरात्रीं हा आक्रोश ऐकला कीं नवीन माणसांची भीतीनें घाबरगुंडी उडते. विशेषतः लहान मुलें व बायका यांना या ' रामनामा'चा फार त्रास होतो. पण

'मोक्षबाज' लोक इतरांच्या अडीअडचणींचा विचार कशाला करतील!

आणि हा दशाश्वमेध घाट! या ठिकाणीं दहा अश्वमेध यज्ञ करण्यांत आले होते. यामुळें हा विशेष पवित्र समजण्यांत येतो. येथें भटजींची गर्दी विशेष असते. सकाळच्या वेळीं तुम्हीं गेलांत तर या भटजींच्या तोंडीं तुम्हाला रुपये, आणे आणि पैचीच भाषा जास्त ऐकूं येईल. आणि ते कसला तरी व्यापार करीत असावेत अशी शंका तुम्हाला येईल. ती शंका खरी आहे. तुम्हाला आणि तुमच्या पितरांना स्वर्ग मिळवून देण्याचा दलालीचा धंदा ते करीत असतात. तुम्ही स्वतःसाठीं सव्वा रुपया, बायकोसाठीं दहा आणे व मुलांसाठीं प्रत्येकीं पांच आणे दिले तरी तो भटजी खूष होईल, आणि तुम्हांला स्वर्गाचा 'पासपोर्ट' मिळवून देईल. अर्थात् तुम्ही जरा भोळसट व श्रीमंत आहांत असें त्याच्या लक्षांत आलें तर तो हीच रक्कम दसपट वीसपटहि करूं शकतो. हा पंडा सगळे धार्मिक मंत्र संस्कृतांत म्हणण्याऐवजीं मोडक्या तोडक्या हिंदींत कां म्हणतो, याबद्दल तुमच्या मनांत कांहीं शंका निर्माण झाल्यास तिला मुळींच थारा देऊं नका. कारण उत्तरेकडे असेंच चालतें. इकडील पंडे अक्षरशत्रु असतात. संस्कृत मंत्र त्यांना येत नाहींत. त्यांच्या एकूण रंगरूपाकडे पाहिल्यास घाटावरील न्हावी, धोबी अगर पंडा यांतील फरक तुम्हाला मुळींच ओळखतां येणार नाहीं याची खात्री बाळगा.

## चौकांतील दलालापासून सावधान

येथून जवळच काशीविश्वेश्वराचें देऊळ आहे. तेथें पोंचण्यासाठीं अत्यंत अरुंद बोळांतून जावें लागतें. या बोळांत उंची उंची कापडांचीं दुकानें आहेत. त्यांतून तुम्ही खण, पातळें विकत घेऊन फसूं शकतां. विश्वनाथाच्या देवळांतील घाणीनें तुमचें डोकें उठलें तर मान वर करून महाराणी अहिल्याबाईनें सोन्यानें मढविलेला त्याचा कळस पाहून घ्या. मूळ विश्वनाथाच्या देवळाच्या जागीं औरंगजेबानें उभारलेली मशीद पहा आणि ज्ञानवापीच्या पाण्यानें स्वतःला शुद्ध करून घ्या. नंतर नाना प्रकारच्या वस्तूंनीं भरलेल्या दुकानांच्या बोळांतून बाहेर पडलांत कीं थोड्याच अंतरावर चौक लागेल. येथें अनेक दलाल तुम्हाला घेरतील

आणि रेशमी, भरजरीचीं वस्त्रें तुमच्या गळ्यांत वाटेल त्या किंमतीला मारण्यासाठीं तुम्हांला समोरच्या कुंजगल्लींत घेऊन जातील. त्या अरुंद गल्लींतील तीं दुकानें पाहून तुम्ही आश्चर्यानें थक्कच व्हाल. पण काशींत या गोष्टीचें आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. इथला सगळा व्यापार अशा बोळांतूनच चालतो.

संध्याकाळच्या वेळीं बनारस शहरांतील कसबी कारागीर आपण तयार केलेल्या रेशमी साड्या, शालू, भरजरी वस्त्रें घेऊन दुकानांवर विकावयास येतात. शंभर रुपयांची साडी दुकानदार पन्नास रुपयाला मागतो आणि सत्तर रुपयांवर सौदा तुटतो. तीच साडी दुकानदार तुम्हाला नव्वद-शंभर रुपयाला विकतो. किंवा तुमच्या देखतच सौदा झाला असल्यास रुपयाला एक आणा कमिशन घेऊन पाऊणशें रुपयाला तुम्हाला ती मिळूं शकेल. त्या सौदेबाजीमुळें सामान्य माणूस गडबडून जातो, पण तुमच्या खिशांत पैसे नसतील तर तुम्हाला मुळीच भिण्याचें कारण नाहीं. तुम्ही माझ्या-प्रमाणें तटस्थपणें सारी गडबड–धांदल पाहूं शकतां.

या चौकांत बनारसचें उत्कृष्ट पान तुम्हाला खावयाला मिळेल. अर्ध्या आण्यापासून पन्नास रुपयांपर्यंत वाटेल त्या किंमतीचें पान येथें मिळतें. येथील मघई जातीचें पान मोठें नाजूक असतें. तें तोंडांत घातल्यानंतर जणूं विरघळून जातें. त्याचा मुळींच चोथा उरत नाहीं. पान न खाणारा माणूस काशीमध्यें औषधालाहि मिळणार नाहीं. चार लाख लोकवस्तीच्या या शहरांत भारतांतील प्रत्येक प्रांतांतील लोक येऊन राहिलेले आहेत. (कारण मोक्ष?) पण त्या सर्वांनीं पान खाण्याचें व्यसन उचललेलें दिसतें. बंगाली तर पान खाण्यांत पटाईतच आहेत, पण मराठी लोकहि खूप पान खातात! अर्थात् उत्तरेकडे पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें विडा खाण्याचा प्रघात जास्त आहे, ही गोष्ट सर्वश्रुतच आहे!

## मालवीय पूल–दुहेरी वाहतूक

गांवांतील गर्दीचा पुरा कंटाळा आल्यानंतर गर्दीपासून दूर असलेलें भारतमाता मंदिर पहावें. संगमरवरी दगडांत कोरलेला अखंड भारताचा

सुंदर नकाशा येथें आहे. मालवीयजींनीं स्थापन केलेली बनारस हिंदु युनिव्हर्सिटीहि प्रेक्षणीय आहे. मीं ती दोनदां पाहिली होती म्हणून या खेपेस तेथें न जातां राजघाटाजवळील मालवीय पूल पहाण्यास गेलों. या पुलाच्या खालच्या मजल्यावरून आगगाडी जाते आणि वरून मोटारीचा पक्का डांबरी रस्ता आहे. या भागांतील लोक हवा खाण्यासाठीं या पुलावर येतात. एकूण पूल सहा फर्लांग लांब असून, मुख्य प्रवाहावरील पूल तीन फर्लांग लांब आहे. मला कुणीं तरी सांगितलें कीं या पुलाच्या वेळीं कुणी महाराष्ट्रीय इंजिनियर येथें होता. तेव्हां अभिमानानें छाती फुगून गेली. पण नंतर समजलें कीं कोण्या जर्मन स्थापत्यविशारदाची ही करामत आहे. हावडा (हौरा- कलकत्ता) येथील हुगळी नदीवरील पुलाप्रमाणें या पुलाच्या वरच्या बाजूसहि उंच उंच लोखंडी कमानी आहेत. त्यामुळें पुलावरील ओझें वाढण्याऐवजीं त्याला बळकटी येते, असें म्हणतात. खालून रेल्वे जाऊं लागली कीं वरच्या बाजूस चालणाऱ्यांना भूकंपासारखे हलके हादरे बसतात. आणि वरून खालीं नजर टाकली कीं डोळे गरगरा फिरूं लागतात. पण येथें स्वच्छंद वारा वहात असतो. यामुळें फिरायला जाण्यासाठीं हें ठिकाण उत्तम आहे. गांवाच्या अगदीं टोंकास असल्यामुळें आणि बहुतेक लोक घाटावरच सकाळ–संध्याकाळचा वेळ घालवीत असल्यामुळें येथें फिरायला येणाऱ्यांची संख्या थोडीच असते. अर्थात् फुटपाथ जरा अरुंद असल्यामुळें फिरणाऱ्यांची संख्या वाढल्यास तें अडचणीचेंच होईल!

येथून काशी शहराचें आणि गंगेच्या कांठावरील घाटांचें दृश्य मोठें मोहक दिसतें.

येथून जवळच श्री. जे. कृष्णमूर्ति यांच्या प्रेरणेनें चाललेली ऋषि व्हॅली नांवाची एक शिक्षण संस्था आहे. तेथील वातावरण शांत व सौंदर्ययुक्त आहे. प्रसिद्ध समाजवादी पुढारी श्री. अच्युतराव पटवर्धन या संस्थेच्या कृषिविद्यालयाचे संचालक आहेत. त्यांच्या संस्थेंत जाण्यासाठीं वरुणा नदी ओलांडावी लागते. त्यांची जागाहि छान आहे.

## संस्कृत विद्येचें माहेरघर

एके काळीं काशी संस्कृत विद्येचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध होतें. भारतांतील मोठमोठे पंडित आपलें पांडित्य दाखविण्यासाठीं काशीला येत आणि येथील पंडितांशीं वादविवाद करीत. धार्मिक बाबतींत फतवा देण्याचें कामहि येथील पंडित करीत. पण आतां संस्कृतचें तें महत्त्व उरलेलें नाहीं आणि काशीच्या धार्मिक फतव्यांनाहि कोणी फारशी किंमत देत नाहीं. तरीहि कांहीं जुने पंडित येथें सध्यां आहेत. श्री. राजेश्वर शास्त्री द्रवीड, श्री. खिस्तेशास्त्री ( महामहोपाध्याय ), श्री. फडके शास्त्री, श्री. गोपाल मिश्र, महामहोपाध्याय पंडित गोपीनाथ कविराज वगैरे मोठमोठे दिग्गज पंडित आजहि काशींत आहेत आणि शेंकडो विद्यार्थी संस्कृत शिकत आहेत. त्यांच्यापैकीं श्री. गोपीनाथ कविराज यांना मी भेटलों आणि संस्कृत अध्ययनाच्या सध्यांच्या स्थितीसंबंधीं त्यांच्याशीं चर्चा केली. ‘ आज ’ या हिंदी दैनिकाचे संपादक श्री. रा. र. खाडिलकर यांनाहि मी भेटलों. काशींतील लोक सकाळच्या वेळीं स्नानसंध्येंत गुंतलेले असल्यामुळें प्रातःकालीन दैनिक ते वाचूं शकत नाहींत आणि म्हणून काशीला सकाळचे दैनिक चालूं शकत नाहीं, ही त्यांनीं दिलेली माहिती मला मजेदार वाटली. ‘ आज ’ चे माजी संपादक कै. पराडकर यांनीं हिंदी पत्रकारसृष्टींत फार मोलाची कामगिरी केली होती. आजहि ‘आज’ सायंदैनिकाचें महत्त्व उत्तर प्रदेशांत पुष्कळ आहे. या दैनिकांत अनेक महाराष्ट्रीय मंडळी काम करीत असतात ही उल्लेखनीय गोष्ट आहे.

## अखेर थोडें खाण्यासंबंधीं

काशीचे लोक इतर क्षेत्रस्थ लोकांप्रमाणें पट्टीचे खाणारे आणि मादक पदार्थांना बंदी नसल्यामुळें पट्टीचे पिणारेहि ( अर्थात् भांग, हिला येथें ‘ विजया ’ असें सुंदर नांव मिळालेलें आहे, थंडाई वगैरे ) म्हणून प्रसिद्ध आहेत. उपवासाच्या दिवशीं तर पेढे बर्फी वगैरे मिठाईवरच येथील सुखवस्तु ताव मारतात. खव्याच्या मिठाईबद्दल जशी काशी प्रसिद्ध आहे तशीच ती बंगाली मिठाईबद्दलहि प्रसिद्ध आहे. कारण येथें बंगाली

लोकांची संख्या खूप मोठी आहे. कलकत्त्याच्या प्रसिद्ध ‘ जलयोग ’प्रमाणें येथेंहि ‘ जलयोग ’ नांवाचें लोकप्रिय उपहारगृह आहे. ‘ जलयोग ’ म्हणजे पाण्याच्या बरोबर जे कांहीं थोडें खावयाचें तें, हिंदी ‘ जलपान ’ प्रमाणें ! रसगुल्ले, गुलाबजामून, रसमलाई, मलाईचमचम, ॲटमबॉम वगैरे अनेक पदार्थ तेथें मिळतात. तेथील अस्वच्छतेकडे ( उत्तर भारतांतील सर्वसामान्य अस्वच्छतेच्या मानानें थोडी कमीच ! ) जरा कानाडोळा केलात कीं तुमचा आत्माराम अगदीं खूष होऊन जाईल !

● ● ● ●

# महागुजरातच्या वाटेवर : १

## सत्याग्रहानें पारडीची प्रसिद्धि

ऑक्टोबर चोवीस १९५५ ची रात्र. दहा वाजून गेले आहेत. बडोद्याला जाण्यासाठीं मी वलसाडच्या थर्डक्लास वेटिंगरूममध्यें बसलों आहें. उकाडा होत आहे. डोकीवर विजेचा पंखा फिरत असला तरी त्याचें अस्तित्वहि जाणवत नाहीं.

गाडीला बराच अवकाश आहे. यामुळें सहजच कागद आणि झरणी यांचें मीलन घडवून आणण्याची इच्छा झाली आणि मी लिहायला बसलों आहें. काल सायंकाळीं पॅसेंजरनें पारडीला आल्यापासून आतांपर्यंत पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींचा गुंता डोकींत अस्ताव्यस्तपणें पडलेला आहे. तो हलुवार हातानें सोडवावयाचा आहे.

पं. सातवळेकरांचा ' आनंदाश्रम ' पारडी स्टेशनपासून जवळजवळ दोन मैल दूर आहे. स्वाध्यायमंडळ तेथेंच आहे. स्थान मोठें रमणीय आहे. सभोंवतीं आंब्याचीं मोठमोठीं झाडें आहेत. छानशी बाग आहे. पूर्वीं या ठिकाणीं मिशनऱ्यांचा अड्डा होता. त्यांच्याकडून ही जागा पं. सातवळेकरांनीं विकत घेतली. किंमत भरपूर द्यावी लागली, पण गुजरातच्या धनिकांनीं चांगलें साहाय्य केलें. पं. सातवळेकर आर्यसमाजी, वेदाभिमानी. हिंदूंनीं वेदांची शिकवण पाळली नाहीं म्हणून त्यांची अवनति झाली, त्या गर्तेंतून वर यावयाचें असेल तर पुन्हां वेदांनाच शरण गेलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. तें कांहींहि असलें तरी सातवळेकर पंडितजीबद्दल येथील लोकांमध्यें विलक्षण आदर आहे आणि त्यांचें म्हणजेच स्वाध्यायमंडळाचें काम व्यवस्थित चालू आहे.

येथून चार मासिकें निघतात. पुरुषार्थ ( मराठी ), वैदिकधर्म ( हिंदी ) ' वेदसंदेश ' ( गुजराती ). यांचा खप कांहीं फारसा नाहीं. पण वैदिक

ज्ञानाचा प्रसार जनतेंत झाला पाहिजे या तळमळीनें तीं चालविण्यांत येत असल्यामुळें रुपये–आणे–पैंत त्यांच्या यशाचें मोजमाप करणें बरोबर होणार नाहीं. संस्कृत भाषेच्या परीक्षाहि येथून चालतात आणि दरसाल बारा हजारापर्यंत विद्यार्थी या परीक्षांना बसतात. अर्थात् या परीक्षा तोट्यांत चालत नाहींत हें सांगणें नलगे.

येथील इमारत ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं बांधलेली असल्यामुळें पाश्चात्य सोयी मात्र छान आहेत. विशेषतः भरपूर खोल्या, संडास, बाथरूम, व्हरांडा वगैरे गोष्टी कशा प्रशस्त आहेत. ज्याठिकाणीं पूर्वीं किरीस्तावांचें चर्च होतें त्याच ठिकाणीं मूळच्या चर्चच्या पायावर सातवळेकरांनीं वेदमंदिर उभारलें आहे. तें लहानसेंच असलें तरी टुमदार आहे. वेदांच्या किंवा सत्य अहिंसेच्या मूर्ती तयार करून त्यांची पूजा न करतां येथें एका सुंदर कपाटांत वेद, कुराण, बायबल, अवेस्ता वगैरे ग्रंथ ठेवलेले आहेत. दर शनिवारीं तेथें सामुदायिक प्रार्थना आणि पंडितजींचें प्रवचन होतें. गांवांतील बरेच लोक या कार्यक्रमाला हजर असतात.

## गुजरात्यांचे नवे कारखाने

इथून जवळच गुजराती धनिकांनीं चालविलेला 'अतुल प्रॉडक्टस्'चा प्रचंड कारखाना आहे. त्यांत नाना प्रकारचे रंग तयार करतात. पांच सहा कोटी रुपये येथें आतांपर्यंत खर्च झाले आहेत. 'इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज'चाहि रंगाचा कारखाना येथें सुरू होणार आहे. मुंबईवर मराठी लोकांनीं अधिकार सांगायला सुरवात केल्यापासून तेथील कारखाने गुजरातेंत हलवावेत आणि नवे कारखाने गुजरातेंतच उभारावेत अशी कल्पना गुर्जर धनिकांच्या डोक्यांत घोळूं लागली असेल तर त्याबद्दल त्यांना दोष देतां येणार नाहीं.

या भागांत पारडी नांवाचीं गांवें बरींच आहेत. त्यांच्यांत घोटाळा होऊं नये म्हणून या पारडीला 'किल्ला पारडी' असें नांव देण्यांत आलेलें आहे, कारण पारडी गांवांत एक किल्ला आहे. वस्तुतः त्याला किल्ला म्हणण्यापेक्षां मोठा वाडाच म्हटलें पाहिजे. त्याच्या भिंती अगदींच सामान्य व फुसक्या दिसतात. पण 'एरंडोऽपि द्रुमायते!' जिथें मोठा

किल्ला नसेल तेथें एखाद्या वाड्याला किल्ला म्हणण्यास काय हरकत आहे? पारडी गांवांतील घरें मात्र छान आहेत. मुंबईंत मिळविलेला पैसा इथें असा सत्कारणीं लागला आहे. पण घरें आलीशान असूनहि गांवाला शाळा नाहीं, कारण गांवांतील कर्तबगार मंडळी बहुधा मुंबईंतच असतात. गलिच्छपणा आपल्या देशाच्या पांचवीला पुजलेला आहे. तेव्हां पारडींतील घाणीबद्दल तक्रार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तरी पण अनेक मराठी शहरांपेक्षां हें छोटेंसें शहर अधिक स्वच्छ आहे असें मला वाटलें. गांवाबाहेरील तळें जरा जास्त गलिच्छ आहे. आणि त्याचा पृष्ठभाग कमळांच्या पानांनीं व्यापून टाकला आहे हें खरें, पण हिंदुस्थानांतलें कोणतें तळें याला अपवाद आहे?

पारडी गांवांतला किल्ला जरी खेळण्यांतल्या किल्ल्यासारखा असला तरी येथून जवळच एक खराखुरा किल्ला आहे. त्याला पारनेराचा किल्ला म्हणतात. सुमारें पर्वतीइतका उंच आणि माथ्यावर तेवढेंच क्षेत्रफळ असलेला हा किल्ला सिंहगड, रायगड, प्रतापगड यांच्या तुलनेनें जरी इटुकला वाटला तरी त्याची शान कांहीं और आहे हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. हा किल्ला पेशव्यांनीं बांधलेला आहे असें म्हणतात. शिवाजी महाराज इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या सुरतेला लुटण्यासाठीं गेले तेव्हां त्यांचा मुक्काम या किल्ल्यावर होता असेंहि म्हणतात. या भागांतील बहुतेक किल्ले मराठ्यांनींच बांधलेले असावेत असें दिसतें. अर्थात् कांहीं मुसलमानांनींहि बांधलेले असतीलच. उद्यां अष्टमीला तेथें मोठी जत्रा भरणार आहे. मीं ती जत्रा पहायला रहावें आणि नाचगान करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या तोंडून पेशव्यांच्या पराक्रमाचे पोवाडे (गुजरातींत) ऐकावेत असा आग्रह मला करण्यांत आला. पण उद्यां सकाळीं बडोद्यास पोंचत आहे असें कळवून ठेवलेलें असल्यामुळें मला जाणेंच भाग आहे. शिवाय उद्यांची जत्रा कशी असेल याचा अंदाज आज पाहिलेल्या दृश्यांवरूनहि करतां येण्यासारखा आहे. दुकानांची मांडामांड सुरू आहे. सोडालेमनच्या बाटल्या आल्या आहेत. करंगळीएवढ्या जाडीच्या उसाच्या गाड्या येऊन पडल्या आहेत. त्यांचा रस हे लोक पिणार! भिकारी नि महारोगी यांनीं तर सर्वांच्या

आधीं येऊन ठाण मांडलें आहे. महारोगी आपापसांत गुजराती बोलत होते. पण त्यांचें रंगरूप आपल्याला परिचित असलेल्या गुजरात्यांसारखें नव्हतें. ते बहुधा रानीपरज-काळीपरज जातीचे गरीब आदिवासी असावेत. एकूण तयारी जय्यत दिसली. पण तीच बाटली नि तीच दारू !

किल्ला पर्वतीइतकाच उंच असला तरी पर्वतीसारख्या ऐसपैस पायऱ्या नसल्यामुळें चढतांना थोडें दमल्यासारखें वाटलें. लोकांनींच आपल्या सोयीसाठीं कच्च्या दगडमातीच्या पायऱ्या तयार केल्या आहेत. पण त्या अगदींच जुजबी आहेत. खालीं उतरतांना तर वाहणा हातांत काढून घेऊनच उतरावें लागतें.

किल्ल्यावरून आजूबाजूचें दृश्य फारच सुरेख दिसतें. सागाच्या वृक्षांचें हिरवेंगार बन खालपासून वरपर्यंत चढत आलेलें आहे. थोड्याच अंतरावर दमणचा समुद्र दिसतो आणि पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या दुर्दैवी प्रदेशाच्या आठवणीनें उगीच मन अस्वस्थ होतें. ज्या 'पार' नदीमुळें 'पारडी' व 'पारनेरा' (पार नदीचें पाणी) हीं नांवें पडलीं ती चिमुकली पण सततवाहिनी नदी नकाशावर काढलेल्या वांकड्या तिकड्या रेघेसारखी दिसते. भाताचीं पिकून पिवळीं झालेलीं शेतें गालिच्यासारखीं दिसत नसलीं तरी मोहक वाटतात. 'अतुल प्रॉडक्टस्‌चा' अवाढव्य विस्तार डोळ्यांत भरतो. एका बाजूला ऐसपैस पसरलेलें बलसाड दिसतें, तर दुसरीकडे छोटेसें पारडी शहर. तरी पण डोळे पुनः समुद्रावरच जाऊन खिळतात आणि मावळतीच्या उन्हांत चमचमणारें त्याचें पाणी सारखें पहातच रहावें असें वाटतें.

पण नुसतें समुद्राचें पाणी पाहून भागणार नाहीं. किल्लाहि बघितलाच पाहिजे. आतां फार थोडा तट शिल्लक राहिला आहे. एखादा बुरूज थोड्याफार तटाच्या भिंतींना सावरून अंग चोरल्यागत उभा आहे. पण सगळे अगदीं लुटपुटीच्या लढाईसाठीं बांधल्यासारखें वाटतें. छोटासा बुरूज, इवलेसे तट अन् लहानसे दरवाजे. 'शिवाजी महाराज घोड्यावर बसून या दारांतून पळून गेले' (कुणाच्या हातावर तुरी देऊन कोण जाणे) असें जेव्हां वाटाड्या सांगूं लागला तेव्हां त्याची कींव करावीशी वाटली.

त्या दारांतून एकटे शिवाजी महाराजहि जाऊं शकले नसते. मग घोड्यावर बसून जाण्याची गोष्टच दूर. वाटाड्या सांगत होता, 'हा इथं मारुती दिसतो ना, त्याच्या खालीं भुयारांत जाण्याची वाट होती. पण ती आतां बुजवून टाकली आहे. हें भुयार पारडी गांवांतल्या किल्ल्यापर्यंत गेलेलं आहे. पण तिथंहि त्याचं तोंड बुजवून टाकलंय!' म्हणजे खरें खोटें ठरविण्याची कटकटच मिटली.

किल्ल्यावर देवीचें एक भिकार देऊळ आहे. पण भिकारडें का असेना, पण देऊळ आहे, याचेंच त्या वाटाड्याला कौतुक वाटत होतें. तें देऊळ अलीकडेच कुणी शेठजींनीं बांधलेलें आहे. देवीच्या मूर्ती नसून तीन गोल दगड आहेत व त्यांना शेंदूर फासून चांदीचे डोळे लावले आहेत. एका अंधाऱ्या खडकांतहि एक देवी आहे. बस्स एवढेंच. दुपारीं दोनला निघून साडेचारला आश्रमांत परत आलों. धमणीचे बैल कमी सुस्त असते तर वेळ आणखी कमी लागला असता. संध्याकाळीं गांवांतून चक्कर मारून आलों आणि जेवण करून एस्. टी. च्या बसनें निघालों बलसाडला यायला. कारण रात्रींच्या या फास्ट गाड्या पारडीला थांबत नाहींत. एस्. टी. ची बस चांगली कोरी होती. 'सौजन्य हें आमचें कर्तव्य आणि आपला हक्क आहे,' 'आपल्या गाडींत घाण करू नका,' 'गाडींत थुंकण्याची सक्त मनाई आहे' वगैरे बोधवचनें या गाडींत लिहिलेलीं नव्हतीं. बहुधा येथील जनतेला त्यांची जरूरी नसावी.

## प्रांतरचनेंत लोकांना आस्था नाहीं

या भागांतले एक भागास जमातीचे आमदार नुकतेच भेटले. राज्य-पुनर्रचना मंडळाच्या अहवालाबाबत तुमचें काय मत आहे, असें त्यांना विचारलें असतां ते म्हणाले, 'त्यांत आम्हांला कांहीं कळत नाहीं. आमचे पुढारी जे ठरवतील तें आम्हांला मान्य. आमच्या गांवांत पाण्याची सोय आहे कीं नाहीं, शेतीसाठीं खतें वगैरे मिळतात कीं नाहीं, शिक्षणाचा प्रसार होतो कीं नाहीं वगैरे गोष्टींतच मी लक्ष घालतों. अन् खरं सांगूं तुम्हांला? आमच्या गुजरातेंत सामान्य माणसाला या राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाविषयीं मुळींच आस्था नाहीं. इतके दिवस आपण महाराष्ट्राबरोबर प्रेमानें राहिलों

तर आतां न रहाण्यासारखं काय कारण घडलंय तें त्यांना कळत नाहीं. राज्य कोण करतंय याचं त्यांना महत्त्व नाहीं, त्यांच्या अडचणी दूर झाल्या म्हणजे झालं.'

## कूळकायद्यानें सर्वांचें असमाधान

कूळ कायद्याच्या बाबतींत लोकांचें मत काय हें विचारतां ते म्हणाले, 'प्रारंभींचा कायद्याचा आराखडा बरा होता. पण नंतर यांत पाणी घालून इतका पातळ करण्यांत आला कीं कुणाचंच समाधान होणार नाहीं त्यानं. पण सध्यां तरी तो आहे तसाच चालवून पाहिला पाहिजे.'

रात्रीं १२ वाजतां मुंबई–अहमदाबाद जनता एक्स्प्रेस आली. गर्दी मुळींच नव्हती, पण मध्यरात्र झालेली असल्यामुळें लोकांनीं झोपून सगळ्या जागा अडवून टाकल्या होत्या. त्यांना उठवणेंहि जिवावर आलें. एका बाकावर थोडीशी जागा रिकामी मिळाली. त्याच्यावर आसन ठोकलें आणि हळूंहळूं हातपाय पसरायला सुरुवात केली. मला गाडींत झोप येतच नाहीं–मग फर्स्टक्लासमधून प्रवास असो कीं एअरकंडिशन्ड डब्यांतून !–तेव्हां पाठीला ताण पडूं नये एवढीच धडपड करतों मी.

या जनतेचे डबे मात्र फारच छान आहेत. स्वच्छता अगदीं दृष्ट लागण्यासारखी आहे. एकूण गुजरातेंत महाराष्ट्रापेक्षां स्वच्छतेचें प्रमाण जास्त आहे कीं काय अशी शंका येते. फुकटे प्रवासीहि फारसे दिसले नाहींत.

इतक्या पहांटे अपरिचित ठिकाणीं जाणें शहाणपणाचें नाहीं असा विचार करून मी बडोद्याच्या वेटींगरूममध्यें लेखन करीत बसलों आहें. गायकवाडांच्या जमान्यांत मी येथें आलों होतों १९४६ सालीं. पण त्या वेळचें कांहीं आठवत नाहीं मला. कदाचित् मराठी पोलिसांची शान त्या वेळीं पहावयास मिळाली असेल. पण आजहि हें स्टेशन कांहीं कमी आकर्षक नाहीं. मराठी लोक जरा कमी झाले असावेत, पण तसेंहि म्हणणें बरोबर होणार नाहीं. अशा अवेळीं इथले मराठी लोक कशाला येतील? जे कोणी या गाडीनें आले असतील ते आपल्या घरीं निघून गेले असतील. मला मात्र दिवस उजाडेपर्यंत इथें बसायला पाहिजे! हो बसलेंच पाहिजे!!

● ● ● ●

# बडोद्यांतील दोन दिवस : १०

ग्वाल्हेर, इन्दूर, बडोदा, झांशी वगैरे महाराष्ट्राबाहेरील शहरांबद्दल मराठी लोकांना एक प्रकारचें विशेष आकर्षण वाटत आलेलें आहे. हीं शहरें वस्तुतः महाराष्ट्रांत नाहींत अथवा महाराष्ट्राचींहि नाहींत. परंतु आपली अशी एक समजूत होऊन बसलेली आहे कीं तीं मराठीच शहरें आहेत. यामुळें तेथील लोक, त्यांच्या संस्था, त्यांची भाषा यांबद्दल आपल्याला नेहमींच आपलेपणा व जिव्हाळा वाटत आलेला आहे. होय, भाषेबद्दलहि ! कांहीं महाराष्ट्रीय लोक बडोद्याच्या गुजराती मिश्रित घेडगुजरी भाषेला हंसत असतीलहि, नाहीं असें नाहीं. कांहीं पुणेरी लोकांनीं ग्वाल्हेर–इंदूरच्या हिंदी प्रभावित मराठीची टिंगलहि केली असेल, परंतु सर्वसामान्य मराठी माणसाला (त्यांत माझाहि समावेश होतो) त्यांच्या त्या भाषेचेंहि कौतुक वाटतें. इतक्या दूर राहूनहि त्यांनीं आपली मायबोली जतन करून ठेविली आहे याचा अभिमान वाटतो. महाराष्ट्राचें प्रतिनिधित्व जणूं तेथील लोक करीत आहेत अशी आपली भावना असते.

आणि या भावनेनेंच मी नडियादच्या गुजराती साहित्य संमेलनाला जातांना (ऑक्टोबर १९५५) दोन दिवस हाताशीं ठेवून बडोद्याला उतरलों. आणि मराठी छंदशास्त्राचे नामवंत विद्वान् डॉ. ना. ग. जोशी यांच्याबरोबर दोन दिवस खूप मजेंत भटकलों. सुमारें दहा वर्षांपूर्वीं आचार्य काकासाहेब कालेलकर तेथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असतांना मी सहकुटुंब बडोद्याला गेलों होतों. त्या वेळीं आम्हीं उभयतां एका गुर्जर कुटुंबांत उतरलों होतों. परंतु त्या वेळचें बडोद्याचें एकूण वातावरणच इतकें मराठीमय होतें कीं आपण महाराष्ट्राबाहेरील एखाद्या शहरांत वावरत आहोंत असा भासहि होत नव्हता. खानदानी मराठमोळ्याची एक मोहक

छाप साऱ्या राज्यकारभारावर आणि शहराच्या व्यवस्थेवर पडलेली अनुभवाला येत होती. याच्या उलट या खेपेस मराठी कुटुंबांत राहून मराठी माणसांना भेटून आणि मराठींत संभाषण-सुख लुटूनहि क्षणोक्षणीं आपण गुजरातेंत आहोंत ही गोष्ट मनांतून जात नव्हती. पूर्वीचें सारें वातावरण पार बदलून गेलें होतें. मराठी माणसांतील तो खानदानी रुबाब कुठेंच दिसत नव्हता. उलट आज आपण इथें आहोंत, उद्यां इथें राहूंच असें नाहीं, अशा प्रकारची अनिश्चित मनोवृत्ति मला तिथें दिसली. जे लोक पूर्वीं गुजरात्यांशीं अरेरावीनें व फटकून वागत होते तेच आतां मराठीचा आग्रह सोडून त्यांच्याशीं सर्व प्रकारें मिळतें घेण्याचा प्रयत्न करीत आहेत असें मला वाटलें. अर्थात् यांत दुःख करण्यासारखें कांहींच नव्हतें. लोकशाहीच्या जमान्यांत लोकांच्या तंत्रानेंच सर्व कारभार चालला पाहिजे असें आपण म्हणतों. मग ती गोष्ट उल्लिखित शहरांच्या बाबतींतच घडून येऊं नये असें आपल्याला कसें म्हणतां येईल ?

## सुंदर इमारतींचें शहर

एके काळीं मराठ्यांनीं गुजरातवर राज्य केलें होतें त्याचें स्मारक म्हणून बडोदें शहराकडे पाहाण्यास हरकत नाहीं.

वाईट गोष्टी भूतकाळांत जमा झाल्या असल्या तरी चांगल्या गोष्टी मात्र अजूनहि अभिमानानें मस्तक वर करून उभ्या आहेत. त्यापैकीं सुंदर इमारती व प्रेक्षणीय स्थळें ह्या मुख्य आहेत. बडोद्याची रचना मोठी सुरेख असून तेथें अनेक प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. ज्या सुरसागर तलावाच्या कांठीं मी उतरलों होतों त्याच्या कडेला असलेली न्यायमंदिराची इमारत मोठी शानदार वाटते. तिच्यासाठीं वापरलेल्या विटा परदेशांतून आण-लेल्या असून पौर्वात्य व पाश्चात्य स्थापत्यकलेचें सुंदर मिश्रण त्या इमारतींत झालेलें आहे. तिच्या समोरील कारंजें सुरू असलें म्हणजे इमारतीची शोभा कांहीं औरच दिसते. पूर्वींचा भपका व टापटीप आतां तेथें आढळत नाहीं. तरीहि मला ती इमारत फार आवडली. रात्रींच्या वेळीं सुरसागर तलावाच्या कांठावरील इमारतींतील दिवे लागले म्हणजे त्यांचीं प्रतिबिंबें तलावांत पडतात आणि मोठें विलोभनीय दृश्य दिसूं लागतें.

याखेरीज बडोदा विद्यापीठाची इमारत, भाजीमार्केट (मंडई) ची इमारत वगैरे इतर इमारतीहि मोठ्या प्रेक्षणीय आहेत. सरकारी राजवाडे व इतर इमारती भरपूर असल्यामुळें गुजरातची राजधानी येथेंच करावी असा कांहीं मंडळींचा प्रचार चालू होता.

**भव्य राजवाडे**

बडोद्यांतील राजवाडे वगैरे सरकारी मालकीच्या (आणि आतां राज्याच्या खासगी मालकीच्या) गोष्टी पहाण्याकडे लोकांचा कल असल्यास आश्चर्य नाहीं.

मात्र त्यासाठीं आधीं परवाना घ्यावा लागतो. हे राजवाडे पाहाण्याची वेळ सकाळीं ९ ते ११ व दुपारीं ३ ते ४॥ असते. या अवधींत लक्ष्मी-विलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, सोन्याची बगी, चांदी-सोन्याच्या तोफा व चांदी-सोन्याच्या अंबाऱ्या या गोष्टी पाहावयाच्या असतात. अर्थात् एकदां घेतलेला पास चार दिवस पुरतो. यामुळें दूरदूर असलेले हे राजवाडे निवांतपणें पाहून घेतां येतात. मजजवळ वेळ थोडा असल्यामुळें त्यापैकीं सर्वोत्कृष्ट समजला जाणारा Indosaracenic पद्धतीचा, लक्ष्मीविलास राजवाडाच तेवढा मीं पाहून घेतला. हा वाडा रुबाबदार असून तेथील प्रचंड तैलचित्रें, पुतळे व दरबार हॉल या गोष्टी विशेष प्रेक्षणीय आहेत. माझ्या मनावर छाप पडली ती मात्र राजवाड्याच्या चौकांत ठेवलेल्या एका ब्रॉंझच्या शिकाऱ्याच्या पुतळ्याची. हा छोटासा पुतळा परदेशांतून आणलेला असून त्यांतील नग्न रानटी शिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव आणि त्याच्या शरीराचा पीळ हीं मनावर ठसून जातात. त्याखेरीज खूप मोठ मोठे ब्रॉंझचे पुतळे आंत वाड्यामध्यें आहेत. या वाड्यासभोंवतीं खूप मोठी बाग असून तिचें आवार खूप मोठें आहे. यामुळें वाड्याला निसर्गाची सुंदर पार्श्वभूमि लाभलेली आहे.

**कीर्ति मंदिर**

माणूस नांवासाठीं अन् कीर्तीसाठीं किती धडपडतो हें पाहिलें कीं अनेकदां मला हंसूं येतें. अर्थात् त्यांतून कोणी सुटला आहे असें मात्र मला कधीं वाटलें नाहीं.

परंतु ज्यांच्याजवळ खरी योग्यता नसते पण पैसा असतो ते लोक पैशाच्या जोरावर आपलें नांव अजरामर करण्याचा जो प्रयत्न करीत असतात तो पाहिला कीं अनेकदां हंसावें कीं रडावें तेंच कळत नाहीं. विशेषतः राजेरजवाड्यांना या मार्गाबद्दल जास्त आकर्षण असतें असें दिसून येतें. बडोद्याच्या राजघराण्यांतील मंडळींची कीर्ति कायम रहावी यासाठीं तेथें एक कीर्तिमंदिर बांधण्यांत आलेलें आहे. परंतु मूळ कल्पकाचा उद्देश कांहीं सफल झालेला दिसत नाहीं. कारण तेथील राजघराण्यांतील लोकांच्या तसबिरींकडे फारच थोड्या लोकांचें लक्ष जातें. तेथें जाणारे बहुतेक सर्व लोक वरच्या मजल्यावरील भिंतीवर सुप्रसिद्ध बंगाली चित्रकार श्री. नंदलाल वसु ( बोस ) यांनीं काढलेलीं चित्रें पाहाण्याकारितांच जात असतात; आणि सुसंस्कृत अभिरुचीचे प्रेक्षक तीं चित्रें पाहून अत्यंत आनंदित होतात यांत शंका नाहीं. अशा प्रकारें ती इमारत गायकवाडांचें कीर्तिमंदिर न बनतां नंदलाल बाबूंचें कीर्तिमंदिर बनलेली आहे.

स्व. रवीन्द्रनाथ ठाकुर यांच्या 'नटीर पूजा' या कवितेचें नंदबाबूंनीं केलेलें चित्रण फार सुंदर आहे. मीराबाईचीं चित्रेंहि छान आहेत. पण मला स्वतःला सर्वांत विशेष आवडलेलें चित्र म्हणजे गांधारी व धृतराष्ट्र यांचें. डोळ्यांना पट्टी बांधलेली गांधारी जितकी बोलकी वाटते त्यापेक्षां पाठमोऱ्या आकृतीचा बलिष्ठ धृतराष्ट्र जास्त बोलका वाटतो. त्याच्या आकृतींतील रेषान्‌रेषा जणूं त्याच्या कुटिल स्वभावाचें प्रकटीकरण करीत असते, या अंधानें खरोखरीच लोखंडी भीमाचा भुगा करून टाकला असेल! याविषयीं मनांत शंकाहि रहात नाहीं. हें चित्र पाहिल्यानंतर इतर सर्व कांहीं विसरून माणूस त्याचाच विचार घोळवीत परत फिरतो.

## विस्तीर्ण सार्वजनिक उद्यान

येथील सार्वजनिक उद्यान विश्वामित्री नदीच्या कांठीं सुमारें दीडशें एकरांत पसरलेलें असून त्यांत येथील प्रसिद्ध पदार्थ संग्रहालय, पशु-संग्रहालय आणि चित्रसंग्रहालय हीं आहेत.

पशु संग्रहालयांतील वाघच मुख्यतः पाहाण्यासारखे आहेत. येथें सिंह नाहीं. एक सिंहीण सारखी ओरडत आणि लोळत होती. तेथील रखवाल-

दाराला आम्ही विचारलें, 'कायरे, ही असं कां करते आहे? तिला कांहीं आजाराबिजार झालाय कीं काय?' त्यावर तो हंसून म्हणाला, 'नाहीं साहेब, ती आतां जवानींत आलीय. तिला मित्र हवाय. पण इथं सिंहच नाहीं. यामुळें ती अशी बेचैन झालीय.' तिची ती स्थिति पाहून आम्हांला तिची कींव आली!

येथील पदार्थ संग्रहालय हिंदुस्तानांतील एक अत्यंत उत्कृष्ट पदार्थ संग्रहालय समजलें जातें. भारतीय कला व संस्कृति, लोकजीवन यांचें दर्शन येथें उत्कृष्ट घडतें. पशुपक्ष्यांचीं पेंढे भरलेलीं शरीरें येथें आहेत. संगमरवरी व धातूचे पुतळे आहेत आणि चित्रें पाहातां पाहातां तर मन अगदीं थकून जातें. तेथील भडक रंगांतील रोरिकची चित्रें मीं दहा वर्षांपूर्वीं पाहिलीं होतीं तीं माझ्या स्मृतींत अजून ताजीं होतीं तीं पुनः पाहून घेतलीं. इतर भारतीय व पाश्चात्य नव्या-जुन्या चित्रकारांचीं चित्रेंहि सुंदर आहेत.

## अजस्र तिमिंगिलाचा सांगाडा

या खेपेस एक नवीन चीज पाहावयास मिळाली. ती म्हणजे एक अजस्र जलचराचा सांगाडा.

याचें भारतीय नांव तिमिंगिल असें असून इंग्रजींत त्याला व्हेक असें म्हणतात. हा प्राणी मासा नसून तो सस्तन प्राणी आहे. हा दुर्लभ व आश्चर्यकारक प्राणी २८ नोव्हेंबर १९५४ रोजीं वडोद्याजवळील महीसागर नदीच्या कांठीं पडलेला आढळला. तो बहुधा पुराच्या प्रवाहांत वर आला असावा आणि मग त्याला परत जातां आलें नसावें. याची एकुण लांबी ७१ फूट २ इंच आहे. म्युझियमच्या तळघरांत हा सांगाडा ठेवलेला असून त्यानें संबंध तळघर व्यापलेलें आहे. हा सांगाडा पाहाण्याची वेळ रोज फक्त दुपारीं ३ ते ४ पर्यंतच असते. (शनिवारीं दुपारीं २ ते ३) यामुळें अनेकांना त्याची माहितीहि होत नाहीं.

हिंदुस्थानांत एवढा मोठा सांगाडा अन्यत्र कोठेंहि नाहीं. हा सांगाडा जमिनीवर तसाच ठेवलेला नसून लहान पितळी खांबावर अधांतरीं ठेवलेला आहे. त्याचें तोंडच एवढें मोठें आहे कीं त्यासाठीं सात खांब अडलेले आहेत. हें तोंड सुसरीच्या जबड्यासारखें दिसतें. पण त्यांत दांत

दिसत नाहींत. त्याच्या छातीला १४ फांसळ्या आहेत. तिमिंगिलाचा रंग अस्मानी होता. हाडांचा रंग मात्र हस्तिदंतासारखा भुरकट आहे.

**आणि तें ग्रंथालय!**

बडोद्याच्या विलीनीकरणानें जर कशाची सर्वांत जास्त हानि झाली असेल तर तेथील मध्यवर्ती ग्रंथालयाची.

इतकें अद्ययावत् व मोठें ग्रंथालय मुंबई इलाख्यांत दुसरें नाहीं असें म्हणतात. पण आतां त्याचें तें महत्त्व उरलें नाहीं. त्याला जिल्हा ग्रंथालयाचें दुय्यम स्थान प्राप्त झालेलें आहे. स्वतःच्या हातानें पुस्तकें निवडण्याची व वर्गणीशिवाय (जबाबदार माणसाच्या शिफारशीनंतर) घरीं पुस्तकें नेण्याची येथील पद्धत फार चांगली आहे. खालच्या मजल्यावरील पुस्तकांच्या जागेंत अंधार पडूं नये म्हणून वरच्या मजल्यावर घालण्यांत आलेली कांचेची फरशी वगैरे गोष्टीहि आकर्षक आहेत.

येथील केमिकल वर्क्स, कलाभुवन, वगैरे गोष्टीहि पाहाण्यासारख्या आहेत. पण आतां तशा गोष्टी इतरत्रहि निर्माण झालेल्या असल्यामुळें त्यांचें पूर्वींचें महत्त्व आतां उरलेलें नाहीं. परंतु ज्या गायकवाडांनीं या शहराला इतकें भव्य व रुबाबदार स्वरूप आणून दिलें त्यांची आठवण मात्र बडोदें सोडतांना झाल्याशिवाय रहात नाहीं!

●●●●

# अहमदाबाद : ११

## गुजरातचें पाटनगर–अहमदाबाद

लौकरच अस्तित्वांत येणाऱ्या महागुजरातची राजधानी बडोद्याला रहावी कीं अहमदाबादला याविषयीं गुर्जरबंधूंमध्यें त्या वेळीं चर्चा चालू होती. याचें कारण असें कीं राजधानीला आवश्यक असणाऱ्या इमारती बडोद्याला भरपूर आहेत. त्या मुळें राजधानी बनल्याबरोबर नवीन इमारतीसाठीं पैसा खर्च करावा लागणार नव्हता. परंतु सर्वसामान्य जनतेच्या मनांत मात्र अहमदाबाद किंवा अमदाबाद हेंच गुजरातचें पाटनगर (राजधानी) म्हणून शेंकडो वर्षांपासून वसलेलें आहे. कारण पूर्वीच्या काळीं गुजरातची राजधानी येथेंच होती. आधुनिक काळीं कापडाच्या गिरण्या व व्यापार यामुळें अहमदाबादचें नांव लोकांच्या तोंडीं झालेलें असलें तरी प्रेक्षणीय स्थळांच्या दृष्टीनें तेथील ऐतिहासिक वास्तूंकडेच आपल्याला जावें लागतें. येथें शिल्पशास्त्राचे असे कित्येक अद्‌भुत नमुने आहेत कीं ज्यांच्या तोडीच्या वस्तू इतरत्र पहावयासहि मिळणार नाहींत. हेंच या शहराचें खरें वैभव! अेड्‌विन ऑर्नाल्डनें या शहरांतील स्थापत्याचें वर्णन ‘जगांतील सर्वांत सुंदर लहान इमारतींचें शहर’ (दि फायनेस्ट लिटल बिल्डिंग्ज इन् दि वर्ल्ड) असें केलें आहे. या इमारती आजकालच्या नसून गेलीं चारपांचशें वर्षें येथें डौलानें उभ्या आहेत. सम्राट् अकबरशहाच्या काळीं या शहरांत एक हजार उत्कृष्ट मशिदी होत्या असें अबुलफजलनें लिहून ठेवलें आहे. त्या काळीं या शहराचें वैभव किती असेल याची कल्पनाच केलेली बरी. उत्तमोत्तम इमारती आणि मनोहर बागबगीचे यांनीं शृंगारलेलें हें शहर शहाजहाननें आग्रा–दिल्लीच्या

इमारती बांधण्यापूर्वी म्हणजे सतराव्या शतकापूर्वी हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ नगर होतें असें इतिहास सांगतो. पूर्वी या शहराचीं नांवें ‘ आशावल ’ आणि ‘ कर्णावती ’ अशीं होतीं. इ. स. १४११ सालीं गुजरातचा स्वतंत्र सुलतान अहमद शाह यानें या नव्या शहराचा पाया घातला. तेव्हांपासून त्याला अहमदाबाद हें नांव पडलें. हा सुलतान स्वतः एक महात्मा होता. यामुळें अजूनहि त्याचें पीर म्हणून स्मरण करण्यांत येतें. तेव्हांपासून या शहराचें वैभव सतत वाढतच होतें. आज ज्याप्रमाणें जगांतील सगळ्या वस्तू मुंबईत मिळतात त्याप्रमाणें एके काळीं अहमदाबादमध्यें जगांतील एकूण एक वस्तू मिळत असत आणि सर्व जातीजमातीचे व देशाचे लोक येथें रहात असत, असें अबुलफजलनें लिहून ठेवलें आहे. सर टॉमस रो यानेंहि इ. स. १६१५ सालीं असें लिहून ठेवलें आहे कीं, ‘ अहमदाबाद हें लंडनइतकेंच मोठें शहर आहे. ’ शहाजहाननें आपली सुंदर राणी मुमताजमहल हिच्या सहवासांत आपल्या लग्नानंतरचीं पाहिलीं पांच वर्षे या शहरांत विलासांत घालविलीं होतीं. यावरून या शहराचें आकर्षण किती मोठें असेल याची कल्पना येते. या शहराची लोकसंख्या एके काळीं आठ लाख ( कांहींच्या मते २० लाख ) होती असेंहि इतिहासकार सांगतात.

## मशिदींचें व कलाकुसरीचें आगर

अहमदाबादमध्यें पहावयाची मुख्य वस्तु म्हणजे वेगवेगळ्या मशिदी इतक्या तऱ्हेतऱ्हेच्या मशिदी, कलाकुसर आणि भव्यता यांचा इतक्या मोठ्या प्रमाणावरील संगम क्वचितच पहावयास मिळतो. अहमदाबादच्या बहुतेक मशिदीचे मनोरे इ. स. १८१९ च्या धरणीकंपामध्यें कोसळून खालीं पडले. पण जे मनोरे सध्यां शिल्लक आहेत तेहि अद्‌भुत आणि प्रेक्षणीय आहेत. या मशिदींचें स्थापत्य हिंदु-मुस्लीम संस्कृतीच्या मीलनाचें द्योतक आहे. कारण मशिदी जरी मुस्लिम राज्यकर्त्यांनीं बांधविलेल्या असल्या तरी कारागीर हिंदूच होते. अर्थात् ही गोष्ट भारतांतील सर्वच मुस्लिम शिल्पाबद्दल म्हणतां येईल. परंतु अहमदाबादेंतील मशिदींमध्यें हिंदु स्थापत्याची छाप विशेष स्पष्ट दिसून येते. कांहीं मशिदींमध्यें हिंदु व जैन मंदिरांचे खांब वगैरे अवशेषहि जसेच्या तसे वापरलेले येथें आढळून येतात.

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........



## हिंदु-मुस्लिम बांधकामाचा संगम


अहमदाबादची जुम्मा ( जामी ) मशीद ही भारतांतील मोठ्यांतमोठ्या मशिदींपैकीं एक समजली जाते. या मशिदींत हिंदु मुस्लीम स्थापत्याचा सुरेख संगम झालेला आहे. आंतील बांधणी मुख्यतः हिंदु पद्धतीची असून मुख्य दरवाजासमोरील खांबांवर हिंदु तोरण शोभेसाठीं कोरलेलें आहे. यामुळें त्याला देवळाची शान आलेली आहे. मशिदीचें आवार ३८८ फूट ९ इंच लांब व २४६ फूट ८ इंच रुंद आहे. मशिदीच्या खुल्या चौकाचें क्षेत्रफळच मुळीं ८७,०९५ चौरसफूट आहे. मशिदींत एकूण २५६ खांब असून ७५ मोठे चौकोनी खांब आहेत. ही मशीद पहिला सुलतान अहमदशाह (इ. स. १४११ ते १४४२) यानें १४२३ सालीं बांधली. याचे दोन्ही मनोरे 'हलते मनोरे' म्हणून साऱ्या आशियांत प्रख्यात होते. पण १८१९ च्या धरणीकंपांत त्यांचा वरील भाग पडून गेला. जहांगीर बादशहाला अहमदाबाद शहर विशेष आवडलें नव्हतें, पण जुम्मा मशिदीच्या बांधणीवर मात्र तो बेहद्द खूष होता. ही मशीद गांवांतच भाजी बाजाराजवळ आहे.

## सिद्दी सैयदच्या मशिदींतील जाळ्या

अहमदाबादेंतील सर्वोत्कृष्ट कलाकुसर कोणती असें मला कोणी विचारलें तर मी सिद्दी सैयदच्या मशिदींतील दोन दगडी जाळ्यांचें नांव घेईन. लाल दरवाजासमोरील सिद्दी सैयदची ही मशीद छोटीशीच आहे, पण तिच्या मागील बाजूच्या भिंतींत प्रकाशासाठीं सामान्य खिडक्या न करतां झाडांच्या सुंदर आकृत्या कोरलेल्या दोन अद्‌भुत जाळ्या आहेत. या जाळ्या कितीदां जरी पाहिल्या तरी मनाची तृप्ति होत नाहीं. दहा वर्षांपूर्वीं मीं अहमदाबाद पाहिलें होतें. त्या वेळच्या गोष्टींपैकीं फक्त या दोन जाळ्याच माझ्या आठवणींत अगदीं ताज्या राहिल्या होत्या. दिल्लीला किंवा आग्र्यालाहि अशी सुंदर दगडी जाळी पहायला मिळत नाहीं, ही गोष्ट विद्वानांनीं कबूल केली आहे. या जाळ्यांतून सूर्यप्रकाश येत असला म्हणजे तर यांचें सौंदर्य फार खुलून दिसतें.

## साठ फूट उंचीचा हलता मनोरा

सिद्दी सैयदच्या मशिदींतील जाळीइतकीच माझ्या लक्षांत राहिलेली दुसरी वस्तु म्हणजे एकतोडानी मशिदींतील हलता मनोरा होय. सुमारें



एकतोडानी मशिद, हलता मनोरा

६० फूट उंचीचा हा मनोरा वीट व चुना यांनीं बांधलेला असून एखादी पोलादी कांब लवलवावी तसा हलतो. यावर प्रथम तर माझा विश्वासच बसेना. पण जेव्हां प्रत्यक्ष वर चढून स्वतःच्या हातांनीं हलवून पाहिला तेव्हां खात्री पटली. वरून खालीं पहातांना आधींच डोकें गरगरत होतें. त्यांत पुनः मनोर हलूं लागल्यावर तर तोंडचें पाणी पळालें. क्षणाक्षणाला अशी भीति वाटे कीं, हा असा हलतांना एकदम ढासळून पडणार तर नाहीं ना? माझ्याबरोबर आलेले प्रसिद्ध गुजराती एकांकिका लेखक श्री. शिवकुमार जोशी मात्र खुशाल त्या हलत्या मनोऱ्याच्या सज्जांत बसून अहमदाबादच्या गिरण्यांचीं धुराडीं मोजत होते. (तीं धुराडीं ८५ कीं ८४ असल्याचें त्यांनीं मला सांगितलें!) या मनोऱ्याच्या जोडीचा दुसरा मनोराहि हलत होता, परंतु आतां त्याचा वरचा भाग उरलेला नाहीं. तो बहुधा धरणीकंपांत मोडून पडला असावा.

## पितळ व दगडावरील कोरीव काम

पितळ आणि दगड यावरील कोरीव कामाचें उत्तमोत्तम नमुने पहावयाचे असतील तर गांवाबाहेरील संत शाहआलमचा रोजा पहावा. याच्या

P 1021 आ. 1909

प्रवेशद्वारावरील पितळी नक्षीकाम पहातच रहावें, इतकें सुंदर आहे. याचे मनोरेहि कलाकुसरीनें परिपूर्ण असून ते ९० फूट उंच आहेत. भूमितीच्या वेगवेगळ्या आकृत्यांनीं या रोजाच्या भिंती शृंगारलेल्या असून प्रत्येक आकृति स्वतंत्र आहे. या सगळ्या जाळ्या दगडांत कोरलेल्या आहेत. त्यांचें वैविध्य पाहिलें कीं मन आश्चर्यानें थक्क होतें.

## जैन मंदिरांतून कारागिरी कमी

अशा तऱ्हेच्या किती तरी मुस्लीम इमारती या शहरांत आहेत. तीन दरवाजा आहे, भद्रचा किल्ला आहे, राणी रूपमतीची मशीद आहे, शेख हसन मुहंमद चिश्तीची मशीद आहे, राणी सिप्रीची मशीद व रोजा आहे, बीबी अचुत कुकीची मशीद व रोजा आहे, सिद्दी बशीरची मशीद आहे पण सगळ्यांची नांवनिशी देणेंहि शक्य नाहीं. त्याखेरीज एक दोन मंदिरेंहि उल्लेखनीय आहेत. पैकीं १८५० सालीं बांधण्यांत आलेलें स्वामी नारायणाचें मंदिर अवाढव्य असलें तरी कलाकुसरीच्या दृष्टीनें सामान्य वाटतें. दुसरें जैन मंदिर असून ' हठीसिंहनु दहेरुं ' नांवानें तें प्रसिद्ध आहे. शेठ हठीसिंह नांवाच्या गृहस्थांनीं १८४८ सालीं दहा लाख रुपये खर्चून तें बांधलेलें आहे. येथेंहि पुष्कळच कोरीव काम केलेलें आहे. पण मशिदींवरील कोरीव कामांतील नाजूकपणा व विविधत्व येथें पहावयास मिळत नाहीं. पुष्कळ जैन मंदिरांत आढळणारा भपकेबाजपणा येथेंहि दिसतो. कारागिरींतहि एक प्रकारचा संयम असावा लागतो. त्याचा अभाव येथें चांगलाच जाणवतो.

## हौजे कुतुब किंवा कांकरिया तलाव

अहमदाबादमधील हवा खाण्याच्या ठिकाणांपैकीं हौजे कुतुब किंवा कांकरिया तलाव हें एक अत्यंत मनोहर ठिकाण आहे. सुलतान कुतुबुद्दीन अहमदशहानें इ. स. १४५१ च्या सुमारास हा तलाव बांधला. हिंदुस्थानांतील अशा प्रकारच्या बांधलेल्या सर्वांत मोठ्या तलावांमध्यें याची गणना होते. प्रत्येक बाजू १९० फूट लांबीची अशा ३४ समान बाजूंचा हा तलाव बनलेला आहे. याने ७२ एकर जमीन व्यापलेली आहे. यावरून त्याचा विस्तार लक्षांत येईल. तलावाच्या मधोमध नगीनावाडी नांवाचा

एक लहानसा बगीचा असून तेथपर्यंत जाण्यास दगडी पूल आहे. येथेंहि कलाकुसर भरपूर पहावयास मिळते. पूर्वी या तळ्यांत असंख्य मगरी होत्या. त्यामुळें आंत उतरणें धोक्याचें असे. आतां त्या मगरींचा नाश करून तलावाची सफाई करण्यांत आलेली आहे. तेथें बोटिंगची छान सोय आहे.

असाच दुसरा एक तलाव येथें आहे. त्याचें नांव चंडोला तलाव. हा गांवाबाहेर असून सहलीसाठीं येथें नेहमीं लोक येत असतात. याचें सौंदर्य नैसर्गिक असून तें कांकरियापेक्षां किंचितहि कमी नाहीं.

### ओपन एअर थिएटर

येथील जुन्या गोष्टींप्रमाणें कांहीं नवीन गोष्टीहि उल्लेखनीय आहेत. त्यापैकीं 'ओपन एअर थिएटर' किंवा खुलें नाट्यगृह हें एक आहे. याला ७ दारें असून सुमारें चार हजार लोक एका वेळीं बसूं शकतील एवढें तें मोठें आहे. जमिनीवर हिरवळ असल्यामुळें खुर्च्यांची गरज भासत नाहीं. शिवाय प्रेक्षक बसण्याची जागा उतरती असल्यामुळें पुढें बसलेल्यांचा मागच्या लोकांना त्रास होण्याची भीति असत नाहीं. हें थिएटर अगदीं मामुली भाडें घेऊन कार्यक्रमास देण्यांत येतें.

### नवजीवन कार्यालय नवी इमारत

महात्माजींचा साबरमती आश्रम, साबरमती नदीवरील गांधीपूल, पटेल पूल वगैरे गोष्टीहि प्रेक्षणीय आहेत. नुकतीच सात लाख रुपये खर्चून नवजीवन कार्यालयासाठीं बांधलेली इमारतहि पहाण्यासारखी आहे. गांधीजींचें व गांधीजीविषयींचें साहित्य प्रसिद्ध करणारी भारतांतील सर्वांत मोठी संस्था म्हणून नवजीवनची प्रसिद्धि आहे. तिच्यातर्फे आतांपर्यंत गुजराती, हिंदी, इंग्रजी व मराठी भाषांत शेंकडो पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. संस्थेचा स्वतःचा छापखाना असून तो आतां या नव्या इमारतींत आलेला आहे. कंपोजिंग खात्यांतला प्रकाश व स्वच्छता पाहून मनाला मोठी प्रसन्नता वाटते, तर सरदार वल्लभभाई पटेल यांना मिळालेलीं मानपत्रें व भेटी यांचा संग्रह पाहिला कीं मन थक्क होतें. लाखो रुपये किंमतीच्या त्या वस्तू पहात असतां भारताच्या त्या कणखर नेत्याची मूर्ति डोळ्यांसमोर येते.

## वसंत-रजब-तलाव-स्मारक

अहमदाबादच्या हिंदु-मुस्लीम दंग्यांत स्वतःचें बलिदान करणारे देशभक्त वसंतराव हेगिष्टे आणि रजबअली लाखाणी या हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधण्यांत आलेला पोहण्याचा तलाव अहमदाबादचें एक नवें आकर्षण म्हटलें पाहिजे. या तलावांत अद्ययावत् सुखसोयी असून रात्रींच्या वेळीं पाण्याखालून प्रकाश येण्याचीहि व्यवस्था केलेली आहे. हुतात्म्यांच्या स्मृतीसाठीं एखादें दगडी स्मारक, स्तंभ वगैरे उभारण्यापेक्षां अशा तऱ्हेची सर्वांना उपयोगी पडेल अशी गोष्ट करण्यांत अहमदाबादच्या लोकांनीं औचित्य आणि व्यवहार साधला नाहीं असें कोण म्हणेल ?

## मजूर ' महाजन 'ची इमारत

अहमदाबाद कापडाच्या गिरण्यांचें शहर म्हणून प्रसिद्ध आहे. यामुळें येथें मजुरांची एखादी संस्था असणें स्वाभाविकच आहे. येथील ' मजूर महाजन ' मजुरांची प्रातिनिधिक संस्था असून तिची इमारत मोठी छानदार आहे. गिरणीचे मालक व मजूर यांच्यांतील मतभेद शांतपणें दूर करण्याचा प्रयत्न ही संस्था करते. गिरणीमालकहि समंजस असल्यामुळें वारंवार संप, हरताळ वगैरे करण्याची पाळी येथील मजुरांवर येत नाहीं. महाराष्ट्रीय लोकांची वस्तीहि येथें खूप आहे. यामुळें मराठी माणसाला अहमदाबाद फारसें परकें किंवा अपरिचित वाटत नाहीं.

● ● ● ●

# सौराष्ट्राचें सांस्कृतिक शहर, भावनगर : १२

## सौराष्ट्राचें पुणें

महाराष्ट्रांत पुण्याचें, उत्तर प्रदेशांत काशीचें, गुजरातेंत बडोद्याचें, तामिळनाडांत मदुरेचें जें स्थान तेंच सौराष्ट्रांत भावनगरचें मानलें जातें. सौराष्ट्राची राजकीय राजधानी जरी राजकोट असली तरी त्याची सांस्कृतिक राजधानी भावनगरच होती व आहे. विद्या आणि कला यांचें तें फार पूर्वींपासून माहेरघर आहे. राजकोटवर श्रीमंतांचा आणि राजे-रजवाड्यांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. पूर्वीं केवळ राजपुत्रांनाच प्रवेश देणारें राजकुमार कॉलेज तेथें आहे. पण भावनगर हें मुख्यतः मध्यम-वर्गीय, पांढरपेशा समाजाचा प्रभाव असलेलें शहर आहे. तेथील लोकांच्या स्वभावाचेंहि पुण्याच्या लोकांच्या स्वभावाशीं खूपच साम्य आढळतें. व्यापार—उदीम करून पैसा मिळविण्यापेक्षां विद्या व कला यांच्यांत प्रावीण्य मिळवावें, राजकारण खेळावें, साहित्य, काव्य वगैरेंचा आस्वाद घ्यावा इकडे त्यांची प्रवृत्ति अधिक दिसते. या शहरांत महाराष्ट्रीय लोकांची संख्याहि खूप मोठी आहे. नुसत्या मराठी पांढरपेशा लोकांचींच घरें शंभरांहून अधिक असतील. त्याखेरीज मजूर वगैरेहि खूप आहेत.

## निसर्गसुन्दर 'बोर तलाव'

भावनगरच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांत भर घालणारा, शहराच्या बाहेर २-३ मैलांवर असलेला बोर तलाव किंवा 'गौरीशंकर सरोवर' हें स्थान निसर्गसौंदर्याच्या दृष्टीनें विशेष प्रेक्षणीय आहे. याचें वैशिष्ट्य असें कीं हें एका छोट्याशा टेकडीवर असून टेकडी चढून वर जाईपर्यंत त्याचें अस्तित्व लक्षांत येत नाहीं. टेकडी चढून वर गेलें कीं एखाद्या जादूगारानें नजरबंदी करून सुंदर दृश्य उपस्थित करावें तसा भास होतो आणि एक

छोटेंसें मनोहर सरोवर आपल्या समोर अचानक उभें राहतें. याच्या कांठावरच भावनगरच्या राजाची क्लबची इमारत आहे. तिचें दृश्यहि छान दिसतें. एक शंकराचें देऊळ असून भाविक लोक तेथें पैसा-आणेली ठेवीत असतात.

## गांवांतील तख्तेश्वर मंदिर

येथील लवण संशोधन संस्था, ( Salt research institute ), सर भावसिंहजी पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, गंगाजलिया मंदिर, वगैरे अनेक गोष्टी पाहाण्यासारख्या आहेत. पण मला जें सर्वांत अधिक आवडलें तें म्हणजे तख्तेश्वर-मंदिर होय. हें मंदिर एका छोट्याशा कृत्रिम टेकडीवर बांधलेलें आहे. देऊळ शुभ्र संगमरवरी दगडांचें असून आंत महादेवाची पिंडी आहे. तख्तसिंह नांवाच्या राजानें स्वतःचें नांव अजरामर करण्याच्या इराद्यानें तख्त ( सिंहासन ) या फारसी शब्दाशीं ईश्वराचा समास करून नवीन देवाची निर्मिति केली आहे. येथून भावनगर शहराची शोभा मात्र फारच छान दिसते.

## शामळदास कॉलेज

येथील शामळदास कॉलेज सौराष्ट्रांतील अत्यंत जुन्या कॉलेजांपैकीं एक आहे. १८८७ सालीं महात्मा गांधीजी मॅट्रिक झाल्यानंतर एक वर्षभर या कॉलेजांत शिकत होते. त्या दृष्टीनें या कॉलेजला एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

## गांधी–मन्दिर

सुमारें चौदा लाख रुपये खर्च करून गांधी मंदिर नांवाची एक इमारत व संस्था उभारण्याचें कार्य येथें चालू आहे. आम्ही गेलों त्या वेळीं त्यापैकीं खादी एम्पोरियम् हा भाग तयार झाला होता आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें त्याचें उद्घाटन झालें त्या वेळीं मी तेथें होतों. ही इमारत अगदीं अद्ययावत् असून मोठी प्रेक्षणीय आहे. येथें गांधी साहित्याची व अन्य आनुषंगिक ग्रंथांची एक मोठी लायब्ररी बनणार आहे. गांधीवादी विचारसरणीचें अध्ययन व संशोधन करण्याच्या उद्देशानें हें केन्द्र स्थापन करण्यांत आलेलें आहे. खादी व ग्रामोद्योगाच्या

वस्तूंचें एक कायमचें प्रदर्शन, विक्रीकेन्द्र, वगैरे विभागहि येथें राहाणार आहेत.

**‘सप्तकळा’चें कार्य**

येथील मुक्कामांत ‘शिशुविहार’ या संस्थेतर्फे रात्रींच्या वेळीं ओपन एअर थिएटरांत झालेला ‘सप्तकळा’ या संस्थेचा कार्यक्रम पाहाण्याची संधि मला मिळाली. त्या निमित्तानें या दोन्ही संस्थांची माहिती मिळवितां आली. ती उद्बोधक असल्यामुळें येथें देत आहे. ‘शिशुविहार’ हें जरी लहान मुलांच्या संस्थेचें नांव असलें तरी त्यांत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचा समावेश होतो. क्रीडांगण, वाचनालय, व्यायाम शाळा, राष्ट्रभाषा प्रचार, प्रौढशिक्षण ( साक्षरताप्रसार ) वगैरे अनेक कामें या संस्थेतर्फे केलीं जातात. उघड्या नाट्यमंदिराची छोटीशी इमारत व तिच्या बाजूच्या खोल्या ह्या श्रमदानानें बांधण्यांत आलेल्या आहेत. आणि हें श्रमदान केवळ शहरी पांढरपेशा लोकांनीं केलेलें नसून बंदरावर काम करणाऱ्या मजुरांनीं रात्रींच्या वेळीं मोठ्या हौशीनें केलेलें आहे. येथील शिस्त मोठी वाखाणण्यासारखी दिसली.

दुसरी संस्था म्हणजे ‘सप्तकळा.’ या संस्थेचे संचालक श्री. जगदीश वीराणी हे नुकतेच हृदयविकारानें निधन पावले. ते मोठे हरहुन्नरी होते. गायन, वादन, नृत्य, अभिनय, चित्र, शिल्प व फोटोग्राफी इतक्या सात कला ते स्वतःच शिकवीत असत. या सात कलांमुळेंच संस्थेचें नांव त्यांनीं ‘सप्तकळा’ असें ठेवलें होतें. सौराष्ट्र सरकारनें या संस्थेला मान्यता दिलेली आहे. श्री. वीराजी हे कविहि होते आणि लोकगीतांच्या स्वरांचा उपयोग आपल्या भावगीतांत करीत असत. मॅंडोलिन वाजविण्यांत ते विशेष कुशल असल्याचें मला आढळलें. महाराष्ट्राच्या तुलनेनें सौराष्ट्रांत संगीत-साधना पुष्कळच कमी आहे. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न ही संस्था करीत आहे.

**कलावंतांचें माहेरघर**

भावनगर हें पूर्वीपासून कलोपासनेचें एक केन्द्र म्हणून प्रसिद्ध आहे. येथील अनेक कलावंतांनीं सौराष्ट्राबाहेर जाऊन उत्तम नांव कमावलें आहे. येथील रहिवासी श्री. यशवंतराव पुरोहित हे सध्यां मुंबईला असून ते

अखिल भारतीय कीर्तीचे गायक आहेत. श्री. हरिभाई मोहनलाल शर्मा हे उत्कृष्ट व्हायोलिनवादक म्हणून प्रसिद्ध आहेत. श्री हरभाई त्रिवेदी हे मान्यता पावलेले शिक्षणतज्ज्ञ असून ते 'घरशाळा' नांवाचें मासिक चालवीत असतात. श्री. झवेरचंद्र मेघाणी हे प्रसिद्ध कथालेखक व लोक-साहित्यतज्ज्ञ येथलेच होते. प्रो. विजयराव वैद्य, श्री. मुकुंद पाराशर्य, श्री. नाथालाल दवे वगैरे साहित्यिक व कवि येथीलच आहेत. परंतु सर्वांत महत्त्वाचा भाग चित्रकारांचा आहे. श्री. सोमालाल शाह हे प्रसिद्ध चित्रकार येथेंच रहातात. ते पशुपक्ष्यांचीं व ग्रामीण जनतेचीं चित्रें रेखाटण्यांत सिद्धहस्त आहेत. त्यांचे शिष्य श्री विनायक पंड्या हे मुंबईत व श्री. मार्कंड भट्ट बडोद्यांत कलाविद्यालयांत मोठ्या हुद्यावर काम करीत असतात. श्री. रविशंकर रावळ, श्री. वनराज माळी, श्री. खोडीदास परमार वगैरे चित्रकारहि अत्यंत प्रसिद्ध आहेत. या सर्व कलावंतामुळें या शहरांत कलेचें एक सुंदर वातावरण निर्माण झालेलें दिसतें.

● ● ● ●

# जय सोमनाथ १३

## प्रभास पाटण : सर्वांत जुनें स्थान

सोमनाथाला जावयाचें म्हणजे वेरावळ बंदरापर्यंत जावें लागतें. जुनागडहून ५१ मैल ( आगगाडीनें ) आहे हें ठिकाण. मी दुपारीं १२ ला निघून ( १०–५५ ची गाडी १२ ला सुटली. ) २–१५ ला वेरावळला पोंचलों. येथून ३ मैलांवरच प्रभास पाटण ( किंवा पट्टन ) ऊर्फ सोमनाथ पाटण ऊर्फ देव पाटण आहे. संध्याकाळीं ७–३५ ला पोरबंदरकडे जाणारी गाडी होती. म्हणजे माझ्या हातांत तब्बल ५ तास होते. एवढ्या वेळांत सोमनाथाचें इतिहासप्रसिद्ध मंदिर आणि इतर स्थानें पाहून घेणें शक्य होतें. म्हणून गांवांत ज्या गृहस्थांकडे उतरावयाचें ठरलें होतें, त्यांना मी त्यांच्याकडे येणार नसल्याचें कळविलें; आणि सरळ टांगा करून प्रभासला गेलों. मी २-३० ला टांग्यांत बसलों आणि ६ ला खालीं उतरलों. म्हणजे ३॥ तास टांगा वापरला. त्याबद्दल भाडें दिलें २ रुपये! हें भाडें कमी आहे याची मला जाणीव होती, पण माझ्याजवळचे पैसे संपत आले होते आणि टांगेवाल्याच्या दृष्टीनें हे पैसेहि जास्तच होते. कारण त्याला इतर २।३ सवाऱ्या मिळाल्या असत्या तर त्यानें माझ्याकडून एक–दीड रुपयांहून जास्त घेतलें नसतें. असो.

## टांगेवाल्याशीं गप्पा

टांग्यांत मी एकटाच असल्यामुळें सहजच टांगेवाल्याशीं गप्पा गोष्टी सुरू केल्या. पूर्वी हा भाग नबाबाच्या ताब्यांत होता. त्या वेळीं येथें येणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूला दर माणशीं आठ आणे कर द्यावा लागे. तरीहि उतारूंची संख्या कांहीं कमी नसे. नबाबाचें राज्य असल्यामुळें मुसलमानांचा वरचष्मा बराच असणार. हा टांगेवाला

मुसलमानच होता. त्याचें नांव हाशम हबीब मलेक! मीं त्याला विचारलें, ‘ नबाबाच्या राज्यांत तुम्ही जास्त सुखी असाल नाहीं?’

‘ आम्हां गरिबांना कसलं आलंय सुख, साहेब? चैन केली बड्या लोकांनीं! आम्हांला तर आजच्या इतकी सुद्धां आझादी नव्हती!’ त्यानें प्रामाणिकपणें उत्तर दिलें.

‘ सोमनाथाच्या मशिदीवर आतां पुनः सोमनाथाचं मंदिर बांधायचं काम सुरूं झालंय, त्याबद्दल इथल्या मुसलमानांना मोठा घुस्सा येत असेल नाहीं?’ मीं अगदीं नाजुक प्रश्न केला.

‘ त्यांत घुस्सा यायचं काय कारण, साहेब? मंदिर हिंदूंचं होतं, तें त्यांनीं परत घेतलं. आमच्या मशिदी आम्हांला भरपूर आहेत की!’ तो म्हणाला.

येथें मुसलमानांची वस्ती खूप आहे. पण ते सारे दारिद्र्य व निरक्षरता यांनीं गांजलेले आहेत. टांगेवाले बहुतेक सगळे मुसलमानच आहेत, पण ते आपापसांत चुरस करून स्वतःचं नुकसान करून घेतात.

‘ इथं असे हालांत दिवस काढण्यापेक्षां तुम्ही पाकिस्तानांत कां जात नाहीं?’ मी विचारलें.

‘ पुष्कळ लोक गेले होते पाकिस्तानांत; पण त्यांना तिथली हवा मानवली नाहीं. अगदीं मरतुकडे होऊन परत आले. अन् आमच्या-सारख्या अडाण्यांनीं तिथं जाऊन तरी हमालीच करायची कीं नाहीं? आम्हांला कोणी राज्य देणार आहे थोडंच? त्यापेक्षां ही ओळखीची धूळच बरी!’ तो हंसत हंसत म्हणाला.

खरोखरीच धुळीनें आमचें सर्वांग भरलें होतें. वेरावळपासून प्रभास-पर्यंत कॉंक्रीटचा रस्ता तयार होत असल्यामुळें आम्हांला शेतांतून व मैदानांतून टांगा न्यावा लागत होता. भरधांव पळणारे टांगे आमच्यापुढें जात होते; व जातां जातां धुळीचा अबीर-गुलाल आमच्या अंगावर उधळीत होते. कॉंक्रीटचा रस्ता तयार झाल्यानंतर प्रवाशांची किती सुखसोय होईल, या कल्पनेनें मीं हाशमला विचारलें, ‘ काय रे, नवा रस्ता तयार झाला म्हणजे तुमचे टांगे वायुवेगानें धांवायला लागतील नाहीं?’

'कसचं आलंय साहेब! आमचे टांगे तरी टिकतील कीं नाहीं खुदा जाणे! लोक म्हणतात, आतां बसेस सुरू होतील. तसं झालं कीं आमच्या पोटावर पाय आलेच!' तो दुःखानें म्हणाला.

एकाच चांगल्या गोष्टीचा किती विचित्र परिणाम होतो वेगवेगळ्या लोकांवर! आमच्या देशानें समाजवादाकडे किती जोरानें प्रगति चालविली आहे याची प्रचीति ह्या हाशम टांगेवाल्याला कधीं काळीं येईल काय, या विचारांत मी गढून गेलों असतांच, आमचा टांगा प्रभास गावांत पोंचला व त्या अरुंद आणि गालिच्छ बोळांतून वाट काढीत त्रिवेणी संगमावर जाऊन पोंचला. गांवांत शिरतांच एक तरुण भटजी माझ्यामागें लागला, परंतु मला धार्मिक कृत्यें करावयाचीं नाहींत, एवढेंच नव्हे तर तुझ्या सारख्यानें आतां हा कालग्रस्त धंदा सोडून एखादा स्वाभिमानी व कालानुरूप धंदा शोधून काढावा असें त्याला सांगून मीं त्याला वाटेला लावलें.

**संगमावर**

मला जरी त्रिवेणी-संगमावर स्नान करावयाचें नव्हतें तरी प्रथम मी संगमावरच गेलों. याचें कारण मला नदी व समुद्र यांचें विलक्षण आकर्षण आहे. पण प्रत्यक्ष संगम पाहिल्यानंतर चांगलाच विरस झाला माझा. कुठें तो गंगा-यमुनांचा प्रयागचा प्रचंड त्रिवेणी-संगम, अन् कुठें ह्या छोट्याशा ओढ्यांसारख्या हिरण्या व कपिला नद्या! (अर्थात् नेहमीप्रमाणें सरस्वती ही गुप्तच आहे!) येथून समुद्र जवळच असल्यामुळें नद्यांचें पाणी खारट आहे हें सांगणें नलगे! येथील नद्या एकदमच समुद्राला मिळतात. तेथें लोक भाविकपणें स्नान करतात.

**देहोत्सर्ग**


या संगमावरून जरा पुढें गेलें कीं हिरण्या नदीच्या कांठीं देहोत्सर्ग नांवाचें ठिकाण येतें. याठिकाणीं श्रीकृष्णाच्या पार्थिव शरीराला अग्नि देण्यांत आला होता. पूर्वीं येथें मोठा अश्वत्थ-वृक्ष होता असें म्हणतात; पण हल्लीं नुकतेंच ३ वर्षांपूर्वीं लावलेलें पिंपळाचें रोप तेथें आहे. त्याचीं कोंवळीं कोंवळीं पानें छान दिसतात. येथें येणाऱ्या यात्रेकरूंनीं या झाडाला

पाणी घातलें कीं पुण्याची जोडणी झाली, म्हणून पाण्याची सोयहि करून ठेवण्यांत आलेली आहे.

## सूर्य नसलेलें सूर्यमन्दिर

संगमाच्या समोरच्या बाजूस सूर्यमन्दिर आहे. मंदिराची बांधणी वगैरे चांगली आहे आणि एके काळीं त्याच्यावर कारागिरी व नक्षी असावी असें दिसतें. पण सध्यां तरी तें अगदीं ओकें ओकें दिसतें. देवळांत मूर्ति नाहींच. मीं जितकीं सूर्यमंदिरें पाहिलीं तीं सर्व मूर्तिविनाच होतीं. यामुळें मनांत विचार आला, सगळ्या सूर्यमंदिरांतल्या मूर्तींना झालंय तरी काय? कीं ज्या मंदिरांत मूर्ति नाहीं त्यांनाच सूर्यमन्दिर म्हणण्यांत येऊं लागलें? येथें भिंतीवर सूर्याची वेडीवांकडी आकृति काढण्यांत आलेली आहे. देऊळ जरा उंचावर असल्यामुळें येथून समुद्राचा वगैरे देखावा छान दिसतो.

सोमनाथ हें भारतांतील प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक स्थान समजलें जातें. त्यामुळें गझनीच्या महमुदानें जरी सोमनाथाची मूर्ति



सोमनाथ शाळुंका

फोडून टाकली तरी स्थानमाहात्म्य कायम टिकविण्यासाठीं दुसरें एखादें सोमनाथाचें देऊळ येथें बांधणें भागच होतें. त्याप्रमाणें मराठी साम्राज्याच्या उत्कर्षकाळांत पुण्यश्लोका अहिल्यादेवी होळकर यांनीं जुन्या

सोमनाथाजवळच एक मोठें देऊळ बांधलें. यांतील मुख्य महादेवाची पिंडी खालीं भुयारांत असून वरच्या बाजूस मामुली पिंडी आहे. हेतु हा कीं मुसलमानांचा हल्ला झाला तर तो वरच्या महादेवावर व्हावा आणि खालचा महादेव शिल्लक रहावा. अर्थात् एकदां देवळांत शिरल्यानंतर त्यांना भुयार दिसणार नाहीं ही कल्पना म्हणजे भोळसरपणाच म्हटला पाहिजे. भुयारांतील शिवलिंग मात्र चांगलें भव्य आहे. त्याची शाळुंका दोन उंचीची गंडकी शिळेची अगदीं काळी कुळकुळीत व गुळगुळीत आहे. यामुळें तिच्याकडे पाहात राहावें असें वाटतें.

**जुना सोमनाथ : नवें मन्दिर**

येथून जवळच इतिहासप्रसिद्ध सोमनाथाचें नवें मन्दिर बांधण्याचें काम सुरू आहे. वस्तुतः या सोमनाथाचा इतिहास हिन्दु समाजाच्या आणि एकूण मूर्तिपूजकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा आहे. हिन्दु समाजानें आपल्यांतील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय भेद कायम ठेवल्यामुळेंच मुसलमानांपुढें त्याचा निभाव लागला नाहीं. पण हे भेद नष्ट करण्याची सद्बुद्धि अजूनहि या समाजाला सुचत नाहीं, हीच गोष्ट मूर्तिपूजेची



नवें सोमनाथ मंदिर

व मंदिरांतून लाखो रुपयांचें जडजवाहीर जमा करण्याची. वैयक्तिक मोक्षसाधनेसाठीं मूर्तिपूजेची गरज ज्याला भासेल त्यानें स्वतःच्या घरांत मूर्ति स्थापन करून तिची वाटेल तेवढी पूजा-अर्चा करावी. पण सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग करून कोट्यवधि रुपयांचीं मंदिरें बांधण्यांत आज काय स्वारस्य राहिलें आहे याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. सोमनाथ हें जागृत स्थान समजलें जातें. पण गझनीचा महमूद (इ. स. १०२४) उलगखान (१२९७) बहादुरशाह (१३१८) यांनीं आणि इतरांनीं १३९५, १५११ व १५२० सालीं पुनः पुनः त्याच्यावर स्वाऱ्या करून तें उध्वस्त केलें आणि अखेर १७०६ सालीं औरंगजेबानें तेथें मशीदच बांधून टाकली! तरीहि आमच्या या जागृत देवानें त्यांचें कांहींहि वांकडें केलें नाहीं. जो देव स्वतःचेंच रक्षण करूं शकत नाहीं तो आपल्या भक्तांचें रक्षण काय करणार? म्हणजे खरोखरी आपण आपली मूर्तिपूजेविषयींची कल्पनाच नीट तपासून पाहाण्याची वेळ आतां आली आहे. पण तेवढा विचार करायला सवड आहे कुणाला? कै. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रेरणेनें सध्यां येथें एक प्रचंड मंदिर बांधलें जात आहे. मी गेलों त्या वेळीं तळमजला पुरा होण्याच्या बेतास आला होता. कोणार्कप्रमाणें देवळाच्या कोपऱ्या-कोपऱ्यांतून सुंदर कलापूर्ण (स्त्रियांचीं) चित्रें कोरलीं जात आहेत. अर्थात् नव्या जमान्याची प्रवृत्ति ध्यानांत घेऊन कोणार्कसारखीं अश्लील चित्रें येथें येणार नाहींत असें दिसतें. वस्तुतः हें काम इतकें मोठें आहे कीं त्यासाठीं शेंकडों मजूर कारागीर कामास लावले पाहिजेत. परंतु आतां तिकडे फारसें कुणाचें लक्ष नसावें असें वाटतें. मी गेलों त्या वेळीं तेथें फारच थोडे लोक कामावर होते.

## मंदिराची मूळ कहाणी

देशांतील बारा ज्योतिर्लिंगांच्या उत्पत्तीसंबंधीं भाविक लोकांमध्यें अशी समजूत आहे कीं ' देव–दानवांना अमृत वाटण्याचें वेळीं श्री विष्णूनें जगन्मोहिनीचें रूप घेतलें होतें. तें रूप पहाण्याची श्रीशंकरांना इच्छा झाली. तें रूप पाहून मदनांतक शंकर इतके मोहित झाले कीं तें तिच्या

मार्गे नागडेच धांवूं लागले ! धावतांना तें रूप हस्तगत झालें असें पाहून ज्या ज्या ठिकाणीं त्यांचें वीर्य स्खलन पावलें तीं हीं ठिकाणें होत.' ('महाराष्ट्रांतील प्रवास': पृष्ठ ४००)

यादव लोक द्वारकेला येण्यापूर्वीं प्रभासपट्टण हें एकच स्थान सौराष्ट्रामध्यें विशेष प्रसिद्ध होतें. यावरून हें श्रीकृष्णाच्याहि पूर्वींपासून विद्यमान असावें असें दिसतें. स्कन्दपुराणामध्यें 'प्रभास खंड' नांवाचा एक स्वतंत्र अध्यायच आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं सोमनाथाचें मंदिर प्रथम सोमराजानें बांधलें. त्या वेळीं तें सोन्याचें होतें. नंतर रावणानें तें चांदीनें बांधलें. त्यानंतर कृष्णानें तें लाकडी बांधलें आणि सरते शेवटीं अनहिलपुरच्या भीमदेव व कुमारपाल या राजांनीं तें दगडाचें बांधलें.

## पौराणिक कथा

सोमनाथासंबंधींची पौराणिक कथाहि मजेदार आहे. ती अशी–पूर्वीं ब्रह्मदेवाचा मानसपुत्र दक्षप्रजापति यानें आपल्या साठ मुलींपैकीं सत्तावीस मुली सोमराजाला म्हणजे चन्द्राला दिल्या. त्यांपैकीं फक्त रोहिणीवरच तो जास्त प्रेम ठेवूं लागला. हें इतर मुलींस (नक्षत्रांस) सहन न होऊन त्याबद्दल त्यांनीं आपल्या पित्याजवळ गाऱ्हाणें नेलें. तेव्हां दक्षानें चन्द्राला सर्वजणींवर सारखें प्रेम करण्याविषयीं उपदेश केला. पण प्रेम काय असें उपदेशानें करतां येतें? चंद्रानें तें साफ नाकारलें. त्याबरोबर दक्षप्रजापतीनें त्याला शाप दिला कीं 'जा, तूं यापुढं क्षयरोगानं ग्रस्त होशील !' त्या भल्या गृहस्थाला कोणी तरी विचारायला हवें होतें कीं, 'स्वतःच्या जांवयाला क्षयी होण्याचा शाप देऊन तूं आपल्या मुलींचं काय कल्याण साधलंस ?' पण सगळींच माणसें त्या वेळीं प्राथमिक अवस्थेंत होतीं. त्यामुळें त्यांचे राग–लोभ–द्वेष अत्यंत तीव्र होते. म्हणून दक्षाची समजूत घालण्यांतहि कांहीं अर्थ नव्हता. अखेर चन्द्राला क्षय झालाच. तेव्हां तो ब्रह्मदेवाला शरण गेला. ब्रह्मदेवानें त्याला सल्ला दिला कीं तूं प्रभासक्षेत्रीं शिवलिंग स्थापन करून त्याचें ध्यान कर म्हणजे शंकर प्रसन्न होऊन तुला शापमुक्त करतील. त्याप्रमाणें चंद्रानें सहा महिने तपश्चर्या करितांच त्यास

प्रत्यक्ष शंकरानें दर्शन देऊन सांगितलें कीं, ' जरी दक्षाचा शाप नष्ट होण्यासारखा नाहीं, तरी माझ्या कृपेनें तूं महिन्यांतून कांहीं दिवस चांगला अन् कांहीं दिवस रोगग्रस्त राहाशील. ' हा वर मिळतांच चंद्रानें हर्षयुक्त होऊन आपण स्थापिलेल्या लिंगांत पूर्णांशानें राहाण्याबद्दल शंकरास प्रार्थना केली. ती शंकरानें मान्य करून तो त्या लिंगांत अन्तर्धान पावला.

कच्छ–काठेवाडांतील हवा कोरडी असून तेथें क्षयी लोकहि बरे होतात असें म्हणतात. या वस्तुस्थितीचा या गोष्टीशीं कांहीं संबंध नसेलच असें सांगतां येणार नाहीं.

या ऐतिहासिक व पौराणिक गोष्टी सोडल्या तरी एक सुंदर समुद्र-किनारा या दृष्टीनें सोमनाथाचें महत्त्व अपूर्व समजलें पाहिजे. येथील समुद्रकिनारा पश्चिम भारतांतील एक अत्यंत मनोहर किनारा समजला जातो.

## भालुका तीर्थ

येथून जवळच एक भालुका तीर्थ नांवाचें स्थान आहे. याच ठिकाणीं जरा नांवाच्या भिल्लानें मृगाचा डोळा ( किंवा तोंड ) समजून मारलेला बाण श्रीकृष्णाच्या डाव्या पायाच्या अंगठ्याला लागून त्याला मृत्यु आला होता. श्रीकृष्णाचें मरण डाव्या पायाच्या अंगठ्यांत आहे ही गोष्ट फक्त अभिमन्यूला माहीत होती. कारण तो सुभद्रेच्या पोटांत असतां कृष्ण–सुभद्रेच्या चाललेल्या गोष्टी त्यानें ऐकल्या होत्या. आपल्या या भाच्या-पासून आपल्याला पुढें मागें धोका राहूं नये म्हणून श्रीकृष्णानें त्याला चक्रव्यूहांत अडकवून ठार मारविलें होतें, याचें स्मरण येथें आल्यानंतर होणें साहजिकच होतें. या ठिकाणीं श्रीकृष्णाची एक मूर्ति असून ती नेहमींप्रमाणें उभी नसून कृष्ण लोडाला टेकून बसलेला आहे व त्याचा उजवा पाय डाव्या गुडघ्यावर टेकलेला आहे. मूर्ति सामान्यच आहे. पण घटनेचें चित्रण करणारी आहे.

याच्या समोर एक कुंड असून त्याला पद्मकुंड असें म्हणतात. या कुंडांत श्रीकृष्णानें आपल्या पायाचें रक्त धुतलें होतें असें म्हणतात. यामुळें भाविक लोक या कुंडांतहि स्नान करतात.

या खेरीज इतरहि अनेक लहान मोठीं देवळें व तीर्थस्थानें या ठिकाणीं आहेत. येथील मुसलमानांची मशीदहि प्रेक्षणीय आहे असें टांगेवाला सांगत होता. पण मला गाडी गांठावयाची होती, पोटांत कांहीं नसल्यामुळें झालेल्या धांवपळीमुळेंच थकवा आला होता आणि एकाच वेळीं पुष्कळ गोष्टी पाहिल्यामुळें मनालाहि शीण आला होता. म्हणून अंगठ्या एवढ्या जाडीचा एक ऊंस विकत घेऊन तो खात खात मी टांग्यांतून वेरावळला परत आलों आणि धर्मशाळेंतील सामान घेऊन सरळ स्टेशनवर गेलों.

● ● ● ●

# गांधीजींच्या जन्मभूमींत :                                        १४

### महात्माजींच्या आत्मकथेंत उल्लेख

पोरबंदर म्हणजेच सुदामपुरी ही गोष्ट महात्मा गांधींची आत्मकथा वाचीत असतां, मला लहानपणीं कळली होती. सुदामा भारतांतील लाखो–करोडो अर्धपोटी लोकांचा प्रतिनिधि. त्याच्या गांवांत गरीब जनतेला दरिद्रीनारायण समजून जिवेंभावें तिची सेवा करणारे कर्मवीर गांधी जन्माला यावेत हा योगायोग कांहीं औरच म्हटला पाहिजे. द्वारकाधीश श्रीकृष्णासाठीं स्वतःच्या प्रेमाची खूण म्हणून पोह्यांची पुरचुंडी कांखेंत लपवून नेणाऱ्या कृशशरीर सुदामदेवाबद्दल भारतीय मुलांना नेहमीच एक अद्भुत आकर्षण वाटत असतें. तेव्हां सुदामपुरीला जातांना व तिथें गेल्यानंतर कृष्ण–सुदामा भेटीची कथा मनांत ताजी झाली नसती तरच आश्चर्य. अर्थात् सुदाम्याच्या नगरीपेक्षां गांधीजींची जन्मभूमि या नात्यानेंच आधुनिक जग पोरबंदरला अधिक ओळखतें. कालांतरानें सुदाम्याची स्मृति कदाचित् पुसूनहि जाईल, पण गांधीजींची जन्मभूमि या नात्यानें त्या स्थानाला लाभलेलें महत्त्व कमी होण्याऐवजीं दिवसेंदिवस वाढतच जाणार यांत शंका नाहीं.

पोरबंदरला जावयाचें म्हणजे राजकोटहून आगगाडीनें जेतलसरला जाऊन तेथें गाडी बदलावयाची व थेट पोरबंदरला पोंचावयाचें पण मी प्रथम सोमनाथाचें दर्शन करण्यासाठीं वेरावळला गेलों होतों. त्यामुळें तेथून रात्रीं निघून पोरबंदरला पोंचलों. गांवांत प्रवेश करतांच एक गोष्ट चटकन् आपल्या लक्षांत येते ती अशी कीं हें शहर व्यवस्थित आंखलेलें व मोठें प्रशस्त आहे. इतर शहरांच्या मानानें इथें स्वच्छताहि थोडी जास्तच दिसते, आणि प्रथमदर्शनीं आपला जो ग्रह होतो तो कांहीं अगदींच चुकीचा नसतो. मोरवी व पोरबंदर हीं सौराष्ट्रांतील दोन शहरें

सौन्दर्याच्या बाबतींत बरींच प्रख्यात आहेत. पोरबंदरचा समुद्रकिनाराहि मोठा प्रेक्षणीय आहे. एके काळीं या बंदरांतून अरबस्तान, आफ्रिका व इराण या प्रदेशांशीं खूप मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे.

## मराठी लेखकाची भरपूर प्रशंसा

सुदामपुरीमध्यें सुदाम्याचें मंदिर असलेंच पाहिजे. त्या प्रमाणें तें येथें आहेहि. त्यांतील जुना भाग फार थोडा उरलेला आहे. देवळासमोरील सुंदर प्रशस्त मंडप तर अगदीं अलीकडे बांधलेला असावा असें दिसतें. त्या मानानें भक्तांची गर्दी मात्र येथें फार कमी दिसली.

सोन्याचांदीच्या सिगारेटच्या डब्या, लिपस्टिकच्या डब्या, आरसे वगैरे वस्तू तयार करणारा एक वैशिष्ट्यपूर्ण कारखाना-विश्वकर्मा एंजिनिअरिंग वर्क्स-येथें आहे. माझे मित्र प्रसिद्ध गुर्जर कवि श्री. रतिलाल छाया मला त्या कारखान्यांत घेऊन गेले. मला त्या शोभेच्या वस्तूंचें कांहीं आकर्षण नव्हतें, पण त्या कारखान्याचे मालक श्री. गोविंदभाई गज्जर मोठे मजेदार गृहस्थ वाटले. मला पहातांच ते म्हणाले, "म्हणजे हे 'आमची मुंबई'-वालेच गृहस्थ कीं नाहीं?" आणि त्यांनीं संयुक्त महाराष्ट्रवाद्यांवर हल्ला चढविला. श्री. छाया यांनीं त्यांना कसेंबसें सांभाळून घेतलें, पण नंतर ते मला म्हणाले, "तुम्ही कांहींहि म्हणा, तुमच्या वि. स. खांडेकरांसारखा लेखक मला अजून कांहीं कुणी भेटलेला नाहीं. आतांपर्यंत फक्त त्यांचींच पुस्तकें वांचलीं आहेत. त्यांच्यापुढें आमचे गुजराती लेखक अगदींच फुसके वाटतात." श्री. गज्जर मोठे कल्पक अन् बाणेदार आहेत. नव-नवीन कल्पना काढीत असतात. युरोप-अमेरिकेंत ज्या गोष्टी तयार होणार नाहींत, त्या आपण कराव्यात अशी त्यांची जिद्द असते. पाकिस्तानी पंतप्रधानांनीं मागितलेल्या सिगारेट केसवर जम्मू—काश्मीरचा भाग पाकिस्तानात घालावा लागेल म्हणून त्यांनीं भरपूर पैसे मिळत असतांहि कला-वंतानें सत्याशीं इमान राखलें पाहिजे, या मुद्यावर ती डबी करण्याचें नाकारलें. आतां राजेरजवाडे नाहींसे झाल्यामुळें त्यांच्या कारखान्याला काम मिळेनासें झालें आहे. यामुळेंच त्यांतील कामगारांची संख्या खूपच कमी झाली आहे.

पोरबंदरचें मुख्य प्रेक्षणीय स्थान म्हणजे कीर्तिमंदिर ! महात्मा गांधी ज्या घरांत जन्माला आले, त्या घराचें जुनें स्वरूप न बदलतां त्याच्या समोरच, त्याला जोडून एक भव्य इमारत उभारण्यांत आलेली आहे. हेंच तें कीर्तिमंदिर. गांधीजींच्या मृत्युसमयीं त्यांचें वय ८० वर्षांचें होतें, म्हणून या इमारतीची एकूण उंची ऐंशी फूट ठेवण्यांत आलेली आहे. मध्यें प्रशस्त चौक असून त्याच्या भोंवतीं मोठमोठ्या खोल्या बांधण्यांत आलेल्या आहेत. गांधीजींचा जन्म ज्या ठिकाणीं झाला होता ती खोली अत्यंत काळोखी असली पाहिजे. कारण आपल्या देशांत तशी पद्धतच होती व ती अजूनहि खेडोपाडीं रूढ आहे. पण आतां तेथें खिडक्या वगैरे पाडून भरपूर प्रकाश करण्यांत आलेला आहे. या घरांतील जिने मात्र चांगली अद्दल घडविणारे आहेत. इतके उतरते कीं नीट लक्ष ठेवलें नाहीं तर वरच्या पायरीवरून एकदम जमिनीवरच पोंचावयाचें. आणि अरुंदहि तसेच !

### गांधीजींच्या निवासस्थानीं इमारत

आपल्याकडे एखादें सार्वजनिक काम करावयाचें म्हणजे वर्गणी काढा, सरकारी–निमसरकारी संस्थांकडे भीक मागा, एकमेकांवर दोषारोप करा, तेव्हां कुठें कांहीं तरी काम दिसूं लागायचें; पण व्यापारी समाजामध्यें अशी कृपणता दिसून येत नाहीं. निदान गांधीजींच्या कीर्तिमंदिराच्या बाबतींत तरी वर्गणीचा प्रश्न उपस्थित झाला नाहीं. श्री नानजी कालिदास नांवाच्या स्थानिक कोट्याधीश व्यापारी गृहस्थांनीं या इमारतीसाठीं लागणारा सर्व खर्च ४॥ लाख रुपये स्वतः केला आणि ती इमारत मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत देऊन टाकली. श्री. वल्लभभाई पटेल यांनीं नुसती इच्छा प्रदर्शित केली आणि श्री. नानजीभाईनीं ती ताबडतोब पुरी केली. अर्थात् त्यांच्या दृष्टीनें ही रक्कम अगदींच क्षुल्लक होती. त्यांनीं सौराष्ट्रामध्यें स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठीं लक्षावधि रुपये खर्च केले आहेत. युगांडा (पूर्व आफ्रिका) येथें त्यांचे उसाचे अनेक मळे व स्वतःची रेल्वे असून 'उसाच्या मळ्यांचा राजा' (शुगरकेन किंग) या नांवानें ते प्रसिद्ध आहेत. पोरबंदरला 'आर्यकन्या गुरुकुल' नांवाची

एक संस्था त्यांनीं स्थापन केलेली असून भारतीय आदर्शाप्रमाणें मुलींना शिक्षण देण्याचा प्रयत्न तेथें केला जातो. स्वतः श्री. नानजी कालिदास यांच्या कन्याच त्या संस्थेचें संचालन करीत असतात. त्याखेरीज सौराष्ट्रामध्यें ठिकठिकाणीं मुलींच्या शाळांना व वसतिगृहांना या गृहस्थांनीं सढळ हातानें मदत केलेली आहे. पैशाचा असा सदुपयोग क्वचित् पहावयास मिळतो.

या कीर्तिमंदिराचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या इमारतीचा आराखडा ( प्लॅनिंग ) तयार करण्यापासून तो संपूर्ण इमारत उभी करण्यापर्यंतचें सगळें काम श्री. पुरुषोत्तम डाबी नांवाच्या एका स्थानिक स्थपतींनीं केलेलें असून त्यांचें शिक्षण फक्त प्राथमिक चार इयत्तांपर्यंत झालेलें आहे. आजच्या काळीं प्रत्येक ठिकाणीं डिग्री व पदवी यांचा पावलोपावलीं उदोउदो होत असतां एवढें मोठें काम एका अशिक्षित कारागिरानें करून दाखवावें ही कौतुकाची गोष्ट नाहीं, असें कोण म्हणेल? देशांतीलच नव्हे, तर परदेशांतील लोकहि जें स्थान पाहायला येणार तें सुंदर व आकर्षक बनविण्याच्या कामीं श्री. डाबी यांनीं चांगलेंच यश मिळविलें आहे.

### कीर्तिमंदिर–विधायक कार्याचें केंद्र

महात्माजींच्या पत्नी कै. कस्तुरबा गांधी यांचें ( माहेरचें ) घरहि गांधीजींच्या घरापासून जवळच आहे. परंतु त्यांच्यामध्यें इतर घरें असल्यामुळें लोकांना चांगलाच वळसा घालावा लागतो. आतां सौराष्ट्र सरकारनें मधलीं दोन घरें ताब्यांत घेतलीं आहेत आणि दोन्ही मुख्य घरांना जोडणारा रस्ता तयार करणें, हिरवळ तयार करणें वगैरे कामासाठीं गांधी स्मारक निधीनें दीड लाख रुपये मंजूर केले आहेत. ही सुधारणा अमलांत आली म्हणजे कीर्तिमंदिराची शोभा खूपच खुलून दिसेल यांत शंका नाहीं.

कीर्तिमंदिर ठराविक चाकोरींतील स्मारकाप्रमाणें मूर्तिपूजेचें ठिकाण बनूं नये यासाठीं येथें विधायक कार्याचें केंद्र ठेवण्यांत आलेलें आहे. सूत कांतण्याची सोय येथें आहे. लहान मुलांसाठीं व मोठ्या माणसांसाठीं वेगवेगळीं पुस्तकालयें आहेत. गांधीजींच्या जीवनांतील ठळक ठळक गोष्टी दाखविणारीं छायाचित्रें अत्यंत व्यवस्थितपणें मांडून ठेवण्यांत आलेलीं

आहेत. त्यांत आपल्याला सहसा पहावयास न मिळणारीं अशींहि अनेक चित्रें तेथें आहेत.

पोरबंदर पूर्वीपासूनच साहित्यिक व कलावंत यांचें आगर समजलें जातें. हार्मोनियमपटु श्री. द्वारकेशलालजी महाराज येथलेच. सध्यां मुंबईत रहात असलेले आजचे प्रथितयश गुर्जरकथा लेखक श्री. गुलाबदास ब्रोकर पोरबंदरचेच. मुंबई जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील एक विभागप्रमुख श्री. जगन्नाथ आहिवासी, ग्रामीण जीवनाचीं चित्रें रंगविणारे, पोर्ट्रेट पेंटर श्री. नारायण खेर, प्रसिद्ध कलासमीक्षक श्री. डी. जी व्यास आणि पोरबंदरचे महाराजा व नगररचनातज्ज्ञ श्री. नटवरसिंहजी ही मंडळी पोरबंदरचीच.

आतां सौराष्ट्राचें विलीनीकरण महागुजरातमध्यें झालें आहे, तरीहि प्रत्येक गांवाला व शहराला आपापल्या मोठ्या लोकांबद्दल अभिमान वाटतच असतो. श्री. रतिलाल छाया यांनीं मला पोरबंदरच्या कलावंतांसंबंधीं माहिती सांगितली, तेव्हां त्यांच्या चेहेऱ्यावरहि असाच अभिमान झळकत होता. अर्थात् ते स्वतः कांहीं कमी प्रतिभाशाली नाहींत. गुजरातींतील उत्कृष्ट कवि म्हणून त्यांची ख्याति आहे आणि आपल्या कविताहि ते सुंदर गाऊन दाखवितात !

●●●●

## मुंबईचा नक्षा उतरून टाकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारें
# कंडला बंदर : १५

### धांवती भेट

सौराष्ट्राचा दौरा करीत करीत मी द्वारकेला पोंचलों तेव्हां नोव्हेंबर १९५५ ची ९ तारीख उजाडली होती. ता. १३ ला दिवाळी होती. घरून निघाल्याला मला तीन आठवडे होऊन गेले होते आणि महाराष्ट्रीय माणूस कितीहि पुरोगामी अथवा निधार्मिक बनला तरी दिवाळीविषयीं त्याच्या मनांत असणारें जबरदस्त आकर्षण मुळींच कमी झाल्याचें आढळत नाहीं. यामुळें दिवाळी दिवशीं स्वतःच्या घरीं, आपल्या मुलांबाळांमध्यें जाऊन पोहोंचण्याची ओढहि मला लागलेली होती. यामुळें सौराष्ट्राचा परिचय करून घेतला तेवढा पुरे झाला, कच्छची मुशाफरी करण्यासाठीं पुनः केव्हां तरी यावें असा विचार मनांत घोळूं लागल्यास नवल नाहीं. वस्तुतः द्वारकेपासून कच्छ कांहीं तसें फार दूर नाहीं. योग्य साधनें असतील तर दोन—चार तासांत द्वारकेहून कच्छला जातां येईल. परंतु सरंजामशाही राजवटीच्या जोखडाखालून नुकत्याच मुक्त झालेल्या सौराष्ट्रांत वाहतुकीचीं साधनें फारच दुबळीं व अपुरीं असलीं तर काय आश्चर्य ? म्हणून कच्छमधील भुज, मांडवी वगैरे ठिकाणीं जाण्याचा बेत रहित करून फक्त कंडला बंदर पाहून यावें असें मीं ठरविलें. अर्थात् तेंहि कांहीं सोपें नव्हतें. द्वारकेहून राजकोटला जाऊन व तेथून वांकानेर जंक्शन (एकूण १६४ मैल) गांठावयाचें व तेथून मोरवीवरून नवलखी बंदरापर्यंत (४६ मैल) गाडीनें जावयाचें. तेथून फेरीबोटीनें किंवा वाफरांत बसून सुमारें २०–२२ मैलांची कच्छची खाडी ओलांडावयाची तेव्हां कुठें कंडला बंदर दिसणार ! वाहतुकीचीं साधनें व्यवस्थित असतील तर हा सव्वा दोनशें किंवा अडीचशें मैलांचा प्रवास कांहीं फार मोठा म्हणतां

येणार नाहीं. पण एवढ्या अल्प अंतरासाठींहि मला तीस तास घालवावे लागले. द्वारकेहून सायंकाळीं ४ ला मी निघालों आणि दुसरे दिवशीं रात्रीं ९-९॥ च्या सुमारास गांधीधामला पोंचलों.

## कंडला बंदराचें महत्त्व

वस्तुतः इतकी धडपड अन् धांवपळ करण्याची जरूर तरी काय होती असें कोणी विचारील. त्यावर माझें उत्तर असें कीं कंडला बंदराला दिवसेंदिवस जें महत्त्व येत आहे त्यामुळें तें बंदर आहे तरी कसें हें पाहण्याची तीव्र उत्कंठा माझ्या मनांत निर्माण झाली होती. म्हणून कच्छचा फेरफटका करणें जमलें नाहीं तरी निदान इतक्या दूर आल्यानंतर कंडला बंदर तरी नजरेखालून घालावयाचेंच असें मीं ठरवलें आणि त्याप्रमाणें तें पाहून आलों.

अखंड भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर मुंबई व कराची हीं दोन मुख्य व मोठीं बंदरें होतीं. यांपैकीं मुंबईचे हात पश्चिम व मध्यभारतापर्यंत पोंचलेले



बोटीवरून दिसणारें कंडला बंदर

होते आणि कराचीनें उत्तर भारताचा व्यापार आपल्याकडे ओढून घेतलेला होता. सिंध, पंजाब, राजस्थान व उत्तर प्रदेश आणि कच्छ व

सौराष्ट्र एवढा प्रदेश कराचीच्या कक्षेंत येत होता. तें बंदर पाकिस्तानांत गेल्यामुळें मुंबईवरील ताण भयंकरच वाढला आणि कच्छ, सौराष्ट्र, राजस्थान, पंजाब व उत्तर प्रदेश या विभागाला मुंबईवर अवलंबून राहावें लागलें. याचा प्रत्यक्ष व्यापारावर काय परिणाम होतो याची कल्पना आपल्यासारख्या व्यापारांत अनभिज्ञ असणाऱ्या लोकांना सहसा येत नाहीं. मीहि याला अपवाद कसा असेन ? पण नवलखी बंदराहून कंडला बंदराकडे वाफरांतून जात असतां प्रवासांत भेटलेल्या एका सिंधी व्यापाऱ्याला मीं यासंबंधीं प्रश्न विचारला. तेव्हां तो म्हणाला, 'माझा स्वतःचाच अनुभव तुम्हांला सांगतों म्हणजे तुमच्या लक्षांत येईल. मी एक छोटा दुकानदार आहे. माझं सायकलचं दुकान आहे. मला लागणारं सामान जर मीं मुंबईहून मागवलं तर मला रुपयाला ६ पैसे खर्च येतो. उलट दिल्लीहून सामान मागविलं तर ४ पैसे किंवा कित्येकदां २ पैसेहि खर्च येतो. याचं कारण मुंबईपर्यंतचं अंतर जास्त आहे अन् वाहतुकीचीं साधनंहि चांगलीं नाहींत.'

'पण मग तुम्हीं सगळं सामान दिल्लीहूनच कां मागवीत नाहीं ?' मीं विचारलें.

'आम्हांला लागणाऱ्या सगळ्याच गोष्टी दिल्लीला मिळतात असं नाहीं. शिवाय भावांत फरक पडतोच. दिल्लीचा माल मुंबईहूनच गेलेला असतो. यामुळं तो मुंबईपेक्षां महाग पडतो. तेव्हां मालाचा दर अन् वाहतूक खर्च यांचा विचार करून आम्हांला ऑर्डर द्यावी लागते. उद्यां कंडला बंदरांतून वाहतूक सुरू झाली कीं मुंबईपेक्षांहि जास्त स्वस्त माल इथं मिळूं लागेल; कारण कंडला ते मुंबईपर्यंतचं अंतर कमी होईल. आणि दिल्लीलाहि माल थोड्या वेळांत नि कमी खर्चांत मिळूं लागेल.'

अशी आहे ही व्यापारी ग्यानबाची मेख ! कंडला बंदर झाल्यानंतर उत्तर भारतांत जाणाऱ्या ( व येणाऱ्या ) मालाचा सुमारें दोनशें मैलाचा रेल्वे-प्रवास वांचेल आणि तेवढ्यानेंच दरसाल ९० ( नव्वद ) लाख रुपयांचा दळणवळण खर्च कमी होईल. शिवाय वेळ व परिश्रम वांचतील तें वेगळेंच.

## थोडासा इतिहास

हिंदुस्थानला जवळजवळ ३५०० मैल लांबीचा समुद्र–किनारा लाभला आहे. वस्तुतः ही किती भाग्याची गोष्ट आहे! समुद्र–किनाऱ्यामुळें संरक्षण तर होतेंच, पण जमिनीवरील वाहतुकीपेक्षां समुद्रांतील वाहतूक ही अनेक पटींनीं स्वस्त असल्यामुळें त्या दृष्टीनेंही समुद्राचा खूप उपयोग होतो. परंतु दीडशें वर्षांच्या पारतंत्र्याच्या काळांत इकडे कोणालाच लक्ष देतां आलें नाहीं. म्हणून या साडेतीन हजार मैल लांबीच्या किनाऱ्यावर फक्त पांच मोठीं बंदरें निर्माण होऊं शकलीं. ती म्हणजे मुंबई, मद्रास, कलकत्ता, कोचीन व विशाखापट्टण हीं होत. यांच्यापेक्षां कितीतरी अधिक बंदरांची आपल्याला आवश्यकता आहे; आणि त्या दृष्टीनें स्वतंत्र भारताच्या सरकारनें प्रयत्नहि सुरू केला आहे.

कंडला बंदराचें नांव जरी आपण नुकतेंच ऐकूं लागलों असलों तरी पश्चिम किनाऱ्यावर कोठें कोठें मोठीं बंदरें ( Major ports ) तयार करतां येतील हें पाहाण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या ‘ दि वेस्ट कोस्ट मेजर पोर्ट डेव्हलपमेंट कमिटी’नें भारताच्या फाळणीपूर्वींच म्हणजे १९४६ सालीं या ठिकाणीं मोठें बंदर तयार करण्याची शिफारस केलेली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अर्थात् हें बंदर अगदींच नवें नसून सुमारें पंचवीस वर्षांचें जुनें आहे. इ. स. १९३० सालीं कच्छचे महाराज यांनीं स्थानिक गरजा भागविण्यासाठीं म्हणून हें छोटेसें बंदर बांधलें. आज त्याला जुनें बंदर (Old port) असें म्हणतात. सध्यां नवलखीहून जाणारीं वाफरें याच बंदराला लागतात आणि तेल, मीठ वगैरे मालाची वाहतूक याच बंदरांतून होते. अजून नव्या बंदरांत माणसांचीं जहाजें येऊं लागलेलीं नाहींत. यामुळें सगळी वाहतूक या जुन्या बंदराच्या द्वारेंच होते. नवें कंडला बंदर या जुन्या बंदराजवळच असून नवें बंदर तयार झाल्यानंतरहि हें जुनें बदर आपलें काम करीतच राहील असें दिसतें.

श्री. कस्तुरभाई लालभाई यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या पश्चिम भारत मुख्य बंदर कमिटीनें १९४८ सालीं कंडला येथें मोठें बंदर व्हावें

अशी शिफारस केली आणि ती भारत सरकारनें तावडतोब स्वीकारली व १९४९ सालीं प्रारंभिक कामाला सुरुवातहि झाली. प्रत्यक्ष कामास सुरुवात (पायाभरणी) ता. १० जानेवारी १९५२ रोजीं भारताच्या पंतप्रधानांच्या हस्तें झाली.

## आणि गांधीधाम

याच वेळीं भारताच्या फाळणीमुळें सिंधमध्यें शांततेच्या आशेवर राहिलेले हजारो हिंदुलोक निर्वासित बनून भारतांत येऊं लागले. सिंधपासून



गांधीधाम

कच्छचा प्रदेश जवळ आहे आणि तेथील हवापाणी व एकूण वातावरण सिंधी लोकांना मानवणारें आहे; यामुळें आपल्याला कच्छमध्यें वस्ती करून राहतां आलें तर बरें होईल असें सिंधी निर्वासितांना वाटलें असल्यास नवल नाहीं.

श्रीप्रताप दियालदास (दयाळदास) या सिंधी धनिकांनीं आपल्या कांहीं मित्रांच्या सहकार्यानें १९४७ सालींच 'सिंधु रीसेटलमेंट कार्पोरेशन लिमिटेड' (सिंधु पुनर्वसाहत संस्था) नांवाची जॉइंट स्टॉक कंपनी स्थापन केली व भारतसरकारकडे (कारण कच्छचा प्रदेश भारत

सरकारच्या हुकमतीखालीं आहे ) कंडला बंदराजवळ पंधरा हजार एकर जमिनीची मागणी केली. त्याप्रमाणें जानेवारी १९४८ मध्यें ही जमीन दरसाल १ हजार रुपयाच्या नाममात्र भाड्यानें कंपनीला मिळाली.

पुढें १२ फेब्रुवारी १९४८ रोजीं राष्ट्रपिता गांधीजींची थोडीशी रक्षा कंडलाच्या खाडीमध्यें आचार्य जे. बी. कृपलानी यांच्या हस्तें विसर्जित करण्यांत आली आणि त्याच दिवशीं नव्या नगरीचा पायाभरण समारंभ झाला व तिला ‘ गांधीधाम ’ असें नांव देण्यांत आलें. आचार्य जीवनराम कृपलानी हे या सिंधु रीसेटलमेंट कार्पोरेशनचे अध्यक्ष ( चेअरमन ) असून श्री भाईप्रताप दयाळदास हे ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. तेव्हांपासून या नगरीची निर्मिति मोठ्या वेगानें सुरू असून आतांपर्यंत पुष्कळच काम झालेलें आहे.

## कंडला बंदराचीं वैशिष्ट्यें

परंतु गांधीधामची माहिती करून घेण्यापूर्वीं कंडला बंदराचाच परिचय करून घेणें आवश्यक आहे. कारण कंडला बंदर येथें झालें नसतें तर गांधीधामाकडे कोणाचें लक्ष गेलें असतें कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे. किंबहुना कंडला बंदर झालें नसतें तर गांधीधामहि उभें राहिलें असतें असें सांगतां येत नाहीं.

कंडला बंदर हें मोठें बंदर बनविण्यांत यावें अशी जी शिफारस ‘ दि वेस्ट कोस्ट मेजर पोर्ट डेव्हलप्मेंट कमिटी’नें केली तिचीं कारणें काय आहेत हें प्रथम पाहिलें पाहिजे.

कराची पाकिस्तानांत गेल्यामुळें पंजाब, राजस्तान, उत्तर प्रदेश वगैरे प्रदेशाला मुंबईसारख्या दूर अंतरावरच्या बंदरावर अवलंबून राहावें लागूं लागलें आणि म्हणून कराची व मुंबई यांच्या दरम्यान एखाद्या मोठ्या ( Major ) बंदराची आवश्यकता फाळणीमुळें निर्माण झाली होती हें वर सांगितलेंच आहे. ही आवश्यकता पुरी करण्यासाठीं सौराष्ट्रांतील भावनगर, पोरबंदर, ओखा वगैरेपैकीं एखादें बंदर निवडतां आलें नसतें असें नाहीं. पण या सर्व बंदरांपेक्षां कंडलाजवळ एक वैशिष्ट्य होतें. तें म्हणजे त्याची वांकण असलेली खोल खाडी. कोणत्याहि ठिकाणीं

उत्कृष्ट बंदर बनवावयाचें असेल तर त्याला दोन गोष्टी आवश्यक असतात : एक म्हणजे मोठमोठीं वादळें आणि वावटळी यांपासून तें स्थान सुरक्षित असलें पाहिजे. ( अशा प्रदेशाला 'sheltered waters' असें म्हणतात. ) म्हणजे तें बंदर अगदीं उघड्यावर असतां कामा नये. ( अर्थात् उघड्यावर असलेलें बंदर शत्रूच्या माऱ्यांत चटकन् सांपडतें हाहि त्याचा एक दोष असतोच. ) आणि दुसरी गोष्ट अशी कीं बंदराजवळील पाणी खोल असलें पाहिजे. पाणी खोल नसेल तर मोठमोठ्या जहाजांना बंदरापर्यंत येतांच येणार नाहीं. शिवाय बंदरभाग चांगला विस्तृत असला पाहिजे. तो इतका ऐसपैस असला पाहिजे कीं आंत येणाऱ्या जहाजाला कोणतीहि अडचण न पडतां इकडे तिकडे वळतां आलें पाहिजे.

कंडलाच्या बाबतींत या सर्व अटी पूर्ण झालेल्या आहेत. कंडला बंदर हें कच्छच्या आखाताच्या एका टोंकाला एखाद्या नालाच्या आकाराच्या ६ मैल लांबीच्या दक्षिणोत्तर खाडीच्या ( Creek ) किनाऱ्यावर आहे. त्यामुळें उघड्या समुद्रांत ( open sea ) उठणाऱ्या वादळांची भीति त्याला नाहीं. या खाडींतील पाणी पावसाळ्यांतहि फार शान्त राहतें. तेथें खोलीहि भरपूर म्हणजे ३० फूट ड्राफ्टवाल्या मोठ्या बोटी ( स्टीमर्स ) सहज ये-जा करूं शकतील एवढी म्हणजे संथ जलपृष्ठाच्या (lowest tide) खालीं ३० ते ५५ फूट इतकी आहे. ( ड्राफ्ट म्हणजे कोणत्याहि गलबताला तरण्यासाठी लागणारें पाणी. ) या नालाच्या आकाराच्या खाडीची सरासरी रुंदी २५०० फूट ( कांहीं ठिकाणीं २ हजार फूट तर कांहीं ठिकाणीं ३ हजार फूट आहे ) असल्यामुळें एका वेळीं अधिक जहाजें बंदरांत राहूं शकतात आणि बंदरांत येणाऱ्या जहाजांना हालचाली करतांना अडचण भासत नाहीं. मी ज्या वेळीं रात्रीं ८च्या सुमारास कंडला बंदरांत प्रवेश केला त्या वेळीं तेथें एक प्रचंड तेलवाहू जहाज येऊन थांबलेलें होतें. त्याच्यावरील दिव्यांच्या झगझगाटामुळें तो एखादा तरता राजवाडाच असावा असा त्या अंधारांत भास होता. पाण्याची खोली व उथळपणा दाखविणारे विजेचे दिवेहि संबंध खाडीमध्यें रस्त्याच्या दोन्ही बाजूस लुकलुकत असून रात्रींच्या वेळीं त्यांची शोभा मोठी छान दिसत होती.

## एक मोठा दोष

परंतु या बंदरांतहि एक फार मोठा दोष आहे व तो निसर्गानेंच निर्माण केलेला आहे. तो असा कीं या खाडीच्या तोंडाशीं एक रेतीचा मोठा बंधारा आहे. याला इंग्रजींत 'बार' (Bar) असें म्हणतात. बंदरांत शिरणाऱ्या प्रत्येक जहाजाला हा बंधारा ओलांडून आंत प्रवेश करावा लागतो. या बंधाऱ्यावर ओहटीच्या वेळीं १३ फूट पाणी असतें. यामुळें त्या वेळीं मोठीं जहाजें येथून जाऊं-येऊं शकत नाहींत. परंतु ज्या निसर्गानें हा अडथळा निर्माण केला आहे त्यानेंच त्यांतून सुटण्याचा एक मार्गहि स्वतःच्या हातीं राखून ठेवलेला आहे. त्यासाठीं माणसाला निसर्गाच्या इच्छेवर किंवा कालचक्रावर अवलंबून राहावें लागतें एवढेंच. पण त्या बाबतींत निसर्ग आडदांडपणा किंवा लहरीपणा मात्र मुळींच करीत नाहीं, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. हा मार्ग म्हणजे भरतीची लाट. समुद्राच्या ऐन भरतीच्या वेळीं येथील पाण्याची उंची (Tidal Range) जवळ जवळ २४ फुटांनीं वाढते. सप्तमी-अष्टमीच्या दिवशींहि पाणी १६ फुटांनीं चढतें. यामुळें भरतीच्या वेळीं मोठ्या जहाजांना या बंधाऱ्यावरून सहज आंत प्रवेश करतां येतो व बाहेर पडतां येतें. अर्थात् त्यामुळें बोटींच्या अष्टौप्रहर गमनागमनांवर निर्बंध पडतो व भरती-ओहटीच्या वेळा सांभाळाव्या लागतात हें मान्य केलेंच पाहिजे. पण सगळ्याच बंदरांतून अष्टौप्रहर जहाजांची ये-जा चालू शकते असें थोडेंच आहे? त्यामुळें हा दोषहि फार तापदायक आहे असें म्हणतां येत नाहीं. मात्र या बंधाऱ्याचा विस्तार वाढूं नये किंवा खाडींतील एखाद्या ठिकाणचें पाणी उथळ होऊं नये यासाठीं रेती हटविण्याचें (ड्रेजिंग) काम सतत करावें लागणार आहे. पण तें तर सर्व बंदरांतून करावेंच लागतें.

## आंतर-प्रदेशाची भरभराट

मोठ्या बंदरासाठीं जागेची निवड करतांना आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. ती म्हणजे त्याच्या आसपासचा आंतरप्रदेश (Hinter-land) ही होय. कंडला बंदराला सुमारें चार कोटि पन्नास लक्ष लोकसंख्या असलेला, दोन कोटि सत्तर लक्ष चौरस मैलाचा उत्तर

व पश्चिम भारताचा प्रदेश ' आंतर–प्रदेश ' म्हणून लाभलेला आहे. या भागांत दुसरें मोठें बंदर नसल्यामुळें त्यांतील सगळी वाहतूक याच बंदरामार्फत होईल. म्हणजे या बंदराला कामाची उणीव अशी कधीं भासणार नाहीं. हें बंदर बनवण्यापूर्वी कच्छचा प्रदेश इतर भारतापासून जवळ जवळ वेगळा पडलेला होता. याच्या पश्चिमेस व दक्षिणेस समुद्र असून उत्तरेची व पूर्वेची बाजू कच्छच्या रणानें व्यापलेली आहे. या रणांत पावसाळ्यामध्यें मान्सून वाऱ्यामुळें समुद्राचें पाणी शिरतें आणि त्याच वेळीं कांहीं नद्याहि आपापल्या पुरांचें पाणी घेऊन या रणांत प्रवेश करतात. त्यामुळें एरव्हीं कोरडें ठणठणीत असणारें हें रण जुलैपासून नोव्हेंबरपर्यंत सुमारें सहा महिने पाण्यानें तुडुंब भरलेलें असतें. त्या वेळीं कच्छला एखाद्या बेटाचें स्वरूप प्राप्त झालेलें असतें. ही परिस्थिति नाहींशी करण्यासाठीं कच्छला रेल्वेच्या द्वारें, खुष्कीच्या मार्गानें इतर भारतीय प्रदेशांशीं जोडण्याचें भारत सरकारनें नोव्हेंबर १९४९ मध्यें ठरविलें व त्याप्रमाणें जानेवारी १९५० मध्यें कामाला सुरुवात होऊन २ ऑक्टोबर १९५२ रोजीं राष्ट्रपति डॉक्टर राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें कंडला ( गांधीधाम )–डीसा या १७० मैलांच्या मीटर गेज रस्त्याचें उद्‌घाटनहि झालें. किती झपाट्यानें हें काम झालें याची कल्पना मनांत आली कीं मन आश्चर्यानें थक्क होतें. या रेल्वेमुळें कच्छचा भाग अहमदाबाद–अजमेर या रेल्वे फांट्याला पालनपूरजवळ जोडला गेला. कारण डीसा–पालनपूर रेल्वे फांटा ( १७ मैल ) पूर्वींपासून विद्यमान होताच. आतां आणखी एक ब्रॉड गेज ( मोठ्या लाईन ) चा फांटा काढून कंडला बंदराचा संबंध अहमदाबाद शहराशीं जोडण्याची योजना अंमलांत आणली जात आहे. अहमदाबादपर्यंत मोटार रस्ता ( Highway ) बांधण्याचें काम तर सुरूहि झालें आहे. यामुळें या रेल्वे व मोटार मार्गावरील भागांत एक नवीन चैतन्य व उत्साह खेळूं लागेल आणि व्यापार-धंदा वाढल्यानें त्याची भरभराट होऊं लागेल. हीच गोष्ट राजस्थानलाहि लागू आहे.

एक बंदर झाल्यामुळें या भागांतील सगळ्या सुप्त शक्ती जागृत होतील आणि उद्योगधंद्यांना फार मोठें उत्तेजन मिळेल ही गोष्ट आत्तांच

स्पष्ट दिसूं लागली आहे. मालाची आयात-निर्यात सहजासहजीं होऊं शकतें अशी परिस्थिति नसेल तर तेथील उद्योगी लोक (मारवाडी कच्छी वगैरे) आपला प्रदेश सोडून अन्यत्र जातात. आतां त्यांना अन्य प्रान्तांत किंवा परदेशांत जावें लागणार नाहीं.

## निम्म्याहून अधिक आयात तेलाची

कंडला बंदरामध्यें बाहेरून येणाऱ्या मालामध्यें सर्वांत अधिक प्रमाण तेलाचें (पेट्रोल, रॉकेल वगैरे) राहणार आहे. १९४५-४६ सालीं या जुन्या बंदरांतून साठ हजार टनापेक्षांहि कमी वजनाच्या मालाची आयात-निर्यात झाली होती. ती १९५५-५६ सालीं आठ लाख टनापर्यंत वाढेल असा अंदाज आहे. बंदराचा पूर्ण विकास झाला म्हणजे हीच आयात-निर्यात तीस लाख टनापर्यंत जाईल. यावरून या बंदराच्या अवाढव्यपणाची कल्पना येईल. कराची मधून १९ लाख टनाचा व्यापार चालत होता आणि मुंबईमधून ४० लाख टन वजनाचा व्यापार चालतो. यावरूनहि या बंदरासंबंधीं कांहीं कल्पना येऊं शकेल. या बंदराचा पहिला टप्पा पूर्ण झाला म्हणजे यांतून कोणकोणत्या मालाची आयात-निर्यात होईल हें पुढील आंकड्यांवरून लक्षांत येईल:—

| आयात | | निर्यात | |
|---|---|---|---|
| तेलें | ५ लाख टन | मीठ | ७५ हजार टन |
| अन्नधान्यें | ५० हजार ,, | भुईमूग | २० ,, ,, |
| कापूस | ३० ,, ,, | कापूस | १० ,, ,, |
| कापड | ३० ,, ,, | लोंकर | १५ ,, ,, |
| इमारत सामान | २६ ,, ,, | हाडें व हाडांचें खत | १२ ,, ,, |
| दगडी कोळसा | २२ ,, ,, | इतर सामान | ११ ,, ,, |
| यंत्रें औषधें | २५ ,, ,, | | |
| इतर सामान | ८९ ,, ,, | | १,४३,००० |
| एकूण | ७,७२,००० | | |

यावरून सर्वप्रथम हें लक्षांत येतें कीं या बंदरामध्यें रॉकेल, पेट्रोल वगैरे

तेलेंच प्रामुख्यानें आयात होणार असून त्यांचें प्रमाण निम्म्याहून अधिक आहे. यामुळें या भागांत या तेलांची अगदीं रेलचेल होऊन जाईल. डीसा–गांधीधाम रेल्वे रस्त्यावर चालणाऱ्या वाफेच्या आगगाड्यांचे बॉयलर वाटेंतील खारट पाण्यामुळें ( Hard Water ) खराब होऊं नयेत म्हणून त्या मार्गावर तेलावर चालणारीं एंजिनें ( diesel locomotives ) वापरावींत अशीहि कल्पना कांहीं लोकांच्या डोक्यांत आहे. त्याचें कारण येथें तेल स्वस्त पडेल हेंच होय.

जुन्या कंडला बंदरांतहि तेल उतरून घेण्यासाठीं एक उत्कृष्ट धक्का ( Oil jetty ) असून त्याच्या द्वारें बराच मोठा तेल–पुरवठा कच्छच्या आंतरप्रदेशांत होत असतो. येथील तेलाचे जाडजूड नळ पाहाणाऱ्याचें लक्ष चटकन् वेधून घेतात. हा धक्का मीं नीट हिंडून पाहिला. पण तो लक्षांत राहाण्याचें कारण मात्र वेगळेंच आहे. जुन्या बंदर कचेरींतील ( Oil Port Office ) जे वृद्ध गृहस्थ तो धक्का दाखविण्यासाठीं माझ्या-बरोबर आले होते त्यांचा चेहरा, रंग डोळे, कपाळाचें गंध व कपडे हीं सर्व आपल्याकडील अस्सल कोंकणस्थ ब्राह्मणासारखीं होतीं. यामुळें मी फसून त्यांना महाराष्ट्रीयच समजलों. पण ते कच्छी ब्राह्मण निघाले. वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकांत इतकें विलक्षण साम्य क्वचितच आढळतें. यामुळें ते गृहस्थ आणि तो तेल–धक्का दोन्हींहि माझ्या लक्षांत पक्कीं राहिलीं आहेत.

### ८ एप्रिल १९५५

कंडला बंदराच्या इतिहासांत ता. ८ एप्रिल १९५५ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा गणला जाईल. कारण त्या दिवशीं भारताचे वाहतूक व रेल्वे मंत्री श्री. लालबहादुर शास्त्री यांच्या हस्तें तेथील तेलधक्क्याचें उद्‌घाटन होऊन कंडला हें भारतांतील मुख्य बंदर झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. तेव्हांपासून या बंदरांत तेलाची मोठ्या प्रमाणावरील आयात सुरू झाली आहे. अर्थात् त्या वेळीं जरी तेल–धक्क्याचें उद्‌घाटन झालें असलें तरी त्याचें काम पुरें झालें नव्हतें. मी गेलों त्या वेळीं हा धक्का पूर्ण होऊन मोठीं तेलवाहू जहाजें येण्यास सुरुवात झाली होती. आपण आगगाडींतून जुन्या कंडला बंदरापासून गांधीधामला ( ६ मैल ) जाऊं लागलों कीं

वाटेंत बर्माशेल, काल्टेक्स व स्टँडर्ड व्हॅक्यूम ऑईल कंपन्यांच्या प्रचंड पांढऱ्या शुभ्र टांक्या रेल्वेच्या दोन्ही बाजूंना दिसतात. यांत तेलाचा सांठा करण्यांत येतो व तेथून तो रेल्वेनें रवाना होतो. या टांक्या देशपांडे नांवाच्या महाराष्ट्रीय कॉंट्रॅक्टरनीं बांधल्या आहेत असें समजलें तेव्हां इतक्या लांब येऊन कंत्राट घेणाऱ्या मराठी माणसाचें कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

तेलाच्या आयातीवरच मुख्यत: लक्ष केंद्रित करण्यांत आलेलें असल्यामुळें तेलाच्या वहातुकीसाठीं आधुनिकतम साधनें वापरण्यांत येत असली तर आश्चर्य नाहीं. तेथें तेलवाहू जहाजांसाठीं एक खोल पाण्यांतील धक्का (deep–water berth), एक थांबण्याचा धक्का (waiting berth), १२ इंच व्यासाचा एक व १६ इंच व्यासाचा एक असे दोन तीन हजार फूट लांबीचे प्रचंड लोखंडी नळे एवढी सामुग्री तेथें सज्ज आहे. यांपैकीं १२ इंची नळ पेट्रोलसाठीं (white oils) व मोठा नळ रॉकेल, क्रूडॉइल्स (black oils) वगैरेंसाठीं आहे. जहाजांतील तेल या नळांच्या द्वारें पंपानें (booster pumps) सरळ पांच मैल दूर असलेल्या टांक्यांत सोडण्यांत येतें. या पंपाच्या द्वारें दर मिनिटास २५०० गॅलन तेल दर चौरस इंचास ३०० ते ४०० पौंडाच्या दाबानें टाक्यांतून भरलें जातें.

## सायकलवरून फेरफटका

वस्तुतः मला गांधीधामच्या गोपालपूर भागांत एका गुजराती मित्राकडे उतरावयाचें होतें. परंतु रेल्वेच्या लहरीपणामुळें गांधीधाम स्टेशनपर्यंत पोंचायलाच दहा वाजून गेले. तेथून गोपालपूर दोन मैलच असले तरी गाडी तेथपर्यंत पोंचायला तासभरसुद्धां सहज घेईल आणि मग अपरिचित ठिकाणीं अपरात्रीं पत्ता शोधून काढणेंहि जमणार नाहीं म्हणून गांधीधाम स्टेशनजवळच्या रेल्वे कॉलनींतच मीं एखाद्या हॉटेलांत उतरावें असा पोक्त सल्ला गाडींतील उतारू मित्रांनीं दिल्यामुळें मी गांधीधाम स्टेशनवरच उतरलों आणि रोजीं फक्त एक रुपया निवास–शुल्क घेणाऱ्या एका स्वस्त सिंधी हॉटेलांत (यापेक्षां अधिक स्वस्त हॉटेल कोठें असेल असें मला

बंदराच्या आसपास बराचसा भाग दलदलीचा आहे. तो भरून काढण्यासाठींहि बराच खर्च करावा लागेल. परंतु सध्यां त्याची घाई नाहीं. बंदरापासून गांधीधामापर्यंतचा ८ मैलांचा प्रदेश सध्यां तरी मोकळाच राहील. जसजशी आयात–निर्यात वाढत जाईल तसतसा हा प्रदेश वापरांत येऊं लागेल असें वाटतें.

## पुनश्च गांधीधाम

अशा प्रकारें हें बंदर आधुनिक सुखसोयींनीं सज्ज करून त्याला पश्चिम किनाऱ्यावरील उत्कृष्ट बंदर बनविण्यासाठीं भारत सरकार प्रयत्न करीत आहे. त्यांतील बारीक सारीक गोष्टी विषयीं इतक्यांत विस्तारानें लिहितां येणार नाहीं. १९५७ सालीं तें पुरें झालें म्हणजेच त्याचें यथातथ्य चित्र आपल्या समोर येऊं शकेल. तोंपर्यंत आपण तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या भागाकडे म्हणजे गांधीधामाकडे वळून त्याचें विहंगावलोकन करूंया.

बंदरभाग हा मध्यवर्ती सरकारच्या अधिकार-कक्षेंतील असून तेथील सगळें काम ज्या बंदर अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं चाललेलें आहे त्याला 'डेव्हलपमेंट कमिशनर' असें म्हणतात. याच्या उलट गांधीधामची जबाबदारी प्रारंभीं उल्लेखलेल्या 'सिंधू रिसेटलमेंट कार्पोरेशन'वर आहे. या कंपनीचें अधिकृत भांडवल अडीच कोटींचें असून तेवढ्यापुरती सरकारची देखरेख या कामावर राहील असें म्हणतां येईल. शिवाय सरकारनें १ कोटि १० लाख रुपये इमारती बांधण्याकरितां लांब मुदतीनें कर्जाऊहि दिले आहेत.

या नगराचा प्रारंभीं जो आराखडा (master plan) तयार करण्यांत आला होता त्यांत १० ते १२ लाख लोकसंख्येच्या निवासाची तरतूद होती; त्याप्रमाणें आदिपूर व सरदार गंज या दोन उपनगरांची आंखणी करून कामहि हातीं घेण्यांत आलें. परंतु तो अव्यवहार्य असल्याचें लौकरच आढळून आलें. म्हणून दुसरा आराखडा तयार करण्यांत आला. त्यांत ५ लाख लोकसंख्येचा समावेश करण्याचें उद्दिष्ट होतें. परंतु अविकसित आंतरप्रदेश (undeveloped state of the hinterland), आणि कंडला बंदराची मर्यादित प्रगति पाहतां हा आराखडाहि सध्यां अव्यवहार्य



उद्यांच्या कंडला बंदराचा देखावा

असल्याचें आढळून आलें आणि एका अमेरिकन कंपनीकडून तिसरा आराखडा तयार करवून घेण्यांत आला. या आराखड्यामध्यें ६० हजारापासून ४ लाखांपर्यंत हळूहळू वाढत जाणाऱ्या लोकवस्तीची कल्पना आहे. आतां याच आराखड्याप्रमाणें काम चालू असून आदिपूर, सरदार गंज (सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ), गोपालपुरी (श्री. एन्. गोपालस्वामी अय्यंगार यांच्या स्मरणार्थ) आणि रेल्वे कॉलनी अशीं चार छोटीं उपनगरें तयार झालीं आहेत. यांच्यांत भरपूर अंतर असल्यामुळें पुढें मागें वाटेल तितकी वाढ करतां येईल.

सरकारकडून मिळालेल्या मदतीवर आतांपर्यंत ३१२४ घरें व ३४८ दुकानें बांधून तयार झालीं आहेत. हीं घरें व दुकानें निर्वासितांना विकत देण्यांत आलेलीं असून त्यांचीं किंमत त्यांनीं २५ वर्षांत फेडावयाची आहे. कांहीं निर्वासितांना त्यांच्या पाकिस्तानांत राहिलेल्या मालमत्तेचा मोबदला म्हणूनहि घरें व दुकानें मिळालेलीं आहेत.

याखेरीज बंदर विभाग आणि रेल्वे खातें यांनींहि आपापल्या नोकरवर्गाकरितां घरें बांधलेलीं आहेत.

गांधीधामाच्या सर्व घरांतून राहात असलेल्या लोकांची एकूण संख्या आतां सुमारें २५ हजार झालेली आहे. या सर्व घरांना पाणी व वीज यांचा पुरवठा झालेला असून ही सर्व जबाबदारी 'सिंधु रीसेटलमेंट कार्पोरेशन' (S. R. C.) वर आहे. सध्यां तेथें म्युनिसिपालटी वगैरे नाहीं. त्यामुळें नगरपालिकेचें कामहि कार्पोरेशनच करते. नगरनिर्मितीसाठीं लागणारें सीमेंट, विटा, ह्यूम पाइप्स, लाकूडकाम, लोखंडी सामान वगैरे वस्तूंसाठीं कार्पोरेशननें स्वतःचे कारखाने उभारलेले असून त्यांतून फार मोठ्या प्रमाणावर माल तयार होतो आणि बांधकाम झटपट होण्यास त्यायोगें मदत होते.

### मुख्य प्रश्न पाण्याचा

कंडला बंदर आणि गांधीधाम यांचें भवितव्य जर कोणत्या एका गोष्टीवर अवलंबून असेल तर ती म्हणजे पिण्याचें पाणी होय. कंडला व गांधीधामच नव्हे तर सारा कच्छ देशच वालुकामय आणि रणानें वेढलेला

असा आहे. येथें गोडें पाणी मिळणें ही गोष्ट सोन्याची खाण सांपडण्यापेक्षांहि जास्त मोलाची व महत्त्वाची आहे. जर येथें भरपूर गोडें पाणी मिळूं शकलें तर येथील लोकसंख्या वाटेल तितकी वाढू शकेल आणि वृक्षराजीचीं दृश्यें दिसूं लागून या भागाला नंदनवनाचें स्वरूप प्राप्त होईल. पण सारें घोडें येथेंच पेंड खात आहे.

गांधीधामाच्या वायव्येस चार मैलांवर वीडी नांवाच्या गांवाजवळ सध्यां पांच नलिकाकूप (ट्यूब वेल्स) तयार करण्यांत आलेलें असून त्यांचें पाणी सर्वत्र पोंचविलें जात आहे. आदिपूर विभागांत मुख्यतः वरिष्ठ अधिकाऱ्यांची वस्ति असल्यामुळें तेथें घरोघरीं नळ जाऊन पोंचले आहेत. परंतु इतरत्र सार्वजनिक हौदावरूनच पाणी न्यावें लागतें. याखेरीज नागलपूर आणि खंभरा या गांवांतूनहि पाणी आणण्याची योजना ( Pilot Water supply Scheme ) सध्यां चालू आहे. परंतु हें सगळें पाणी मिळालें तरी तें दोन लाखापेक्षां अधिक लोकसंख्येला पुरणार नाहीं. पाण्याचा प्रश्न असा महत्त्वाचा होऊन बसल्यामुळें जेथें माणसांनाच पुरेसें पाणी मिळेल कीं नाहीं याची शंका आहे तेथें झाडांकडे कोण लक्ष देणार? सिं. री. कार्पोरेशननें स्वतःच्या आवारांत बांधलेल्या सुमारें १२ मैल लांबीच्या रस्त्याच्या कडेला १५११५ झाडें लावलेलीं आहेत. त्यांपैकीं जीं मोठीं झालीं आहेत त्यांच्याबद्दल फारशी चिंता नाहीं. पण नव्या झाडांना पाणी कसें मिळणार याविषयीं तेथील एका गृहस्थांनीं काळजी व्यक्त केली.

या पाणी-पुरवठ्याचा पावसाशींहि संबंध आहे ही गोष्ट मला तेथें कळली. पाण्यासंबंधीं माहिती देणारे गृहस्थ म्हणत होते, ' इथें दरसाल सरासरीनें जरी १३ किंवा १४ इंच पाऊस पडत असला तरी त्यांत नियमितता मुळींच नसते. यामुळें लागोपाठ दोन-दोन तीन-तीन वर्षेंहि पावसाशिवाय जातात. अशा वेळीं पाण्याचे फार हाल होतात. यंदाचीच गोष्ट घ्या. यावर्षीं इथं पाऊस फार कमी पडला. त्याबरोबर ट्यूब-वेल्समधील पाण्याला वरून मिळणारं प्रेशर [ दाब ] कमी झालं आणि पाणी कमी प्रमाणांत येऊं लागलं. असं अवर्षण लागोपाठ पडलं तर प्यायला पाणी मिळेल कीं नाहीं याची सुद्धां शंका आहे. अशा स्थितींत झाडांना


पाणी कुठलं आणायचं? म्हणून तर तुम्हांला जिकडं तिकडं हा ओसाड नि वैराण प्रदेश पसरलेला दिसतो आहे.'

## मुंबईचें स्थान घेऊं शकेल काय?

येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं पाण्याची इतकी टंचाई असतांना याची वाढ कशी होईल? कांहीं लोक असें म्हणतांना आढळतात कीं, कंडला बंदर झालें कीं गुजराती भांडवलवाले तेथें जातील आणि मग मुंबई महाराष्ट्राला मिळेल. यांतील मुंबई महाराष्ट्राला मिळण्याचा मुद्दा आपण सोडून देऊं. (कारण मुंबई ही कोणी देण्याघेण्याची बाब नाहीं, ती महाराष्ट्राची आहेच.) पण मुंबईवरील ताण (लोकसंख्येचा) कमी करण्याच्या बाबतींत कंडला बंदर कितपत उपयोगी पडेल याचा मात्र विचार करावा लागेल. जिथें जास्तींत जास्त २ लाख लोक राहूं शकतील तेथें मुंबईवरील लोकसंख्येचा ताण कसा कमी होणार? कामाचा ताण थोडाफार कमी होईल हें खरें. पण तें कामहि फक्त बंदरभागापुरतेंच असेल. गिरण्यांचा पसारा सहजासहजीं हलवितां येण्यासारखा नाहीं. आणि म्हणूनच कंडल्याला अथवा गांधीधामाला तेथील लोकांची इच्छा असूनहि कापडगिरणी निघूं शकलेली नाहीं. अर्थात् तेथील हवा कापडगिरणीला कितपत अनुकूल आहे याचाहि विचार करावा लागेलच. कारण कंडला हें समुद्रकाठीं असलें तरी तेथील हवा मुंबईप्रमाणें दमट नसून खूपच कोरडी आहे.

पाण्याच्या पुरवठ्यासंबंधीं एका मित्रानें अशी कल्पना सांगितली कीं भाक्रा–नानगल धरणाचें पाणी राजस्थानांत येणार आहे. तेंच पुढें कच्छमध्यें आणतां आलें तरच तेथील पाण्याचा प्रश्न सुटेल. अर्थात् पाण्याचा तुटवडा असूनहि सुमारे १८ एकर जमीन, उद्यानें (Parks), बागा (Gardens), नर्सरी यांच्यासाठीं राखून ठेवण्यांत आलेली असून तेथें बागाहि लावण्यांत आल्या आहेत. तसेंच ८६ एकर जमीन शेतीसाठीं ठेवलेली असून त्यापैकीं १८ एकर जमिनींत सांडपाण्यावर शेती केली जाते. तिच्यांत हिरवा चारा, फळें, भाजीपाला, भुईमूग, डाळी व धान्यें यांचा समावेश होतो.

या रेताड प्रदेशांत मध्येंच एखादें हिरवेगार शेत पाहिलें कीं मनाला किती आनंद होतो याचा अनुभव मला गांधीधामापासून कंडल्याला



**निसर्गरम्य कंडला बंदरांतील सूर्यास्त**

सायकलवरून जातांना आला. गांवाबाहेरच एका लहानशा शेतांत बाजरीचीं इवलींशीं रोपें सकाळच्या संथ वाऱ्याबरोबर हलकेंच डोलत असलेलीं पाहून सानंदाश्चर्य वाटलें. कारण तेथें विहीर वगैरे दिसत नव्हती. पावसाळ्याच्या अखेरीस एखादा पाऊस पडला असेल आणि त्यावरच तें छोटें शेत उभें राहिलें असेल.

## शिक्षणाची व्यवस्था

रस्ते, पाणी–वीज पुरवठा, ड्रेनेज वगैरे सोयींप्रमाणें सिं. री. कार्पोरेशननें आपल्या येथील मुलांच्या शिक्षणाचीहि व्यवस्था केलेली असून त्यासाठीं तें दरसाल ५४ हजार रुपये खर्च करीत असतें त्यापैकीं १९ हजार रुपये कच्छ सरकारकडून व ३५ हजार रुपये विद्यार्थ्यांच्या फीमधून वसूल होतात. येथें बालवर्गापासून मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण तर मिळतेंच, पण त्याशिवाय सिव्हिल इंजिनियरिंग व व्यापारकला ( कमर्शियल क्लासेस ) यांचेहि वर्ग चालविले जातात. याखेरीज दवाखाने, रुग्णालयें बँका,

देवळें, चित्रपटगृहें, क्लब वगैरे गोष्टीहि येथें आहेत. सारांश, जीवनाचें कोणतेंहि अंग उपेक्षित राहूं नये यासाठीं येथें शक्य तेवढी सर्व खबरदारी घेतली जात असते. नगरपालिकेचीं कामें करण्यासाठीं 'गांधीधाम पालिका समिति' नांवाची संस्था कार्पोरेशननें तयार केलेली आहे.

## गांधीधामचें सुंदर स्टेशन

हा सारा भाग सपाट व वैराण असल्यामुळें मुंबईच्या मलबारहिलची किंवा कलकत्त्याच्या पार्कांची शोभा इथं आणतां येणार नाहीं. परंतु इमारतीमध्यें सौंदर्य आणून ही उणीव थोडीफार भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. अशा इमारतींपैकीं गांधीधामचें स्टेशन हें एक आहे. गांधीधामांत मीं प्रवेश केला तेव्हां रात्र असल्यामुळें या स्टेशनाची भव्यता माझ्या लक्षांत आली नव्हती; पण जातांना मात्र मीं तें नीट पाहून घेतलें आणि त्यानें मुंबईच्या स्टेशनाला खास मागें टाकलें आहे हें मीं स्वतःशीं कबूल केलें. सुमारें साडेसहा लाख रुपये खर्चून बांधलेल्या या दुमजली स्टेशनांत चार वेटिंगरूम्स, एक मोठा वेटिंग हॉल व १३ रिटायरिंग रूम्स आहेत. हा भाग भूकंपीय प्रदेशांत ( Seismic zone ) मोडत असल्यामुळें स्टेशनाची इमारत व बंदरांतील इमारतीहि भूकंपाला दाद न देणाऱ्या अशा बांधलेल्या आहेत.

## बकालीपणाची छाया

मीं मुख्यत: रेल्वेकॉलनीच पाहिली. पण तेथील स्वरूपावरून एकूण शहरासंबंधीं थोडी फार कल्पना आली असें म्हणतां येईल. गांधीधाममध्यें निम्याहून अधिक लोक सिंधी असल्यामुळें त्यांच्या संस्कृतीची छाप या शहरावर पडली असल्यास नवल नाहीं. अस्वच्छता व गलिच्छता बऱ्याच मोठ्या प्रमाणावर तेथें दिसली. मुंबई शहर अलीकडे बकाली बनत चाललें असलें तरी त्याला एक सुसंस्कृत परंपरा आहे व तेथील लोकांना संस्कारितेविषयीं थोडें फार का होईना, आकर्षण आहे. पण तें गांधीधाममध्यें मात्र दिसत नाहीं. गांधीधामला जाण्यापूर्वीं मला असें कळलें होतें कीं तेथें दारू व जुगार यांचें राज्य आहे. अर्थात् जुगाराचें दर्शन मला झालें नाहीं. पण दारूची मात्र कल्पना आली. माझ्याबरोबरच गाडींतून उतरलेले

एक मुंबईचे महाराष्ट्रीय गृहस्थ माझ्याच हॉटेलांत आले होते. त्यांनीं हॉटेलांत पाय ठेवतांच बीअर (दारू) मागविली. परंतु हॉटेलांत फक्त ब्रॅंडीच होती. आणि खालचें दारूचें दुकान बंद झालें होतें. यामुळें त्या गृहस्थांचा कसा जळफळाट झाला तें मीं डोळ्यांनीं पाहिलें व मनांतल्या मनांत मला हंसूं आलें.

अशा या शहरांत सुसंस्कृत गुजराती समाज कितपत समरस होईल हें सांगणें कठीण आहे. अर्थात् सिंधी लोकांनंतर पंजाबी व मारवाडी लोकांची संख्या येथें वाढण्याची शक्यता जास्त आहे. कारण त्यांना हा भाग जवळ असून येथील हवापाणी त्यांच्या परिचयाचें आहे. यामुळें मुंबईवर गुजराती धनिकांना जसें वर्चस्व प्रस्थापित करतां आलें तसें तेथें करतां येईल अशी फारशी शक्यता दिसत नाहीं. येथील स्थानिक जनता म्हणजे कच्छी लोकहि सिंधी, पंजाबी, मारवाडी लोकांप्रमाणेंच व्यापारी असून त्यांचाहि बराच प्रभाव या बंदरावर राहील असें दिसतें, आणि सध्यांच त्यांना बिगर कच्छी लोकांचें आगमन आवडेनासें झालेलें आहे !

हमाली व कारकुनी करणाऱ्या मराठी माणसांना मात्र येथें चांगलाच वाव आहे. अर्थात् इंजिनिअरिंग वगैरे खात्यांत मोठमोठ्या हुद्यांवर असणारे अनेक महाराष्ट्रीयहि येथें पहावयास मिळाले.

आणखी एका बाबतींत हें स्थान महत्त्वाचें ठरणार आहे. ती म्हणजे विमानतळ. आज युरोपला जातांना कराचीचा विमानतळ टाळतां येत नाहीं. त्याला तोड म्हणून कंडला येथें एक प्रचंड आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यांत येणार आहे. तो तयार झाल्यानंतर कराचीच्या सागरी महत्त्वा-प्रमाणें आकाशीय महत्त्वहि हिंदुस्थानच्या दृष्टीनें पुष्कळच कमी होईल आणि दोन्ही बाबतींत भारत देश चांगला स्वावलंबी होईल असें समज-ण्यास हरकत नाहीं. त्या दृष्टीनें या बंदराचें सर्व भारतीयांनीं मनापासून स्वागतच केलें पाहिजे.

● ● ● ●

# आपला प्रेमळ शेजारी–सौराष्ट्र १६

चांगल्या गोष्टींचा चांगला परिणाम दिसून यायला देखील विशिष्ट परिस्थिति विद्यमान असावी लागते. एखाद्या पौष्टिक पदार्थाचा किंवा शक्तिवर्धक औषधाचा परिणाम पाहावयाचा असेल तर तो पदार्थ किंवा तें औषध नुकत्याच आजारांतून उठलेल्या व्यक्तीला दिलें पाहिजे. चांगल्या धडधाकट माणसावर त्याचा प्रभाव सहजासहजीं दिसून येणार नाहीं.

स्वातंत्र्याची गोष्टहि अशीच आहे. आपल्या या महादेशाला दीडशें वर्षांच्या गुलामीनंतर जें स्वातंत्र्य मिळालें आहे त्याचा उत्कृष्ट परिणाम पाहावयाचा असेल तर आधींच प्रगत असलेल्या प्रदेशांकडे न जातां त्यांतल्या त्यांत मागासलेल्या प्रदेशांत गेलें पाहिजे. अशा एका प्रदेशांत मी नुकताच हिंडून आलों आणि स्वातंत्र्यानें येथील युगानुयुगें सुप्त स्थितींत पडलेल्या जनतेमध्यें कसें चैतन्य निर्माण केलें आहे तें मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलें.

हा प्रदेश म्हणजे आपला शेजारी सौराष्ट्र होय. या प्रदेशाचें सौराष्ट्र हें नांव जरी अत्यंत पुरातन असलें तरी परवां परवांपर्यंत त्याला काठिया-वाड किंवा काठेवाड असेंच म्हणण्यांत येत होतें. हें एखादें अखंड राज्य नव्हतें तर दोनशे दोन लहान मोठ्या संस्थानांचें विचित्र कडबोळें होतें. तीं संस्थानें तरी कसलीं? बडोदा किंवा म्हैसूर यांसारखीं पुढारलेलीं संस्थानें काठेवाडांत नव्हतीं. भावनगर, राजकोट, गोंडल यासारखीं चार दोन त्यांतल्या त्यांत बरीं संस्थानें वगळलीं तर बाकीचीं संस्थानें मध्ययुगांत वावरणारींच होतीं. त्या सर्वांना भारताच्या महासागरांत विलीन करून भारताशीं एकजीव बनविण्याचें कार्य भारताच्या त्या पोलादी महापुरुषानें-सरदार वल्लभभाई पटेल यांनीं-मोठ्या चातुर्यानें केलें आणि

१५ फेब्रुवारी १९४८ रोजीं नव्या सौराष्ट्र प्रदेशाचा जन्म झाला. तेव्हां-पासून या छोट्याशा प्रदेशानें प्रगतीच्या दिशेनें जणूं घोडदौड चालविली आहे. ती पाहिली कीं स्वातंत्र्याची संजीवनी लोकांमध्यें कसा उत्साह निर्माण करते याचा प्रत्यय येतो.

सौराष्ट्रांत हिंडत असतां मला एकसारखी महाराष्ट्राची आणि त्यांतहि रत्नागिरी जिल्ह्याची आठवण येत होती. तोच समुद्र किनारा, तीच नापीक अन् खडकाळ जमीन आणि तेच काटक नि कणखर लोक. रत्नागिरीसारख्या डोंगरांच्या रांगा इथें नाहींत. पण गिरनार, पालीताणा वगैरे लहान मोठे डोंगर भरपूर आहेत.

पण त्यापेक्षांहि एक फार मोठें साम्य मला तिथें आढळलें. कोंकणच्या भरड जमिनींतून हिमालयासारखी प्रचंड कामगिरी करून दाखविणारीं माणसें जशी निर्माण झालीं तशींच सौराष्ट्राच्या नापीक जमिनींतून जागतिक नि राष्ट्रीय कीर्तीचे पुरुष उदयाला आले. गुर्जर साहित्यांतील ज्ञानेश्वरच जणूं असा संत नरसी महेता सौराष्ट्रांतच जन्मला होता. जुनागडमधील नरसी महेताचें मंदिर पहातांना माझ्या महाराष्ट्रीय मनासमोर देहू-आळं-दीचीं मंदिरें उभीं राहिलीं असल्यास काय आश्चर्य? संतवर कबिरांनीं सांगून ठेविलें आहे—

**जाति न पूछो साधकी, पूछि लीजिये ग्यान।**
**मोल करो तलवारका, पडा रहन दो म्यान॥**

आतां आपल्या देशांतून जातीचें उच्चाटन होऊं लागलें आहे, तेव्हां तो प्रश्नच उरलेला नाहीं, म्हणून मी 'जाति' या ऐवजीं 'प्रांत' किंवा 'भाषा' हा शब्द योजून हा दोहा म्हटला. कोणत्याहि भाषेंतला अन् प्रांतांतला संत, महात्मा, साहित्यिक, कलाकार असला तरी तो माझ्याच भारतांतला आहे, माझाच आहे ही भावना आतां उदयास येऊं लागली आहे. तिचा प्रत्यय मला सौराष्ट्रांत हिंडतांना पदोपदीं आला. असो.

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती सौराष्ट्रांतलेच होते. मोरवीजवळच्या त्यांच्या टंकारा गांवीं त्यांचें स्मारक होऊं घातलेलें आहे.

विश्ववंद्य महात्मा गांधी तर सौराष्ट्राच्या भूमींतच लहानाचे मोठे झाले. राजकोटला असलेलें त्यांचें घर मीं पाहिलें आणि त्यांच्या भगिनींचें दर्शन घेतलें तेव्हां माझ्या अंत:करणांत भावनांनीं अगदीं गर्दी करून सोडली होती. पोरबंदरला ज्या घरांत बापूजींचा जन्म झाला ती जागा आतां राष्ट्रीय स्मारक म्हणून सुरक्षित ठेवण्यांत आलेली आहे आणि तिथेंच कीर्तिमंदिर नांवाची एक भव्य इमारत बांधण्यांत आलेली आहे.

त्याखेरीज हरिजनांचे सेवक अन् मित्र कैलासवासी ठक्कर बाप्पा, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. नानाभाई भट्ट, गुर्जर जनतेचे लाडके कवि कलापी, लोकशाहित्याचे अनन्य उपासक स्वर्गीय झवेरचंद मेघाणी वगैरे डझनवारी नांवें सांगतां येतील. पाकिस्तानचे निर्माते स्वर्गीय महम्मद अली जिना हे देखील सौराष्ट्राचेच निवासी होते आणि जिथें गांधीजींचा जन्म झाला त्याच पोरबंदर जवळील पानेली गांवीं जिनांचाहि जन्म झाला होता. हा योगायोग मजेशीर नाहीं असें कोण म्हणेल ?

सौराष्ट्राची जमीन नापीक आहे, जवळ जवळ माळरानच म्हणायला हरकत नाहीं. शिवाय तिथल्या नद्याहि अगदीं मामुली. त्यामुळें शेतीसाठीं पाण्याची टंचाईहि भरपूर आहे. पण निसर्गावर मात करायचा सौराष्ट्रीय जनतेनें जणूं विडाच उचलेला आहे. नदी कितीहि लहान असली तरी तिला अडवायची, बांध घालायचा आणि तिचें पाणी सर्वत्र खेळवून सगळीकडे नंदनवन फुलवायचें असा निश्चय तिथल्या जनतेनें केला आहे. त्याप्रमाणें १६ नद्यांवरील कामाला सुरवात होऊन कांहीं कामें पुरींहि झालीं आहेत. मी गेलों त्या वेळीं पालीताण्याजवळील शत्रुंजी नदीवरील धरणाचा पाया घालण्यासाठीं भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू तिथें आलेले होते. केवळ शंभर मैल लांबी असलेल्या या नदीवर साडे-चार कोटि रुपये खर्चून बांधण्यांत यावयाच्या धरणामुळें एक लाख एकर जमिनीला पाणी मिळणार आहे. दुसऱ्या पंचवर्षीय योजनेच्या शेवटीं २२ कोटि ८५ लाख रुपये खर्च करून अंमलांत येणाऱ्या धरण योजनांमुळें सव्वापांच लाख एकर जमीन हिरवीगार होईल. हें भविष्याचें चित्र मनोहर नाहीं असें कोण म्हणेल ?

एका बाबतींत सौराष्ट्र अन् महाराष्ट्र यांत मोठा फरक आहे. सौराष्ट्रांतला शेतकरी किंवा मजूर मराठी शेतकऱ्यापेक्षां अंगापिंडानें चांगला भरदार नि मजबूत आहे. मेर, रबारी, मियाणा, काठी वगैरे वेगवेगळ्या जमातींतील लोकांचे पोषाखहि मोठे रंगीबेरंगी अन् रुबाबदार असतात. लंगोटी लावलेला अर्धनग्न शेतकरी किंवा गुराखी मला सौराष्ट्रात कुठेंच दिसला नाहीं. सौराष्ट्रांतला सामान्य शेतकरी जितके कपडे वापरतों तितके आपल्याकडल्या फारच थोड्या शेतकऱ्यांच्या अंगावर दिसतात.

सौराष्ट्रीय लोक खाण्यापिण्याच्या बाबतींत चांगले चोखंदळ आहेत. दूध-तूप अन् तेल यांची रेलचेल त्यांच्या जेवण्यांत असते. याचा परिणाम म्हणूनच कीं काय येथील लोकांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची तुकतुकी अन् उल्हास दिसतो. केवळ पुरुषांच्याच नव्हे तर बायकांच्या चेहऱ्यांवरहि जीवनाविषयींचा आनंद ओसंडत असलेला पाहावयास मिळतो. मोरवीजवळच्या एका खेड्यांत समाजविकास योजनेतर्फे चाललेला स्त्रियांचा रात्रींचा वर्ग पाहावयाची संधि मला मिळाली होती. दहा वर्षांच्या मुलीपासून पंचवीस—तीस वर्षांच्या बाईपर्यंत सर्व वयाच्या स्त्रिया त्या वर्गात होत्या. अर्थात् बहुतेक विवाहित होत्या हें सांगायला नकोच. नवीन-नवीन गोष्टी शिकण्याचा त्यांचा उत्साह अन् मोकळेपणा पाहून मी तर थक्कच झालों. पांच सात वर्षांपूर्वीं याच स्त्रिया घराच्या चार भिंतींत कोंडून पडलेल्या होत्या आणि शाळेचें नांव घ्यायची हिम्मत त्यांच्यांत नव्हती असें कुणी सांगितलें तर त्यावर आपला विश्वास बसणार नाहीं. दिवसभर शेतांत राबून येणाऱ्या स्त्रियांमध्यें शिक्षणाबद्दलचा इतका उत्साह असूं शकतो या गोष्टीवर स्वतः माझासुद्धां तोपर्यंत विश्वास बसला नव्हता. स्वातंत्र्याचें वारें आतां कुठवर जाऊन पोहोंचलें आहे याचें जणूं तें प्रात्यक्षिकच होतें.

**आणि प्रेक्षणीय स्थळें ?**

बावीस हजार चौरस मैलाच्या त्या छोटेखानी राज्यांत प्रेक्षणीय स्थळांचीहि अगदीं रेलचेल आहे. सौराष्ट्राचीं वैशिष्ट्यें कोणतीं याविषयीं पुराणांत एक श्लोक आहे. तो असा:—

**सौराष्ट्रे पंचरत्नानि नदी नारी तुरंगमाः ।**
**चतुर्थं सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम् ॥**

अर्थात् यांतल्या सर्वच गोष्टी शब्दशः खऱ्या आहेत असें म्हणतां येणार नाहीं. इथल्या नद्या फारच सामान्य आहेत अन् घोडेहि कांहीं विशेष मोठे आढळले नाहींत. आपल्याकडल्या भीमथडी तट्टांसारखींच घोडीं दिसलीं. स्त्रियांच्या विषयीं कांहीं बोलणें आधुनिक काळांत असभ्यतेचें लक्षण गणलें जातें; म्हणून त्याविषयीं मत न देणेंच योग्य. राहातां राहिलीं दोन स्थळें. एक सोमनाथ अन् दुसरी द्वारका. यांपैकीं सोमनाथ हें भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून त्याला ऐतिहासिक महत्त्वहि खूप आलेलें आहे. सोमनाथाच्या मंदिराचा विनाश हा हिंदुसमाजाच्या ऱ्हासाचा श्रीगणेशा समजण्यास हरकत नाहीं. मात्र सोमनाथाची पुनः स्थापना ही जातीय किंवा धार्मिक दृष्टीची नसून तिला एक लोकशाहीची महान् पार्श्वभूमि लाभलेली आहे. वेरावळ स्टेशनपासून सोमनाथपर्यंत मला घेऊन गेलेला टांगेवाला मुसलमान होता. त्याला मीं विचारलें, ‘ काय रे, सोमनाथाचें देऊळ पुनः बांधायला सुरवात झाली, तेव्हां तुम्हां मुसलमानांना मोठें दुःख झालें असेल नाहीं ? ’ त्यावर त्यानें दिलेलें उत्तर मोठें लक्षांत घेण्यासारखें होतें. तो म्हणाला, ‘ यांत दुःख होण्याचें काय कारण ? हिंदूंचेंच देऊळ होते, तें त्यांनीं परत घेतलें. ’ याचा अर्थ असा कीं लोकशाहीचा अन् सहिष्णुतेचा परिणाम त्या सामान्य टांगेवाल्याच्या मनावरहि झाला होता. अर्थात् त्यांत त्याची धंदेवाईक वृत्ति मुळींच नसेल असें म्हणतां येणार नाहीं. मीं त्याला विचारलें, ‘ हा सोमनाथ मंदिराचा भाग जुनागडच्या नबाबाच्या ताब्यांत होता तेव्हां तुम्ही सुखांत होता कीं आतां आहांत ? ’ तो म्हणाला, ‘ साहेब, तेव्हां आम्हांला भाडें मिळणेंहि मोठें मुष्किलीचें होई. आतां इतकीं माणसें इकडे येत असतात कीं आम्हांला ओली कोरडी का होईना, भाकरी खायला मिळते. ’

द्वारका तर काय बोलून चालून हिंदूंचें मोठें तीर्थक्षेत्रच. द्वारकेचें श्रीकृष्णाचें मंदिर मोठें भव्य आहे आणि तें अगदीं समुद्रकांठावर असल्या-मुळें तेथली नैसर्गिक शोभाहि अगदीं अवर्णनीय आहे. द्वारकेला गेल्या-

बरोबर लहानपणीं वाचलेल्या श्रीकृष्णाच्या कथा एका मागोमाग आठवूं लागल्या आणि थोडा वेळ मन भूतकाळांत तल्लीन होऊन गेलें. पण श्रीकृष्णाच्या मंदिराच्या शिखराशीं स्पर्धा करणारीं सिमेंट फॅक्टरीचीं धुराडीं डोळ्यांसमोर येतांच तें मन एकदम विसाव्या शतकांत आलें. सौराष्ट्रांत सिमेंट, पॉटरी, मीठ वगैरे वस्तूंचे लहान मोठे कारखाने आहेत आणि विजेचा पुरवठा जसजसा वाढत जाईल तसतशी इथली कारखानदारी जोरानें फोफावणार यांत मुळींच शंका नाहीं.

सोमनाथ–द्वारकेप्रमाणेंच पालीताण्याजवळील शत्रुंजय टेकडी आणि जुनागडजवळील गिरनार पर्वत हीं स्थानेंहि अवश्यमेव पाहाण्यासारखीं आहेत. शत्रुंजय टेकडीवर केवळ जैन धर्मीयांचींच मंदिरें आहेत तर गिरनारवर जैन व हिंदु या दोन्ही धर्मांचीं देवळें आहेत. त्यांत अबूच्या पहाडावरील देवळांप्रमाणें कलाकुसर नसली तरी त्यांची जागा इतकी उत्कृष्ट आहे कीं केवळ तेवढ्यावरच माणूस खूष होतो. गिरनारवरून सभोंवतालचें दृश्य इतकें मनोहर दिसतें कीं तें पाहाण्यांत मन तल्लीन होऊन जातें आणि ३६०० फूट उंच चढून गेल्याच्या श्रमाचा परिहार होतो. सामान्य माणूस आपण होऊन अशा अवघड डोंगरावर चढणार नाहीं, तेथून दिसणारी सृष्टिशोभा पाहाणार नाहीं, निसर्गाचा खजिना लुटणार नाहीं हें आधींच हेरून आमच्या पूर्वजांनीं त्या ठिकाणीं देवळें बांधलीं अन् त्या देवळांतल्या देवांचें दर्शन घेणें अत्यावश्यक करून ठेवलें.

पण माझ्या मनावर जर सगळ्यांत कोणत्या गोष्टीचा ठसा विशेष उमटला असेल तर तो सौराष्ट्रीय लोकांच्या वृत्तीचा अन् वागण्याचा. गुजराती माणूस म्हटला कीं त्याला रुपये आणे पै खेरीज दुसरी गोष्टच सुचत नाहीं, असा आपला समज झालेला असतो. याला मी तरी कसा अपवाद असणार? पण सौराष्ट्रांत पाऊल टाकतांच माझा भ्रमनिरास झाला. सौराष्ट्रांतहि मोठमोठे व्यापारी आहेत आणि ते भारतांतच नव्हे तर सिलोन, फिलिपाइन्स, आफ्रिका वगैरे दूरदूरच्या भूभागांत जाऊन खोऱ्यांनीं पैसाहि कमावतात. पण त्यांच्या ठिकाणीं विद्येची नि कलेचीहि तितकीच आवड आहे. सध्यां सौराष्ट्रांत दोन मोठे व्यापारी आहेत.

आपण मिळविलेला पैसा शिक्षणापायीं अन् त्यांतहि स्त्रीशिक्षणापायीं खर्च व्हावा यांत त्यांना धन्यता वाटते. त्यांनीं दान केलेली रक्कम दोन तीन कोटीपर्यंत गेलेली आहे हें जेव्हां मी ऐकलें तेव्हां माझें मस्तक आनंदानें अन् आदरानें आपोआप लवलें. स्वातंत्र्य आल्यापासून उठल्यासुटल्या सरकारच्या मदतीवर अवलंबून राहण्याकडे आपला कल होऊं लागला आहे, अशा वेळीं स्वतःच्या पदराला खार लावून समाजसेवा करणारे धनिक पुढें येतात हें पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं ? महाराष्ट्रांत चालणारी विद्येची उपासना, संगीताचा नि चित्रकलेचा अभ्यास वगैरे गोष्टींबद्दल सौराष्ट्रांतील लोकांच्या मनांत किती आदराची भावना आहे हें मीं पाहिलें तेव्हां आपण करीत असलेल्या ज्ञानतपस्येचें महत्त्व नव्यानें माझ्या लक्षांत आलें.

आणि तेथील लोकांचें आतिथ्य ? त्याचा विसर तर मला कधींच पडणार नाहीं. मी जिथें जिथें गेलों तिथें तिथें मला इतकें प्रेम मिळालें कीं त्या भाराखालीं मी दडपून गेलों. वस्तुतः भाषावार प्रांतरचनेच्या कटकटी चालू असतांनाच मी सौराष्ट्रांत फिरत होतों. पण महाराष्ट्राबद्दल किंचित्‌हि कटुतेची भावना मला कुठें आढळली नाहीं. कवि काय, कलावंत काय, शिक्षक काय अन् सामान्य कारकून काय, सगळेजण इतक्या प्रेमळ-पणानें वागले कीं त्यांच्याशीं आपली फार जुनी ओळख आहे असें मला वाटूं लागलें. अन् नैसर्गिक रीत्याच त्या प्रदेशाबद्दल आत्मीयता निर्माण झाली. सौराष्ट्रीय माणूस हा स्वभावानें मोठा दिलदार अन् प्रेमळ आहे. जुन्या बंधनांच्या कवचांतून तो नुकताच बाहेर पडतो आहे, त्यामुळें थोडा बावरल्यासारखा अवश्य दिसतो. पण निसर्गाच्या सान्निध्यांत वाढलेलें त्याचें मन अन् शरीर जीवनशक्तींनीं जणूं रसरसलेलें आहे. क्षुद्रपणा त्याला माहीत नाहीं. त्याचें शरीर गिरनार पर्वतासारखें कणखर अन् मन पोरबंदरच्या समुद्रासारखें विशाल आहे. सौराष्ट्रांत फिरत असतां तेथील निसर्ग अधिक विलोभनीय आहे कीं माणूस अधिक विलोभनीय आहे अशी शंका मला वरचेवर येई. असा उमदा शेजारी लाभल्याबद्दल कोणाला आनंद होणार नाहीं ?

●●●●

सौराष्ट्राची राजधानी

# राजकोट : १७

## राजधानीचें शहर

राजकोट ही सौराष्ट्राची राजधानी. पूर्वी ही राजकोट संस्थानाची राजधानी होती आणि काठेवाड (सौराष्ट्र) च्या पोलिटिकल एजंटाची मुख्य कचेरी येथेंच असे. त्यामुळें या शहराला पूर्वीपासूनच महत्त्व प्राप्त झालेलें होतें. सामान्यतः सौराष्ट्राच्या मध्यभागीं हें येत असल्यामुळें सर्वांना तें सोईचेंहि असे. याखेरीज या शहराला एक लोकशाही परंपराहि आहे. १९२० सालीं येथील राजे श्री. लखजीराज यांनीं आपल्या संस्थानांत विधिमंडळ निर्माण केलें. तेव्हांपासून संस्थानी स्वातंत्र्याच्या चळवळींत या शहराला एक विशेष महत्त्व प्राप्त झालें. १९४७ पर्यंत ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचें काठेवाडांतील मुख्य कार्यालय येथेंच होतें. त्यामुळें नवीन सौराष्ट्र जन्माला आल्यानंतर या शहराला त्याची राजधानी बनण्याचें भाग्य लाभलें असल्यास आश्चर्य नाहीं.

## गांधीजींच्या वडिलांचा वाडा

संस्थानीं जमान्यापासून राजधानी बनण्याची संधि राजकोटला मिळत गेल्यामुळें येथें मोठमोठे राजवाडे, उद्यानें, सरकारी कचेऱ्या वगैरे असणें स्वाभाविकच आहे. येथील वॅटसन म्यूझियम, आजी नदीवरील धरण, प्रसिद्ध क्रिकेटपटु रणजीतसिंहजी जेथें शिकत होते तें 'राजकुमार कॉलेज,'* प्रद्युम्न पार्क, ज्युबिली गार्डन्स, तलाव, झवेरी बाजार, रेसचें मैदान,

* पूर्वीं या कॉलेजांत फक्त राजपुत्रांनाच प्रवेश मिळे. आतां इतरांनाहि प्रवेश मिळूं शकतो.

रामकृष्ण आश्रमची सुंदर लायब्ररी वगैरे ठिकाणें अवश्य पाहाण्यासारखीं आहेत. रेसकोर्सवर सध्यां घोड्यांच्या रेसेस चालत नाहींत. पण सकाळीं संध्याकाळीं फिरावयास जाण्याचें एक उत्तम ठिकाण या दृष्टीनें त्याचें महत्त्व आहे. ( मीं तेथें असतांना पंडित जवाहरलाल नेहरू यांचा दौरा सौराष्ट्रांत सुरू होता. त्या वेळीं या शर्यतीच्या मैदानावर एक बालकांचा मेळावा भरलेला होता. तेथें जवाहरलालजींच्या भाषणाच्या वेळीं मी गेलों होतों. ) परंतु या गोष्टी बहुतेक सगळ्या मोठ्या शहरांतून पाहावयास मिळतातच. तेव्हां त्यांत मला विशेष असें कांहीं वाटलें नाहीं.

माझ्या दृष्टीनें राजकोटचें आकर्षण वेगळेंच होतें. तें म्हणजे तेथील कबा गांधीचें घर किंवा वाडा. ( कबा गांधीनो डेलो ) कबा गांधी म्हणजे महात्माजींचे पिताजी. पोरबंदरची दिवाणगिरी सोडल्यानंतर ते राजकोट संस्थानचे दिवाण झाले होते. त्यामुळें गांधीजींचा जन्म पोरबंदरला झाला असला तरी त्यांचें बालपण व शालेय शिक्षण राजकोटलाच झालेलें होतें. ज्या आल्फ्रेड हायस्कुलांत ते शिकत होते तेंहि पाहाण्यासारखें आहे. या वाड्यांत गांधीजी लहाणपणीं राहात असल्यामुळें त्याला एखाद्या स्मारकासारखें किंवा तीर्थस्थानासारखें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. देशांतील व विशेषतः परदेशांतील जे लोक राजकोटला जातात ते प्रथम गांधीजींचा हा वाडा पाहातात. वाडा जुन्या पद्धतीचा, जाडजूड दरवाजा ( दिंडीसह ) असलेला व चांगला मजबूत आहे. तो गांवांत इतर घरांच्या घोळक्यांतच आहे. आणि त्याचें वैशिष्ट्य असें कांहीं नाही. त्यामुळें तो शोधून काढतांना आम्हांला थोडा त्रास झाला. तरी त्याच्या बाहेरच्या बाजूस ‘ श्री पुतळीबा उद्योग मंदिर ’ या नांवाची पाटी असल्यामुळें फार चौकशी करीत बसावें लागलें नाहीं. पुतळीबाई हें गांधीजींच्या आईचें नांव. सध्यां येथें सूतकताई वगैरे विधायक कार्य चालू असतें. विशेषतः स्त्रियांनीं त्याचा फायदा घ्यावा या दृष्टीनें प्रयत्न चालू असतात.

आम्ही वाडा पाहायला गेलों तेव्हां गांधीजीहून सात वर्षांनीं मोठ्या असलेल्या त्यांच्या भगिनी तेथें राहात असल्याचें आम्हांला कळलें. म्हणून थोडा वेळ थांबून त्यांना भेटून घेतलें. त्यांच्या व गांधीजींच्या चेहऱ्यांत

खूपच साम्य दिसलें. 'मोहन'च्या लहानपणच्या गोष्टी त्या अजूनहि मोठ्या रसाळपणें सांगतात. राजकोट रेडियोवरूनहि त्यांचा कार्यक्रम झालेला होता.

## राष्ट्रीय शाळा

गांधीजींचें विधायक कार्य मोठ्या उत्साहानें चालविणारी एक संस्था येथें असून तिच्यांत फार कर्तबगार मंडळी काम करीत असतात. या संस्थेचें नांव 'राष्ट्रीय शाळा' असें असून श्री. पुरुषोत्तम गांधी तिचें संचालन करीत असतात. गांधीजींचे नातू श्री. कनु गांधी, त्यांच्या पत्नी श्रीमती आभा गांधी वगैरे मंडळी त्यांना मदत करतात. येथें खादीकाम, तेलघाणी, बाल मन्दिर, संगीत महाविद्यालय वगैरे अनेक विभाग आहेत. यांपैकीं कांहीं विभागांतून महाराष्ट्रीय शिक्षक काम करीत असतात. गांधीजींनीं राजकोटला जो प्रख्यात उपवास केलेला होता तो या राष्ट्रीय शाळेंतच केला होता. ज्या खोलींत त्या वेळीं ते रहात असत ती चांगली सुरक्षित ठेवलेली असून त्या उपवासांच्या वेळचीं छायाचित्रें तेथें लावलेलीं आहेत.

••••

## सृष्टिसौंदर्याचें दर्शन घडविणारा

# गिरनार : १८

### ऊंचो गढ गिरनार, वादळथी वातो करे !

( उंच गिरनार गड ढगांशी गोष्टी करतो. )

लहानपणीं भूगोल शिकतांना गिरनारच्या जंगलांत सिंह आढळतात असें पाठ केलें होतें; यामुळें जेव्हां गिरनारला जाण्याचा माझा कार्यक्रम ठरला तेव्हां आपण सिंहांच्या घरांत जाणार असा माझा समज झाला. तो फारसा खोटाहि नव्हता; कारण एके काळीं गिरनारच्या परिसरांतहि सिंह राहात होते. परंतु आतां मात्र फक्त गीरच्या जंगलांतच सिंह पाहावयास मिळतात. हें गीरचें जंगल ५७६ चौरस मैल विस्ताराचें असून तेथेंहि सिंहाच्या शिकारीला बंदी असल्यामुळेंच सिंह टिकून राहिले आहेत. नाहीं तर संबंध आशियांत औषधालाहि सिंह मिळाला नसता. १९५० सालीं या सिंहांची शिरगणती घेतली असतां त्यांची संख्या २५३ भरली होती. गीरचे जंगल जसें सिंहासाठीं प्रसिद्ध आहे तसेंच दुधाळ गायी-म्हशी-साठींहि हा भाग प्रख्यात आहे. गीर जातीच्या गायी आतां आपल्या महाराष्ट्रांतहि मोठ्या प्रमाणांत येऊं लागल्या आहेत. सदर गीरचे जंगल जुनागडपासून जवळच आहे आणि गिरनार तर जुनागडच्या शेजारींच आहे. परंतु गिरनार हें जंगल नसून तो डोंगर आहे एवढें ज्ञान ह्या प्रवासामुळें झालें.

गिरनार शब्दाची व्युत्पत्ति शोधतां शोधतां असें समजलें कीं गिरनार हा हिमालयाचा मुलगा व पार्वतीचा मोठा भाऊ. शंकर-पार्वतीच्या लग्नांत त्यानें देवांची बडदास्त फार उत्कृष्ट ठेवल्यामुळें प्रसन्न होऊन भगवान विष्णूंनीं त्याला असा वर दिला कीं, 'तूं यापुढें सर्व पर्वतांमध्यें साक्षात् नारायण होशील. तुझ्या ठिकाणीं सर्व देव देवता निवास करतील'

तेव्हांपासून त्याचें नांव 'गिरिनारायण' पडलें व त्याचा अपभ्रंश 'गिरनार' असा झाला. ज्या जुनागढ शहराजवळ हा पर्वत आहे. त्याचें प्राचीन नांव मणिपुर असें होतें. त्यानंतर त्याला चंद्रकेतुपूर, रेवतनगर आणि गिरिनगर अशीं नांवें मिळालीं. या गिरिनगरवरूनहि गिरनार शब्द बनला असल्याची शक्यता आहे.

## गिरनार सौराष्ट्रांत कसा ?

आतां हे हिमालयपुत्र पश्चिमेस कसे आले म्हणून कोणी विचारील; त्याचें उत्तरहि तयार आहे.

त्याचें असें झालें. पूर्वीं पर्वतांना पंख असत व ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं उडून जात. यामुळें असंख्य प्राण्याचा नाश होई. म्हणून ब्रह्मानें इंद्राला अशी आज्ञा केली कीं सगळ्या पर्वतांचे पंख कापून टाक. ही बातमी गिरनारला कळतांच तो हिमालयांतून उडून सौराष्ट्राजवळच्या समुद्रांत बुडी मारून बसला. पुढें पार्वतीला सगळी हकीगत कळली आणि तिनें शंकराला व विष्णूला आपल्या भावाचा शोध करण्यास पाठविलें. त्यांनीं जाऊन समुद्राची स्तुति केली तेव्हां समुद्र प्रसन्न होऊन पांच योजनें दूर गेला आणि अशा प्रकारें गिरनार सौराष्ट्राच्या किनाऱ्यावर राहिला. महाकवि माघ यानें आपल्या 'शिशुपालवध' या महाकाव्यांत या पर्वताचा 'रैवत' या नांवानें उल्लेख केलेला आहे. ह्युएन्त्संगहि येथील बौद्ध-विहाराचें दर्शन करण्यास आला होता. त्यानें या पर्वताचें नांव उज्जयंत असें दिलें आहे.

## अशोकाचे शिलालेख

जुनागड शहरापासून गिरनारचा पायथा सुमारें दोन अडीच मैल आहे. तेथें जाण्यास टांगे व बसेस मिळतात. तळाशीं पोंचण्यापूर्वींच दोन महत्त्वाचीं स्थळें वाटेंत लागतात. त्यांपैकीं एक ऐतिहासिक असून दुसरें धार्मिक आहे. ऐतिहासिक स्थळ म्हणजे सम्राट अशोकाचे शिलालेख असलेला खडक होय. वस्तुतः या खडकावर अशोक (इ. स. पू. २५०) रुद्रदामन (इ. स. १५०) व स्कंदगुप्त (इ. स. ४५४) या तिघांचे आलेख आहेत. परंतु अशोक विशेष प्रख्यात असल्यामुळें त्याच्या नांवानें

हे लेख प्रसिद्ध आहेत. यांतील अशोकाचा लेख पालींत असून इतर दोन संस्कृतमध्यें आहेत.

शिलालेख हा एखाद्या स्तंभावर किंवा शिळेवर असावयाचा अशी माझी कल्पना. पण येथील लेख मात्र जमिनींतील एका खडकावर कोरलेले आहेत. एखादा लहानसा दगडी उंचवटा (a nearly hemispherical, mass of granite) असावा असा तो खडक दिसतो. याचा दगडहि काळा कणखर नसून लालसर ग्रॅनाईट आहे. शेंकडों वर्षेपर्यंत हे शिलालेख जंगलांतच अज्ञान स्थितींत पडून होते. इ. स. १८२२ सालीं कर्नल टॉड यांनीं त्यांच्यावर प्रकाश पाडला आतां या शिळेवर इमारत बांधून तिच्या संरक्षणाची व्यवस्था केलेली आहे. ज्याअर्थीं सुमारें हजार वर्षांच्या काळांत यावर तीन लेख कोरण्यांत आले त्याअर्थीं तो काळ या भागांत चांगला भरभराटीचा असावा असें समजण्यास हरकत नाहीं. या खडकाच्या ईशान्य ( पूर्वोत्तर ) भागावर अशोकाच्या १४ धर्माज्ञा कोरलेल्या असून माथ्यावर रुद्र दामनाचा लेख खोदलेला आहे व पश्चिमेच्या बाजूस स्कंदगुप्ताच्या गव्हर्नराच्या आज्ञा आहेत.

## दामोदर कुंडाचें वैशिष्ट्य

अशोकाचे शिलालेख पाहून जरा पुढें गेलें कीं रस्त्याच्या कडेलाच दामोदर कुंड लागतें. याच्या काठीं दामोदराचें म्हणजे श्रीकृष्णाचें देऊळ आहे.

हें कुंड चांगलें विस्तृत असून त्याचें दृश्य मोठे मनोहर आहे. आम्ही तेथें गेलों तेव्हां सकाळची वेळ होती आणि कांहीं भाविक लोक स्नान करीत होते व भटजी महाराज आपल्या चोपड्या सरसावून तेथें पूर्वीं येऊन गेलेल्या त्यांच्या पूर्वजांचीं नांवें वाचून दाखवीत होते. या कुंडाचा आकार नदीसारखाच आहे आणि जुनागडचीं व आसपासचीं शवें येथें भस्मीभूत होण्यासाठीं येत असतात. या कुंडाचें वैशिष्ट्य म्हणजे याच्या पाण्यांत माणसाचीं हाडें विरघळून जातात. यामुळें त्याचें नांव विलीयक असेंहि पडलें आहे. नाशिक त्रिवेणीप्रमाणें येथेंहि अनेक लोक आपल्या मृत नातेवाईकांच्या अस्थी आणून विसर्जित करतात. पूर्वीं एकदां ब्रह्मानें या जागीं यज्ञ केला होता. त्या वेळीं येथें गंगा, यमुना, सरस्वती वगैरे सर्व

पवित्र नद्या आणि देव गोळा झाले होते. त्याची स्मृति म्हणून हें कुंड राहिलें व म्हणून तें फार पवित्र आहे असें समजलें जातें.

प्रसिद्ध वैष्णव संत नरसी मेहता या कुंडांत स्नान करण्यासाठीं येत असत. म्हणून त्यांच्या मूर्तीचीहि स्थापना येथें एका लहानशा देवळांत करण्यांत आलेली आहे.

याच्या शेजारीच रेवतीकुंड नांवाचें दुसरें एक कुंड असून तें खूप खोल व चारी बाजूंनीं पायऱ्या असलेलें असें आहे.

## गिरनारची चढण

दामोदर कुंडावरून पुढें गेलें की मुचकुंद महादेव, भवनाथ, लम्बे, हनुमान वगैरे देवांचीं लहान मोठीं देवळें आहेत. परंतु आमच्याजवळ वेळ फार थोडा होता. आणि गिरनारवर चढण्यास आम्ही विशेष उत्सुक होतों. यामुळें त्या देवळांचें दुरूनच दर्शन घेतलें. रात्रीं गिरनारवर वस्तीला राहावयाचें आणि सकाळीं लौकर उठून परत यावयाचें असें आम्ही ठरविलें होतें. कारण डोंगर चढायची सर्वांत सोयीची वेळ म्हणजे पहांट किंवा सायंकाळ ! आम्हीं सुमारें ५ वाजतां गिरनार चढायला सुरवात केली. या वेळीं उन्ह बरेंच कडक होतें. परंतु गिरनारची निम्मी चढण चढून जाईपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस चांगली दाट झाडी असल्यामुळें आम्हांला उन्हाचा मुळींच त्रास झाला नाहीं. गिरनारची उंची आहे ३६७० फूट पण चढण मात्र खूपच त्रासदायक वाटली. वस्तुतः अगदीं तळापासून शिखरापर्यंत प्रशस्त पायऱ्या आहेत. यामुळें प्रारंभीं चढतांना मोठी गंमत वाटते. परंतु शेवटीं शेवटीं भयंकर थकवा वाटूं लागतो. सुमारें ४ हजार पायऱ्या आहेत. शत्रुंजय ( पालीताणा ) पर्वताच्या पायऱ्याहि जवळजवळ इतक्याच आहेत. परंतु त्यांची उंची फारच कमी आहे; यामुळें वृद्धांना त्या सोयींच्या आहेत. गिरनारच्या पायऱ्याहि जवळजवळ इतक्याच आहेत. परंतु त्यांची उंची फारच कमी आहे; यामुळें वृद्धांना त्या सोयीच्या आहेत. गिरनारच्या पायऱ्या चांगल्या उंच असून जुन्या पद्धतीच्या जिन्यांप्रमाणें त्या एकावर एक ठेवल्यासारख्या वाटतात. २५०० पायऱ्या गेल्यावर ' माळीनी परब ' नांवाची एक पाणपोई आहे. तेथें थोडा वेळ

थांबून आम्ही पाणी प्यालों आणि ताजेतवाने होऊन पुढें चालूं लागलों.

## प्रचंड शिळांची भिंत

आतां हिरवागार गिरनार संपून वृक्षविहीन डोंगर सुरू झाला. डाव्या बाजूस इतक्या प्रचंड शिळांची भिंत दिसत होती कीं वर पाहिल्यास चक्कर यावी. शंभर–दीडशें फूट उंचीच्या त्या शिळा तुटलेल्या कड्याप्रमाणें दिसत होत्या आणि जरा पुढें गेलें कीं आपला मार्गच बंद होणार अशी भीति मनांत उत्पन्न होत होती. पण कसबी मानवानें या शिळांच्या कडे-कडेनेंच नागमोडी वळणानें रस्ता वरपर्यंत नेला आहे. आतां सूर्यास्त झाला होता; यामुळें उन्हाचा त्रास होण्याची भीति उरली नाहीं. तसेंच झाडी संपून मोठमोठ्या शिळांचा भाग सुरू झाल्यामुळें अंधाराचीहि भीति नव्हती. आतां वरचा किल्ल्यासारखा भाग जवळ दिसत होता तर खालचें जुनागड शहर अंधुक होऊं लागलें होतें. जिकडे तिकडे दाट झाडी पसरलेली होती. याच जंगलांत एके काळीं वनराज स्वैर विहार करीत असत ही कल्पना मनांत येतांच क्षणभर थरारल्या सारखें झालें.

## उपरकोटमधील जैन मंदिरें

गिरनारचा मुख्य भाग किल्ल्यासारखा असून त्याची तटबंदीहि कर-ण्यांत आलेली आहे. या भागांत डोंगर-पर्वतांचा उपयोग धार्मिक स्थळें या दृष्टीनेंच केला जातो.

नाहींतर किल्ला या दृष्टीनें गिरनारला सिंहगड किंवा रायगड या किल्ल्यापेक्षां मुळींच कमी महत्त्व मिळालें नसतें. मी सिंहगडावर अनेक वेळां चढलों आहे पण गिरनारवर चढतांना जितका थकवा मला आला तितका सिंहगडावर चढतांना कधींच आला नव्हता. यावरून गिरनारच्या चढणीची कल्पना येईल.

आम्ही किल्ल्यांत पोंचलों तेव्हां सात वाजले होते. ती नोव्हेंबरची ५ तारीख व आश्विन कृष्ण षष्ठी होती. अंधार चांगलाच पडला होता. अजून ५०० फूट चढाई बाकी उरली होती. परंतु शिखरावर राहाण्याची कांहीं सोय नव्हती म्हणून आम्ही तेथेंच धर्मशाळेंत रात्र काढून सकाळीं वर जाऊन येण्याचें ठरविलें. या भागाला उपरकोट किंवा कोट ( गड )

असें म्हणतात. येथें जैनांचीं खूप मोठीं व श्रीमंत मंदिरें आहेत. सर्वांत मोठें व महत्त्वाचें मंदिर जैनांचे बावीसावे तीर्थंकर नेमीनाथ स्वामींचें असून तें बाराव्या शतकांत बांधलेलें असावें असें म्हणतात. नेमीनाथ स्वामींची मूर्ति काळ्या संगमरवराची असून तिच्या अंगावर लाखों रुपयांचें जडजवाहीर असतें. सर्वसंगपरित्याग करून संन्यासी बनलेल्या या आपल्या तीर्थंकराला हिऱ्यामोत्यांनीं मढवून व त्यांसाठीं कडीकुलपांत बंदिस्त करून जैन धर्मीय लोक काळावर आणि आपल्या धर्मसंस्थापकांवर जणूं सूडच उगवीत आहेत असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

या खेरीज इ. स. ११७७ सालीं तेजपाल व वस्तुपाल यांनीं बांधलेलें १९ वे तीर्थंकर मल्लीनाथ यांचें देऊळहि विशेष प्रेक्षणीय आहे.

## गिरनारची परिक्रमा

देवदिवाळीपासून म्हणजे दिवाळीनंतर १० दिवसांनीं गिरनार पर्वताच्या प्रदक्षिणेची यात्रा सुरू होते. हिला गिरनारची परिक्रमा असें म्हणतात.

कार्तिक शुद्ध एकादशीला भवनाथाच्या मंदिरापासून ही सुरू होते आणि कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं भवनाथाच्या मंदिराजवळ येऊन ती संपते. या दिवसांत येथें चांगलीच कडाक्याची थंडी असते; परंतु तरीहि सुमारें वीसपंचवीस हजार यात्रेकरू या वेळीं तेथें जमतात आणि जय गिरनार! जय अंबे!! जय भवनाथ!!! अशा गर्जना घोषणा करीत सबंध गिरनारला प्रदक्षिणा घालतात. या वेळीं खूपच मोठी जत्रा येथें भरते. लोकगीतें ऐकावयास मिळतात. लोकनृत्यें पहावयास मिळतात आणि एक प्रकारें ग्रामीण सौराष्ट्राचें दर्शनच येथें घडतें.

या जैन मंदिरांच्या जरा वरच्या बाजूस जटाशंकर धर्मशाळा आहे. धर्मशाळेच्या बाहेरच पाण्याचें सुंदर कुंड आहे. आम्ही या धर्मशाळेंत रात्र घालवावयाचें ठरविलें. तेथें तीन चार प्रशस्त खोल्या आहेत. परंतु त्या दिवशीं परगांवांहून बरीच शाळकरी मुलें गिरनार पाहाण्यास आलीं होतीं आणि इतरहि कांहीं यात्रेकरू होते. यामुळें आम्हांला खोली न मिळतां व्हरांड्यांतच झोंपावें लागलें. तेथें अगदीं अल्प भाड्यानें गाद्या व रजया मिळतात. यामुळें अंथरण्या–पांघरण्याची चांगली व्यवस्था झाली.

जवळच एक हॉटेल आहे. तेथें पुरी भाजी खाऊन आम्ही झोंपी गेलों.

**मुख्य मंदिर जगदंबेचें**

उपरकोटपासून सुमारें ५०० फूट वर असलेलें अंबाबाईचें देऊळ हिंदूंच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

नवविवाहित वधूवरें या देवीच्या दर्शनाला येत असतात. हिला अंबाजी असें म्हणतात. (उत्तरेकडे 'जी' हा आदरार्थी शब्द पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि लावण्यांत येतो. यामुळें अंबाजी म्हणजे अंबादेवी.)

आपला भाऊ गिरनार याच्या संरक्षणासाठीं पार्वती स्वतः येथें येऊन राहिली. तीच ही अंबा. आम्ही पहांटेच वर चढून गेलों. त्या वेळीं आरती चाललेली होती. येथें देवीची नेहमींची मूर्ति नसून शेंदूर फासलेल्या दगडाला दोन चांदीचे डोळे लावून मूर्ति बनविलेली आहे. यावरून हें दैवत कदाचित् फार पुरातन व आदिवासींचें असावें असें मला वाटलें.

येथें आलें म्हणजे गिरनारची उंची संपते. येथून गिरनारची मागची बाजू दिसते आणि एक नवेंच अद्भुत दृश्य नजरेसमोर उभें राहातें. जवळ जवळ गिरनार इतकीच उंची असलेलीं तीन चार डोंगर-शिखरें एका मोठ्या पर्वतांतून कोरून काढल्याप्रमाणें रेखीव आकारांत दिसूं लागतात. सबंध गिरनार चढून येईपर्यंत या गिरिशिखरांचा मागमूसहि लागत नाहीं. यामुळें एखाद्या जादूनें तर ही नवी सृष्टि आपल्या समोर उभी राहिली नसेल ना असा क्षणभर भास होतो. सूर्योदयाची वेळ होती. मागून येणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या प्रभावामुळें एखाद्या मोठ्या कागदावर रेखाचित्र काढावें तसे ते डोंगर दिसत होते. या शिखरांना टुंक असें म्हणतात. तेथें गोरखनाथाची टुंक, दत्तात्रयाची टुंक व कालीमातेची टुंक अशीं तीन शिखरें दिसतात. शेवटचें शिखर अत्यंत अवघड असून तेथें बहुधा कोणी जात नाहीं. दत्तात्रेयाच्या शिखरापर्यंत बरेच लोक जाऊन येतात, पण त्यासाठीं खालीं उतरून पुनः वर चढावें लागतें आणि आम्ही अगदीं थकून गेलों होतों व वेळहि फार थोडा होता म्हणून आम्ही त्या शिखराचें दुरूनच दर्शन घेतलें आणि जड मनानें परत फिरलों.

●●●●

# जुनागड :                                                        १९

एखादें स्थान आधीं ज्या गोष्टीसाठीं प्रसिद्ध असतें ती गोष्ट कालांतरानें विस्मृतीच्या गर्तेत लुप्त होऊन जाते आणि नव्याच गोष्टींचें आवरण त्या स्थानाभोंवतीं पसरूं लागतें. जुनागडच्या बाबतींतहि ही गोष्ट विशेषेंकरून अनुभवास येते.

जुनागड ही सौराष्ट्राच्या प्राचीनतम राजधान्यांपैकीं एक. सौराष्ट्रांतील सर्वांत उंच डोंगराच्या-गिरनार पर्वताच्या (उंची ३६०० फूट) पायथ्याशीं वसलेल्या या नगरानें आतांपर्यंत अनेक नांवें धारण केलीं आहेत. प्रारंभीं त्याला मणिपूर असें म्हणत असत. त्यानंतर त्याला चंद्रकेतुपूर नांव मिळालें. त्यानंतर रेवतनगर व नंतर गिरिनगर. हळूहळू त्याला जीर्णदुर्ग असें संबोधण्यांत येऊं लागलें. त्याचेंच भाषांतर होऊन जुनागड हें नामाभिधान त्याला प्राप्त झालें. पण एवढ्यावर त्याची नामकरणप्रक्रिया संपली नाहीं. इ. स. १४७० सालीं गुजरातचा सुलतान मुहम्मद बेगडा यानें हें शहर जिंकून त्याला मुस्तफाबाद असें नांव दिलें. पण तें नांव कालाच्या प्रवाहांत वाहून गेलें आणि पूर्वींचें जुनागड हेंच नांव कायम राहिलें.

## पाकिस्तानी प्रचारानें प्रसिद्धि

हिंदु व जैन लोकांचीं मंदिरें असलेला सुप्रसिद्ध गिरनार पर्वत येथून जवळच आहे, सम्राट् अशोक, रुद्रदामन्, आणि स्कंदगुप्त यांनीं कोरलेले शिलालेख येथें आहेत, सबंध आशिया खंडांत सिंहाचें एकमेव निवासस्थान असलेलें गीरचें जंगल येथेंच आहे, परंतु अलीकडे जुनागडला जी प्रसिद्धि भारतांत व जगांत मिळालेली आहे तिचें कारण मात्र पाकिस्तानी प्रचार हेंच होय. हिन्दुस्तानच्या फाळणीच्या वेळीं जुनागडचा नबाब मोहब्बतखान यानें आपलें राज्य पाकिस्तानला जोडलें गेल्याचें जाहीर केलें. ही गोष्ट अर्थातच जुनागडच्या प्रजेला मान्य नव्हती. म्हणून तिनें नबाबाविरुद्ध बंड केलें. आरजी हुकुमत ( तात्पुरतें प्रतिसरकार ) स्थापन केली आणि

जुनागडवर चाल केली. त्याबरोबर नबाबसाहेब कराचीला पळून गेले आणि अशा प्रकारें १७४८ सालीं प्रस्थापित झालेली बाबी घराण्याची नबाबी सत्ता बरोबर दोनशें वर्षांनीं कायमची नष्ट झाली. सध्यां हे नबाबसाहेब पाकिस्तानांत काय करतात म्हणून मीं चौकशी केली तेव्हां त्यांनीं बरोबर नेलेली संपत्ति संपल्यामुळें कराचीला एक हॉटेल चालवीत आहेत असें मला कळलें. दुर्दैव बिचाऱ्याचें ! जनतेच्या इच्छाआकांक्षा ओळखून ते हिंदुस्तानांत राहिले असते तर इतक्या लौकर त्यांच्यावर भिकेला लागण्याची पाळी आली नसती ही गोष्ट कदाचित् त्यांनाहि आतां पटली असावी. पण पाकिस्तान मात्र अजूनहि आपल्या हिन्दविरोधी प्रचारामध्यें जुनागड व मानवदार संस्थानांचा उपयोग करीत असतें. हीं संस्थानें पाकिस्तानांत सामील झालेलीं असतांहि हिंदुस्ताननें तीं आपल्या ताब्यांत घेतलीं आहेत असा पाकिस्तानचा आरोप आहे. फाळणीनंतर नबाबाच्या मुसलमान गुंडांनीं कांहीं दिवसपर्यंत तेथील जनतेला खूपच त्रास दिला होता. आतां मात्र तेथें नबाबी सत्तेचा मागमूसहि उरलेला नसून तेथील मुस्लीम प्रजा गुण्यागोविंदानें नांदत असल्याचें मला दिसलें.

### उपरकोटमधील प्रेक्षणीय गोष्टी

गिरनारच्या पायथ्याशीं वसलेलें शहर मोठें मनोरम आहे. येथील रस्त्यांना उतार असल्यामुळें स्वच्छता भरपूर आढळते. शहरांतील घरांची व दुकानांचींहि दारें जुन्या काळच्या कोट–किल्ल्यांच्या दारांसारखीं जाडजूड व मजबूत आहेत. त्यावरून येथील जनतेला नबाबाच्या कारकीर्दींत सुरक्षितता वाटत नसावी असा सहज अंदाज करतां येतो. शहरामध्यें अनेक राजवाडे, मकबरे, देवळें वगैरे असून तेथील शिल्प स्थापत्य प्रेक्षणीय आहे. कांहीं महालांतून आतां सरकारी कचेऱ्या व शिक्षणसंस्था चाललेल्या आहेत. स्वामी नारायण मंदिराच्या छतावर ( आंतील बाजूस ) काढलेलीं जुन्या पद्धतीचीं चित्रें फारच सुंदर आहेत. परंतु जुनागडला पाहाण्याचें स्थान म्हणजे उपरकोट किंवा वरचा किल्ला हें होय. शहराच्या वरच्या बाजूस हा असून त्याचा तट अजून पुष्कळच चांगल्या स्थितींत आहे. हा किल्ला ग्रहरिपु नांवाच्या चुडासमा राजानें बांधला होता.

हा किल्ला भुईकोटच आहे. म्हणजे त्यांत प्रवेश करण्यासाठीं वर चढून जावें लागत नाहीं. आंत मात्र सर्वत्र जंगल वाढलेलें आहे.

किल्यांत प्रवेश करतांना दाराशींच मारुति व गणपति यांच्या दोन मोठ्या मूर्ती आहेत. त्यांपैकीं मारुतीच्या एका हातांत गदा असून दुसऱ्या हातांत एका स्त्रीच्या झिंज्या पकडलेल्या आहेत. मला त्याचा कांहींच अर्थ कळेना. म्हणून माझ्यासोबत आलेल्या गौरीभाई व तनाभाई या मित्रांना मीं त्या संबंधीं विचारलें. तेव्हां त्यांनीं एक मजेशीर दंतकथा सांगितली ती अशी—

पनोती नांवाची एक राक्षसीण होती. मारुतीचे पराक्रम ऐकून त्याच्याशीं आपलें लग्न व्हावें अशी इच्छा तिच्या मनांत उत्पन्न झाली. म्हणून ती त्याच्याकडे गेली आणि त्याला तिनें मागणी घातली. पण मारुति पडला बाल–ब्रह्मचारी. त्यानें तिच्या मागणीला विनयपूर्वक नकार दिला. त्याबरोबर ती खवळली आणि तिनें मारुतीवर हल्ला केला. अर्थात् मारुतिहि कांहीं बेसावध नव्हताच. त्यानें तिचा हल्ला परतवून तिला पायदळीं तुडविलें व तिच्या झिंज्या उपटल्या आणि तिला पराभूत केलें. तेव्हांपासून ही पनोती वाईट ग्रहांच्या रूपानें साऱ्या पुरुष जातीला छळत असते अशी इकडे समजूत आहे. अर्थात् त्या वेळीं हनुमानाची उपासना केली म्हणजे मात्र पनोतीचें कांहीं चालत नाहीं. (पनोती शब्दांचा गुजराती जोडणी कोशांतील अर्थ 'शनीची दशा, वाईट स्थिति' असा आहे.) अशा प्रकारच्या मारुतीच्या मूर्ती याच भागांत मला पाहायला मिळाल्या.

**अडीचडी ने नवघण कुवो ।**
**जे न जुए ई जीवतो मुवो ॥**

(अर्थः– अडीचडी व नवघण या विहिरी ज्यानें पाहिल्या नाहींत तो जिवंत असून मेल्यासारखाच आहे.)

उपरकोटमधील सर्वांत लक्षांत राहाण्यासारखीं स्थळें म्हणजे दोन प्रचंड विहिरी होत. इतक्या खोल, मोठ्या व पक्क्या बांधलेल्या विहिरी क्वचितच पाहायला मिळतात. यांतील एका विहिरीचें नांव 'अडीचडी वाव' असून दुसरीचें नांव 'नवघण कुवो' असें आहे. (अडीचडी म्हणजे चढायला अत्यंत त्रासदायक, वाव म्हणजे विहीर) अडीचडी विहीर

खूप खोल असून हिच्या पायऱ्या सरळ पाण्यापर्यंत जाऊन पोंचलेल्या आहेत. ही विहीर चूडासमा राजांच्या दासींनीं बांधली असें सांगतात. वरून पाण्याकडे पाहातांना डोळे फिरतात. 'नवघण कुवो' ही विहीर अडीचडी पेक्षांहि मोठी आणि शानदार आहे. अडीचडी आतां ढासळूं लागलेली आहे तर नवघण कुवो अजून उत्कृष्ट स्थितींत आहे. नवघण हें राजाचें नांव असून त्यानें ती विहीर बांधल्यामुळें तिला तें नांव देण्यांत आलेलें आहे.

विहिरीनंतर पाहावयाची गोष्ट म्हणजे दोन मोठ्या तोफा. यांपैकीं एकीचें नांव 'कडानाल' असून दुसरीचें नांव 'नीलम' किंवा 'लीलम' आहे. यापैकीं नीलम तोफ १७ फूट लांब असून तिचें वैशिष्ट्य म्हणजे सुलतान मुहम्मदाच्या आज्ञेवरून मलिक इयाझ नांवाच्या सरदारानें दीवच्या पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांचा पराभव करून ती मिळवून आणलेली आहे. ही तोफ तुर्की लोकांनीं तयार केलेली असून ती दीवमध्यें टाकून ते गेले होते. अर्थात् ज्यांनीं विजापूरची मुलुख मैदान (मलिकाए मैदान) तोफ पाहिली असेल त्यांना या 'नीलम'चें विशेष कौतुक वाटणार नाहीं.

उपरकोटमध्यें बौद्ध गुंफांचे अनेक भग्नावशेष पाहावयाला मिळतात. ते इतस्ततः इतके विखुरले आहेत कीं एका दमांत सगळे पाहाणें शक्य होत नाहीं. अर्थात् त्यांत कांहीं प्रेक्षणीय असेंहि उरलेलें नाहीं. इ. स. ३०० च्या सुमारास बांधलेला एक बौद्ध विहार येथें होता. त्यांतील कांहीं भाग दोन मजली, तीन मजलीहि होता. सर्व किल्लाभर शिताफळाच्या झाडांचें जणूं जंगल उगवलेलें आहे.

### 'नरसी मेहतानो चोरो'

जुनागडचें महत्त्व आणखी एका दृष्टीनें आहे. ती म्हणजे प्रसिद्ध गुर्जर संत व कवि नरसिंह मेहता यांची ही जन्मभूमि व कर्मभूमि आहे. मराठींत ज्ञानेश्वराचें जें स्थान आहे तेंच गुजरातींत नरसिंह (किंवा नरसी) मेहता यांचें आहे. गांवामध्यें नरसी मेहतांचें देऊळ आहे. त्याला 'नरसी मेहतानी चोरो' असें म्हणतात. चोरो म्हणजे मोठा ओटा, सर्वांनीं एकत्र जमावयाची गांवांतील जागा, चावडी, (पोलिसचौकी)! देऊळ सामान्यच

असून त्यांत नरसी मेहता व त्यांचें उपास्य दैवत श्रीकृष्ण यांच्या मूर्ती आहेत.

जुनागडचें आणखी एक आकर्षण म्हणजे ‘ रूपायतन ’ ही संस्था होय. येथून निघणाऱ्या ‘ प्यारा बापू ’ या गुजराती मासिकाबद्दल आणि या संस्थेबद्दल मीं पूर्वीं बरेंच ऐकलें होतें. यामुळें वेळांत वेळ काढून या संस्थेंत अवश्य जावयाचें असें मीं ठरविलें होतें.

गिरनारच्या पायथ्याशींच ( जुनागडपासून सुमारें दोन मैलांवर ) ही संस्था आहे. मुख्य रस्त्यापासून सुमारें पाऊण मैल आंत जावें लागतें. आम्ही सायंकाळच्या सुमारास तेथें पोंचलों. आपण एखाद्या निर्जन जंगलांतच आलों आहोंत असा आम्हांला भास झाला. वस्तुतः तें जंगल नसून एक फार मोठी आंबराई आहे. परंतु अनेक वर्षें तिच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें तिथें जंगल वाढल्याचा भास होतो.

रूपायतन संस्था तशी अगदीं लहान आहे. दोनचारच छोटेखानी इमारती तेथें आहेत. श्री. नवीन गांधी व धीरज गांधी हे भाऊ ती संस्था चालवीत असतात. त्यांच्यावर शांतिनिकेतन आणि सेवाग्राम या दोन्ही संस्थांचे संस्कार झालेले आहेत. आणि गांधी व टागोर यांच्या तत्त्वांचा व जीवनप्रणालीचा समन्वय साधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. गांधीजींनीं जीं तत्त्वें आचरणांत आणण्याचा उपदेश केला त्यांवर कलेचें पुट कसें चढवितां येईल याचा विचार त्या ठिकाणीं चालतो. ‘ प्यारा बापू ’ नांवाचें गुजराती मासिक तेथून प्रसिद्ध होतें. त्यांचा छोटासा छापखानाहि तेथेंच आहे. हातकागद तयार करणें, दीपक, खेळणीं, भांडीं वगैरे मातीच्या कलापूर्ण वस्तू बनविणें, मातीच्या व शाडूच्या मूर्ति तयार करणें वगैरे कामें तेथें चालतात. गांवांतील देवळांमध्यें सुंदर व कलापूर्ण अशा मूर्ती भग्न अवस्थेंत इतस्ततः पडलेल्या असतात. त्या मूर्ती आणून त्यांच्या आधारें नवीन उत्कृष्ट मूर्ति बनविण्याची नवीन कल्पना तेथें अमलांत आलेली पाहून मला गंमत वाटली.

आम्हांला अंधार पडण्यापूर्वीं गिरनावर पोंचावयाचें होतें म्हणून रूपायतनच्या मोहांत जास्त वेळ न गुरफटतां अतृप्त मनानें आम्हीं त्या अंबराईचा निरोप घेतला.

●●●●

# शत्रुंजय–जैनांची मंदिरनगरी : २०

## मंदिराच्या प्रेमांतून कलाकृति

भारतामध्यें जैन लोकांइतकें मंदिराचें प्रेम-किंबहुना वेड-इतर जमातींत क्वचितच पहावयास मिळतें. या प्रेमांतून अबू किंवा हळेबीडसारख्या अप्रतिम कलाकृति जरी थोड्याच निर्माण होत असल्या, तरी भारतीय शिल्पकलेच्या विकासामध्यें या मंदिरांचें फार मोठें स्थान आहे हें कबूल करावें लागेल. जैनांचीं अनेक तीर्थक्षेत्रें पर्वतांवर व टेकड्यावर वसलेलीं आहेत. आणि या टेकड्या-पर्वताचें स्वत:चें एक सौंदर्य असतें. यामुळें जेथें मंदिरांमध्यें कांहीं वैशिष्ट्य नसेल तेथें डोंगरांवरून दिसणाऱ्या सुंदर दृश्यांची मेजवानी तरी आपल्या डोळ्यांना हटकून चाखावयास मिळते. भारतामध्यें गिरनार, अबू, शत्रुंजय, संमेत शिखर व तरिंग हे पांच डोंगर जैन लोकांनीं पवित्र मानलेले आहेत. त्यापैकीं शत्रुंजय व गिरनार या स्थानांना भेट देण्याची संधि मला नुकतीच मिळाली आणि डोंगर चढून वर जातांना झालेले श्रम क्षणांत विसरून जाण्याइतका मोह वरून दिसणाऱ्या दृश्यांनीं माझ्या मनाला पाडला एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या वैशिष्ट्याची कल्पना येईल. भारतांत डोंगरांना तुटवडा नाहीं, पण त्यांपैकीं सर्वोत्कृष्ट डोंगर निवडणें या गोष्टीलाहि महत्त्व आहेत. या बाबतींतील सर्व श्रेय जैनधर्मीयांना दिलेंच पाहिजे.

## तीस मैल जायला रेल्वेला चार तास

'शत्रुंजय' हा शुद्ध उच्चार झाला. इतकी संस्कृतनिष्ठा सामान्य लोकांना कुठली ! त्यांनीं त्याचीं रूपें 'शेत्रुंजय' 'शेत्रुंजा' 'छेत्रुंजा' अशीं केलीं आहेत. यामुळें टांगेवाला 'छत्रुंजा' असेंच म्हणतो. हा शत्रुंजय डोंगर पालीताणा शहराच्या दक्षिणेस एक मैलावर आहे. पालीताणा

हें शहर भावनगर ( सौराष्ट्र ) पासून अवघें तीस मैल असून रेल्वेनें भाडें तेरा आणे पडतें. अर्थात् भावनगरला जातांना वाटेंत सिहोर नांवाचें जें जंक्शन् लागतें तेथूनहि पालीताण्याला जातां येतें आणि मुख्य रेल्वेमार्गावरील सोनगढ स्टेशनापासूनहि मोटारीनें जातां येतें. मी आधीं भावनगरला गेलों होतों म्हणून तेथूनच पालीताण्याला गेलों. मात्र या भागांतील वाहुतुकीचीं साधनें—विशेषतः रेल्वे इतकी अव्यवस्थित आहेत कीं या तीस मैलांच्या प्रवासासाठीं मला पहाटेपासून रात्रीपर्यंतचा संबंध दिवस खर्च करावा लागला. गाडी इतकी हळू चालते व वाटेंत इतका वेळ थांबते कीं तीस मैल जायला तिला चार तास लागतात.

## झाडझुडपांरहित शत्रुंजय डोंगर

पालीताण्यापासून शत्रुंजयच्या पायथ्यापर्यंत टांगे मिळतात. भाडें चार सहा आण्यापासून रुपाया दोन रुपयापर्यंत कितीहि असूं शकतें. पायथ्याशीं पोचल्यानंतर सुमारें दोन हजार फूट (१९७७ फूट) उंचीचा डोंगर समोर दिसूं लागतो. त्याच्यावर झाडेंझुडपें मुळींच दिसत नाहींत. क्वचितच एकादें बाभळीचें झाड असलें तर असावयाचें. असा हा खडकाळ डोंगर जैनांनीं कां पसंत केला असावा, अशी शंका मनांत येते. पण वर जाऊन पाहिल्यानंतर ही शंका आपोआप विरघळून जाते.

## सहा हजार अरुंद पायऱ्यांची चढण

मीं सकाळीं पावणे अकरा वाजतां ऐन उन्हांत डोंगर चढण्यास सुरवात केली. उन्हाचा खूप त्रास होईल असें वाटलें होतें, परंतु वेळेच्या अभावीं मला त्याच वेळीं डोंगर चढणें भाग होतें. या डोंगरावर चढण्यासाठीं नुकत्याच नवीन पायऱ्या बांधण्यांत आलेल्या आहेत. या पायऱ्यांची उंची पुरी साडेपांच इंचहि नाहीं. यामुळें वृद्ध व अशक्त लोकांना वर चढण्यास मुळींच त्रास होत नाहीं. अशा सुमारें सहा हजार पायऱ्या आहेत. पण त्या फारच पसरलेल्या असल्यामुळें त्या मानानें उंचीचा त्रास होत नाहीं.

मी गेलों तेव्हां चातुर्मासाचे दिवस होते. त्या दिवसांत जैन लोक यात्रा करीत नाहींत. यामुळें वर चढणारे फारसे कोणी नव्हते. डोंगरावर असणाऱ्या एका पेढीतील कारकून रोजचें टपाल घेऊन वर चालला होता.

## शत्रुंजय–जैनांची मंदिरनगरी : २०

### मंदिराच्या प्रेमांतून कलाकृति

भारतामध्यें जैन लोकांइतकें मंदिराचें प्रेम-किंबहुना वेड-इतर जमातींत क्वचितच पहावयास मिळतें. या प्रेमांतून अबू किंवा हळेबीडसारख्या अप्रतिम कलाकृति जरी थोड्याच निर्माण होत असल्या, तरी भारतीय शिल्पकलेच्या विकासामध्यें या मंदिरांचें फार मोठें स्थान आहे हें कबूल करावें लागेल. जैनांचीं अनेक तीर्थक्षेत्रें पर्वतांवर व टेकड्यावर वसलेलीं आहेत. आणि या टेकड्या-पर्वताचें स्वतःचें एक सौंदर्य असतें. यामुळें जेथें मंदिरां-मध्यें कांहीं वैशिष्ट्य नसेल तेथें डोंगरांवरून दिसणाऱ्या सुंदर दृश्यांची मेजवानी तरी आपल्या डोळ्यांना हटकून चाखावयास मिळते. भारतामध्यें गिरनार, अबू, शत्रुंजय, संमेत शिखर व तारिंग हे पांच डोंगर जैन लोकांनीं पवित्र मानलेले आहेत. त्यापैकीं शत्रुंजय व गिरनार या स्थानांना भेट देण्याची संधि मला नुकतीच मिळाली आणि डोंगर चढून वर जातांना झालेले श्रम क्षणांत विसरून जाण्याइतका मोह वरून दिसणाऱ्या दृश्यांनीं माझ्या मनाला पाडला एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या वैशिष्ट्याची कल्पना येईल. भारतांत डोंगरांना तुटवडा नाहीं, पण त्यांपैकीं सर्वोत्कृष्ट डोंगर निवडणें या गोष्टीलाहि महत्त्व आहेत. या बाबतींतील सर्व श्रेय जैन-धर्मीयांना दिलेंच पाहिजे.

### तीस मैल जायला रेल्वेला चार तास

'शत्रुंजय' हा शुद्ध उच्चार झाला. इतकी संस्कृतनिष्ठा सामान्य लोकांना कुठली! त्यांनीं त्याचीं रूपें 'शेत्रुंजय' 'शेत्रुंजा' 'छेत्रुंजा' अशीं केलीं आहेत. यामुळें टांगेवाला 'छत्रुंजा' असेंच म्हणतो. हा शत्रुं-जय डोंगर पालीताणा शहराच्या दक्षिणेस एक मैलावर आहे. पालीताणा

हें शहर भावनगर (सौराष्ट्र) पासून अवघें तीस मैल असून रेल्वेनें भाडें तेरा आणे पडतें. अर्थात् भावनगरला जातांना वाटेंत सिहोर नांवाचें जें जंक्शन् लागतें तेथूनहि पालीताण्याला जातां येतें आणि मुख्य रेल्वेमार्गावरील सोनगढ स्टेशनापासूनहि मोटारीनें जातां येतें. मी आधीं भावनगरला गेलों होतों म्हणून तेथूनच पालीताण्याला गेलों. मात्र या भागांतील वाहुतुकीचीं साधनें–विशेषतः रेल्वे इतकी अव्यवस्थित आहेत कीं या तीस मैलांच्या प्रवासासाठीं मला पहाटेपासून रात्रीपर्यंतचा संबंध दिवस खर्च करावा लागला. गाडी इतकी हळू चालते व वाटेंत इतका वेळ थांबते कीं तीस मैल जायला तिला चार तास लागतात.

## झाडझुडपांरहित शत्रुंजय डोंगर

पालीताण्यापासून शत्रुंजयच्या पायथ्यापर्यंत टांगे मिळतात. भाडें चार सहा आण्यापासून रुपाया दोन रुपयापर्यंत कितीहि असूं शकतें. पायथ्याशीं पोचल्यानंतर सुमारें दोन हजार फूट (१९७७ फूट) उंचीचा डोंगर समोर दिसूं लागतो. त्याच्यावर झाडेंझुडपें मुळींच दिसत नाहींत. काचितच एकादें बाभळीचें झाड असलें तर असावयाचें. असा हा खडकाळ डोंगर जैनांनीं कां पसंत केला असावा, अशी शंका मनांत येते. पण वर जाऊन पाहिल्यानंतर ही शंका आपोआप विरघळून जाते.

## सहा हजार अरुंद पायऱ्यांची चढण

मीं सकाळीं पावणे अकरा वाजतां ऐन उन्हांत डोंगर चढण्यास सुरवात केली. उन्हाचा खूप त्रास होईल असें वाटलें होतें, परंतु वेळेच्या अभावीं मला त्याच वेळीं डोंगर चढणें भाग होतें. या डोंगरावर चढण्यासाठीं नुकत्याच नवीन पायऱ्या बांधण्यांत आलेल्या आहेत. या पायऱ्यांची उंची पुरी साडेपांच इंचहि नाहीं. यामुळें वृद्ध व अशक्त लोकांना वर चढण्यास मुळींच त्रास होत नाहीं. अशा सुमारें सहा हजार पायऱ्या आहेत. पण त्या फारच पसरलेल्या असल्यामुळें त्या मानानें उंचीचा त्रास होत नाहीं.

मी गेलों तेव्हां चातुर्मासाचे दिवस होते. त्या दिवसांत जैन लोक यात्रा करीत नाहींत. यामुळें वर चढणारे फारसे कोणी नव्हते. डोंगरावर असणाऱ्या एका पेढींतील कारकून रोजचें टपाल घेऊन वर चालला होता.

त्याची सोबत मला मिळाली. त्यानें एक दोन ठिकाणीं मधले रस्ते (जुने) दाखविले. त्यामुळें पायऱ्यांचा त्रास थोडा वेळ चुकला.

ऐन दुपारची वेळ असली तरी थंडगार वारें झुळझुळ वहात होतें. यामुळें उन्हाचा त्रास फारसा झाला नाहीं, म्हणजे जाणवला नाहीं. मध्यें एक दोन ठिकाणीं थंड पाणी पिण्यास मिळालें. त्यामुळें उरलेली चढण उत्साहानें चढून गेलों.

## मुसलमान वाटाड्याचा सर्वत्र संचार

माझा वाटाड्या एक मुसलमान छोकरा होता. त्याचें नांव अकबरशाह अलीशाह. काळासांवळा अन् मोठा हुशार पोऱ्या होता. हरिजनांना आपल्या मंदिरांत प्रवेश न करूं देणारे जैन या मुसलमानाला आपल्या देवळांतून कसें हिंडूं देतात याबद्दल मला वाटलेलें आश्चर्य मीं त्याच्याजवळ व्यक्त करतांच तो म्हणाला, ‘ साहेब, मी दर्ग्याच्या सेवेला राहिलोंय. मी मांसमच्छर खात नाहीं म्हणून मला जैनांच्या मंदिरात जातां येतें. ’

म्हणजे मांसमच्छर खाणें हें पवित्र नाहीं अशी कल्पना मुसलमानांतहि रूढ आहे तर !

## पहिलें नमन अंगारशाह पिराला

शत्रुंजय डोंगरावर चढतांच प्रथम अंगार शाह पिराचा दर्गा लागतो. येथून खालच्या पालीताणा शहराचें व आसमंतांतील प्रदेशाचें दृश्य फारच सुंदर दिसतें. विशेषतः सपाट मैदानांतून एकाद्या रजत प्रवाहाप्रमाणें वाहणारी शत्रुंजी नदी तर मनाला मोहूनच टाकते.

## पीरानें अल्लाउद्दिनाला परतविलें

या अंगारशाहपिरासंबंधींची दंतकथा मोठी उद्बोधक आहे. असें सांगतात कीं अल्लाउद्दीन खिलजीनें शत्रुंजयावरील जैन मंदिरें उध्वस्त करण्यासाठीं या डोंगरावर चढाई केली होती. त्या वेळीं येथील मुस्लीम साधूनें त्याला असा निरोप पाठविला कीं “ क्या दीन क्या जैन, सब एक है ! तुम इन मंदिरोंको मत तोडो ! मैं इनका रखवाला हूँ । ” ( दीन म्हणजे धर्म, मुस्लीम धर्म ). पण धर्मांध अल्लाउद्दीनानें त्या महात्म्याचें म्हणणें ऐकलें नाहीं आणि आपलें सैन्य डोंगरावर चढविण्यास

सुरवात केली. त्याबरोबर पिरानें वरून फौजेवर अग्निवर्षाव केला. निखाऱ्यांच्या त्या माऱ्यापुढें अल्लाउद्दीनची फौज टिकाव धरूं शकली नाहीं आणि अशा प्रकारें शत्रुंजयाचें रक्षण झालें. तेव्हांपासून या पिराला 'अंगारशाह पीर' असें संबोधण्यांत येऊं लागलें.

## लाकडी पाळणे व अवयवांचा ढीग

मुस्लीम पीर व त्यांचे दर्गे यांनीं आमच्या जनजीवनांत किती खोलवर प्रवेश केला आहे, याची प्रचीति येथेंहि येतें. या पीरांवर चांदीचे अनेक लहानलहान पाळणे चढविलेले दिसत होते. लांकडी पाळण्यांची संख्या तर अगाणित होती. शेजारची एक खोलीच अशा छोट्या लांकडी पाळण्यांनीं भरली आहे. त्यासंबंधीं चौकशी करतां असें कळतें कीं ज्यांना मुलें होत नाहींत असे स्त्री-पुरुष येथें येऊन पिराला नवस मागून घेतात आणि मूल झाल्यानंतर त्याला एक पाळणा वाहतात. कोणी लांकडी तर कोणी सोन्याचांदीचा. तसेंच ज्यांचे हातपाय अधू असतात तेहि लोक नवस मागून घेतात आणि गुण आल्यानंतर लाकडाचे हातपाय करून पिराला वाहतात. असें शेंकडों हातपाय इथें पडलेले दिसले.

या भागांत मोर खूप आहेत. यामुळें मोरांच्या पिसांचेच झाडू सगळ्या देवळांतून पहावयास मिळतात.

## जिकडे पहावें तिकडे देवळेंच देवळें

अंगारशाह पीर पाहून झाल्यानंतर प्रत्यक्ष शत्रुंजयाच्या मंदिरनगरींत आपण प्रवेश करतों. जिकडे पहावें तिकडे देवळेंच देवळें दिसतात. याचें कारण जैनाचें मंदिरवेड हें तर आहेच, पण दुसरें कारण म्हणजे शत्रुंजय डोंगरावर देऊळ बांधणें हें अत्यंत मोठें पुण्यकार्य समजलें जातें. यामुळें ज्याला ज्याला शक्य असेल तो तो आपल्या नांवाचें एक देऊळ येथें बांधतो. या ठिकाणीं सुमारें नऊशें (८६३) देवळें आहेत. यावरून देवळांची किती गर्दी झाली असेल याची कल्पना येईल. यापैकीं कांहीं देवळें ११ व्या शतकांतील आहेत असें सांगण्यांत येतें. परंतु त्यांत फारसें तथ्य नाहीं. कारण १४ व्या १५ व्या शतकांतील मुस्लीम आक्रमकांनीं येथील बहुतेक मंदिरें धुळीस मिळविलीं होतीं. यामुळें हीं मंदिरें १६ व्या शतकापासूनचीं आहेत असें समजण्यास हरकत नाहीं.

## मंदिरांत कला व सौंदर्य नाहीं

येथील मंदिरामध्यें कला किंवा सौंदर्य यांचा मात्र अभावच जाणवतो. आपल्या ऐश्वर्याचें प्रदर्शन करण्याच्या भरांत आपण कलेची हानि करीत आहोंत याची कल्पनाहि येथें देवळें बांधणाऱ्या शेठजींना येत नसावी असें दिसतें. कलारसिकाला वाटतें. 'काय हा पैशाचा अपव्यय!' बाकी पुण्यप्राप्तीचा सोस भारतीयांमध्यें इतका भयंकर आहे कीं त्यामुळें इतर मूल्यें कःपदार्थ होऊन जातात.

## मोतीशाह शेठनी टूक

पूर्वीं या डोंगराचे दोन भाग पडलेले होते. मध्यें एक खिंड होती. तिला 'कूतासन गाळा' असें म्हणत. या खिंडीमध्यें वरून पाहिल्यास हत्तीहि चिमणीएवढा बारीक दिसे असें म्हणतात. डोंगरावर नवीन देऊळ बांधण्यास जागा शिल्लक उरली नाहीं, तेव्हां या खिंडीचा उपयोग करण्याचें एका मोठ्या धनिकानें ठरविलें. त्याचें नांव मोतीशाह. त्यानें आपल्या दिवाणजीला सांगितलें, 'आ गाळाने तमे पाणाथी न भरी शको तो नाणाथी भरी दो.' (ही खिंड दगडांनीं भरता आली नाहीं तर नाण्यांनीं भरून टाका.) त्याप्रमाणें अक्षरशः लाखों रुपये खर्च करून ही खिंड भरण्यांत आली. हें काम करीत असतां १३ हजार रुपयांची नुसती दोरीच लागली असें अकबर शाह सांगत होता. त्यांत अतिशयोक्ति नसावी. आतां त्या ठिकाणीं मोतीशाहची टूक (टूक म्हणजे शिखर) आहे आणि दोन्ही डोंगर एकमेकांना जोडले गेले आहेत.

## तुम्ही पापी कीं पुण्यवान् पहातां येतें

आपण पुण्यवान् आहोंत कीं नाहीं हें तपासून घेण्याची सोयहि येथें करण्यांत आलेली आहे. उभ्या सांडणीची (उंटीण) एक दगडी मूर्ति आहे. तिच्या पायाखालून जो जाईल तो पुण्यवान् असें समजलें जातें. पापी माणसाला त्या लहानशा जागेंतून पलीकडे जातां येत नाहीं. मी त्या सांडणीच्या पोटाखालून सहज पलीकडे गेलों आणि अकबरशाहाला विचारलें, 'काय रे, तुझासुद्धां या जादूवर विश्वास आहे काय?' तो नुसता हंसला.

## चौमुखजीचें भव्य मंदिर

येथें महत्त्वाचीं अशीं चार पांच देवळें आहेत. त्यांतील आदिस्वरदेवाचें देऊळ सर्वांत मोठें असून त्याच्यासमोर पुंडरीक आहे. शांतिनाथाचें देऊळ सुरेख असून देवळाजवळ उत्तम कलाकुसर पहावयास मिळते. त्याखेरीज आदिनाथ, कुमारपाल, विमलशाह, संप्रीतिराजा वगैरे अनेक तीर्थंकरांचीं देवळें तेथें आहेत. आदिस्वराच्या देवळांत हिरेमाणकांचा खूप मोठा संग्रह आहे. तो विशिष्टप्रसंगीं पहावयास मिळतो. चौमुखजीचें मंदिर माझ्या विशेष ध्यानांत राहिलें, कारण तेथील मूर्तीला चार तोंडें असून तीं चांगलीं मोठीं आहेत. चार बाजूस चार प्रवेशद्वारें असून प्रत्येक बाजूस देवाचें तोंड येतें. या मंदिराचा सभामंडप चांगला प्रशस्त आहे.

अशा प्रकारें बराच वेळ फिरत मीं मुख्य मुख्य मंदिरें पाहिलीं आणि ऊन्ह असतांनाच खालीं उतरलों. चढतांना सुमारें सव्वा तास लागला होता, उतरतांना एक तास लागला. मात्र उतरण्यापूर्वीं पुनः एकदां अंगारशाहपिराजवळून खालीं दिसणाऱ्या मनोहर प्रदेशाचें डोळे भरून दर्शन घेतल्याशिवाय मी राहिलों नाहीं. शत्रुंजयावरील देवळांचीं चित्रें पुसून जातील, पण शत्रुंजय नदीची रजतधारा मात्र कधींच स्मृतिपटावरून पुसली जाणार नाहीं.

••••

## रमणीय, तसेंच उद्यमशील शहर

# मोरवी : २१

### मोरवीचें दुहेरी आकर्षण

वस्तुत: भारत सरकारनें प्रसिद्ध केलेल्या ' भारत पहा ' ( See India ) पुस्तिकामालेंतील ' मुंबई व सौराष्ट्र ' या पुस्तिकेंत मोरवी ( गुजराती ' मोरबी ' ) शहराचा उल्लेख आलेला नाहीं. त्यामुळें तें फारसें प्रेक्षणीय नसावें असा कोणाचाहि समज होणें साहजिक आहे. त्याप्रमाणें माझाहि तसाच समज झालेला होता. पण तरीहि मला तेथें जाण्याची उत्सुकता लागून राहिलेली होती. त्याचीं कारणें दोन. एक असें कीं, ज्यांनीं माझा सौराष्ट्रांतील दौरा आंखून ठिकठिकाणीं माझी सोय केलेली होती ते गुजरातीचे प्रसिद्ध कवि व कथाकार श्री. नाथालाल दवे हे तेथें रहात होते. आणि दुसरें म्हणजे, मोरवीच्या गणपुल्यांच्या ' परशुराम पॉटरी वर्क्स 'संबंधीं ज्या ज्या वेळीं मराठी वृत्तपत्रांतून मी कांहीं वाचीत असे त्या त्या वेळीं आधींच व्यापारउदिमांत मागासलेल्या महाराष्ट्रांतील एका गृहस्थांनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या व उद्यमशीलतेच्या जोरावर, उद्यमप्रवीण गुर्जरांच्या प्रदेशांत जाऊन कारखाना काढला आणि तो नांवारूपाला आणला, याबद्दल मला मोठें कौतुक वाटत असे. त्यामुळें सौराष्ट्रांत जाण्याचें ठरतांच मोरवीचा कार्यक्रम मीं निश्चित करून टाकला. श्री. नाथालाल दवे यांची नि माझी ओळख पन्हाळ्याच्या ' लिटररी वर्कशॉप 'मध्यें झालेली होती. इतका सज्जन, मनमिळाऊ, सच्चा (सिन्सिअर) आणि कलाप्रेमी साहित्यिक क्वचितच पहायला मिळतो.

### रुक्ष प्रदेशांतील रम्य नगर

विरमगामपासून राजकोटकडे जातांना ८७ मैलांवर वांकानेर हें जंक्शन लागतें. तिथून नवलखी बंदरापर्यंत ४६ मैलांचा एक लहानसा रेल्वे-फांटा

आहे. या नवलखी बंदरांतूनच फेरीबोटीनें सुप्रसिद्ध कंडला बंदराला व तेथून कच्छमध्यें जायला मार्ग आहे. यामुळेंच या छोट्या फांट्यावर खूप गाड्या दौडत असतात. या रस्त्यावर बांकानेरपासून १८ मैलांवर मोरवी हें जंक्शन आहे. मोरवी हें उद्योगधंद्याचें ठिकाण असल्यामुळें बांकानेर ते मोरवी ये-जा करणाऱ्याहि तीन गाड्या आहेत. या बांकानेर स्टेशन-वरील पेढे फार प्रसिद्ध आहेत. त्यांची चव तर वेगळी आहेच, पण त्यांचा आकारहि सामान्य पेढ्यापेक्षां वेगळा असतो.

इथली गाडीहि लक्षांत रहाण्यासारखी छोटेखानी आहे. तीन अरुंद डबे असतात तिला; अन् पुढें तेलावर चालणारें इंजिन.

बांकानेरलाहि 'परशुराम पॉटरी वर्क्स'ची शाखा असून तेथें संडास, मुऱ्या वगैरेसाठीं लागणारें सामान ( Sanitary ware ) व कौलें तयार होतात. आगगाडींतून जातांना ही फॅक्टरी आपल्याला सहज दिसूं शकते.

हा भाग अत्यंत रुक्ष आणि ओसाड वाटतो. जुन्या संस्थानी राजवटींत शेती व पाटबांधारे यांच्याकडे विशेष लक्ष न दिलें गेल्यामुळें सारें माळरान ओकेंओकें पडलेलें दिसतें.

तीन स्टेशनें सोडलीं कीं चौथें स्टेशन येतें नझरबाग. हें स्टेशन मुख्यतः परशुराम पॉटरी वर्क्सच्या सोईसाठींच बांधलेलें आहे. या स्टेशनच्या आवारांतच ही फॅक्टरी आहे. येथून दोनच मैलांवर मोरवी स्टेशन आहे. नझरबागेपासून मोरवी शहर सुरू होतें आणि ओसाड माळ पाहून कंटाळलेल्या डोळ्यांना जरा चांगलें दृश्य पहायला मिळतें.

## दोन घोडे व दोन बैल

गांवांत प्रवेश करीत असतां आगगाडींतून चार अत्यंत उत्कृष्ट कला-कृती आपल्याला पहायला मिळतात. रेल्वे-रस्त्याच्या मच्छु नदीवरील पुलावर चार जनावरें आहेत. त्यांपैकीं दोन घोडे असून दोन बैल आहेत. हे पशु लोखंडी ( कीं ब्रॉंझचे ? ) असून त्यांच्यांतील जिवंतपणा ते पहा-णाऱ्याला आकर्षून घेतो. घोडे जणूं मुक्त संचार करायला निघाले आहेत आणि बैल—किंवा सांड—टक्कर घेण्याच्या किंवा ढुशी मारण्याच्या तयारींत आहेत ! त्यांच्या स्नायूंतील सामर्थ्य आणि डोळ्यांतील तरतरी आपल्याला

इतकी जाणवते कीं, आपण खरोखरीचेच घोडे–बैल पहात आहोंत असा भास होतो. पूर्वींच्या संस्थानी राजवटींत जनावरांचे हे पुतळे परदेशांतून आणून येथें उभे केलेले आहेत. आपल्या देशांत इतके आकर्षक पुतळे करतां येतील कीं नाहीं हें अजमावून पहाण्यासारखें आहे.

**भक्त नसलेलें ' मणि–मंदिर '**

स्टेशनपासून जवळच ' मणि–मंदिर ' नांवाचें सुंदर मंदिर आहे. तेथील राधाकृष्णाच्या मूर्ती खरोखरीच प्रेक्षणीय आहेत मंदिराची बांधणीहि मोठी शानदार आहे. देवाच्या पूजा-आरती वगैरेची चांगली सोय आहे. पण येथें भक्तांचीच उणीव फार आहे. याचें कारण असें कीं, या मंदिराची उत्पत्ति फार चमत्कारिक पद्धतीनें झालेली आहे. येथील एका राजानें आपल्या मणिबाई नांवाच्या रखेलीच्या स्मरणार्थ हें मंदिर बांधून त्याला 'मंणि-मंदिर' असें नांव दिलेलें आहे. आतां आपल्या देशांत कान्होपात्रेच्या भक्तीचें गुणगान करणारे लोक कितीहि असले तरी एका सामान्य रखेलीच्या नांवानें बांधलेल्या देवळांत जायला भाविक माणूस तयार होणार नाहीं, ही गोष्ट त्या राजाच्या लक्षांत आली नसावी. शिवाय राजवाड्यासारख्या मोठ्या अशा या मंदिरांत समोरच्या बाजूला सरकारी खजिना असल्यामुळें तेथें नेहमीं संत्र्यांचा पहारा असतो. अशा जागीं सामान्य भक्त सहसा कसा जाणार ? सत्तेच्या आणि संपत्तीच्या जोरावर मंदिर बांधतां येईल; पण त्या मांदिराला भक्त मिळतीलच असें नाहीं, ही गोष्ट या देवळावरून चटकन् लक्षांत येते.

**प्रेक्षणीय झुलता पूल**

येथील मच्छु नदीवरील झुलता पूल हा विशेष प्रेक्षणीय आहे. जवळजवळ दीड–दोन फर्लांग रुंदीचा हा अंधांतरीं लटकणारा पूल दोन्ही तीरांवर जाडजूड तारांनीं आवळलेला आहे. प्रत्यक्ष पुलाची रुंदी फार कमी आहे आणि खालीं घातलेल्या फळ्या पुष्कळच ढिल्या झालेल्या आहेत. शिवाय या ठिकाणीं नदीचें पात्र डोळे फिरण्याइतकें खोल आहे. यामुळें या पुलावरून जातांना सामान्य माणसाला भीति वाटल्याशिवाय रहात नाहीं.

अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:

## परशुराम पॉटरी वर्क्स

मोरवीला थांबण्यांत तेथील कांचसामान व चिनी मातीचीं भांडीं वगैरे तयार करणारा श्री. गुणपुले यांचा ' परशुराम पॉटरी वर्क्स ' हा कारखाना पहाणें हाहि माझा एक उद्देश होताच. त्यामुळें तेथील एका महाराष्ट्रीय गृहस्थांबरोबर हिंडून सगळा कारखाना व्यवस्थित पाहून घेतला. कंदिलाच्या कांचा, पेले वगैरे कांचमाल विशेष आकर्षक किंवा वैशिष्ट्यपूर्ण वाटला नाहीं. पण हें त्या कारखान्याचें वैशिष्ट्य नसून, चिनी मातीच्या विशिष्ट प्रकारच्या विटा ( Refractories ) किंवा असेंच सामान तयार करणें हें त्याचें वैशिष्ट्य आहे. ज्या ठिकाणीं अत्यंत अधिक उष्णता वापरली जाते तेथील भट्टयांना सामान्य विटा वापरल्यास त्या जळून किंवा वितळून जातील; म्हणून विशिष्ट प्रकारच्या उष्णता सहन करणाऱ्या विटा वापराव्या लागतात, त्या येथें तयार होतात. विजेच्या वहातुकीसाठीं लागणारीं उपकरणें तयार करण्याचें कामहि आम्ही गेलों तेव्हां तेथें चालू होतें. अर्थात् अशा प्रकारचे कारखाने देशांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. परंतु महाराष्ट्रीय गृहस्थांनीं परप्रांतांत जाऊन चालविलेला कारखाना, या दृष्टीनें याचें महत्त्व आम्हां महाराष्ट्रीयांना विशेष वाटतें.

कारखान्याचे संचालक श्री. अंतूभाई गणपुले हे खूप उत्साही असून स्थानिक गुजराती लोकांमध्यें त्यांच्याबद्दल चांगली आदराची व विश्वासाची भावना असल्याचें मला दिसून आलें.

## ग्रामीण विकासाचें ओझरतें दर्शन

या शहराची आंखणी फार व्यवस्थित झालेली असून सोय आणि सौंदर्य यांची दृष्टि त्यांत आहे. यामुळें सौराष्ट्रांतील दोन सर्वांत सुंदर शहरांत त्याची गणना होते : एक पोरबंदर आणि दुसरें मोरवी. गांवांतील बाजारभाग व इतर वस्ती हीं आंखीव रस्त्यांच्या कडेनें वसलेली आहे. बाजार-रस्ता तर चांगला ऐसपैस आहे. यामुळें तेथून जातांना विशेष प्रशस्त वाटतें. तेथील राजवाडे चांगले प्रेक्षणीय आहेत. पूर्वीच्या राजांनीं जे अनेक राजवाडे बांधून ठेवले आहेत त्यांचा उपयोग लोकशाही जमान्यांत शिक्षण-संस्थांना व अन्य समाजोपयोगी संस्थांना होत आहे. सबंध

सौराष्ट्रभर इतके राजवाडे मोकळे पडलेले आहेत कीं, शाळा-कॉलेजांना नव्या इमारती बांधण्याची सध्यां तरी तेथें जरूर भासत नाहीं. मोरवीचें इंजिनिअरिंग कॉलेज एका राजवाड्यांतच आहे. तेथील 'वाघमहाल' प्रेक्षणीय आहे. तेथें मोरवी संस्थानचें सेक्रेटरीएट होतें. अशा प्रकारच्या इतरहि अनेक इमारती येथें पाहाण्यासारख्या आहेत.

पण येथें असतांना मला एक मोठी चांगली संधि मिळाली, ती म्हणजे येथील विकास-योजनेंतील स्त्रियांची एक रात्र-शाळा पहाण्याची. अर्थात् तिला रात्र-शाळा म्हणण्यापेक्षां साक्षरतेचा वर्गच म्हणणें जास्त बरोबर होईल. कारण तिचा मुख्य उद्देश स्त्रियांना अक्षरज्ञान करून देणें हाच आहे. दहा वर्षांच्या मुलीपासून पंचवीस तीस वर्षांच्या बाईपर्यंत सर्व वयाच्या स्त्रिया त्या वर्गांत होत्या. अर्थात् त्यांतल्या बहुतेक सगळ्या विवाहित होत्या हें सांगायला नकोच! त्या छोट्याशा गांवीं शिक्षणाची इतकी आवड उत्पन्न झालेली आहे कीं, शाळेची छोटी इमारत अपुरी पडल्यामुळें दोन पाळ्या कराव्या लागतात.

मी गेलों त्या वेळीं सुगीचा हंगाम होता. दिवसभर थकूनभागून आलेल्या त्या बायकांना परत शेतावर जायचें होतें. पण मधल्या वेळांत त्या शाळेला आलेल्या होत्या. कांहींजणी तर वर्ग संपण्यापूर्वींच शेताकडे निघून गेल्या पण वर्गांत चाललेला कार्यक्रम सोडून जातांना त्यांच्या जिवावर आलें होतें हें स्पष्ट दिसत होतें. त्यांच्याकडून मीं कांहीं गाणीं ऐकलीं तेव्हां त्यांनीं मलाहि एखादें भजन म्हणून दाखविण्याचा निर्भयपणें आग्रह केला. मीं त्यांना 'उठ, जाग मुसाफिर भोर भई' हें गाणें गाऊन दाखविलें तें त्यांना इतकें आवडलें कीं, तें लगेच लिहून देण्याबद्दल त्यांनीं लकडा लावला. माझे मित्र श्री. नाथालाल दवे यांनी त्यांना तें लिहून देण्याचें आश्वासन दिलें, तेंव्हांच आमची सुटका झाली. येथील मुख्य विकास–अधिकारीहि मोठे उत्साही दिसले.

● ● ● ●

REFBK-0009738
REFBK-0009738